लोकलेखा समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ च्या नागरी अहवालामधील नियोजन विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१)

तेरावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहास
दिनांक ऑगस्ट, २०१६ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
ऑगस्ट, २०१६

लोकलेखा समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ च्या नागरी अहवालामधील

नियोजन विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१)

तेरावा अहवाल

एचबी ११५५—१

लोकलेखा समिती
(२०१५-२०१६)

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(५) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.
(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.
(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(९) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.
(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.
(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(१२) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.
(१३) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.
(१४) श्री. वैभव नाईक, वि.स.स.
(१५) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.
(१६) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स.
(१७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.
(१८) श्री. जयंत पाटील, वि.स.स.
(१९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(२०) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.
(२१) श्री. जयंत पाटील वि.प.स.
(२२) श्री. सुनिल तटकरे, वि.प.स.
(२३) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.
(२४) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.
(२५) श्री. संजय दत्त, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक १ मे २०१५ रोजी विधानसभा व दिनांक २१ मे २०१५ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठित करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव
(३) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार
(४) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(५) श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव
(६) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि. अ.
(७) श्री. सो. न. सानप, अवर सचिव
(८) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी
(९) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ च्या नागरी अहवालामधील नियोजन विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१) विचार करून लोकलेखा समितीचा तेरावाअहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक १ ऑक्टोबर, ४, २४ नोव्हेंबर, २०१५ व दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजीप्रधान सचिव, ग्रामविकास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, पाणीपुरवठा व स्वच्छता, सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान), शालेय शिक्षण, अन्न व नागरी पुरवठा, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम, रोजगार हमी योजना, जलसंधारण विभाग व विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरून बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट 'अ' मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट 'ब' मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीच्या उप समिती-१ ने दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी प्रारूप अहवाल तयार करून विचारात घेतला.

समितीने दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारूप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन :
मुंबई/नागपूर,
दिनांक ४ ऑगस्ट, २०१६.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	(पाच)
(१)	**नियोजन विभाग**	१
	(परिच्छेद क्र. ४.१.६)	
	(परिच्छेद क्र. ४.१.९)	
(२)	**उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग**	३
	(परिच्छेद क्र.४.१.७)	
	(परिच्छेद क्र.४.१.८.४)	
(३)	**ग्रामविकास विभाग**	५
	(परिच्छेद क्र. ४.१.७.१)	
	(परिच्छेद क्र.४.१.७.२)	
	(परिच्छेद क्र.४.१.८.४)	
	(परिच्छेद क्र.४.१.९.२)	
	(परिच्छेद क्र.४.१.११)	
(४)	**सार्वजनिक आरोग्य विभाग**	१३
	(परिच्छेद क्र. ४.१.८.१)	
(५)	**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभाग**	२४
	(परिच्छेद क्र.४.१.८.२)	
(६)	**पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग**	२६
	(परिच्छेद क्र.४.१.८.३)	
(७)	**अन्न व नागरी पुरवठा**	२९
	(परिच्छेद क्र.४.१.८.५)	
(८)	**सार्वजनिक बांधकाम विभाग**	३०
	(परिच्छेद क्र.४.१.९.१)	
(९)	**नियोजन (स्था.वि.निधी, रोहयो) व ग्रामविकास विभाग**	३३
	(परिच्छेद क्र.४.१.९.२)	
(१०)	**सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान)**	३४
	(परिच्छेद क्र.४.१.११)	
(११)	**शालेय शिक्षण विभाग**	३६
	(परिच्छेद क्र.४.१.८.२)	
(१२)	**नगरविकास विभाग**	३९
	(परिच्छेद क्र.४.१.९.३)	
	(परिच्छेद क्र.४.१.११)	

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.४.१ " गोंदियाची जिल्हा केंद्रीत लेखापरीक्षा " यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत :—

" नियोजन "

१९९२ मध्ये केलेल्या घटनेच्या ७४ व्या दुरुस्तीने जिल्ह्यातील पंचायती व नगरपालिका यांनी केलेल्या योजनांचे एकत्रिकरण करून आरोग्य, शिक्षण, सिंचन, इमारती व रस्ते इत्यादी असे सर्व कार्यक्रम एका एकात्मिकृत जिल्हा योजनेमध्ये समावेश करण्यासाठी एक जिल्हा नियोजन समिती(डीपीसी) स्थापन करणे आदेशित केले आहे. याशिवाय स्थानिक व्यवस्थापनाचे तिनही स्तर जसे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा गट व ग्रामपंचायती यांनी वार्षिक कृती योजना (एएपी) प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरूवातीला तयार करावयाची होती आणि वार्षिक कृती योजनेचा भाग असल्याशिवाय कुठलेही काम हाती घ्यावयाचे नव्हते.

अभिलेखांच्या लेखापरिक्षणातील छाननीवरून असे उघडकीस आले की, जरी जिल्हा नियोजन समिती मार्च, १९९९ मध्ये स्थापन करण्यात आली तरी जिल्ह्याच्या एकूण विकासासाठी एक पंचवार्षिक प्रमाणबद्ध योजना तयार केली गेली नाही. जिल्हा नियोजन समितीने जिल्ह्यातील पंचायती व नगरपालिकांनी तयार केलेल्या योजनांचे एकत्रिकरण करून एक एकात्मिकृत योजना तयार केली नव्हती. तथापि, गट व जिल्हा स्तरावर वार्षिक कृती योजना तयार केल्या होत्या.

प्रमाणबद्ध योजना व एकात्मिकृत जिल्हा योजना यांच्या अभावि आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, सिंचन, इमारती व रस्ते इत्यादी विविध कार्यक्रमांकरिता गट व ग्रामपंचायती यांच्याकडून निविष्टी तसेच समाजाच्या जाणिवलेल्या गरजा आणि जिल्ह्यातील विविध भाग व जाती जमातीमधील विषमता अज्ञात व न मिटलेली अशी राहिली.

जिल्हा आरोग्य संस्थेला (डी. एच. एस.), शासनाच्या निम्नस्तरांकडून मिळालेल्या निविष्टीवरुन जिल्ह्यांकरिता एक प्रमाणबद्ध योजना व वार्षिक योजना तयार करावयाच्या असतात. तथापि, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनच्या (एन. आर. एच. एम.) घटकांसाठी प्रमाणबद्ध योजना तयार करण्यात आली नाही.

तसेच जिल्हा शिक्षण अधिकाऱ्याला सर्व शिक्षा अभियान (एस. एस. ए.) अंतर्गत प्राथमिक शिक्षण देण्यासाठी एक एकत्रित प्रमाणबद्ध योजना तयार करायची असते. तथापि, जिल्हा शिक्षण अधिकाऱ्याने २००६-११ यामध्ये कालावधीत योजना तयार केली नाही.

निकास परीषदेत असे नमूद करण्यात आले (नोव्हेंबर, २०११) की एक सविस्तर उत्तर लवकरच सादर करण्यात येईल.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

शासन निर्देशानुसार जिल्ह्याकरीता वार्षिक तसेच पंचवार्षिक योजना तयार केली जाते. गोंदिया जिल्ह्याची सन २००६ ते २०११ या कालावधीकरिता प्रत्येक वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजना तयार करण्यात आली असून त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

इतर विकास कार्यक्रम व रोजगार निर्मिती

विधानसभा/विधानपरिषद सदस्य, स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम

विधानसभा/विधानपरिषद सदस्य, स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमाखाली, लोकांच्या स्थानिक गरजांवर आधारलेली विकासाची कामे, विविध यंत्रणा/विभाग यांच्याद्वारे कार्यान्वित करण्यासाठी संबंधित विधानसभा/विधानपरिषद सदस्यांच्या विधानसभा मतदार संघात, संबंधित विधानसभा/ विधानपरिषद सदस्यांच्या शिफारशीवरुन घ्यावयाची असतात. लेखापरीक्षा छाननीत खालील गोष्टी उघडकीस आल्या.

निधीचा वापर न करणे

शासनाने प्रत्येक विधानसभा मतदार संघासाठी विधानसभा/विधानपरिषद सदस्य स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमाचा निधी रुपये ८० लाखापासून रुपये १ कोटीपर्यंत वाढविला (२००७-०८) विधानसभा/विधानपरिषद सदस्य, स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या कामासाठी अर्थसंकल्पीय तरतूद आणि २००६-११ या कालावधीत त्यावरील खर्च आणि कामांची लक्ष्ये व साध्ये तक्ता **क्र. १५** मध्ये दर्शविल्याप्रमाणे होते.

तक्ता क्र. १५ विधानसभा/विधानपरिषद सदस्य स्थानिक क्षेत्र विकास निधीचा वापर

(रुपये कोटीमध्ये)

कालावधी	ज्यांचा हिशेब ठेवला आहे अशा विधानसभा/विधानपरिषद सदस्यांची संख्या	तरतुद	खर्च	वापराची टक्केवारी
२००६-०७	६	५.५१	४.१६	७५
२००७-०८	६	६.४७	५.७२	८८
२००८-०९	६	६.२१	४.७६	७७
२००९-१०	६	७.५३	५.३८	७१
२०१०-११	६	८.३२	३.५९	४३
	एकूण . .	३४.०४	२३.६१	

सन २००६-११ दरम्यान तरतूद केलेल्या निधीचा उपयोग करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी काही परिणामकारक पाऊले उचलली नाहीत, ज्यामुळे कार्यक्रमाचे पूर्ण लाभ मिळू शकले नाहीत. जिल्हा नियोजन अधिकारी (डीपीओ) यांचेजवळ २०१०-११ वर्षात दिलेली कामे, पूर्ण झालेली/ अपूर्ण राहिलेली कामे आणि सुरू न झालेली कामे याबद्दल काहीही माहिती नव्हती.

उत्तरादाखल डी. पी. ओ. यांनी नमूद केले (ऑगस्ट, २०११) की संबद्ध माहिती कार्यान्वयन करणाऱ्या यंत्रणेकडून प्राप्त व्हावयाची होती.

निकास परिषदेत असे नमूद करण्यात आले की सध्याची स्थिती दाखविणारा अहवाल लवकरच सादर करण्यात येईल. तथापि, कार्यक्रमाचे पूर्ण लाभ जिल्ह्यातील सामान्य लोकांपर्यंत पोचले नाहीत ही वस्तुस्थिती कायम राहते.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २००६-०७ ते २०१०-११ या कालावधीत प्राप्त तरतूद व खर्चाबाबतची माहिती खालीलप्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे :—

जिल्हा- गोंदिया (रुपये कोटीमध्ये)

कालावधी	ज्यांचा हिशेब ठेवला आहे अशा विधानसभा/ विधानपरिषद सदस्यांची संख्या	प्राप्त तरतूद	झालेला खर्च	टक्केवारी
२००६-०७	६	५.५१	४.१६	७५
२००७-०८	६	६.४७	५.७२	८८
२००८-०९	६	६.२१	४.७६	७७
२००९-१०	६	७.५३	५.३८	७१
२०१०-११	६	९.७७	९.६२	९८
	एकूण . .	३५.४९	२९.६४	८४

सन २०१०-११ या वर्षात एकूण ५०३ कामे मंजूर करण्यात येऊन कामे पूर्ण झालेली आहेत. करिता कृपया सदर परिच्छेद वगळण्यात यावा. ही विनंती.

“ अनुसूचित जातीच्या लोकांच्या लाभासाठी काम नाही ”

या योजने अंतर्गत निधीच्या १० टक्के रक्कम अनुसूचित जातीच्या लोकांच्या लाभासाठी वापरावयाची होती, तथापि, लेखापरिक्षा छाननीत असे उघडकीस आले की संबंधित विधानसभा/विधानपरिषद सदस्यांनी अनुसूचित जाती क्षेत्रात कामे ना सुचविले होते ना जिल्हा प्राधिकाऱ्यांनी अनुसूचित जातीच्या लोकांच्या लाभासाठी विकासाची कामे करण्यासाठी २००६-११ या कालावधीत निधी राखून ठेवला होता.

निकास परिषदेत असे नमूद करण्यात आले की, लोकसंख्येच्या टक्केवारी प्रमाणे कामे घेतली जात होती तथापि अनुसूचित जातीं करिता कामे घेण्यासाठी काही विनिर्दिष्ट प्रयत्न केले गेले नाहीत ही वस्तुस्थिती कायम आहे.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मा. आमदार महोदयांकडून कामे प्रस्तावित करण्यांत येतात. त्यामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता असलेल्या कामांचा समावेश असतो व त्यानुसार कामे मंजुर करण्यात येतात. करिता कृपया सदर परिच्छेद वगळण्यांत यावा ही विंनंती.

“ कामे पूर्ण होण्यातील विलंब ”

शासनाच्या अनुदेशांप्रमाणे विधानसभा/विधानपरिषद सदस्य स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमाखाली मंजूर झालेली कामे त्याच वर्षात किंवा जास्तीत जास्त पुढील वर्षात म्हणजे दोन हंगामात पूर्ण करावयाची होती. तथापि, असे दिसून आले की, २००९-१० या वर्षात मंजूर झालेली १३५ कामे ठरलेल्या तारखेच्या आंत पूर्ण झाली नव्हती. काम पूर्ण करण्यातील अवाजवी विलंबाची कारणे कामांच्या पुनिर्विदा बोलावणे, जागेची अनुपलब्धता, किंमतीतील वाढ इत्यादी अशी दिली गेली जी निकास परिषदेतही मान्य करण्यांत आली.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सन २००९-१० या आर्थिक वर्षात मंजूर झालेली १३५ कामे पूर्ण झालेली आहेत. करिता कृपया सदर परिच्छेद वगळण्यात यावा. ही विनंती.

उद्योग, उर्जा व कामगार विभाग

१.२ वित्तीय व्यवस्थापन व लेखांकन साचा :

राज्याच्या अर्थसंकल्पाद्वारे, विकासाच्या विविध कार्यक्रमांसाठी जिल्ह्याला निधी दिला जातो. याशिवाय, राज्य शासन व भारत सरकार यांचेकडून डी आर डी ए व कार्यान्वयन करणाऱ्या यंत्रणांना विविध सामाजिक-आर्थिक कार्यक्रमांच्या कार्यान्वयनासाठी थेट निधी दिला जातो. जिल्हाधिकारी सी इ ओ व डी आर डी ए, गटांना व इतर कार्यकारी यंत्रणांना निधी देतात.

२००६-२०११ या कालावधीकरिता काही ठळक योजना/कार्यक्रम यांचेकरिता मिळालेला निधी त्यानूसार केलेला खर्च यांचा तपशिल तक्ता १ मध्ये दिला आहे.

तक्ता १ : काही ठळक योजना/कार्यक्रम यांचे अंतर्गत तरतूद केलेला निधी व खर्च (रक्कम रुपये कोटीत)

योजनेचे नाव (१)	निधीची तरतूद (२)	केलेला खर्च (३)	अखर्चित रक्कम (४)
जिल्हाधिकारी			
इतर मार्ग क्षेत्र योजना	१७९.०५	१७९.०५	०
जिल्हा विकास योजना	३१०.३१	३००.५०	९.८१
संसद सदस्य स्थानिक क्षेत्र विकास योजना	२०.१९	१६.१५	४.०४
विधानसभा सदस्य स्थानिक क्षेत्र विकास योजना	३४.०४	२३.६१	१०.४३
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (एमजीएनआरईजीएस)	८८.३२	८६.८३	१.४९

(१)	(२)	(३)	(४)
स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना	४.४०	४.३६	०.०४
सार्वजनिक वितरण प्रणाली (पीडीएस)	२१०.००	१७७.८९	३२.११
मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.			
राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन (एनआरएचएम)	४२.२९	४१.९०	०.३९
राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम (एनएसीपी)	१.४०	१.२२	०.१८
सर्व शिक्षा अभियान (एसएसए)	८४.५४	८४.३७	०.१७
शालांत पूर्व शिष्यवृत्ती	७.७७	६.६१	१.१६
शालांत शिष्यवृत्ती (जीओआय)	७७.९९	७४.०२	३.९७
मध्यान्ह भोजन (एमडीएम)	३१.९७	२८.०५	३.९२
एकात्मिकृत बाल विकास योजना (आयसीडीएस)	३७.३२	३७.९१	-०.५९
ग्रामीण पाणीपुरवठा (आरडब्लुएस)	२०.३९	१८.८५	१.५४
संपूर्ण सफाई मोहीम (टीएससी)	२१.४०	१९.४५	१.९५
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा			
इंदिरा आवास योजना (आयएवाय)	६१.४८	६१.११	०.३७
राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-इत्यादी	५.६९	५.६९	०
मागास क्षेत्र अनुदान निधी (बीआरजीएफ)	३२.८०	२६.२२	६.५८
स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (एसजीएसवाय)	३५.१८	३४.८२	०.३६
राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना (आरजीजीव्हीवाय)	१३.३१	३९.४१	-२६.१०
एकूण . .	१३१९.८४	१२६८.०२	५१.८२

स्त्रोत: विभागाचे आकडे

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, रुपये १,३१९.८४ कोटीची तरतूद असताना रुपये १,२६८.०२ कोटी खर्च झाले व रुपये ५१.८२ कोटी कार्यान्वयन करणाऱ्या यंत्रणांजवळ अखर्चित राहिले.

लेखापरिक्षा चाचणीवरुन हे उघडकीस आले की, राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेखाली (आरजीजीव्हिवाय), अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने, अतिरिक्त दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) घरांना व्याप्त करण्यासाठी मंजुरी पेक्षा जास्त खर्च करून रुपये २६.१० कोटीचे दायित्व निर्माण केले. भारत सरकारला पाठविलेला (ऑगस्ट, २००८) सुधारित प्रस्ताव अद्याप मंजुर व्हावयाचा होता (जुलै, २०११)

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण १०व्या योजने अंतर्गत गोंदिया जिल्ह्यांसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) नुसार रुपये १९.७१ कोटी रक्कमेसाठी केंद्र शासनाने मंजुरी दिली होती. त्यानंतर निविदा मागविण्यात आल्या व ॲवार्ड किमतीनुसार केंद्रसरकारने रुपये २१.७१ कोटीसाठी मंजुरी दिली. रा.गां.ग्रा.वि. योजना ही केंद्रसरकार पुरस्कृत असून सदर योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील ग्राहकांना नाममात्र रुपये १५ अनामत रक्कम घेऊन मोफत वीज जोडणी दिली जाते. केंद्र शासनाकडून सदर योजने अंतर्गत एकूण ९१,४७४ दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना मोफत वीज जोडणी देण्याचे उद्दिष्ट मंजूर करण्यात आले होते व त्या करिता रुपये १३.७२ कोटी मंजूर करण्यात आले होते. त्यापैकी एकूण ७४,७८९ दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना मोफत वीज जोडणी देण्यात आलेली असून सदर कामाकरिता रुपये १५.२५ कोटीचा खर्च झालेला आहे. दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी हे विखुरलेले, लांब अंतरावर तसेच काही लाभार्थी डोंगराळ भागात असल्यामुळे कंत्राटदाराने जास्त किमतीच्या निविदा गोंदिया जिल्ह्यासाठी

सादर केल्या. ॲवार्ड किंमतीनुसार दारिद्र्यरेषेखालील लाभार्थीसाठी प्रति रुपये २०३९ इतका खर्च करण्यात आला. सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाने दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांसाठी रुपये १५०० प्रती जोडणी इतकी रक्कम मंजूर करण्यात आलेली होती. त्यामुळे दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांसाठी प्रस्तावित रुपये २०३९ प्रति जोडणी प्रमाणे झालेल्या एकूण खर्चाच्या रुपये १५.२५ कोटी रकमे ऐवजी रुपये ११.२२ कोटी केंद्र शासनाकडून मंजूर करण्यात आले आहेत त्यामुळे रुपये ४.०३ कोटी रकमेचा खर्च अधिक झाला आहे, तसेच, सदर योजनेवर रुपये ३५.८३ कोटी इतका खर्च झालेला आहे. त्या खर्चावर १० टक्के ओव्हरहेड चार्जेस म्हणजे रुपये ३.५८ कोटीची मागणी आर ई सी कडे केली होती त्यामुळे कंपनीच्या पुस्तकात एकूण खर्च ३९.४१ कोटी झालेला दिसतो. परंतु केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांच्या वीज जोडणीसाठी १००% अनुदान मिळत असल्यामुळे तसेच पायाभूत सुविधांवर ९०% अनुदान व १०% कर्ज मिळत असल्यामुळे आरईसी/केंद्र शासनाने १०% ओव्हर हेड चार्जेस फक्त पायाभूत सुविधांवर मंजूर केले आहे. त्यामुळे एकूण प्रस्तावित १०% ओव्हरहेड चार्जेस रुपये ३.५८ ऐवजी रुपये २.०५ कोटी मंजूर केले आहे त्यामुळे एकूण रुपये १.५३ कोटी खर्च जास्त बुक झालेला आहे.

केंद्र शासनाच्या देखरेख समितीने (Monitoring Committee) ॲवार्ड कॉस्ट मंजूर करतेवेळी जी किंमत रिस्ट्रिक केलेली होती (Pro rata restriction) त्याचप्रमाणे अंतिम क्लोजरसाठी रुपये ४.१७ कोटी कमी मंजूर केलेले आहेत.

कंपनीने केलेला खर्च १०% ओव्हरहेड चार्जेस विचारात घेऊन रुपये ३९.४१ कोटी इतका दिसतो मात्र केंद्र शासनाची अंतिम मंजुरी रुपये २९.६७ कोटी आहे. त्यावरुन रुपये ९.७४ कोटी अधिक खर्च झालेला आहे. त्याचे विवरण थोडक्यात खालीलप्रमाणे आहे :—

		(रुपये कोटीत)
१.	दारिद्र्यरेषेखालील लाभार्थी वीज जोडणी खर्च	४.०३ कोटी
२.	ओव्हरहेड खर्च वाढ	१.५३ कोटी
३.	केंद्र शासनाच्या देखरेख समितीने केलेले (Pro rata restriction)	४.१७ कोटी
	एकूण . .	९.७३ कोटी

विनामूल्य विद्युत जोडणीचा लाभ न देणे :—

भारत सरकारने अनुदेश दिले (सप्टेंबर, २००८) की आय ए वाय चे कार्यान्वयन, राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेशी (आरजीजीव्ही वाय) जोडून करावयाचे होते. त्यांनी पुढे आदेश दिले की शासनाने आय ए वाय च्या लाभार्थींमध्ये उपलब्ध असणाऱ्या लाभांबद्दल जागरूकता उत्पन्न केली पाहिजे, म्हणजे त्यांना उपलब्ध असलेले सर्व लाभ घेता येतील, तथापि, जिल्हा पातळीवर किंवा गट पातळीवर विनामूल्य विद्युत जोडणी देण्यासाठी, काहीही कार्यवाही करण्यात आली नाही. ३५४ लाभार्थींकडून संग्रहित केलेल्या माहितीप्रमाणे, चाचणी-तपासणी केलेल्या ६१ ग्रामपंचायतीमध्ये फक्त १८५ लाभार्थींनी आर जी जी व्ही वाय चा लाभ घेतला.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सन २००६ ते २०११ या कालावधीत इंदिरा आवास योजने अंतर्गत लाभ घेतलेल्या एकूण १३५१६ लाभार्थ्यांपैकी १२७५ लाभार्थ्यांना राजीव गांधी ग्रामीण योजने अंतर्गत वीज उपलब्ध करून देण्यात आलेली असून उर्वरित १२२४१ लाभार्थ्यांकडे अगोदर पासूनच वीज जोडणी उपलब्ध असल्यामुळे या लाभार्थ्यांना वीज जोडणी करण्यात आलेली नाही. यावरून स्पष्ट होते की विद्युत जोडणीचा लाभ सर्वच ग्राहकांना मिळालेला आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

१.३ व्याजाचा परतावा न करणे

केंद्र पुरस्कृत योजनांकरिता असलेल्या व राष्ट्रीयीकृत बँकामध्ये ठेवलेल्या निधीवर मिळालेले व्याज हे संबंधित बी.डी.ओ. नी डी.आर.डी. कडे, योजनांकरिता निधीचा अतिरिक्त स्त्रोत म्हणून पाठवावयाचे होते. असे दिसून आले की, २००६-११ या वर्षादरम्यान, निवडलेल्या बी डी ओ नी विविध योजनांखाली मिळविलेले रुपये ५५.११ लाख चे संचित व्याज, डी.आर.डी.ए. कडे परत केले नाही.

हे मान्य करतांना, निकास परिषदेत असे नमूद करण्यात आले की, पाच बी.डी.ओ. पैकी दोन बी.डी.ओ. नी (अर्जुनी मोरगांव व देवरी) व्याजाची रक्कम अद्यापपर्यंत परत केलेली नव्हती. (नोव्हेंबर, २०११)

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी-मोरगांव व देवरी पंचायत समित्यांना सन २००६-१५ ह्या कालावधीत विविध योजनांसाठी मिळालेल्या व्याजाची जि.ग्रा.वि.यं. कार्यालयात परत केलेली व्याजाची रक्कम व त्यांच्या कडे शिल्लक रकमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

		तपशील		(रुपये लाखात)
अ.क्र.	पंचायत समितीचे नांव	सर्व योजनेसाठी वर्ष २००६ ते २०१५ ह्या कालावधीसाठी प्राप्त व्याज	जि.ग्रा.वि.यं.ला परत केलेली व्याजाची रक्कम	शिल्लक रक्कम वजा (३-४)
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	अर्जुनी मोरगाव	१८.९६	१८.९६	०
२	देवरी	९०.०४	९०.०४	०
	एकूण	१०९.००	१०९.००	०

उपरोक्त तपशिलावरून असे दिसून येते की पंचायत समिती अर्जुनी मोरगांव व देवरी ह्यांनी प्राप्त व्याजाची रक्कम जि.ग्रा.वि.यं. खाती जमा केलेली आहे.

रोख पुस्तिकेतील शिल्लकींचा बँकेतील शिल्लकींशी मेळ न घालणे

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (म.जि.प.व.पं.स.) लेखा संहिता, १९६८ च्या नियम ५७ मध्ये असे करारनिविष्ट केले आहे की रोख पुस्तिकेप्रमाणे रोख शिल्लकीशी बँक किंवा कोषागार अभिलेखाप्रमाणे शिल्लकीशी ताडून पाहिली पाहिजे व महिन्याच्या शेवटच्या दिवशी रोख पुस्तिकेतील शिल्लक व बँकेतील शिल्लक यांच्यातील फरकाचे विश्लेषण करण्यासाठी एक मेळ विवरणपत्र तयार केले पाहिजे. जिथे फरक हे काही चुकांमुळे असतील तिथे या चुका दुरुस्त करण्यासाठी किंवा फरक दूर करण्यासाठी ताबडतोब व परिणामकारक उपाययोजना केली पाहिजे.

असे आढळून आले की २००६-११ या कालावधीत गोंदिया गटात ३१ मार्च च्या रोख पुस्तिकेतील शिल्लकीचा बँकेतील शिल्लकेशी मेळ घातला गेला नाही. अर्जुनी मोरगाव, देवरी व तिरोडा गटात हा मेळ फक्त मार्च, २०१० पर्यंत घातला गेला होता. २००६ -११ या कालावधीत सडक-अर्जुनी गटात इंदिरा आवास योजनेच्या बाबतीत मेळ घातला गेला नाही आणि स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना व राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-१ यांच्या लेख्याच्या बाबतीत शेवटचा मेळ मार्च, २००९ मध्ये घातला गेला होता. लेखापरीक्षणात असे दिसून आले की मार्च, २०११ ला रोख पुस्तकांमधील शिल्लक व बँक खाते पुस्तकामधील शिल्लक यात मेळ न झालेला रुपये ३.१५ कोटीचा फरक होता त्याचा तपशील परिशिष्ट ४.१.१ मध्ये दिलेला आहे. (विवरण क्र. १)

लेख्यातील मेळ घालण्यातील अभावामुळे गटविकास अधिकारी लेख्यांच्या दोन संचामधील फरकाची कारणे ओळखण्याच्या चुका दुरुस्त करण्यासाठी ताबडतोब परिणामकारक उपाय योजना करण्याच्या परिस्थितीत नव्हते निकास परिषदेत असे नमूद केले गेले (नोव्हेंबर, २०११) की मेळ घालण्याचे काम लवकरच केले जाईल.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे

सदर परिच्छेदांचे अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की पंचायत समिती गोंदिया, अर्जुनी मोरगाव, देवरी, तिरोडा व सडक अर्जुनी ह्यांनी सन २००६-११ ह्या कालावधीत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाच्या पुढील योजना कार्यान्वित केलेल्या आहेत सदर योजनांचे ताळमेळाची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहेत :—

अ. क्र.	पंचायत समिती ताळमेळाची स्थिती खालीलप्रमाणे				
	गोंदिया	अर्जुनी मोरगाव	देवरी	तिरोडा	सडक अर्जुनी
१	३१ ऑगस्ट २०१५ पर्यंत अद्ययावत	३१ ऑगस्ट २०१५ पर्यंत पूर्ण करण्यात येत आहे	३१ ऑगस्ट २०१५ पर्यंत पूर्ण करण्यात येत आहे.	३१ ऑगस्ट २०१५ पर्यंत अद्ययावत	३१ ऑगस्ट २०१५ पर्यंत अद्ययावत

उपरोक्त स्थितीवरून असे दिसून येते की पंचायत समिती गोंदिया व तिरोडा, सडक/अर्जुनी ह्यांनी ताळमेळाचे काम अद्ययावत केलेले आहे.

तथापि पंचायत समिती अर्जुनी-मोरगांव, देवरी ह्यांचे ताळमेळ अद्ययावत नसल्याने ह्या कार्यालयाचे पत्र क्र. ८३८ दिनांक १६ सप्टेंबर २०१५ अन्वये संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याकरिता सक्त सूचना देण्यात आलेली आहे. तरी सदरचे अनुपालन मान्य करण्यात यावे ही विनंती.

गृहनिर्माण :

निवारा ही मनुष्य प्राण्याची एक मूलभूत गरज आहे. ग्रामीण तसेच शहरी क्षेत्र पुन्हा चैतन्यपूर्ण करण्यासाठी, एकात्मिक गृहनिर्माण व गलिच्छ वस्ती विकास कार्यक्रम (आयएचएसडीपी), इंदिरा आवास योजना (आयएवाय) व राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना (आरजीजीएनवाय) ज्या प्रामुख्याने गलिच्छ वस्तीत राहणारे व ग्रामीण गरीब लोकांवर लक्ष केंद्रीत करतात, त्यांच्याद्वारे अनेक उपक्रम शासनाने हाती घेतले आहेत.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सन २००६-०७ या कालावधीत निवारा योजनेसाठी इंदिरा आवास योजना, राजीव गांधी ग्रामीण निवारा ह्या योजना राबविण्यात येत होत्या.

इंदिरा आवास योजना

इंदिरा आवास योजना (आय.ए.वाय.) ही केंद्र व राज्य यांमध्ये ७५:२५ या प्रमाणात खर्च करणार असलेली केंद्र पुरस्कृत योजना, एक स्वतंत्र योजना म्हणून जानेवारी, १९९६ मध्ये सुरूवात करण्यात आली. अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, बंधमुक्त कष्टकरी आणि इत्यादी दारिद्र्य-रेषेखालील (बी.पी.एल.) गैर एस.सी./एस.टी. ग्रामीण घरे यांना एक रकमी आर्थिक सहाय्य देऊन त्यांचे निवारा/बांधणे/श्रेणीवाढ करणे, हा योजनेचा उद्देश होता. २००६-११ या कालावधीत भौतिक व आर्थिक लक्ष्ये आणि साध्ये तक्ता ११ मधील तपशिलाप्रमाणे होते.

वर्ष	प्रत्यक्ष लक्ष	साध्य पूर्ण झालेले	चालू असलेले	सुरूवात न झालेले	उपलब्ध निधी	प्रत्यक्ष खर्च
२००६-०७	१,३२०	१,३२०	०	०	४.७३	४.१७
२००७-०८	१,५५५	१,५५५	०	०	५.५७	४.४८
२००८-०९	६,२२०	६,२२०	०	०	१४.२१	९.८६
२००९-१०	२,३४०	२,३३८	२	०	३२.९५	३२.९०
२०१०-११	२,०८१	१,६८५	३६०	३६	१०.०६	९.६९
एकूण	१३,५१६	१३,११८	३६२	३६	६७.५२	६१.१०

स्त्रोत : डी आर डी ए गोंदीया

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

इंदिरा आवास योजना- सन २००६-११ या कालावधीत राबविण्यात आलेल्या इंदिरा आवास योजनेचे लक्षांक आणि साध्य, उपलब्ध निधी व प्रत्यक्ष खर्च याबाबतची सध्याची स्थिती खालीलप्रमाणे आहे :—

वर्ष	प्रत्यक्ष खर्च	साध्य पूर्ण झालेले	उपलब्ध निधी	प्रत्यक्ष खर्च
२००६-०७	१,३२०	१,३२०	४.२६	४.२६
२००७-०८	१,५५५	१,५५५	४.८६	४.८६
२००८-०९	१,५५५	६,२२०	६.६०	६.६०
२००९-१०	२,३४०	२,२४६	१८.७८	१४.७८
२०१०-११	८,६५१	८,६५१	९.९१	९.९१
एकूण	८,६५१	८,६५१	४०.४१	४०.४१

सन २००६-०७ ते २०१०-११ मधील घरकुलांचे साध्य पूर्ण करण्यात आलेले असून या घरकुलावरील रक्कम रुपये ४०.४१ लक्ष पूर्णतः खर्च करण्यात आली आहे.

पूर्ण झालेली घरे चुकीची कळविणे

निवारा ही मनुष्य प्राण्याची एक मुलभूत गरज आहे. ग्रामीण तसेच शहरी क्षेत्र पुन्हा चैतन्यपूर्ण करण्यासाठी, एकात्मिकृत गृहनिर्माण व गलिच्छ वस्ती विकास कार्यक्रम (आयएचएसडीपी), इंदिरा आवास योजना (आयएवाय) व राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना (आरजीजीएनवाय) ज्या प्रामुख्याने गलिच्छ वस्तीत राहणारे व ग्रामीण गरीब लोकांवर लक्ष केंद्रित करतात, त्यांच्याद्वारे अनेक उपक्रम शासनाने हाती घेतले आहेत.

वर्ष	प्रत्यक्ष लाभ	साध्य पूर्ण झालेले	चालू असलेले	सुरूवात न झालेले	उपलब्ध निधी	प्रत्यक्ष खर्च
२००६-०७	१,३२०	१,३२०	०	०	४.७३	४.१७
२००७-०८	१,५५५	१,५५५	०	०	५.५७	४.४८
२००८-०९	६,२२०	६,२२०	०	०	१४.२१	९.८६
२००९-१०	२,३४०	२,३८८	२	०	३२.९	३२.९०
२०१०-११	२,०८१	१,६८५	३६०	३६	१०.०६	
एकूण	१३,५१६	१३,११८	३६२	३६	६७.५२	

स्त्रोत : डी.आर.डी.ए. गोंदिया

डी.आर.डी.ए. ने शासनाला सादर केलेल्या (मार्च, २०११) प्रगती अहवालाप्रमाणे, २००९-११ या वर्षांतील ३६२ घरांचे बांधकाम अपूर्ण होते, तथापि लेखापरीक्षणात आढळून आले की चाचणी तपासणी केलेल्या गटामध्ये १,२८९ घरे अजून पूर्ण व्हायची होती. या प्रकारे शासनाला चुकीचा अहवाल दिला गेला. याप्रकारे, पूर्ण झालेल्या घरांचा फुगवलेला अहवाल डी.आर.डी.ए. नी शासनाला सादर केला.

ही वस्तुस्थिती मान्य करताना पी.डी. डी.आर. डी.ए. यांनी नमूद केले (सप्टेंबर, २०११) की, आकड्यांची अचूकता संबंधित गटांच्या अभिलेखांशी दुरुस्त करण्यात येईल.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परिक्षणाच्या वेळी चाचणी तपासणी केल्याप्रमाणे एकूण १२८९ इतकी घर पूर्ण व्हावयाचे होते. तथापि सध्याची स्थिती खालीलप्रमाणे आहे :—

अ. क्र.	जिल्हा	लेखापरीक्षणाच्या वेळी अपूर्ण असलेली घरे	सद्यः स्थितीत पूर्ण झालेली घरे	कारणे
१	गोंदिया	१२८९	१२८९	निरंक

शासनास सादर केलेल्या (मार्च, २०११) प्रगती अहवालाप्रमाणे २००९-११ या वर्षांतील तपासणी केलेल्या १२८ गटातील ३६२ घरांचे बांधकाम सद्यः स्थितीत पूर्ण झाले आहे. तरी वस्तुस्थिती लक्षात घेता सदरहू परिच्छेद वगळण्यात यावा, अशी विनंती आहे.

विनामुल्य विद्युत जोडणीचा लाभ न देणे

भारत सरकारने अनुदेश दिले (सप्टेंबर, २००८) की आय.ए.वाय. चे कार्यान्वयन, राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेशी (आरजीजीव्हीवाय) जोडून करावयाचे होते. त्यांनी पुढे आदेश दिले की शासनाने आय.ए.वाय. च्या लाभार्थ्यांमध्ये उपलब्ध असणाऱ्या लाभाबद्दल जागरुकता उत्पन्न केली पाहिजे, म्हणजे त्यांना उपलब्ध असलेले सर्व लाभ घेता येतील. तथापि जिल्हा पातळीवर किंवा गट पातळीवर विनामुल्य विद्युत जोडणी देण्यासाठी, काहीही कार्यवाही करण्यात आली नाही. ३५४ लाभार्थ्यांकडून संग्रहीत केलेल्या माहितीप्रमाणे, चाचणी - तपासणी केलेल्या ६१ ग्राम पंचायतींमध्ये फक्त १८५ लाभार्थ्यांनी आर जी जी व्ही वाय चा लाभ घेतला होता.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांना राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेचा सुद्धा लाभ देण्यात यावा असे शासनाने निर्देश आहेत. त्यानुसार लाभार्थ्यांमध्ये जागरुकता उत्पन्न करण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा/पंचायत समिती कार्यालयामार्फत सन २०१४-१५ मध्ये कार्यशाळा घेण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार राजीव गांधी विद्युतीकरण योजनेंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थ्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :—

अ.क्र.	जिल्हा	सन २००६-११ या कालावधीत लाभ दिलेल्या इंदिरा आवास योजनेचा लाभार्थ्यांची संख्या	राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेअंतर्गत लाभ दिलेले लाभार्थ्यांची संख्या	कमी लाभार्थ्यांना लाभ दिले असल्यास त्यांची संख्या
१	गोंदिया	१३५१६	१२७५	१२२४१

ज्या इंदिरा आवास योजनेतील घरकुल लाभार्थ्यांकडून विद्युत कनेक्शन उपलब्ध नव्हते अशा १२७५ घरकुल लाभार्थ्यांना विद्युत कनेक्शन उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. मात्र ज्या इंदिरा आवास योजनेतील लाभार्थ्यांकडे अगोदर पासून विद्युत कनेक्शन उपलब्ध असल्यामुळे व त्यांना दुसऱ्या विद्युत कनेक्शनचा लाभ घेता येत नसल्याने १२२४१ लाभार्थ्यांना विद्युत कनेक्शनचा लाभ देण्यात आलेला नाही. कृपया सदर वस्तुस्थिती विचारात घेता सदर परिच्छेद वगळण्यात यावा, अशी विनंती.

संवितरण न झालेले धनादेश :

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती संहितेच्या नियम २७ मध्ये असे करारनिविष्ट केले आहे की, धनादेश आदात्याला ताबडतोब वितरीत करावयाचा असेल तेव्हाच त्यावर स्वाक्षरी करावी.

बी.डी.ओ. देवरीमध्ये असे आढळून आले की, इंदिरा आवास योजनेअंतर्गत मार्च, (रुपये १५ हजार) व सप्टेंबर, २०१० मध्ये काढलेले (रुपये १०.०२ लाख) असे रुपये १०.१७ लाखांचे ११४ धनादेश व्यक्तींना वितरीत केले गेले नव्हते तथापि, लेख्यामध्ये, संपूर्ण अनुदान खर्च झाल्याचे दाखविले होते.

बी.डी.ओ. यांनी नमूद केले (जून, २०११) की लाभार्थ्यांनी कांही किरकोळ कामे पूर्ण न केल्यामुळे धनादेश वितरीत केले गेले नव्हते.

लेखा परीक्षणाचे अभिक्षण मान्य करतांना निकास परिषदेत (नोव्हेंबर, २०११) असे नमूद केले गेले की, जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कार्यवाही सुरू केली जाईल व उत्तर लवकरच सादर केले जाईल.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

खंड विकास अधिकारी पंचायत समिती देवरी यांनी लाभार्थ्यांनी घरकुलांची किरकोळ कामे पूर्ण न केल्यामुळे इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांना मार्च व सप्टेंबर, २०१० मध्ये अनुक्रमे रुपये १५,००० व रुपये १०.०२ लक्ष असे एकूण रुपये १०.१७ लक्ष रुपयांचे धनादेश दिले नाहीत. तथापि, सध्याची स्थिती खालीलप्रमाणे आहे :—

अ. क्र.	पंचायत समितीचे नाव	लेखा परीक्षणाच्या वेळची स्थिती		सध्या स्थितीत प्रदान केलेल्या धनादेशांची संख्या व रक्कम		सध्या स्थितीत प्रलंबित असलेल्या धनादेशांची संख्या व रक्कम		कारणे
		प्रलंबित धनादेशाची संख्या	रक्कम	प्रदान केलेल्या धनादेशाची संख्या	रक्कम	रक्कम	संख्या	
१	देवरी	११४	१०१६६८८	११४	१०१६६८८	निरंक	निरंक	

काही लाभार्थ्यांच्या घरी छतापर्यंत कामे झालेली होती. काही लाभार्थ्यांची दरवाजे खिडकी व शौचालयाची कामे अपूर्ण असल्याने, तसेच काही लाभार्थी व्यवसायामुळे स्थलांतरीत झाल्यामुळे ते धनादेश उचल करू शकले नाहीत. अशा सर्व ११४ लाभार्थ्यांची अपूर्ण घरकुलांची बांधकामे

त्वरेने पूर्ण करून देण्यात आली व या लाभार्थ्यांना माहे नोव्हेंबर, २०११ पर्यंत धनादेश वितरीत करण्यात आले. यावर्षी लाभार्थ्यांनी बँकेतून रक्कमेची उचल केलेली आहे. उपरोक्त परिच्छेदांच्या अनुषंगाने श्री. हाडगे, वरिष्ठ सहाय्यक (लेखा), पंचायत समिती, देवरी यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित केलेली आहे. सद्यःस्थिती मध्ये श्री. हाडगे, वरिष्ठ सहाय्यक (लेखा), पंचायत समिती, देवरी यांना निलंबित करण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त अनुपालनास अनुसरुन परिच्छेद वगळण्यास यावा, अशी विनंती आहे.

मागास क्षेत्र अनुदान निधी :

मागास क्षेत्र अनुदान निधी हा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम, २००६-०७ मध्ये सुरू केला गेला. हा कार्यक्रम विविक्षित जिल्ह्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या विकासात्मक अंतःप्रवाहांना एकत्रित करून, पुरवठा म्हणून आर्थिक साधन संपत्तीने, विकासातील क्षेत्रीय असमतोल दूर करण्यासाठी तयार केला होता. लेखापरीक्षा छाननीत पुढील गोष्टी उघडकीस आल्या :—

निधीचा कमी वापर : सहभागी नियोजन प्रक्रियेद्वारा ओळखलेले एकात्मिक विकासातील समीक्षणात्मक अंतर दूर करण्यासाठी बी.आर.जी.एफ. मध्ये क्षमता बांधणी निधी व पूरेसे बंधमुक्त अनुदान अशा दोन निधी खिडक्यांच्या समावेश होतो. ही योजना गोंदिया जिल्ह्यात २००९-१० पासनू कार्यान्वित होती. २००९-२०११ या कालावधीत मिळालेला निधी व झालेला खर्च तक्ता १६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे होता.

तक्ता १६: निधीची स्थिती व बी.आर.जी.एफ. खालील अपूर्ण कामे :—

(रुपये कोटीमध्ये)

वर्ष	सुरूवातीची शिल्लक	मिळालेला निधी	एकूण	केलेला खर्च	विना खर्च अनुदान	मंजूर कामे	पूर्ण झालेली कामे (टक्के)	अपूर्ण कामे (टक्के)
२००९-१०	निरंक	१६.४०	१६.४०	१५.९६	०.४४	६९२	६५७ (९५)	३५ (५)
२०१०-११	०.४४	१६.४०	१६.८४	१०.२६	६.५८	५३६	२३७ (४४)	२९९ (५६)
एकूण		३२.८०		२६.२२	७.०२	१२२८	८९४ (७३)	३३४ (२७)

स्त्रोत : DRDA यांचे आकडे

योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे निधी मंजूर झालेल्या वर्षातच ग्रामपंचायतींनी ते वापरायचे होते. तथापि, २००९-११ या दरम्यान मिळालेले निधी पूर्णपणे वापरले गेले नाहीत व निधी वापरातील तूट २.६१ टक्के ते ३९.०७ टक्के या टप्प्यात होती. मंजूर झालेल्या एकूण १२२८ कामांपैकी (२००९-११) ग्रामपंचायती ८९४ कामे (७३ टक्के) पूर्ण करू शकल्या व मार्च, २०११ पर्यंत ३३४ कामे अपूर्ण राहीली व रुपये ६.५८ कोटी विना वापर राहिले.

निकास परिषदेत असे नमूद करण्यात आले की, निधी मिळण्यात झालेल्या विलंबामुळे तो वेळेच्या आत वापरला जावू शकला नाही, हे उत्तर मान्य करण्यासारखे नाही. कारण आधीच्या वर्षीची म्हणजे २००९-१० ची ३५ कामे २०१०-११ पर्यंत पूर्ण व्हावयास हवी होती.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

मागास क्षेत्र अनुदान निधी योजने अंतर्गत वर्ष २००९-२०१० अंतर्गत योजनेच्या अंमलबजावणीकरीता एकूण प्रस्तावित निधी रुपये १६४०.०० कोटी पैकी १४६१.२४ एवढा निधी प्राप्त झाला होता. सदर प्राप्त निधीनुसार नगरपरिषद, गोंदिया व तिरोडा आणि एकूण ग्राम पंचायत स्तरावर एकूण ५४९ कामे मंजूर करण्यात आली होती. मंजूर कामांपैकी तीन कामे काही कारणास्तव रद्द करून ५४६ कामे पूर्ण करण्यात आली होती. त्यामध्ये ग्राम पंचायत व नगरपरिषद स्तरावर रुपये १४०८.६९ एवढ्या निधीचे वाटप करण्यात आले होते. त्याचपमाणे सन २०१०-२०११ मध्ये शासनाकडून १६४०.०० कोटी व वर्ष २००९-१० चा उर्वरित निधी मिळून १८१८.७६ कोटी शासनाकडून प्राप्त झाली. या निधीमधून १५९६.३१ कोटी निधी ग्राम पंचायत, नगर परिषद, गोंदिया व तिरोडा यांना प्रशासकीय मंजुरीकरीता देण्यात आली असून, त्यात एकूण ६५३ कामे घेण्यात आली. त्यापैकी २ कामे रद्द करून ६५१ कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

तरी सादर केलेल्या आक्षेपानुसार सन २००९-२०१० ते सन २०१०-२०११ मधील कोणतीही कामे अपूर्ण नाहीत. सबब, आक्षेप वगळण्यात यावा ही विनंती.

क्षमता बांधणी

क्षमता बांधणीचा उद्देश :—

पंचायती व नगरपालिकांमधील निवडून आलेल्या सर्व प्रतिनिधींना त्यांच्या जबाबदाऱ्या जास्त चांगल्या रितीने पूर्ण करण्यासाठी ज्ञान व कौशल्य याची श्रेणी वाढ यासारख्या घटकांना केंद्र करून प्रशिक्षण देणे, पंचायती मध्ये किंवा पंचायतीच्या निकट काम करणाऱ्यांनी परिणामकारकरित्या पंचायतींची सेवा करणे व पंचायतींना त्यांच्याकडे आलेले काम सुलभ करणे त्यांची कार्यपद्धती सुधारणे यासाठी प्रशिक्षण देणे हा होता.

डी.आर.डी.ए. गोंदिया ने सन २००९-२०११ या कालावधीत रुपये १.६४ कोटीचे अनुदान, संनियंत्रण व कार्यालय स्वयंचलनावर खर्च केले. लेखापरीक्षण छाननीत पुढील गोष्टी उघडकीस आल्या :-

यशवंतराव चव्हाण विकास व्यवस्थापन अकादमी (यशदा) व राज्य पातळीवरील नोडल अभिकरण यांनी ग्रामपंचायतींचे निवडून आलेले प्रतिनिधी व कार्यालय कर्मचारी यांना उपग्रह प्रशिक्षण देण्यासाठी मेसर्स भारत इलेक्ट्रॉनिक्स, बंगलोर यांचेशी Satellite Interactive Terminals (एस.आय.टी.) पुरविणे व बसविणे यासाठी करार केला. कंपनीने २००९-१० या वर्षात जिल्ह्यातील सर्व गटांना एस.आय.टी. पुरविले. तथापि, एकाही नमुना चाचणी गटाने मार्च, २०११ पर्यंत एस.आय.टी. बसविण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा पुरविल्या नव्हत्या. परिणामी, एस.आय.टी. वेळेच्या आत बसविले जाऊ शकले नाहीत व त्याचा हमी काळही संपला. याशिवाय एकाही नमूना चाचणी गट, यशदा, पुणे यांच्याशी ऑन लाईन जोडला गेला नव्हता परिणामी, ज्याच्या एकाही निवडून आलेल्या प्रतिनिधीला किंवा ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले गेले नाही.

डी.आर.डी.ए.,गोंदियाने ग्रामपंचायतींना त्यांचेकडे आलेली कामे करणे सुलभ होण्यासाठी संगणक व उपसाधने पुरविली. पांच नमुनाचाचणी गटांमध्ये ग्रामपंचायतीकडे आलेल्या संगणकांची माहिती तक्ता १७ मधील तपशील प्रमाणे होती.

तक्ता १७ : ग्रामपंचायतींना संगणकांचा पुरवठा

(रुपये लाखामध्ये)

वर्ष	ग्रा.पं. ची संख्या	पुरविलेले संगणक	ब्रॉडबँड जोडणी उपलब्ध		केलेला खर्च
			होय	नाही	
२००९-१०	२९	२९	२९	०	१६.६५
२०१०-११	८९	८९	२०	६९	३७.४९
एकूण	११८	११८	४९	६९	५४.१४

स्त्रोत:- विभागाचे आकडे

वरील माहिती दर्शविते की ब्रॉडबँड जोडणीची स्थिती लक्षात न घेता संगणक व उपसाधने पुरविली गेली. परिणामी ज्या हेतुने ते प्राप्त केले गेले त्यासाठी पायाभूत सुविधांचा उपयोग झाला नाही.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

यशदा संस्थेने भारत इलेक्ट्रॉनिक्स संस्थेबरोबर केलेल्या करारानुसार साहित्य पुरवठा करूनही पंचायत समिती गटाने मार्च, २०११ पर्यंत एस.आय.टी. बसविण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा पुरविल्या नव्हत्या. वास्तविक साहित्य प्राप्त झाल्यानंतर पंचायत समिती कार्यालयाने सुयोग्य जागा निश्चित करण्याची कार्यवाही जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व पंचायत समिती स्तरावर करण्यासंदर्भात यशदाने वेळोवेळी सूचना दिलेल्या होत्या.

या दरम्यान त्या कालावधीमध्ये गोंदिया जिल्ह्यातील ९ पैकी ७ एस.आय.टी कार्यान्वित करण्यात आलेल्या असून या माध्यमातून २३५४ कर्मचारी/ लोकप्रतिनिधी यांचे प्रशिक्षण सॅटकॉम मार्फत देण्यात आले. उर्वरित २ एस.आय.टी. (पंचायत समिती गोरेगाव व तिरोडा) यामध्ये भारत इलेक्ट्रॉनिक्स संस्था स्तरावरील उभारणी दोष (Installation Defects) असून यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी BEL बंगलोर संस्थेस सदर पाठपुरावा करण्यात आला. सन २०१४-१५ वर्षात बीआरजीएफ जिल्ह्यांतर्गत २५ प्रलंबित एस.आय.टी. पैकी ६ एस.आय.टी. केंद्र BEL बंगलोर संस्थेने पुर्नस्थापित केले आहेत. यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील पंचायत समिती सडक अर्जुनी एस.आय.टी. चा समावेश आहे. उर्वरित प्रलंबित एसआयटी पुर्नस्थापित करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

संनियंत्रण व नियंत्रण

असे दिसून आले की, जिल्ह्यातील अंतर्गत नियंत्रण यंत्रणाखाली दिल्याप्रमाणे दुर्बल होती. लेखे सादर करण्यातील विलंब व मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखे यांच्या मान्यतेशिवाय वार्षिक लेखे प्रकाशित करणे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (एम.झेड.पी. व पी.एस.) अधिनियम, १९६१ च्या खंड १३६ च्या तरतुदीनुसार तसेच एम.झेड.पी. व पी.एस. १९६८ च्या लेखा संहिता, नियम ६६ प्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला महसूल व खर्च यांचे वार्षिक लेखे " विवरण पत्र " पुढील आर्थिर्क वर्षाच्या १० जुलैला किंवा त्या अगोदर, वित्तीय समितीसमोर १० ऑगस्ट पर्यंत ठेवण्यासाठी तयार करणे आवश्यक आहे. त्यानंतर हे लेखे ३० सप्टेंबरला किंवा त्याआधी जिल्हा परिषदेसमोर मान्यतेसाठी ठेवावयाचे असतात व सी.ए.एल.एफ.ए. त्यांच्या मान्यतेनंतर १५ नोव्हेंबर पूर्वी शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करावयाचे असतात.

परंतु, २००६-०८ या कालावधीत, लेखे तयार करणे व प्रसिद्ध करणे यात १० ते १३ महिन्यांचा विलंब झाला होता. २००८-११ या कालावधीचे वार्षिक लेखे तयार केले गेले नव्हते (मे, २०११) शिवाय सीईओने २००६-०८ या कालावधीचे वार्षिक लेखे सीएएफए लेखे यांच्या मान्यतेशिवाय व प्रमाणित केल्याशिवाय प्रकाशित केले होते.

लेखे पक्के करणे व सी.ए.एल.एफ.ए. लेखे यांच्या मान्यतेशिवाय प्रसिद्ध करणे यातील थकबाकी, हे अकार्यक्षम आंतर नियंत्रणाचे निदर्शक होते.

हे अभिक्षण मान्य करताना, निकास परिषदेत सी.ई.ओ. यांनी नमूद केले (नोव्हेंबर, २०११) की भविष्यात लेखे तयार करणे यातील विलंब टाळला जाईल.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

जिल्हा परिषद व अंतर्गत सर्व पंचायत समितींचे लेखे एकत्र करून जिल्हापरिषदेचा वित्तीय व महसुली वार्षिक लेखा तयार केला जातो. सन २००६-०७, सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखे अनुक्रमे नोंव्हेंबर, २००८ व जुलै, २००९ मध्ये पूर्ण झाले होते. तथापि, स्थानिक निधी लेखा विभागाची मंजुरी सन २०१२ मध्ये घेण्यात आली. यासाठी विलंब झाला होता.

सन २००८-०९ ते सन २०१०-११ चे लेखे अनुक्रमे मे, २०११, डिसेंबर, २०११, मे, २०१२ मध्ये पूर्ण करण्यात आले होते, तथापि, स्थानिक निधी लेखा परिक्षा विभागाची मंजूरी सन २०१३ मध्ये घेण्यात आली. यासाठी विलंब झाला होता.

जिल्हा परिषद, गोंदियाचे मुख्य लेखा अधिकारी यांचे पद सदर कालावधीत ५ वर्षांपासून रिक्त होते.

वार्षिक लेखे स्थानिक निधी लेखा विभागाकडून प्रमाणित होण्यापूर्वी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले होते. तथापि, सन २०१२-१३ पासून स्थानिक निधी लेखा परिक्षा विभागाकडून प्रमाणित झाल्यानंतर राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात येत आहेत. वार्षिक लेखे विहित मुदतीत करण्याची दक्षता आम्ही घेत आहोत तरी, कृपया सदरचे अनुपालन मान्य व्हावे.

अंतर्गत लेखापरीक्षण केले नाही :

एम.झेड.पी. अँड पी.एस. लेखासंहितेच्या परिशिष्ट I ते IV मध्ये असे करारनिविष्ट केले आहे की मुख्य लेखा व वित्त अधिकारी हा अंतर्गत लेखापरीक्षेकरीता व जिल्हा परिषदेच्या विविध विभागांनी ठेवलेल्या अभिलेखांच्या नियतकालिक तपासणीकरिता जबाबदार आहे.

अभिलेख्यांच्या छाननीत असे उघडकीस आले की, २००६-०७ ते २०१०-११ या कालावधीत विभागांचे अंतर्गत लेखापरिक्षण मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्याने नियमितपणे केले नव्हते. ज्याचा तपशिल परिशिष्ट ४.१.४ मध्ये दिला आहे.(विवरण **पत्र क्र. २**)

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

जिल्हा परिषद/पंचायत समिती लेखासंहितेच्या परिशिष्ट I ते IV नुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या विविध विभाग व पंचायत समितींनी ठेवलेल्या अभिलेख्यांची नियतकालिक तपासणी करणे आवश्यक आहे.

सन २००६-०७ ते सन २०१०-११ या कालावधीमध्ये काही विभाग व पंचायत समितींचे अंतर्गत लेखापरिक्षण हे काम करण्यात आले होते. मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे पद या कालावधीमध्ये ५ वर्षापासून रिक्त असल्याने व लेखा अधिकारी यांचेकडे त्या पदाचा कार्यभार असून सदर कालावधीमध्ये सर्व जिल्हा परिषद व पंचायतसमितीचे अंतर्गत लेखा परिक्षण करता आले नाही.

तथापि, सन २०१३-१४ पासून अंतर्गत लेखापरिक्षण कार्यक्रम निश्चित करून त्यानुसार लेखापरिक्षणाचे काम आता नियमितपणे चालू आहे. तरी कृपया सदरचे अनुपालन मान्य व्हावे.

सार्वजनिक आरोग्य विभाग

१.४ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन

भारत सरकारने एप्रिल, २००५ मध्ये, ग्रामीण भागात विशेषतः लोकसंख्येच्या गरीब व दुबळ्या वर्गाला सुगम, परवडण्यासारख्या, परिणामकारक व विश्वसनीय आरोग्य, देखरेख सुविधांसाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन प्रारंभ केले. एनआरएचएम ही केंद्र पुरस्कृत योजना सी.ई.ओ. जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यानी (डी एच ओ) कार्यान्वित करावयाची योजना आहे. १२ सामुहिक आरोग्य केंद्रे (सीएचसी), ३९ प्राथमिक आरोग्य केंद्रे (पीएचसी) व २३७ उपकेंद्रे (एच.सी.) यांच्या जाळ्यांद्वारे जनतेला आरोग्य देखरेख सेवा दिली जाते. पाच सामुहिक आरोग्य केंद्रे, (१. रजेगाव, २. तिरोडा, ३. अर्जुनी मोरगाव, ४. सडक अर्जुनी, ५. देवरी), सात प्राथमिक आरोग्य केंद्रे (१. रावणवाडी, २. दवणीवाडा, ४. मालगाव, ५. धाबेपौनी, ६. सौदड व ७. मुल्ला), व १४ उप केंद्रे (१. नागरा, २. गर्रा, ३. धापेवाडा, ४. कवलेवाडी, ५. कराटी, ६. माहुरकडा, ७. तादागांव, ८. बोन्डे, ९. नवेगावबांध, १०. पळसगाव /राका, ११. खोडशिवनी, १२. सुरटोळी, १३.फुक्कीमेटा व १४. पिंडकेपार) यांची चाचणी तपासणी करण्यात आली आहे.

सुविधा सर्वेक्षण

एनआरएचएम खाली सुगम परवडण्यासारख्या व समन्यायी, आरोग्य देखरेखींच्या तरतुदीची पहिली पायरी म्हणून ग्रामीण भागात आरोग्य देखरेख सुविधांमधील त्रुटी ओळखण्यासाठी एक सुविधा सर्वेक्षण करण्याची आवश्यकता होती. जिल्ह्यांत अश्या केलेल्या सर्वेक्षणांचा मार्च, २०११ च्या स्थितीचा तपशिल **तक्ता २** मध्ये दिला आहे.

तक्ता २ :- मार्च, २०११ ला जिल्ह्यातील सुविधा सर्वेक्षणाची स्थिती दाखविणारे विवरण पत्र :—

आरोग्य केंद्र	आरोग्य केंद्रांची संख्या	सुविधा सर्वेक्षण केले नाही	सुविधा सर्वेक्षण न केल्याची टक्केवारी
सामुहिक आरोग्य केंद्रे (सीएचसी)	१२	५	४२
प्राथमिक आरोग्य केंद्रे (पीएचसी)	३९	२५	६४
उप केंद्रे (एससी)	२३७	२२२	९४

डिएचओने मुद्दा मान्य करतांना नमूद केले (जून, २०११) की जरी सुविधा सर्वेक्षण केले गेले नाही, तरी जास्त भार असणारी क्षेत्रे, वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय (आरएच), वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र (पीएचसी), सहाय्यकारी परिचारिका व प्रस्तविका यांनी दिलेल्या मागणी/तक्रारीवरून ठरविता आली.

निकास परिषदेत असे नमूद केले गेले की सुविधा सर्वेक्षण ऑक्टोबर, २०११ मध्ये केले गेले होते.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :——

आरोग्य संस्थांचे आयपीएचएस मानांकाअंतर्गत वर्गीकरण करण्यापूर्वी सुविधा सर्वेक्षण करणे आवश्यक असते जेणे करून आरोग्य सेवेतील त्रुटी शोधून त्याचे निराकरण करणे शक्य होते. त्यामध्ये तज्ज्ञ मनुष्यबळ, Nursing Staff, आयुष कक्ष, साहित्य व उपकरणे, अद्ययावत प्रयोगशाळा व रक्तसाठा केंद्र इत्यादीची गरज असते व त्या अनुषंगाने अभियानाच्या पहिल्या टप्यात सुविधा सर्वेक्षण करण्यात आले.

गोंदिया जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०११ मध्ये सुविधा सर्वेक्षण झाले होते. ज्या ठिकाणी जास्त लोकसंख्या आहे व आरोग्य सुविधांची कमतरता आहे अशी ठिकाणे सुविधा सर्वेक्षणाकरिता निवड करण्यात आली.

गोंदिया जिल्ह्यांतील आरोग्य संस्थेमध्ये कार्यरत असणाऱ्या मनुष्यबळाकडून विशिष्ट भागाची निवड करण्यात आली होती. निवासी वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक, उप जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक, तालुका वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत सुविधा सर्वेक्षण करण्यात आले असून त्यांच्या अहवालामध्ये आरोग्य सुविधामधील त्रुटी शोधण्यात आल्या आहेत. व त्यानुसार त्रुटींची पुर्तता करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे.

सन २००१ च्या जनगणनेस अनुसरून शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी २०१३ व दिनांक ९ जून २०१४ अन्वये गोंदिया जिल्ह्याकरिता ६ नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र व २९ उप केंद्रे मंजूर झाली.

४० प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी ३८ प्राथमिक आरोग्य केंद्रे ही स्वतःच्या शासकीय इमारतीत कार्यरत असून एका प्राथमिक आरोग्य केंद्रांचे काम प्रती पथावर आहे. व दुसऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी जागा उपलब्धतेसाठी कार्यवाही सुरू आहे. २३८ उप केंद्रापैकी २३६ उप केंद्रे स्वतःच्या इमारतीत कार्यरत आहेत. २ उप केंद्राचे बांधकाम प्रगती पथावर आहे. तसेच नवीन मंजूर २९ उप केंद्रापैकी १० उप केंद्रांचे काम प्रगती पथावर आहे.

पायाभूत सुविधा

भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांप्रमाणे (आयपीएचएस) प्रत्येक १,२०,००० लोकसंख्येकरिता (८०,००० जनजाति/वाळवंटी क्षेत्रात) एक सामुहिक आरोग्य केंद्र असले पाहिजे ३०,००० लोकसंख्येकरिता (२०,००० जनजाति/वाळवंटी क्षेत्रात) एक प्राथमिक आरोग्य केंद्र असले पाहिजे आणि प्रत्येक ५,००० व्यक्तिंतकरिता (३,००० जनजाति क्षेत्रात) एक उप केंद्र असले पाहिजे. या प्रमाणकांच्या शर्तीप्रमाणे, सामुहिक आरोग्य केंद्राच्या बाबतीत काही तूट नव्हती पण मार्च, २०११ ला लेखापरिक्षेत दिसून आल्याप्रमाणे चार पी एच सी ३१ उप केंद्रे यांची तूट होती.

पुढे असे आढळून आले की, चाचणी तपासणी केलेल्या घटकांच्या बाबतीत, पुढील पीएचसी व उप केंद्रे, आयपीएचएस मानकांशी तुलना केली असता, अधिक ओझे लादलेली अशी होती. ज्याचा तपशिल तक्ता ३ मध्ये दिला आहे.

तक्ता ३ : पीएचसी व उप केंद्रे यांचा कार्यभार

पीएचसी चे नाव	समाविष्ट लोकसंख्या	उप केंद्राचे नाव	समाविष्ट लोकसंख्या
रावणवाडी	५८,०००	धापेवाडा	९,२२६
इंदोरा	४५,९९३	नागरा	८,२७६
मुल्ला	४५,८२४	कावलेवाडा	७,४२८
सौंदड	३७,८९७	गर्रा	६,१३९

स्त्रोत : विभागाचे आकडे

निकास परिषदेत असे नमूद करण्यात आले (नोव्हेंबर, २०११) की, पीएचसी व उप केंद्रे यांच्या कमतरतेमुळे त्यांच्यावर जास्त भार लादला गेला आहे. नवीन पीएससी व उप केंद्रे यांच्या निर्मितीची बाब आधीच शासनाकडे घेण्यात आली होती.

तसेच तक्ता ४ मधील तपशीलाप्रमाणे ३१ मार्च २०११ ला जिल्ह्यामधील सीएचसी, पीएचसी व उप केंद्रामध्ये अपुऱ्या पायाभद्यत सुविधा होत्या.

तक्ता ४ : सीएचसी व उप केंद्रांमध्ये पायाभूत सुविधा यांची अनुपलब्धता

तपशिल	जिथे पायाभूत सुविधा उपलब्ध नव्हत्या अशा केंद्रांची संख्या		
	सामुहिक आरोग्य केंद्रे	प्राथमिक आरोग्य केंद्रे	उप केंद्रे
चाचणी तपासणी केलेल्या केंद्रांची संख्या	५	७	१४
नेमलेली शासकीय इमारत	१	१	१
रुग्णांकरिता प्रतिक्षालय	१	२	लागू नाही
प्रसुतिकक्ष	-	-	१
शस्त्रक्रियागार	-	१	लागू नाही
चिकित्सालय कक्ष	-	१	१
आणिबाणी/दुर्घटना कक्ष	१	४	लागू नाही
कर्मचाऱ्यांकरिता निवासी सुविधा	१	१	२
पुरुष व स्त्रियांकरिता वेगळी उपयोगिता	१	२	५
कचरा विल्हेवाट पद्धती	१	–	३
सूचना पेटी	-	१	१०
स्त्रोत : विभागाचे आकडे			

सडक- अर्जुनी तहसील येथील रुग्णालय २००४ पासून एक पीएचसी च्या इमारतीत सुरू झाले. तेंव्हापासून, जरी ग्रामीण रुग्णालयाला ३० खाटांची संख्या मंजूर होती, तरी ते फक्त सहा खाटांनी काम करत होते. शिवाय, ग्रामीण रुग्णालयाकरिता रुपये १.४४ कोटीची नेमलेली इमारत जी ऑगस्ट, २०१० मध्ये पूर्ण करून हस्तांतरीत व्हावयाची होती, ती अपूर्ण राहिली (जून २०११) या विलंबामुळे ज्या आरोग्य देखरेख पायाभूत सुविधा ग्रामिण रुग्णालयाने तरतूद करावयाच्या होत्या. त्यापासून सडक-अर्जुनीची ग्रामीण जनता वंचित राहिली.

जिल्हा आरोग्य संस्थेला २००६-११ या कालावधीत सर्व प्रकारच्या संख्यांची आयपीएचएस प्रमाणे श्रेणीवाढ करण्यासाठी रुपये ८.८३ कोटी मिळाले होते, पण रुपये ८.८० कोटीचा खर्च केल्यावरही (मार्च, २०११) प्रशिक्षित मनुष्यबळ व पायाभूत सुविधा यांच्या बाबतीत एकाही संस्थेची श्रेणीवाढ आयपीएचएस प्रमाणे झाली नाही.

निकास परिषदेत असे नमूद केले गेले (नोव्हेंबर, २०११) की भरतीच्या जाहिरातींना आलेल्या अतिशय कमी प्रतिसादामुळे सीएचसी, पीएचसी व उपकेंद्रे यांची श्रेणीवाढ होवू शकली नाही. सडक अर्जुनी येथील ग्रामीण रुग्णालयाच्या बाबतीत असे नमूद केले गेले की ते रुग्णालय लवकरच ३० खाटांनीशी कार्य सुरू करेल.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

गोंदिया जिल्ह्यात ३८ प्राथमिक आरोग्य केंद्रे, २३६ उप केंद्रे व ९ ग्रामीण रुग्णालय ही स्वतःच्या शासकीय इमारतीत कार्यरत आहेत. सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये व वैद्यकीय संस्थामध्ये बायोमेडिकल कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी व्यवस्था असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रामधील व संस्थेमधील परिसर स्वच्छ व आरोग्यदायी आहे. त्यामुळे वैद्यकीय उपचारासाठी आलेल्या रुग्णांसाठी आल्हाददायक वातावरण असते. सूचनापेटी सर्वच आरोग्य संस्थामध्ये उपलब्ध असल्यामुळे तसेच प्राप्त झालेल्या सूचनाचे स्वागत केले जाते.

एमपीसीबी च्या मार्गदर्शक सूचनेनुसार बायोमेडिकल कचऱ्यांची विल्हेवाट लावण्यासाठी दोन प्रकारचे खड्डे सर्वच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये व उप केंद्रामध्ये घेण्यात आले असून त्याद्वारे बायोमेडिकल कचऱ्यांची विल्हेवाट लावण्यात येते.

उपलब्ध असणाऱ्या मनुष्यबळानुसार विशेषतज्ज्ञ व इतर तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचे एकत्रित सूत्र सर्वच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वापरण्यात आले असून त्यानुसार सर्व प्रकारच्या विशेषतज्ञांची आरोग्य सुविधा गरीब व गरजू लोकांना पुरविण्यात येते.

आयपीएचएस अंतर्गत असणारी सर्व पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आली आहेत. सद्यस्थितीत सर्व पदे भरून आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

सडक-अर्जुनी तहसील येथील ग्रामीण रुग्णालयाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आले असून त्यासाठी मुदतवाढ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक १५ ऑक्टोबर २०१० च्या पत्रान्वये मंजूर होती. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक १४ ऑक्टोबर २०११ रोजीच्या पत्रान्वये रुपये १०० प्रति दिन विलंब आकार मंजूर असून त्यानुसार संबंधित कंत्राटदाराच्या अंतिम देयकामधून रुपये ४०,५०० इतक्या रकमेची वजावट करण्यात आली आहे.

सदरचे बांधकाम दिनांक २० डिसेंबर २०११ रोजी पूर्ण झाले असून त्याच दिनांकापासून हस्तांतरीत झाल्याने त्वरीत रुग्ण सेवेसाठी कार्यान्वित केले.

पायाभूत आरोग्य देखरेख सेवा

पायाभूत आरोग्य देखरेख सेवा, ज्यांची तरतूद आरोग्य केंद्रात आवश्यक होती, त्या बऱ्याच केंद्रात उपलब्ध नव्हत्या, ३१ मार्च २०११ ला या बाबतीतील सीएचसी व पीएचसी यातील स्थितीचा तपशिल तक्ता ५ मध्ये दिला आहे.

तक्ता ५ : आरोग्य देखरेख सेवा

(संख्येमध्ये)

तपशिल	जेथे सेवा उपलब्ध नव्हत्या अशा केंद्राची संख्या	
	सीएचसी	पीएचसी
रक्ताचा साठा	२	लागू नाही
नवजात काळजी	०	१
२४७ प्रसुती	०	१
आंतररुग्ण विभाग (आयपीडी) सेवा	०	१
क्ष-किरणे	१	लागू नाही
अल्ट्रा साऊंड	३	लागू नाही
ईसीजी	१	७
प्रसुती काळजी	४	०
आकस्मिक सेवा (२४ तास)	०	२
कुटुंब नियोजन (Tubectomy व Vasectomy)	१	लागू नाही
वैद्यकीय गर्भपात (एमटीपी) सेवा	२	६
जनन संबंधी स्त्रीरोगशास्त्रांतर्गत		
परिस्थितीची तपासणी	४	४
बालरोग चिकित्सा	१	लागू नाही

स्त्रोत : विभागाचे आकडे

वरील मूलभूत सेवांच्या अभावी ग्रामीण जनता या सेवांपासून वंचित राहिली.

अभिक्षण मान्य करतांना निकास परिषदेत (नोव्हेंबर, २०११) असे नमूद केले गेले की, आयपीएचएस प्रमाणे सुविधांची तरतूद करण्यासाठी प्रयत्न केले जात होते.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :——

आयपीएचएस मांनकानुसार सर्व पायाभुत आरोग्य सुविधा गोंदिया जिल्ह्यातील आरोग्य संस्थामध्ये उपलब्ध केल्या आहेत. सर्व आयपीएचएस मानक संस्था या Delivery points मध्ये समाविष्ट असून २६ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ८७ उप केंद्रामध्ये २४×७ सुविधा उपलब्ध आहेत. आंतर रुग्ण तसेच बाह्य रुग्ण सेवा सर्व आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध आहेत.

सेवा सुविधा उदा. क्ष-किरणे, अल्ट्रा-साऊंड, ईसीजी इ. सुविधा आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध आहेत त्यामुळे एनबीसीसी, एसएनसीयु, सी-सेक्शन निदान सेवा सारख्या बाबी रुग्णांस उपलब्ध झाल्या.

मनुष्यबळ व्यवस्थापन

वैद्यकीय देखरेखीची गुणवत्ता व कार्यक्षमता ही बहुतांशी मनुष्यबळ साधनसंपत्तीच्या उपलब्धतेवर अवलंबुन असते. लेखापरिक्षेतील छाननीमध्ये, चाचणी- तपासणी केलेल्या आरोग्य केंद्रामध्ये तक्ता ६ मध्ये दिल्याप्रमाणे मनुष्यबळांची तुट दिसून आली.

तक्ता :- ६ चाचणी तपासणी केलेल्या आरोग्य केंद्रामध्ये मनुष्यबळाची उपलब्धता.

अ.क्र.	तपशिल (प्रमाणक)	आयपीएचएस प्रमाणकांप्रमाणे आवश्यकता	सध्याची परिस्थिती (मार्च २०११)	तुट
	सामुहिक आरोग्य केंद्रे (एकूण ५)			
१	सर्वसाधारण शल्यचिकित्सक (१ प्रति सीएचसी)	५	०	५
२	भिषक (१ प्रति सीएचसी.)	५	०	५
३	प्रसुतिशास्त्रज्ञ / स्त्री रोग तज्ञ (१ प्रति सीएचसी)	५	०	५
४	बालरोग चिकित्सक (१ प्रति सीएचसी.)	५	३	२
५	बधिरीकरण तज्ञ (१ प्रति सीएचसी)	५	०	५
६	नेत्र शल्यचिकित्सक (१ प्रति सीएचसी)	१	०	१
७	सर्वसाधारण कर्तव्य अधिकारी (६ प्रति सीएचसी)	३१	१४	१७
८	कर्मचारी परिचारिका (१५ प्रति सीएचसी अ १८ एसडीएच करीता)	१८	७	९
९	औषध निर्माता/मिश्रक (३ प्रति सीएचसी + ४ एसडीएच करीता)	१८	७	९
१०	प्रयोगशाळा तंत्रज्ञ (३ प्रति सीएचसी अ ४ एसडीएच करिता)	१६	६	१०
११	क्ष किरण चित्रकार (२ प्रति सीएचसी/एसडीएच)	१०	३	७
१२	नेत्रोपचार सहाय्यक (१ प्रति सीएचसी एसडीएच)	५	३	२
	प्राथमिक आरोग्य केंद्रे (एकूण ७)			
१	वैद्यकीय अधिकारी (२ प्रति पीएचसी)	१४	१३	१
२	औषधनिर्माता (१ प्रति सीएचसी)	७	५	२
३	कर्मचारी परिचारीका (३ प्रति पीएचसी)	२१	१	२०
४	प्रयोगशाळा तंत्रज्ञ (१ प्रति पीएचसी)	७	५	२
	उप केंद्र एकूण : १४			
१	आरोग्य कार्यकर्ता (एक प्रति उप केंद्रे)	१४	११	३
	स्त्रोत विभागाचे आकडे			

वरील तक्त्यावरून हे उघड आहे की आरोग्य केंद्रात मनुष्य बळाचा अतिशय तुटवडा होता. निकास परिषदेत असे नमूद केले गेले की ग्रामीण भागात काम करण्याकरिता वैद्यकीय कर्मचारी वर्गात अल्प प्रतिसादामुळे कर्मचारीवर्गाचा तुटवडा होता. निकास परिषदेत असे नमूद केले गेले की, ग्रामीण भागात काम करण्याकरिता वैद्यकीय कर्मचारी वर्गाच्या अल्प प्रतिसादाने कर्मचारी वर्गाचा तुटवडा होता. आवश्यक जागा भरण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्नांची प्रक्रिया सुरू होती.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :——

उपलब्ध असणाऱ्या मनुष्यबळानुसार विशेषतज्ञ व इतर तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचे एकत्रित सुत्र सर्वच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वापरण्यात आले असून त्यानुसार सर्व प्रकारच्या विशेषतज्ञांची आरोग्य सुविधा गरीब व गरजु लोकांना पुरविण्यात येते.

आयपीएचएस अंतर्गत असणारी सर्व पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आली असून सर्व आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

यामध्ये वैद्यकीय सल्लागार, बालरोग तज्ञ, भुलतज्ञ, नेत्रतज्ञ या विशेषज्ञांचा समावेश होतो. सद्यःस्थितीत सर्व पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आली आहेत. मुख्य सेविका (आरोग्य) पदे उपलब्ध होत नसल्याने त्या जागी कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या परिचारिकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

परिचारिका शाळा न चालविणे

भारत सरकारने, एनआरएचएम च्या कार्यान्वयनासाठी निर्गमित केलेल्या कार्यचौकटीप्रमाणे परिचारीका शाळांना बळकट करणे हा एनआरएचएम चा एक अत्यावश्यक घटक आहे. या कारणाकरिता जिल्हा आरोग्य संस्था एनआरएचएम गोंदिया ने २००७-०८ ते २०१०-११ या वर्षात जिल्हा शल्यचिकित्सक, कुवर तिलक सिंग, सर्वसाधारण रुग्णालय, गोंदिया यांना परिचारीका शाळेकरिता रुपये ६४.११ लाखांचे अनुदान दिले होते. या रुपये ६४.११ लाखांपैकी मार्च २०११ पर्यंत रुपये १९.३१ लाख खर्च झाला होता.

लेखापरिक्षणात असे दिसून आले की, एक वर्ग खोली व २० परिक्षार्थी परिचारिकांरिता एका वसतिगृहांचे बांधकाम सुरू होते पण महाराष्ट्र परिचर्या परिषदेच्या तपासणी नंतर विहित प्रमाणकांप्रमाणे आवार नसल्याने परिचारिका शाळा चालविण्याची परवानगी देण्यात आली नाही.

निकास परिषदेत असे नमूद करण्यात आले की, परिचारिका शाळा २०१२-१३ मध्ये काम सुरू करेल.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :——

शासन निर्णय क्र. नर्सिंग स्कुल २०१२/ फाईल नं. १६७, दिनांक १ ऑक्टोबर २०१२ अन्वये केटीएस रुग्णालय गोंदिया येथे नर्सिंग स्कुल बांधण्यास मंजुरी मिळाली. केंद्र शासनाच्या पत्र क्र. Z. २८०१५/१२, दिनांक २३ नोव्हेंबर २०१२ अन्वये देखील गोंदिया जिल्ह्यांतील नर्सिंग स्कुल बांधकामासाठी मान्यता आहे. नर्सिंग स्कुल सप्टेंबर, २०१३ पासून कार्यरत आहे.

Name of Post (1)	Regular (2)	Contractual (3)	Total Posts (4)
Principal	1	0	1
Vice - Principal	1	0	1
Tutor	8	6	14
Steno/Acct.	1	0	1
Clerk	1	0	1
Liberian	1	0	1
Lab Attendant	0	1	1
Watchman	3	2	5
Driver	0	1	1
Cleaner	0	1	1
Cook	4	0	4
Warden	2	1	3
Sweeper	3	0	3
Peon	1	2	3
Total ..	26	14	40

For ANM Nursing School Staff (Support & Teaching Staff)

Name of post	Filled Contractual Post
Tutor	1
Acct. / DEO	1
Sweeper	2
Cook	2
Watchman	4
Total ..	10

रोगप्रतिकारक्षम करण्याचा कार्यक्रम

२००६-११ या कालावधीत शुन्य ते एक वयोगटातील बालकांना बीसीजी, डीटीपी व ओपीव्ही पासुन प्रतिकारक्षम करण्याचे एकूण साध्य ८८ ते १०० टक्के होते. त्याचप्रमाणे, बालकांमध्ये दुय्यम प्रतिकारक्षमता करण्याच्या बाबतीत लक्षांचे एकूण साध्य डीटी करीता ९८ ते १०० टक्के, टीटी करीता (१० वर्ष वयोगट) ९३ ते १०० टक्के व टीटी (१६ वर्ष वयोगट) करीता ९० ते १०० टक्के होते. २००६-०८ या कालावधीत तीव्र श्वसन विषयक संक्रमणाची (एआरआय) एकूण १२६ उदाहरणे सापडली. (२००८-११ या कालावधीत माहिती दिली गेली नाही) ज्याकरिता अभिभाषणाची आवश्यकता आहे.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

रोगप्रतिकारक्षम करण्याच्या कार्याक्रमांतर्गत सन २०१२-१३ मध्ये ० ते १ वर्ष वयोगटातील मुलांना बीसीजीची लस देण्याचे प्रमाण १०२.७७ टक्के इतके असून ओपीव्ही चे प्रमाण ९८.९६ टक्के व डीपीटी चे प्रमाण ९८.९६ टक्के इतके आहे. पल्स पोलीओचे प्रमाण १२६ (२००६-०८) वरुन ३८ पर्यंत खाली आले आहे.

Vaccine	08-09	09-10	10-11	11-12	12-13	13-14
BCG	98.37	131.67	126.03	112.78	102.77	96.84
DPT	100.49	92.52	110.13	104.91	98.96	99.46
OPV	100.49	92.52	110.13	104.91	98.96	99.46
DT	103.79	99.08	99.26	100.24	92.15	92.31
TT10	100.42	104.36	97.88	99.83	92.73	97.44
TT16	90.35	101.40	97.12	99.85	93.23	105.9

ARI Cases during 2008-11

Year	0 to 1 yr.	1 to 5 yr.	Total
2008-09	31	3	34
2009-10	41	5	46
2010-11	39	3	42
2011-12	37	2	39

अंधत्व नियंत्रणाकरिता राष्ट्रीय कार्यक्रम (एन.पी.सी.बी.)

वक्रीभवनातील दोष असणाऱ्या विद्यार्थ्यांना चष्म्यांचे विनामुल्य वितरण करणे या कार्यक्रमात दृष्टीसमोर ठेवले होते. वक्रीभवनातील दोष व चष्म्याचे वितरण यांची माहिती तक्ता ७ मध्ये दिली आहे.

तक्ता - ७ चष्म्यांच्या पुरवठ्यातील तूट :—

वर्ष	सापडलेले वक्रीभवन दोष	चष्म्यांचा पुरवपठा केला	तूट	तूटीची टक्केवारी
२००६-०७	७८८	६०९	१७९	२२.७२
२००७-०८	१२२७	११०३	१२४	१०.११
२००८-०९	१२७३	७६२	५११	४०.१४
२००९-१०	९५७	७७५	१८२	१९.०२
२०१०-११	८३१	६३१	२००	२४.०७
स्त्रोत विभागाचे आकडे				

ज्या विद्यार्थ्यांमध्ये वक्रीभवनाच्या दोष होता अश्या सर्व विद्यार्थ्यांना चष्मे दिले गेले नाहीत व यातील तूट गेल्या पाच वर्षात १० टक्के ते ४० टक्के या टप्प्यात होती.

गोंदिया जिल्ह्यांत नेत्र पेढी नव्हती. तथापि, २००७-०८ या वर्षात eyeball संग्रह केंद्र मंजुर करण्यात आले व या केंद्रात वर्ष २००९-१० पासून eyeball संग्रह केले जात होते व एका खाजगी नेत्र पेढीला हस्तांतरित केले जात होते.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

जिल्ह्यात कार्यरत नेत्र चिकित्सा अधिकारी यांचेकडून मासिक सभेत दृष्टीदोष आढळून आलेल्या शालेय विद्यार्थ्यांच्या चष्मे मागणीची यादी सादर करण्यात आली होती. नमूद केलेल्या कालावधीत सदर मागणीची यादी सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, गोंदिया यांना सादर केली असून त्यानुसार सर्व शिक्षा अभियान, गोंदिया यांनी विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांना मोफत चष्मे वाटप केले गेले होते. न दिले गेलेले चष्मे पुढील आर्थिक वर्षात म्हणजेच एप्रिल महिन्यात देण्यात आल्यामुळे सदरची तूट दिसत आहे. तरी प्रत्येक दृष्टीदोष आढळलेल्या शालेय विद्यार्थ्यांना योग्य चष्मे द्यावयाची दक्षता घेण्यात आलेली आहे.

गोंदिया जिल्ह्यांत नेत्र पेढी नसल्याबाबतची कारणे खालील प्रमाणे आहेत :—

१. जिल्ह्यात कॅरेटोप्लास्टी करण्याकरिता आवश्यक नेत्र तत्रांची कमतरता आहे.
२. नेत्रपेढी करीता आवश्यक जागा नाही तसेच सामान्य रुग्णालय, गोंदिया येथील इमारत सक्षम अधिकाऱ्यांद्वारे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया यांना एम.सी.आय.च्या सामजस्य करारानुसार हस्तांतरीत करण्यात आली आहे.

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम

अकराव्या योजनेच्या अखेरपर्यंत कुष्ठरोग नष्ट करण्याचे व कुष्ठरोग प्रचलित दर प्रती १०,००० ला एक या पेक्षा कमी हे ठेवण्याची निश्चिती करण्याचे राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. कुष्ठरोग प्रचलित दर, उपचार घेत असलेल्या कुष्ठरोग रुग्णांची एकूण संख्या व नविन प्रकरणांची संख्या २००६-११ या कालावधीत **तक्ता ८** मध्ये दिल्याप्रमाणे होती.

तक्ता - ८ कुष्ठरोग रुग्णांचा चालू असण्याचे प्रमाण :—

वर्ष	प्रचलित दर	उपचार घेत असलेले रुग्ण	नोंदणी झालेली नवी प्रकरणे
२००६	०.७६	१००	२७०
२००७	०.८५	११२	१९९
२००८	१.२२	१६५	२४१
२००९	२.०५	२८३	४००
२०१०	२.९२	२६४	३७७
२०११	२.११	३०३	३८२
स्त्रोत :- विभागाचे आकडे			

२००६-०७ ही वर्ष वगळता, प्रचलित दर प्रति १०,००० ला एक या पेक्षा कमी हे लक्ष्य साध्य करण्यात जिल्ह्याला अपयश आले व नोंदणी झालेल्या रुग्णांना संख्येत वाढ झाली.

विकास परिषदेत असे नमूद करण्यात आले की चालू वर्षात असलेली प्रकरणे शोधून काढल्याचे प्रमाण वाढले व भविष्यात लक्ष्य साध्य करण्यात येईल.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

दर दहा हजारी लोकसंख्या मागे कुष्ठरुग्णांचे प्रमाण एक (१) पेक्षा कमी करण्यासाठी गरजे नुसार केलेल्या उपाययोजनाबाबत स्पष्टीकरण मा. लोकलेखा समितीस खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे :—

सन २००६-२०११ च्या प्रचलित दरानुसार तुलना केली असता दर दहा हजारी कुष्ठरुग्णांचे प्रमाण सध्याचे स्थितीत २०१२ पासून ते मार्च २०१५ अखेर दर दहा हजारी कुष्ठरुग्णांचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून येते तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :—

वर्ष	प्रचलित दर	उपचार घेत असलेले रुग्ण	नोंदणी झालेली नवी प्रकरणे
२०१२	२.१०	२९६	४२६
२०१३	२.०९	२९४	४४५
२०१४	२.००	२८१	४०२
२०१५	१.९७	२७६	३७६
स्त्रोत :- विभागाचे आकडे			

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमा अंतर्गत गोंदिया जिल्ह्यामध्ये कुष्ठरोग दुरीकरण धोरण अंतर्गत शोध मोहिम राबविण्यात येत असून लपलेल्या कुष्ठरोरुग्णांची संख्या वाढत आहे.

या धोरणानुसार खालीलप्रमाणे कृती योजना राबविण्यात येत आहे :—

(१) प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा, तालुका, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर समन्वयक समिती स्थापन करण्यात आली आहे.

(२) संपूर्ण लोकसंख्याचे आशा, अवैस, अवैप यांच्या मार्फत शोध मोहिम राबवून नविन रुग्ण शोधण्यात येत आहेत.

(३) कुष्ठरुग्णांचे संपूर्ण औषधोपचार होईपर्यंत वरील कर्मचाऱ्यांमार्फत पाठपुरावा करण्यात येत असून आढावा घेण्यात येतो.

(४) समाजात कुष्ठरोगाबाबत जनजागृती माहिती, शिक्षण व प्रसारमाध्यमांद्वारे प्रभावीपणे कार्यक्रम राबविण्यात येतो.

(५) प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर कुष्ठरोग उपचार दिवस कार्यान्वित करून त्या मार्फत सनियंत्रण आणि मार्गदर्शन कुष्ठरुग्णांना करण्यात येत आहे.

(६) नवीन कुष्ठरुग्णांना प्राथमिक अवस्थेत शोधण्यासाठी कुष्ठरुग्णांच्या सहवासितांची तपासणी करण्यात येते.

(७) सर्व आरोग्य अधिकारी/कर्मचाऱ्यांना कुष्ठरोगाबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे व निरंतर देण्यात येत आहे.

(८) शालेय आरोग्य तपासणी पथक मार्फत शालेय विद्यार्थ्यांचे कुष्ठरोगाबाबत तपासणी करण्यात येते व पाठपुरावा घेण्यात येतो.

सुधारित राष्ट्रीय सुधारित/क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम

एनआरएचएम च्या कार्यान्वयनाच्या कार्यचौकटी प्रमाणे, मिशनच्या संपूर्ण कार्यकाळात क्षयरोग डॉटस (डीओटीएस) मालिकेचे कार्यान्वयन करून व आणखी, नियोजित प्रकरणे शोधण्याचे प्रमाण कायम राखून ८५ टक्के रोगमुक्ती प्रमाण राखण्याचे ठरवण्यात आले. तथापि २००६-११ या कालावधीत ८५ टक्क्याची इच्छित पातळीचे रोगमुक्ती प्रमाण, **तक्ता ९** मधील तपशीलाप्रमाणे, राखणे शक्य झाले नाही.

तक्ता - ९ क्षयरोग रुग्णांच्या रोगमुक्तीचे प्रमाण :—

वर्ष	नोंदणी झालेल क्षयरोग रुग्ण	रोगमुक्त झालेले+ उपचार पूर्ण झालेले	रोगमुक्तीचे प्रमाण
२००६ -०७	१,९०१	१,५५१	८३.५१
२००७ -०८	१,६५२	१,३६३	८३.४०
२००८-०९	१,५१३	१,२४५	८०.७३
२००९ -१०	१,४३९	१,१५०	७२.५०
२०१० -११	३३०	१२०	७५.६९

स्त्रोत :- विभागाचे आकडे

२००६-११ या कालावधीत नवीन थुंकी निश्चितीची ८४ टक्के प्रकरणे शोधून काढण्यात आली जी ७० टक्क्यांच्या विहित लक्ष्यापेक्षा खूप जास्त होती.

विकास परिषदेत असे नमूद केले गेले की, आरोग्य जागृती शिबिरांमध्ये समाजाच्या सहभागातील अभावामुळे आणि आदिवासी समाजातील निरक्षरतेमुळे, रोगमुक्तीचे प्रमाण इच्छित पातळीपर्यंत साध्य करणे शक्य झाले नाही.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सन २००८-०९, २००९-२०१० या कालावधीत जिल्ह्यातील बहुतांश आरोग्य केंद्रात आरोग्य सेवक व आरोग्य सेविका यांच्या जागा भरल्या नव्हत्या. तसेच याच कालावधीत सुरक्षानिका कार्यक्रमांचे वरिष्ठ क्षयरोग पर्यवेक्षकांच्या २ जागा अनुक्रमे क्षयरोग पथक-नवेगांव/बांध व क्षयरोग पथक-गोंदिया रिक्त होत्या.

सुरक्षनिका अंतर्गत सन २०१५-२०१६ सर्व नवीन चार तालुकानिहाय सर्व वरिष्ठ उपचार पर्यवेक्षकाच्या (तालुका आमगांव, सालेकसा, तिरोंडा, सडक/अर्जुनी) जागा भरण्यात आल्या आहेत, जेणेकरून तालुकानिहाय सर्व क्षयरुग्णांना खात्रीशीर औषधोपचार व पुढील Treatment defaulter retrival action वेळेच्या आत करून जास्तीतजास्त क्षयरुग्णांना संपूर्ण औषधोपचार देऊन विहित लक्ष साध्य करता येईल.

तसेच, वरिल संपूर्ण कालावधीत गोंदिया जिल्ह्यात एचआयव्ही को-इन्फेक्शनचे प्रमाण तसेच क्षयरोगाबरोबरच क्षयरुग्णांना असलेले इतर आजारामुळे क्षयरुग्णांच्या मृत्यूचे प्रमाण अधिक वाढले आहे.

सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय क्षयरुग्णांच्या एचआयव्ही तपासणीकरिता संबंधित रेकॉर्ड व तपासणी किटची उपलब्धता जिल्हा सामान्य रुग्णालय आयसीटीसी येथून करण्यात आली असून लवकरात लवकर सर्व क्षयरुग्णांची एचआयव्ही तपासणी करून पुढील एआरटी औषधोपचार सुरू करून मृत्युचे प्रमाण कमी करता येईल.

गोंदिया जिल्हा हा आदिवासी बहुल, शिक्षणाचा अभाव असल्यामुळे व आरोग्य जागृती शिबिरांमध्ये समाज सहभागातील अभाव असल्यामुळे रोगमुक्तीचे प्रमाण इच्छित पातळीपर्यंत साध्य करणे शक्य झाले नाही. तसेच जिल्ह्यात रुग्णांची आर्थिक परिस्थिती खालावली असल्यामुळे रुग्ण औषधोपचारादरम्यान उदरनिर्वाहाकरिता स्थलांतरित होत असल्याने रोगमुक्तींचे प्रमाण इच्छित पातळीपर्यंत साध्य करता आले नाही.

तरी सन २०१५-२०१६ मध्ये आदिवासी /दुर्गम व इतर समाजामध्ये आरोग्य व जनजागृती व स्पुटम कलेक्शन सेंटर तसेच पिक-अप कलेक्शन सेंटरसाठी "दृष्टी" ह्या अशासकीय स्वयंसेवी संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे.

क्षयारोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत गोंदिया जिल्ह्यात Advocacy Communication Social Marketing सुरू करण्यात आले आहे.

आरोग्य व्यवस्थापनास समाजाचा सहभाग

एनआरएचएम च्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) आंतररुग्ण विभाग (आयपीडी) सेवा आणि रुग्णालयातील आणि बाह्यपोच (आऊटरीच) कामाकरिता, सुविधा यांच्या कार्यसिद्धीचा आढावा घेण्याकरिता, रुग्णालयाच्या व्यवस्थापनाकरिता, पंचायत राज कार्यचौकटी अंतर्गत पीएचसी, सीएचसी, जिल्हा रुग्णालय पातळींवर रोगी कल्याण समित्या (आरकेएस) स्थापन करावयाच्या आहेत. रोगी कल्याण समित्यांना लाभार्थींच्या तक्रारी दूर करावयाच्या असतात व गुणवत्तापूर्ण आरोग्य काळजी सेवेची सुलभता निश्चित करावयाची असते. याकरिता आरोग्य सुविधेच्या प्रत्येक पातळीसाठी प्रमाणीकृत सेवा विनिर्दिष्ट वेळापत्रकात देण्याकरिता एका निश्चित बांधिलकीसह नागरी सनद विकसित करावयाची आहे.

चाचणी तपासणी केलेल्या पाच सीएचसी, पीएच सी, व १४ उपकेंद्रे यापैकी एक सीएचसी, एक पीएच सी व ८ उपकेंद्रांमध्ये नागरी सनद प्रदर्शित केली नव्हती. याप्रकारे नागरिक सनदद्वारा, आरोग्य काळजी मोहीम ही फक्त आंशिक होती. व आरोग्य काळजी देण्याबाबत समाजाची गाऱ्हणी बहुतांशी असंबोधित राहिली.

हे अभिक्षण मान्य करताना, निकास परिषदेत असे नमूद केले गेले की जिल्ह्यांतील सर्व सीएचसी, पीएचसी व उपकेंद्रे यात नागरी सनद प्रदर्शित करण्याकरिता आवश्यक अनुदेश निर्गमित केले जात होते.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

रुग्ण कल्याण समितीची स्थापना सर्व संस्थांमध्ये करण्यात आली आहे. बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) आंतररुग्ण विभाग (आयपीडी) सेवा आणि रुग्णालयातील बाह्यपोच (आऊटरीच) कामाकरिता, सुविधांचा आढावा घेण्यासाठी नागरी सनद विकसित करण्याबाबतच्या सूचना तसेच आईसी व बीसीसी कार्यक्रमांतर्गत आरोग्याबाबतची माहिती व जाणीव करून करून देण्यासाठी नागरिकांमध्ये जागृती निर्माण केली जाते.

रुग्ण कल्याण समितीच्या नियामक सभेत वार्षिक निधीचे नियोजन केले जाते. प्रत्येक आरकेएस सभा ही आरोग्य संस्थेमध्येच घेतली जाते. सभा सुरू होण्यापूर्वी समिती सदस्यांचे रुग्णालयास भेट देणे अपेक्षित आहे. रुग्णालयीन रचनेचा अभ्यास करणे, रुग्णांना भेट देणे, रुग्णाना देण्यात येणाऱ्या सेवा साहित्याचा वापर चांगल्या प्रकारचा आहे हे तपासणे इ. या पद्धतीने सभेला सुरूवात करताना संस्थेची माहिती होते व आवश्यकतेनुसार रुग्णांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी निर्णय घेण्यास मदत होते. प्रत्येक आरोग्य संस्थेमध्ये सूचना पेटी ठेवण्यात आली असून सभा सुरू होण्यापूर्वी त्यातील सुचना वाचून रुग्णांचाही सहभाग होत असतो व रुग्णांच्या / रुग्णालयाच्या गरजा प्राध्यान्याने सोडविण्यास मदत होते.

रुग्ण कल्याण समितीच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा होण्यासाठी खालील पद्धतीचा अवलंब केला आहे :—

१. रुग्ण कल्याण समितीस मार्गदर्शक सुचना पाठविण्यात आल्या आहेत.

२. अशासकीय सदस्यासाठी प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षणाचे मॉडल तयार केले आहे. तसेच, प्रशिक्षणाचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. सदस्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

३. वित्तीय व प्रशासकीय अधिकार रुग्ण कल्याण समितीला देण्यात आले आहेत.

गोंदिया जिल्ह्यात एकूण ९९.३ आशा स्वयंसेविका ह्या समाज व आरोग्य सेवा पुरविणाऱ्या संस्थेमधील दुवा आहेत.

आदिवासी विकास विभाग

शिष्यवृत्ती योजना

समाजातील दुर्बल घटकांचे आणि विशेषतः अनुसूचित जाती (एस टी) व अनुसूचित जमाती (एस टी) यांच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधाचे प्रवर्तन करण्याकरिता विविध शिष्यवृत्ती योजना भारत सरकारच्या आर्थिक पाठिंब्याने राज्य शासन कार्यान्वित करीत आहे. जिल्हापातळीवर योजना, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडून कार्यान्वित केल्या जात आहेत.

लेखा परिक्षेच्या छाननीत असे उघडकीस आले की, संपूर्ण लक्षित असलेला गट, योग्य आर्थिक सहाय्याने समाविष्ट करण्याची निश्चिती करण्यासाठी, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी, पात्र विद्यार्थ्यांच्या नाव नोंदणीची माहिती शिक्षण विभाग किंवा शैक्षणिक संस्थांकडून मागविली नाही संस्थांकडून आलेल्या प्रस्तावांच्या आधारावर शिष्यवृत्ती दिली गेली.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात आदिवासी विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेंतर्गत गोंदिया जिल्हाकरिता प्रकल्प कार्यालय, देवरी यांची खर्च व साध्य याबाबत माहिती :—

वर्ष	प्राप्त निधी	एकूण खर्च	प्राप्त अर्ज	एकूण साध्य
२००६-२००७	१६५.७१	१६५.७१	६०८७	६०८७
२००७-२००८	१३२.२४	१३२.२४	५९५६	५९५६
२००८-२००९	१४५.५०	१४५.५०	४०९६	४०९६
२००९-२०१०	२५४.१७	२५४.१७	५९२५	५९२५
२०१०-२०११	२७६.३०	२७६.३०	५८३९	५८३९

भारत सरकार शिष्यवृत्ती/वैद्यकीय व तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शुल्क प्रतिपूर्ति व शिक्षण फी, परिक्षा फी (फ्री शीप) प्रतीपूर्ती या योजनेचा लाभ घेण्याकरिता अनुसूचित जमातीच्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह प्रकल्प कार्यालयामध्ये मंजुरीकरिता सादर करण्यात येत होते.

विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करीत असताना विद्यालय/महाविद्यालयाकडून विद्यापीठाचे मान्यतापत्र, शासनाचे मान्यतापत्र/परवानगी पत्र मागवून तसेच शासनाने मान्यता दिलेली क्षमता (Intake Capacity) इ. सर्व बाबी लक्षात घेता व कोणताही अनुसूचित जमातीचा विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही व भारत सरकार यांनी ठरवून दिलेल्या ग्रुप I,II,III, IV प्रमाणे गटवारी निहाय विद्यार्थ्यांचे अर्ज तपासून शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली. देवरी प्रकल्प कार्यालयातील उपलब्ध दस्ताऐवजानुसार सदर प्रकल्प क्षेत्रात सन २००६-२०११ या कालावधीत अनुसूचित जमातीचा कोणताही विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित नव्हता.

सामाजिक न्याय विभाग

१.५ शालांत पूर्व शिष्यवृत्ती

अस्वच्छ स्वरूपाचा व्यवसाय करणाऱ्यांच्या बालकांना शालांत पूर्व शिक्षणासाठी आर्थिक सहाय्याची तरतूद करण्यासाठी ही योजना केंद्र व राज्य सरकारांकडून ५० : ५० या प्रमाणात कार्यान्वित करण्यात येते.

२००६-२०११ या कालावधीत, जिल्ह्यातील १०,३९३ पात्र विद्यार्थ्यांपैकी ९,५४४ विद्यार्थ्यांना रुपये १.२७ कोटी च्या शिष्यवृत्त्या दिल्या गेल्या व अपुऱ्या संख्येने आलेले प्रस्ताव व अपुऱ्या निधीमुळे ८४९ विद्यार्थी, या योजनेखालील लाभांपासून वंचित राहिले.

निकास परिषदेत असे नमूद केले गेले की, निधी प्राप्त न झाल्यामुळे काही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नाही. या प्रकारे विद्यार्थी ज्या शिष्यवृत्तीकरिता पात्र होते ते त्यापासून वंचित राहिले.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सामाजिक न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

१. सदर योजने अंतर्गत माहे सप्टेंबर अखेर पर्यंत संबंधित शाळेकडून प्रस्ताव मागविण्यात येतात. त्या उपरांत प्राप्त तरतुदीच्या अनुषंगाने माहे मार्च अखेरपर्यंत संबंधित शाळेचे प्रस्ताव निकाली काढण्यात येतात.

२. सदर योजने अंतर्गत संबंधित शाळेकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाच्या आधारे विद्यार्थी संख्येनुसार तरतुदींची मागणी करण्यात येऊन प्राप्त तरतुदींच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव निकाली काढण्यात येतात. सन २००६-२०११ पर्यंतचे लक्ष्य १०,३९३ विद्यार्थी असून ९,५४४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आलेला आहे. सन २०१०-११ या वित्तीय वर्षात रुपये ४२.०० लक्ष मागणी करण्यात आली होती. परंतु, रुपये ३०.०० लक्ष तरतूद प्राप्त झाली व त्यामुळे ८४९ विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले. सन २०११-१२ या वित्तीय वर्षात जादा तरतूद प्राप्त होताच प्रलंबित प्रस्ताव व त्यावर्षी जेवढे प्रस्ताव प्राप्त झाले तेवढे सर्व प्रस्ताव निकाली काढण्यात आले आहेत. त्यामुळे सन २००६-२०११ या कालावधीतील एकही विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिला नाही.

तरी उपरोक्त अनुपालन मान्य करावे, ही विनंती.

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

अनुसूचित जाती/विमुक्त जाती/भटक्या जमाती व विशेष मागासवर्गीय प्रवर्गातील इ. ५वी ते इ. १०वी मधील वर्गातील मुलींना समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद द्वारा आर्थिक सहाय्य देण्यासाठी ही योजना जिल्ह्यात कार्यान्वित केली गेली.

६१,९८३ विद्यार्थ्याचे लक्ष्य असतांना, सन २००६-२०११ या कालावधीत फक्त ५४,४६७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली गेली, ज्याचा परिणाम ७,१५६ विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहण्यात झाला. सन २००८-०९ मध्ये संबंधित शाळांकडून १९३ पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव न आल्याने रुपये ७.४५ लाखांचे अनुदान प्रत्याप्रित केले गेले. सन २०१०-११ मध्ये शासनाकडून कमी निधी प्राप्त झाल्यामुळे ७,३२३ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली गेली नाही.

निकास परिषदेत असे नमूद करण्यात आले की, शाळांकडून प्रस्ताव उशीरा आल्याने आणि शासनाकडून अनुदानाच्या कमी तरतुदीमुळे सर्व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देता आली नाही हे उत्तर मान्य करण्यासारखे नाही कारण, सर्व शाळांकडून वेळेवर प्रस्ताव घेण्यासाठी विभागाने पुरेसे प्रयत्न केले नव्हते.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सामाजिक न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेंतर्गत तरतुदींची मागणी करतांना मागील वर्षी साध्य झालेल्या विद्यार्थ्यांचे संख्येवर ५% ते १०% वाढ दर्शवून पुढील वर्षीचे उद्दीष्टे ठरवून संभाव्य तरतुदींची मागणी करण्यात येते. त्या अनुषंगाने सन २००८-२००९ मध्ये ४९२८ विद्यार्थी उद्दिष्टये असून रुपये ५०.०० लक्ष मागणी करण्यांत आली व सदर वर्षात तरतूद प्राप्त झाली. परंतु वर्षाचे अखेरपर्यंत १९३ विद्यार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे सदर वर्षात ४७३५ मुलींना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला. त्यानंतर सन २००९-१० मध्ये प्रलंबित प्रस्ताव प्राप्त करून विद्यार्थीनींना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला.

सन २०१०-२०११ मध्ये सदर योजनेवर आठमाही सुधारित अंदाज पत्रकामध्ये रुपये १४५.०० लक्ष तरतुदीची मागणी करण्यांत आली होती. परंतु त्या वर्षात शासनाकडून रुपये ६८.०० लक्ष तरतूद प्राप्त झाली. प्राप्त तरतुदींच्या अनुषंगाने ७३२३ मुलींना सदर शिष्यवृत्तीचा लाभ देण्यांत आलेला असून उर्वरित प्रलंबित देयके सन २०११-१२ व काही देयके सन २०१२-१३ मध्ये प्राप्त तरतुदीमधून निकाली काढण्यांत आलेली आहेत. त्यामुळे सन २००६-२०११ या कालावधीतील एकही विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिला नाही.

तरी उपरोक्त अनुपालन मान्य करावे, ही विनंती.

ई - शिष्यवृत्ती योजना

प्रस्तावांची पडताळणी व मंजुरीची प्रक्रिया व विद्यार्थ्यांना संबंधित संस्थाद्वारे शिष्यवृत्तीचे वितरण करण्यातील विलंब टाळण्यासाठी व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे थेट प्रदान त्यांच्या बँकेतील खात्याद्वारे करण्याच्या हेतूने भारत सरकारने ई-शिष्यवृत्ती योजना सुरू केली (जानेवारी, २०१०).

सर्व पात्र विद्यार्थ्यांना समाविष्ट करून, कोअर बँकींगची सुविधा असणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकामध्ये खाती उघडून, ई-शिष्यवृत्ती प्रक्रिया सर्व बाबतीत पूर्ण करून ३० जून २०१० पर्यंत पूर्ण करावयाची होती. पात्र विद्यार्थ्यांना जुलै, २०१० पासून इलेक्ट्रॉनिक क्लिरिंग सिस्टिमद्वारे (ईसीएस) शिष्यवृत्तींचे प्रदान करावयाचे होते.

जिल्ह्यातील २७२ महाविद्यालयातील ४९,९५८ पात्र विद्यार्थ्यांपैकी, ४६,४०२ विद्यार्थ्याना शिष्यवृत्ती मंजूर केली गेली व ४२,२९६ विद्यार्थ्यांना त्यांच्या बँक खात्याद्वारे शिष्यवृत्ती मिळाली, उर्वरित ७,६६२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालेली नव्हती कारण ४,१०६ विद्यार्थ्यांच्या बाबतीत संबंधित महाविद्यालयांची विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांना चुकीचे बँक खाते क्रमांक कळविले होते व ३,५५६ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती प्रस्ताव महाविद्यालयांनी देय तारखेच्या आत सादर केलेले नव्हते.

उत्तरामध्ये, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गोंदिया यांनी नमूद केले की, ज्या विद्यार्थ्यांचे खाते क्रमांक चुकीचे होते. त्यांच्या बाबतीत शिष्यवृत्तीची रक्कम विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्या खात्यात ठेवली होती. शिवाय, प्रस्ताव वेळेवर प्राप्त न झाल्याने रुपये ५२ लाख शासनाला प्रत्यर्पित केले गेले. ७,६६२ विद्यार्थी सन २०१०-११ मध्ये शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले.

चाचणी-तपासणी केलेल्या चार संस्थांमध्ये, या संस्थांनी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेकडे प्रस्ताव न पाठविल्याने व शैक्षणिक वर्षात बँक खाते न उघडल्याने ३२३ विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले.

निकास परिषदेत असे नमूद करण्यात आले की, ४६,४०२ विद्यार्थ्यांपैकी ७,६६२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नाही कारण त्यांनी चुकीचे बँक खाते क्रमांक कळविले होते. काही विद्यार्थ्यांच्या बाबतीत संबंधित महाविद्यालयांनी प्रस्ताव वेळेवर पाठविले नाही, हे उत्तर स्वीकार्य नाही कारण अचूक बँक खाते क्रमांक व शिष्यवृत्तीसाठीचे प्रस्ताव वेळेच्या आत प्राप्त करण्यासाठी विभागाने पुरेसे प्रयत्न केले नाहीत.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सामाजिक न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

२०१०-११ या शैक्षणिक वर्षातील सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली आहे.

या कार्यालयांतर्गत ७६६२ विद्यार्थी वंचित राहिले असले तरी संबंधित संस्थांना व विद्यार्थ्यांना वेळोवेळी बँक खाते नॅशनल बँकेत उघडण्याबाबत व संस्थेची परीपूर्ण कागदपत्रे या कार्यालयात जमा करणेबाबत दिनांक २२ एप्रिल २०१० ला जा. क्र. १३६ व जा. क्र. १३७ प्रमाणे पत्र पाठविण्यात आलेली आहेत. दिनांक २८ डिसेंबर २०१० ला जा. क्र. १६४१ प्रमाणे पत्र पाठविण्यात आले. दिनांक १९ मार्च २०११ ला जा. क्र. ५२३ व जा. क्र. ५२९ अन्वये पत्र पाठविण्यात आले. तसेच दिनांक १५ जुलै २०११ ला. जा. क्र. ११०३ प्रमाणे पत्र पाठवून सर्व प्राचार्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. परंतु, उपरोक्त विद्यार्थ्यांची कोणतीही माहिती या कार्यालयास मिळाली नाही, त्यामुळे सदर विद्यार्थी वंचित राहिले होते.

मागील २०१०-११ या वर्षातील वंचित लाभार्थ्यांना २०११-१२ या वर्षामध्ये शिष्यवृत्ती अदा करण्यात आली त्यामुळे सद्यःस्थितीत एकही विद्यार्थी या शिष्यवृत्तीपासून वंचित नाही. तसेच कोणत्याही विद्यार्थ्यांची याबाबत तक्रार नाही.

करिता अनुपालन अहवाल मान्यतेसाठी सादर.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

१.६ पाणीपुरवठा

सर्व नागरिकांना, विशेषतः ग्रामीण भागात राहणाऱ्यांना पुरेसे व सुरक्षित पिण्याचे पाणी पुरविणे हे केंद्र व राज्य शासन दोन्हीकरिता अग्रकम क्षेत्र राहिलेले आहे. गोंदिया जिल्ह्यात, दोन केंद्र पुरस्कृत योजना व दोन राज्य शासन पुरस्कृत योजना दोन अभिकरणांद्वारा म्हणजे जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एम.जे.पी.) पिण्याचे पाणी पुरविण्याकरिता कार्यान्वित केला गेल्या. पिण्याकरिता तसेच इतर कामांकरिता पाण्याचा दरडोई वापर प्रति दिन ४० लिटर ठरविला गेला. २००६-२०११ या कालावधीत रुपये २०.३९ कोटी अनुदानाच्या तुलनेत पाणीपुरवठा योजनेवर रुपये १८.८५ कोटी खर्च केला गेला. लेखा परिक्षेचे या बाबतीतील निष्कर्ष खाली चर्चिले आहेत.

शासकीय निधीची अडवणूक :

शासनाने अनुदेश दिल्याप्रमाणे (एप्रिल, १९६८), वेग वर्धित ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमाखालील, पूर्ण झालेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना, संबंधित ग्रामपंचायतींना एक महिन्याच्या आंत त्यांच्या स्वतःच्या साधन संपत्तीमधून पुढे चालविण्याकरिता व परिरक्षा करण्यासाठी हस्तांतरित करावयाच्या होत्या.

तथापि, २००६-२०११ या कालावधीत पूर्ण झालेली सात कामे, कार्यादिष्ट झाल्याच्या तारखेपासून मार्च, २०११ पर्यंत ग्राम पंचायतींनी त्याचा ताबा न घेतल्याने कार्यशील नव्हती. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने या योजनांवर केलेला रुपये ३८.७८ कोटीचा खर्च निष्फळ राहिला आणि त्या योजनांचा वापर केला गेला नाही.

एम.जे.पी. ने नमूद केले (मार्च, २०११) की या योजना हस्तांतरित करण्याकरिता जिल्हापरिषदे बरोबर पत्रव्यवहार केला गेला. तथापि, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद यांनी नमूद केले (सप्टेंबर, २०११) की एम.जे.पी. ने पूर्ण केलेल्या योजना, गावकऱ्यांना आवश्यक दाबाने पाण्याचे पर्याप्त परिणाम देऊ शकत नव्हत्या आणि त्या स्वयंनिर्वाही नव्हत्या.

निकास परिषदेस असे नमूद करण्यात आले (नोव्हेंबर, २०११) की सविस्तर उत्तर लवकरच सादर करण्यात येईल. तथापि, दुर्मिळ शासकीय निधीची अडवणूक झाली व ग्रामीण जनता चांगल्या गुणवत्तेच्या पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहिली ही वस्तुस्थिती कायम राहते.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, गोंदियामार्फत (१) घाटकुरोडा, (२) चिरेखानी, (३) चुरडी, (४) पुतळी, (५) चिचगड पालांदूर, (६) लटोरी, (७) बघोली, या ७ प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्यात येऊन घाटकुरोडा प्रादेशिक पाणीपुरवठा योजना जिल्हा परिषद गोंदिया यांना व चिरेखानी आणि चुरडी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना संबंधित गावाच्या पाणी मंडळास पुढील देखभाल व दुरुस्ती करीता ताब्यात देण्यात आलेल्या आहेत. परंतु ४ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना संबंधित गावांनी हस्तांतरित करून न घेतल्यामुळे सद्यःस्थितीत सदर ४ योजना बंद आहेत.

पुतळी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना ता. सडक अर्जुनी (१६ गांवे १५ वाड्या) :

सदर योजना दिनांक १ जुलै २००८ रोजी कार्यान्वित करण्यात आली असून चाचणी अंतर्गत दिनांक १ जुलै २००८ ते ३० सप्टेंबर २००८ पर्यंत पाणीपुरवठा करण्यात आला. योजनेची संयुक्त पाहणी व योजना हस्तांतरणाबाबत विभागीय कार्यालयाचे दिनांक १२ मे २००८, २१ मे २००८ व ३१ मे २००८ ला सरपंच व जिल्हापरिषद पदाधिकारी यांचे सोबत सभा आयोजित करण्यात आल्या होत्या. तसेच विभागीय कार्यालयाचे पत्र क्र. १०८०, दिनांक २६ मे २००९ व पत्र क्र. १४८४, दिनांक २० जुलै २००९ व २५५६/दिनांक १५ ऑक्टोबर २०१०, तसेच पत्र क्र. ३२७/दिनांक ९ फेब्रुवारी २०१२ अन्वये संयुक्त पाहणी करण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. योजनेची संयुक्त पाहणी तत्कालिन अधिकाऱ्यांसोबत झालेली असून सदर योजना टंचाई कालावधीमध्ये दिनांक १ एप्रिल २००९ ते ३१ ऑगस्ट २००९, दिनांक ७ मे २०१० ते ३० जून २०१० पर्यंत आणि ४ मे २०१२ ते १५ जुलै २०१२ पर्यंत टंचाई अंतर्गत चालविण्यात आली आहे. परंतु मध्यंतरी योजनेच्या उपांगाची हानी झाल्याने योजनेतून पाणी पुरवठा सुरू करणे अडचणीचे झाले असून सदर कामांकरिता या विभागाकडे निधी उपलब्ध नव्हता. तथापि, उपरोक्त प्रादेशिक योजनेतील (१) डव्वा, (२) गोंगले, (३) म्हसवाणी, (४) कोहमारा, (५) पांढरवाणी व १ वाडी, (६) कोयलारी, (७) उशीखेडा या गांवामध्ये प्रादेशिक योजनेतील गावातील पाण्याच्या उंच टाक्या व वितरण व्यवस्था वापरून स्वतंत्र योजना करण्यात आलेल्या आहेत. आणि ९ गावे व १७ वाड्यांमध्ये अस्तित्वातील हात पंप, साधी विहीर इत्यादी उपाययोजनांद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

चिंचगड व १५ गावे प्रा. पापुयो, ता. देवरी (१५ गांवे ०७ वाड्या) :

चिंचगड प्रादेशिक पाणीपुरवठा योजना : चिंचगड प्रादेशिक पाणीपुरवठा योजना दिनांक १ नोव्हेंबर २००८ रोजी कार्यान्वित करून चाचणी दरम्यान माहे ११/२००८ ते ०३/२००९ या कालावधीत पाणीपुरवठा करण्यात आला. योजना हस्तांतरित करून न घेतल्याने योजनेतून ०४/२००९ पासून पाणीपुरवठा बंद करण्यात आला.तद्नंतर माननीय जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी टंचाई कालावधीत योजना चालविण्याकरिता देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने योजनेवरुन माहे मे, २०१० व जून,२०१० या टंचाई कालावधीत गावांना पाणी पुरवठा करण्यात आला नंतर जिल्हा परिषद व इतर यंत्रणेमधून योजना राबविण्यास्तव निधी उपलब्ध करून न दिल्यामुळे दिनांक ३०.६.२०१० पासून गावांत पाणीपुरवठा बंद आहे. योजनेतील समाविष्ट गाव पाणी पट्टी भरण्यास सक्षम नसल्याने व शासन निर्णय क्र. ग्रापापो. १११/प्र.क्र.१००/पा.पु.०७, दिनांक २७ जून, २०११ नुसार ज्या गावाला प्रादेशिक योजनेची पाणी मिळत नसल्यास व गावाची मागणी असल्यास स्वतंत्र पाणीपुरवठा करून देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने सध्या या योजनेतील गावांपैकी (१) आलेवाडी व (२) चिचगड, (३) खामखुर्रा, (४) शिरपूर भागी, (५) मुरमाडी, या गावाच्या स्वतंत्र योजना जिल्हा परिषद मार्फत कार्यान्वित झालेल्या आहेत. सन २०१५-२०१६ च्या कृती आराखड्यात (१) पालनगाव (२) देवलगांव या गावांचा समावेश जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आलेला आहे आणि इतर ८ गाव व ७ वाड्यांमध्ये हातपंप, साधी विहीर इत्यादी उपाययोजनांद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. अस्तित्वातील प्रादेशिक योजनेतील पाण्याची उंच टाकी, वितरण व्यवस्था इत्यादी उपांगे स्वतंत्र योजनेत वापरण्यात आलेली असल्यामुळे प्रादेशिक योजनेवर झालेला खर्च काही अशंतः उपयोगात आलेला आहे.

लटोरी व ३० गावे प्रा.पापुयो. ता. सालेकसा (३० गांवे ५ वाड्या) :-

सदर योजना कार्यान्वित करून दिनांक १०.०४.२००८ ते १५.०७.२००८ पर्यंत चाचणी स्तरावर चालविण्यात आली. योजना हस्तांतरणाबाबत विभागीय कार्यालयाने जिल्हा परिषदेशी पत्रव्यवहार केलेला आहे. माननीय पालकमंत्री यांनी २० जुलै २००८ रोजी घेतलेल्या आढावा बैठकीत जिल्हा परिषदेने निधी उपलब्ध करून देण्याचे अटीवर योजनेतून पाणीपुरवठा सुरू करण्याचे निर्देश दिलेत. त्या अनुषंगाने दि. १ ऑगस्ट २००८ ला पुन्हा पाणी पुरवठा सुरू करण्यात आला. परंतु जिल्हा परिषदेने निधी उपलब्ध करून न दिल्याने दिनांक १ सप्टेंबर २००८ पासून पाणीपुरवठा बंद करण्यात आला. ऑगस्ट २००८ मध्ये योजनेची संयुक्त पाहणी करण्यात आली परंतु जिल्हा परिषदेने योजना हस्तांतरण करून घेतली नाही. एप्रिल, २००९ ते ऑगस्ट,२००९ या कालावधीमध्ये टंचाई अंतर्गत पाणीपुरवठा सुरू करण्यात आला. या दरम्यान विभागीय कार्यालयाने पत्र क्र. १०८०/

दिनांक २६.०५.२००९, १४८४ दिनांक २०.०७.२००९ अन्वये योजना हस्तांतरण करून घेण्यास पत्रव्यवहार करण्यात आला परंतु योजना हस्तांतरीत करून न घेतल्याने दिनांक ०१.०९.२००९ पासून पाणीपुरवठा बंद करण्यात आला. माननीय श्री.रणजित कांबळे, राज्यमंत्री यांनी दिनांक ०३.०२.२०११ रोजी घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये योजनेत समाविष्ट गावांची पाण्याची देयके भरण्यासाठी क्षमता नसल्याने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मागणी असल्यास जिल्हा परिषदने सदर गावाकरिता स्वतंत्र नळ योजना तयार करण्याचे निदेश दिलेत.

LWE कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जिवन प्राधिकरण (१) धानोली (२) कोटजभोरा या गावाकरिता स्वतंत्र नळ योजना कार्यान्वित करून संबंधित ग्रामपंचायतीस हस्तांतरण केली आहे. तिरखेडी व (५ वाड्या) हे गाव कार्यान्वित करण्यात आले आहे. गिरोला, नानव्हा व (२ वाड्या), धानोली या गावांमध्ये पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे. लटोरी, मुंडीपार, नवेगांव, पानगांव रोंधा ही गावे व त्यांच्या ४ वाड्या ती आराखडा २०१५-२०१६ मध्ये समाविष्ट आहे. इतर १९ गांवे / २४ वाड्यांमध्ये अस्तित्वातील हातपंप साधी विहीर या उपाययोजनांद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. प्रादेशिक योजनेतील उपांगे जसे, पाण्याची उंच टाकी व वितरण व्यवस्था, स्वतंत्र योजनेस वापरण्यात आल्यामुळे प्रादेशिक योजनेवर झालेला खर्च उपयोगात झालेला आहे.

बघोली प्रादेशिक योजना, ता.तिरोडा (३ गावे) :

सदर योजना सन २००६ मध्ये पूर्ण करून दिनांक १५.०३.२००६ ते ३१.०१.२००७ पर्यंत चाचणी स्तरावर पाणी पुरवठा सुरू ठेवण्यात आला. सदर योजना हस्तांतरणाबात विभागीय कार्यालयाचे पत्र क्र. १४२८, दिनांक ०२.०७.२००८, ३२७, दिनांक ०६.०३.२००९ व पत्र क्र. १६४८ दिनांक ०५.०७.२०१० अन्वये जिल्हा परिषदेस पत्रव्यवहार करण्यांत आला आहे. तसेच विभागीय कार्यालयाचे पत्र क्र. १७१५ दिनांक १२.०७.२०१० अन्वये योजना हस्तांतरणाच्या टिपण्यासुद्धा जिल्हा परिषदेस पाठविण्यात आलेल्या आहे. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद गोंदिया यांचे पत्र क्र. १११०/ अन्वये संयुक्त पाहणी करण्याबाबत उपविभागास पत्र दिले त्या अनुषंगाने योजनेची दिनांक ३०.०५.२०११ रोजी संयुक्त पाहणी झाली. परंतु पुढे कुठलीही कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आलेली नाही. माननीय जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे आदेशान्वये दिनांक २२.०४.२००९ ते ०३.०९.२००९ पर्यंत टंचाई अंतर्गत योजना चालविण्यात आली. तसेच जिल्हा परिषदेने योजना हस्तांतरणाची तयारी दर्शविल्यामुळे सन २०११-२०१२ मध्ये LWE अंतर्गत नोव्हेंबर, २०११ ते मार्च,२०१२ पर्यंत पुन्हा पाणीपुरवठा सुरू करण्यात आला.परंतु पुन्हा जिल्हा परिषदेने हस्तांतरणाबाबत कुठलीही कार्यवाही केली नसल्याने एप्रिल, २०१२ पासून पाणीपुरवठा बंद आहे. परंतु शासनाच्या धोरणानुसार बघोली,करटी बु.,बोदा या गावांकरिता राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रादेशिक योजनेतील पाण्याच्या टाक्या व पाईपलाईन उपयोगात आणून स्वतंत्र योजना घेण्यात आल्या व योजना कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.

रामपुरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेवर निष्फळ खर्च

रामपुरी व अर्जुनी - मोरगांव तालुक्यतील ४,९८८ लोकसंख्या असलेली नऊ इतर गांव यांच्या करिता प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या बांधणीचे, अंदाजित किंमत रुपये २.४९ कोटी असलेले काम १८ महिन्यांच्या आत पूर्ण करण्यासाठी एका कंत्राटदाराला दिले होते.

लेखापरिक्षेच्या छाननीत असे उघडकीस आले की, ते काम रुपये ३.५९ कोटी खर्च झाल्यावर पूर्ण झाले (डिसेंबर २०१०) राज्य शासनाने रुपये ४.२८ कोटीची सुधारित प्रशासकीय मान्यता दिली (एप्रिल, २०१०) तथापि, या योजनेचे कार्य सुरू झाले नाही (मार्च २०११) अभिलेखावरुन असे दिसून आले की, पाणीपुरवठा योजनेचे कार्य सुरू न होण्याचे प्रमुख कारण म्हणजे ज्या करीता वन विभागाने परवानगी दिली नव्हती अशा आधीच बांधलेल्या पंप गृहाकरिता वनजमिनीवर विद्युत केबल टाकली नव्हती. या प्रकारे रुपये ३.५९ कोटीच्या शासकीय निधीची अडवणूक झाली व १० गावांतील ग्रामीण लोकसंख्या पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहिली.

निकास परिषदेस असे नमूद केले गेले (नोव्हेंबर, २०११) की ही बाब पडताळून पाहण्यात येईल व सविस्तर उत्तर लवकरच पाठविल्या जाईल.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

रामपुरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना (१० गांवे , १ वाडी) ता.अर्जुनी मोर, जि. गोंदिया योजनेस शासन निर्णय क्र. ववेका/प्रक्र.४४९/(अ)/ पापु-१०, दि.२१.०४.१९९८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त असून सुधारित प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्र. ग्रापापु-२००९ / प्र.क्र.३(७)/ पापु-१३ दिनांक ७ एप्रिल, २०१० अन्वये प्राप्त आहे. तसेच मूळ योजनेस मुख्य अभियंता, नागपूर यांचे आदेश क्र. मजीप्रा/मु.अ.(नावग्रा)/ ताशां-२/प्र.क्र.२३३, दिनांक १७.०८.१९९८ अन्वये व सुधारित योजनेस मजीप्रा/मु.अ./ (नाग)/ तांशा (ग्रा)/प्र.क्र.५९८ (क)/१६७३, दिनांक ११.०६.२०१० अन्वये तांत्रिक मंजुरी प्राप्त आहे. सदरहू योजनेची मुळ किंमत रुपये ३७४.९३ लक्ष (ढोबळ) व सुधारित किंमत रुपये ४२८.६८ लक्ष (ढोबळ) असून ही योजना डिसेंबर, २०११ ला कार्यान्वित करण्यात आली. योजनेची पूर्ण कामे मार्च २०१२ ला पूर्ण करून योजनेतून चाचणी तत्वावर सर्व गावांना पाणीपुरवठा करण्यात आलेला होता. दिनांक ०२.०१.२०१३ ला जिल्हा परिषद गोंदिया येथील कार्यकारी अभियंता यांचे सोबत संयुक्तिक

पाहणी करण्यात आलेली असून योजना दि.०४.०१.२०१३ रोजी जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या सभेतील ठरावान्वये दैनंदिन देखभाल व दुरुस्तीकरीता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद गोंदिया यांना दिनांक २१.०१.२०१३ रोजी हस्तांतरीत करण्यात आली आहे. सद्यःस्थितीत योजनेतून सर्व गावांना पाणी पुरवठा सुरळीत सुरू आहे.

दुषित पाण्याचा पुरवठा :-

जलस्वराज्य प्रकल्पाखाली गोंदिया जिल्ह्यातील पाण्याची गुणवत्ता तपासण्याकरिता जिल्हा परिषद गोंदियाने नियुक्त केलेल्या एका खाजगी अभिकरणाद्वारे २००५-२००६ मध्ये एक सर्वेक्षण केले गेले. सर्वेक्षण अहवालाच्या विश्लेषणावरुन असे उघडकीस आले की, एकूण २१६ वस्त्यांच्या पाण्याची गुणवत्ता विविध प्रकारच्या दुषित करणाऱ्या रासायनिक द्रव्यांमुळे दुषित झाली होती. यापैकी मार्च २०११ पर्यंत १५७ वस्त्यांमधील पाण्यावर उपाय करून हे पिण्याकरिता सुरक्षित केले गेले उर्वरित ५९ वस्त्यांकरिता काहीही उपाययोजना केली गेली नाही.

उत्तरामध्ये असे नमूद केले गेले (मार्च २०११) की, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाखाली २०११-२०१३ मधील कृती योजनेत दुषित पाण्याचा उपचार समाविष्ट केला गेला होता.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सविनयपूर्वक अनुपालन सादर करण्यात येते की, सन २००५-२००६ या वर्षात जलस्वराज्य प्रकल्पामार्फत पाणी नमुने चाचणी घेण्यात आली असून त्यामध्ये २१६ गावे / वाड्या विविध घटकांमुळे बाधित असल्याचे ऑगस्ट, २००७ मध्ये प्राप्त अहवालावरुन निदर्शनास आले. त्यापैकी १५७ गावे ही मार्च,२०१० अखेर हाताळण्यांत आली आहेत. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम हे मागणी आधारीत धोरण असल्यामुळे गावाच्या मागणीप्रमाणे व विभागाने सर्वेक्षण केल्यानुसार ५९ गावांपैकी वर्ष २०१०-२०११ अखेर २ गावे, वर्ष २०११-२०१२ अखेर १८ गावे, २०१२-१३ अखेर २८ गावे, वर्ष २०१३-२०१४ अखेर ३ गावे व वर्ष २०१४-२०१५ अखेर २ गावे असे ५३ गावे हाताळण्यात आली. तसेच उर्वरित ६ गावांमध्ये अस्तित्वातील असलेल्या पाणी पुरवठा साधनांद्वारे ग्रामपंचायती मार्फत पाणी पुरवठा सुरू आहे.

तरी कृपया सदरील परिच्छेद क्र.४.१.८.३ वगळण्यात यावा ही विनंती.

अन्न, नागरी व पुरवठा विभाग

१.७ सार्वजनिक वितरण व्यवस्था

गरीब लोकांना रास्तभावात धान्य उपलब्ध करून देणे ही केंद्रे तसेच राज्य शासनाची प्रमुख जबाबदारी आहे. अन्नधान्याचे प्रापण, साठवण, वाहतूक स्वरुपात वाटप इ. ही केंद्र सरकारची जबाबदारी आहे तर स्वस्त भावाच्या दुकानांचे जाळे निर्माण करणे, अन्नधान्याचे वाटप व वितरण, दारिद्ररेषेखालील कुटुंबे ठरविणे, शिधापत्रिका निर्गमित करणे, स्वस्त भावाच्या दुकानांचे पर्यवेक्षण व त्यांचे सनियंत्रण ही राज्य शासनाची जबाबदारी आहे. गोंदिया जिल्ह्यात, वरील कामांची व्यवस्था जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडून ९८१ स्वस्त भावाच्या दुकानांद्वारे पाहिली जाते.

लेखापरिक्षा छाननीत असे उघडकीस आले की, ५० दिवसांच्या करारनिविष्ट कालावधीत अन्नधान्याची उचल न केल्याने, २००६-११ या कालावधीत ३३,६०१ मेट्रीक टन अन्नधान्याचा वाटा एएवाय/एपीएल/बीपीएल योजनांखाली व्यपगत झाला. याचा तपशिल तक्ता १२ मध्ये दिला आहे.

तक्ता १२ : घेतलेली व वितरीत केलेली अन्नधान्ये

(परिमाण मेट्रीक टन मध्ये)

योजनेचे नांव	वाटणी झालेले अन्नधान्य	उचललेले अन्नधान्य	वितरित केलेले अन्नधान्य	व्यपगत झालेला अन्नधान्याचा वाटा
एएवाय	१,३६,७९९	१,२३,३७४	१,२०,५५१	१३,४२५
एपीएल	२९,२०९	२७,०२१	२४,२९६	२,१८८
बीपीएल	१,८२,३३९	१,६४,३५१	१,७०,०३२	१७,९८८
			एकूण	३३,६०१

स्त्रोत - जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया.

हे उघड झाले आहे की, शासनाने विविध योजनांखाली वाटणी केलेले पूर्ण अन्नधान्य उचलण्यात विभागाला अपयश आले.

विभागाने अभिक्षण मान्य केले व नमूद केले की (सप्टेंबर २०११) की अन्नधान्याचा वाटा वेळेत उचलता न आल्याचे कारण मागणी केल्याप्रमाणे दिलेली अन्नधान्ये उचलण्याच्या वेळी पुरेशी क्षमता असलेली गोदामे उपलब्ध नव्हती. याप्रकारे अन्नधान्याचा संपूर्ण वाटा उचलण्याकरिता पुरेशी व्यवस्था केली गेली नव्हती.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न,नागरी व पुरवठा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

विभागाचे अनुपालन :- सार्वजनिक वितरण व्यवस्थेतर्गत गोंदिया जिल्ह्यात सन २००६-०७ ते २०११-१२ या कालावधीत देण्यात आलेल्या नियतनापैकी सुमारे ९१ टक्के धान्याची उचल करण्यात आलेली आहे. तसेच सन २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीत १०० टक्के धान्याची उचल करण्यात आलेली आहे.

सन २००६-०७ ते २००८-१० या कालावधीत मासिक अन्नधान्य नियतनाच्या तुलनेत जिल्ह्यातील शासकीय गोदामाची क्षमता सुमारे दीड पट होती म्हणजेच अन्नधान्यांच्या उचलीकरीता पुरेशी गोदामे नसल्याची बाब संयुक्तिक वाटत नाही. तसेच आवश्यकतेनुसार निमशासकीय/खाजगी गोदामे भाड्याने घेण्यात आली आहेत. तथापि, भारतीय अन्न महामंडळाकडून उचल आदेश नियमित डेपो व्यतिरिक्त अन्य डेपोकडे स्थलांतरीत केल्यानंतर तसेच भारतीय अन्न महामंडळाचे आवक होणाऱ्या धान्यासाठीचा रॅक लागल्यानंतर उचलीचा मिळणारा कालावधी कमी होऊन अन्नधान्याची विहित कालावधीत उचल करता येत नाही. धान्यसाठा उपलब्ध नसताना उचल आदेशात नमूद केल्याप्रमाणे धान्यसाठा भारतीय अन्न महामंडळाच्या संबंधीत डेपो मध्ये उपलब्ध नसल्यास उचलीवर विपरीत परिणाम होतो. त्याचप्रमाणे आवश्यक पत मर्यादा उपलब्ध नसल्याने अथवा वाहतूकीसंदर्भातील अडचणीमुळे अन्नधान्याच्या उचलीवर परिणाम झालेला आहे.

तथापि, सन २०१२-१३ व तदनंतर नियतनानुसार जवळपास पूर्णतः धान्याची उचल करण्यात आलेली आहे. तसेच साठवणूक क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने गोंदिया जिल्ह्यात ६,८४० मे.टन क्षमतेच्या ५ गोदाम बांधकामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यापैकी ३ गोदामांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

महालेखाकार यांचे अभिप्राय : जर अन्नधान्य नियतानाच्या तुलनेत साठवणूक क्षमता सुमारे दीड पट होती, तर विभागाने गोंदिया जिल्ह्यात ६८४० मे.टन क्षमतेच्या ५ गोदाम बांधकामांना प्रशासकीय मान्यता का देण्यात आली याबाबतचा खुलासा लोकलेखा समितीस देण्यात यावा.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न,नागरी व पुरवठा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्र शासनाच्या सुचनेनूसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अन्नधान्य साठवणूकीसाठी मासिक नियमनाच्या सुमारे तीन पट क्षमतेची गोदामे राज्य शासनाकडे असणे अपेक्षित आहे. या सूचनांच्या अनुषंगाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेतंर्गत धान्य साठवणूकीसाठी गोदामे बांधण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्या अंतर्गत गोंदिया जिल्ह्यात ६,८४० मे, टन क्षमतेच्या ५ गोदाम बांधकामांना सन २०१३-२०१४ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग

आर्थिक सेवा

१.८ जिल्ह्याची प्रगती वाढविण्यासाठी आणि शहरी व ग्रामीण क्षेत्रातील विषमता दूर करण्यासाठी मूळ पायाभूत सुविधांची उपलब्धता असणे अत्यावश्यक आहे. त्याने दुर्गम क्षेत्राची आर्थिक व्यवस्था सुधारण्यासाठी त्याला जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या जवळ आणण्यास मदत होते. पायाभूत सुविधांमध्ये सर्व हवामानात चालू असणारे रस्ते, रेल्वेची जोडणी, वायुसेवा व सिंचन गरजा यांचा समावेश होतो. जिल्ह्याचे मुख्यालय गोंदिया हे रस्ते व रेल्वे दोन्हींनी जोडलेले आहे.

रस्त्याची जोडणी असणे

महाराष्ट्रात सर्व राज्यभर फार चांगल्या रस्त्यांची जोडणी आहे. मार्च २०१० ला गोंदिया जिल्ह्यातील रस्त्यांच्या जोडणीच्या स्थितीचा तपशील खालीलप्रमाणे दिला आहे.

रस्त्यांच्या जोडणीची स्थिती

रस्त्याचा प्रकार	रस्त्याची लांबी (किलोमीटर मध्ये)
राष्ट्रीय महामार्ग	३४
राज्य महामार्ग	४०१
मोठा जिल्हा रस्ते	७७७
इतर जिल्हा रस्ते	१२२६
खेड्यांकरिता रस्ते	३३८४
स्त्रोतः विभागीय आकडे	

केंद्र मार्ग निधी :

भारत सरकारने वर्ष २००० मध्ये केंद्र मार्ग निधी (सीआरएफ) अधिनियम, २००० संमत केला. राज्य व आंतर-राज्य जोड रस्ते यांच्या विकासाकरिता सीआरएफ योजनेच्या कार्यान्वयनाचे आणि आर्थिक महत्वाचे नियम रस्ता वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने अधिसूचना दिनांक १० जुलै, २००७ अन्वये अधिसूचित केले.

त्यानुसार २००१ ते २०१० या कालावधीत गोंदिया जिल्ह्यात कार्यकारी अभियंता (काअ), सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी कार्यान्वित करावयाची रुपये७३.५८ कोटीची १३ कामे, सी आर एफ खाली घेण्यात आली. या कामांवरील मार्च २०११ पर्यंत एकूण खर्च रुपये ६१.९० कोटी होता. तथापि, असे आढळून आले (जून, २०११) की १३ कामांपैकी आठ कामे रुपये २९.३० कोटी खर्च करून पूर्ण केली गेली. उर्वरित चार कामांच्या बाबतीत जरी ती कामे काअ, सांबावि, गोंदिया यांनी पूर्ण केल्याचे नमूद केले. तरी अंतिम देयके प्रदान झाली नव्हती व पूर्णत्व प्रमाणपत्रे दिली गेली नव्हती. पुढे असे दिसून आले की, अंदाजित किंमत रुपये २४.७१ कोटी असलेले एक काम, ज्याच्याकरिता प्रशासकीय मान्यता २० फेब्रुवारी, २००९ दिली होती, ते जून २०११ पर्यंत सुरू झाले नव्हते. काअ, सांबावि (रोहयो), गोंदिया यांनी नमूद केले (जून २०११) की ते काम अंदाजपत्रकीय टप्प्यात होते. काम घेण्यातील विलंबाची कारणे काअ नी दिली नाहीत.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

(१) चार कामाचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र ह्या सोबत जोडण्यात आलेले आहे. (परिशिष्ट अ १-अ ४) (विवरण पत्र क्र. ४)

(२) सदर कामाबाबत (गोंदिया शहराच्या पूर्व बाजूकडील वळणमार्गाचे बांधकाम) गोंदिया येथील नागरिकांनी मुंबई उच्च न्यायालय, नागपूर बेंच येथे जनहित याचिका दाखल केली होती. जमिन संपादनासाठी योग्य कार्यवाही पूर्ण झाल्याशिवाय काम सुरू करण्यात येऊ नये अशी विनंती केली होती. त्यावर विभागाच्या वतीने योग्य प्रक्रिया करून जमिन संपादनाची कार्यवाही करण्यात येईल असे शपथपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. मा.न्यायालयाने विनंती मान्य करून केस निकाली काढली.

७.२५ किमी लांबीच्या कामापैकी ६.१५ लांबीचे काम पूर्णत्वास आले असून उर्वरित काम माहे मार्च, २०१६ पर्यंत पूर्ण होईल व अंतीम खर्च हा प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत राहील.

सी आर एफ कामांवरील आणखी अभीक्षणे पुढील परिच्छेदांमध्ये चर्चिली आहेत.

कामाच्या व्याप्तीतील बदल

असे दिसून आले की, विभागाने दोन कामांच्या बाबतीत कामाच्या व्याप्तीत बदल केला होता आणि केंद्र सरकारची परवानगी न घेता अतिरिक्त खर्च केला होता ज्याचा तपशिल परिशिष्ट ४.१.२ मध्ये दिला आहे. (**विवरण पत्र क्र. ५**)

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अ.अ. ह्यांची निरिक्षण टिप्पणी ह्या सोबत जोडण्यात आली आहे. **(परिशिष्ट अ५)** ह्या कामाचा अंतिम खर्च प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत असल्यामुळे केंद्र शासनाच्या फेर मान्यतेची गरज नाही. (**विवरण पत्र क्र. ६**)

केंद्र मार्ग निधीचे अनियमीत अपवाहन :—

मार्च २०११ च्या मासिक प्रगती अहवालात (एम.पी.आर.) असे दिसून आले की, एम.पी.आर.मध्ये कळविलेला खर्च विभागाने सीआरएफ कामांवर केलेल्या खर्चापेक्षा खूप जास्त होता. विभागाने अनियमितरित्या रुपये५.७० कोटी इतका सीआरएफ परिशिष्ट ४.१.३ मधील तपशिलप्रमाणे इतर कामांकडे वळविला.

हे लक्षात आणून दिल्यावर का.अ.ने अभिक्षण मान्य केले व नमूद केले की जी कामे सीआरएफ खाली मंजूर केली नव्हती त्यावरील खर्च सुद्धा सी आर एफ मधून केला गेला आणि त्यामुळे ती कामे एम पी आर मध्ये समाविष्ट केली गेली. तसेच जी कामे सी आर एफ खाली मंजूर केली नव्हती त्यावरील सीआरएफ खाली नोंदलेला खर्च नंतरच्या वर्षाच्या अनुदानांमधून नियमित करण्यात येईल.

निकास परिषदेत असे नमूद करण्यात आले (नोव्हेंबर २०११) की सविस्तर उत्तर लवकरच सादर केल्या जाईल. तथापि, सीआरएफ खाली मंजूर नसलेल्या कामांवरील खर्च, सीआरएफ खाली नोंदविण्यात आला ही वस्तुस्थिती कायम राहते.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापाल यांनी केंद्रीय मार्ग निधी मधील रुपये५.७० कोटी इतर कामांवर खर्च केल्याच्या आक्षेपाच्या अनुषंगाने विभागीय कार्यालयातील दस्ताऐवज व प्रमाणकांची तपासणी केली असता रुपये४.३० कोटी गोंदिया शहरातील रेल्वे उड्डाणपुलाच्या कामावर खर्च झाल्याचे आढळून आले. सदरहू काम केंद्रीय मार्ग निधी मध्येच मंजूर आहे. तसेच एकूण रुपये ९८.३१ कोटी किमतीची १३ कामे मंजूर होती. या रुपये९८.३१ कोटी केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत लक्षणीय किंमतीच्या कामांवरील अनुषंगिक बाबींवर (उदा.सर्वेक्षण, अंदाजपत्रक व नकाशे, मृदु सर्वेक्षण, निविदा इत्यादी) रुपये १.४० कोटी इतकाच खर्च झाला आहे. अशाप्रकारे रुपये५.७० कोटी निधी केंद्रीय मार्ग निधी मधील कामांवरच खर्च झालेला आहे. सविस्तर माहिती सोबत संलग्न करण्यात आली. **(परिशिष्ट अ-७ अ-८)** (**विवरण पत्र क्र. ७**)

कंत्राटदाराला अवाजवी मार्ग :—

गोंदिया जिल्ह्यातील "मरमजोब मासुलकसा घोनाडी मार्ग किमी ७/०० ते २१/०० ची सुधारणा करण्याचे " काम एका कंत्राटदाराला अंदाजित किंमत रुपये५.२० कोटीच्या १८.२५ टक्के कमी दराने देण्यात आले होते. (फेब्रुवारी २००९)

मूळ अंदाजपत्रकात तसेच करारनाम्यात तसेच करारनाम्यात बाब क्र.१४," ७५ मिमि जाड बीबीएम रस्ता पृष्ठभागाची तरतूद करणे व बांधणे " समाविष्ट होती. विभागाने या बाबीच्या ऐवजी अतिरिक्त कार्यान्वित करून घेतली, जी मजूर करारनाम्याच्या बाहेरची होती. याचा परिणाम, मूळ मंजूर बाबीच्या तुलनेत रुपये२.४० कोटीचा अतिरिक्त खर्च होण्यात झाला. ज्याचा तपशिल तक्ता क्र. १४ मध्ये दिला आहे.

तक्ता क्र. १४ : अतिरिक्त खर्च

विशिष्ट किमी मध्ये कार्यान्वयन	कार्यान्वित परिमाण	बाब क्र.१४ करिता कंत्राटातील दर	बाब क्र.१४ ऐवजी नवीन बाबींचा दर	फरक (४-३)	रक्कम (५×२)
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
किमी २-५	५०९.२५५	२३०.३०	७,६०६.६०	७,३७६.३०	३७,५६,४१८
किमी ६-८	२२३.३९५	२३२.४५	७,६६३.३०	७.४३०.८५	१६,६०.०१५
किमी ९-११	५७१.७२५	२३४.६५	७,७१७.७५	७.४८३.१०	४२,७८,२७५
किमी १२-१४	६२६.८३५	२३६.८०	७,७६३.८५	७,५२७.०५	४७,१८,२१८
किमी १५-१७	६४०.८००	२३८.९०	७,८०९.७५	७,५७०.८५	४८,५१,४०१
किमी १८-२०	६२७.८७९	२४०.०५	७,८५५.०५	७,६१५.००	४७,८१,२९९
				एकूण	२,४०,४५,६२६

स्त्रोत :- विभागीय आकडे

अतिरिक्त बाब दर सूची मंजूर करण्याचे समर्थन असे दिले गेले की तो रस्ता नक्षलबाधित क्षेत्रात जात होता आणि बी.बी.एम.ची बाब हाताने (मजूरांकडून) कार्यान्वित करण्यात जास्त वेळ लागला असता अशा परिस्थितीत, कामगारांना काम कार्यान्वित करणे फार कठीण धोकादायक झाले असते.

हे समर्थन योग्य नव्हते कारण निविदा स्वीकार करताना कंत्राटदाराला रस्त्याचे स्थान आणि स्थिती याची पूर्ण जाणीव होती. विभागाला सुद्धा या वस्तुस्थितीची पूर्ण जाणीव होती कारण ही गोष्ट अंदाजपत्रकात दिलेल्या टिप्पणीवरून उघड होते की रस्ता जनजाति क्षेत्र व नक्षल बाधित क्षेत्रातून जात होता आणि जनतेसाठी एका चांगल्या वाहतुकीयोग्य रस्त्याची तरतूद करण्याची आवश्यकता होती आणि त्यानुसार अंदाजपत्रक तयार केले गेले होते.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या कामावरील संपूर्ण खर्च ३०५४ केंद्रीय मार्ग निधी या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात आला असून ह्या कामाचा अंतिम खर्च रुपये ६२७.२४ लक्ष हा प्रशासकीय मान्यता अधिक १० टक्के (रुपये६४६.८४ लक्ष) किंमतीच्या आत आहे.

एमओआरटीएच अंतर्गत मंजूर कामांमध्ये अतिरिक्त बाबीची दर सूची मंजूर करण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता यांना आहेत. त्यानुसार अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांच्याकडून अतिरिक्त बाबीची दर सूची मंजूर करण्यात आली होती व त्याची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे. **(परिशिष्ट अ-६)** (**विवरण पत्र क्र. ८**)

रोजगार हमी योजना विभाग

१.९ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :—

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (एमजीएनआरईजीएस) जी पूर्वी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणून ओळखली जात होती. एक केंद्र पुरस्कृत योजना आहे, जिल्हा खर्चाच्या भारत सरकार व राज्य शासन सहभागी होतात. ग्रामीण क्षेत्रात एक परिवाराला कमीत कमी १०० दिवसांचे मजुरीची हमी असलेला रोजगार देऊन शिवाय टिकाऊ, सामाजिक संपत्तीची निर्मिती करून ग्रामीण स्त्रियांना अधिकार देऊन व सामाजिक समता जोपासून, उपजिविकेची सुरक्षितता वाढविणे हा या योजनेचा मुळ उद्देश आहे.

२००६-११ या कालावधीत जिल्हाधिकाऱ्याने रुपये८८.३२ कोटींचा निधी दिला होता. त्यापैकी रुपये८६.८३ कार्यान्वयन करणाऱ्या यंत्रणांनी योजनेच्या खाली समाविष्ट असणाऱ्या कामांवर खर्च केले.

जिल्हाधिकारी व जिल्ह्यातील पाच नमुना गटांच्या अभिलेखांच्या छाननीत पुढील अनियमितता उघडकीस आल्या.

१०० दिवसांची मजुरी असलेला रोजगार देण्यात सूट :—

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (एनआरईजी) अधिनियम, २००५ खाली प्रत्येक परिवाराला ज्याचे प्रौढ सदस्य अकुशल शारिरीक श्रम करण्यास स्वच्छेने तयार होतात. त्यांना १०० दिवसांच्या मजुरीची हमी असलेला रोजगार देऊन फेब्रुवारी, २००६ पासून जिल्ह्यात एम जी एन आर ई जी एस कार्यान्वित होत आहे.

जॉबकार्डधारक, ज्यांनी काम मागितले व ज्यांना जिल्ह्यात १०० दिवसांची मजुरी रोजगार, २००६-११ या कालावधीत दिला गेला त्यांचा तपशिल तक्ता १८ मध्ये दिला आहे.

तक्ता-१८ जॉबकार्ड धारकांची स्थिती :-

वर्ष	जॉबकार्ड धारकांची एकूण संख्या	जॉबकार्ड धारक ज्यांना मजुरी रोजगार दिला गेला	जॉबकार्ड धारक ज्यांना १०० दिवसांचा रोजगार दिला गेला (टक्के)	तूट टक्केवारी जॉबकार्ड धारकांच्या बाबतीत ज्यांना मागीतला पण ज्यांना १०० दिवसांचा रोजगार दिला गेला नाही.
२००६-०७	१,९०,०३४	२४,५८४	-	१००
२००७-०८	१,९१,०३४	४६,३९६	-	१००
२००८-०९	१,९१,०३४	९६,४९४	५,८६३ (६.०८)	९३.९२
२००९-१०	२,०३,६४५	४२,४६२	३८६ (०.९०)	९९.१०
२०१०-११	२,०८,१३०	५९,४९२	२,४५२ (४.१२)	९५.८८
एकूण		२,६९,४२८	८७०१	

ज्यांनी कामाची मागणी केली अशा २,६९,४२८ परिवारांपैकी फक्त ८,७०१ (३.२२ टक्के) परिवारांना २००६-२०११ या कालावधीत १०० दिवसात मजूरी रोजगार दिला गेला. २००६-०८ दरम्यान १०० दिवसांचा रोजगार दिला होता अशा जॉबकार्ड धारकांची संख्या ' निरंक ' होती. या योजनेचा मुख्य हेतूच विफल झाला.

ज्यांनी काम मागितले होते अशा जॉबकार्ड धारकांना त्यांना कायद्याने हमी दिलेला १०० दिवसांचा मजुरी रोजगार देण्यातील तूट ९४ ते १०० टक्के होती. एन आर ई जी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे ज्या पात्र जॉबकार्ड धारकांना, योजनेखाली रोजगार देण्याचे आश्वासन दिले गेले नव्हते. त्यांना बेरोजगार भत्ता द्यावयाचा होता असे आढळून आले की, ५८५ परिवारातील पात्र जॉबकार्ड धारकांना बेरोजगार भत्ता दिला गेला नव्हता.

निकास परिषदेत असे नमूद करण्यात आले की, परिवारांनी केलेल्या कामाचा मागणीच्या आधारावर काम देण्याची तरतूद केली होती हे उत्तर स्वीकार्य नाही कारण फक्त ३.२२ टक्के परिवारांना १०० दिवसांचा मजुरी रोजगार दिला गेला होता.

नोंदणीकृत जॉबकार्डधारक व ज्या जॉबकार्डधारकांना काम पुरविण्यात आले आहे आणि ज्यांना प्रत्यक्षात १०० दिवस काम पुरविण्यात आले आहे यामध्ये फार प्रमाणात फरक का दिसून येत आहे ? अशा परिस्थितीत नरेगा चे कामे कसे चालत असते.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात रोजगार हमी योजना विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून या योजने अंतर्गत ग्रामीण भागातील कुटुंबाला वर्षातून १०० दिवसांची रोजगार उपलब्ध दिला जातो.

गोंदिया जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करता जिल्ह्यात कामाची मागणी साधारणत: आर्थिक वर्षातील माहे जानेवारी ते जून या कालावधीत कामाची मागणी करण्यात येते, व त्याप्रमाणे या कालावधीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत जिल्ह्यात कामे उपलब्ध करून दिली जातात. उर्वरीत कालावधीमध्ये शेतीविषयक कामे मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याने मजुरांची कामासंबंधीची मागणी राहत नसल्यामुळे बहुतांश मजूर या कालावधीत रोजगार हमीच्या कामावर येत नाही. गोंदिया जिल्ह्याचे सरासरी १३४९ मी.मी. वर्षाचे पर्जन्यमान आहे. तसेच प्रत्येक वर्षी गोंदिया जिल्ह्यामध्ये सरासरी पेक्षा जास्त पाऊस पडत असल्यामुळे व पीक परिस्थिती समाधानकारक असल्यामुळे रोहयोच्या कामाला मागणी नाही.

सन २००६-०७ या वर्षात आर्थिक वर्षात १,९१,०३४ कुटुंबाची नोंद गोंदिया जिल्ह्यात करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात सर्वच कुटुंब कामाची मागणी करत नसल्याचे दिसून येते. NREGA २००५ कायद्याच्या तरतुदीनुसार ज्या कुटुंबाना (अकुशल मजुरांना) काम पाहिजे असल्यास त्याची लेखी स्वरुपात मागणी नमुना ४ मध्ये ग्रामपंचायत किंवा तालुका स्तरावर करणे आवश्यक आहे. त्यानतर त्या मजुरांना नमुना ७ मध्ये संबंधित ग्रामपंचायतीकडून ज्या कामावर काम द्यायचे आहे त्या कामाच्या नावासह काम करण्याचे आदेश देण्यात येतात.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही योजना मागणीप्रवण योजना असल्याने ज्या मजुरांनी कामाची मागणी केली त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे. ८,७०१ जॉबकार्डधारकांना १०० दिवसांपेक्षा जास्त व इतर जॉबकार्डधारकांना पुरेशा प्रमाणात उपलब्ध होतील इतकी कामे शेल्फवर उपलब्ध होती.

त्याचप्रमाणे ५८५ परिवारातील पात्र जॉबकार्ड धारकांना पुरेशा प्रमाणात उपलब्ध होतील इतकी कामे शेल्फवर उपलब्ध असतानांही कामाची मागणीच न केल्यामुळे, त्यांना बेरोजगार भत्ता देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान) विभाग

१.१० सर्वसाधारण सेवा

ई- शासन

विविध भागात माहिती तंत्रज्ञानाच्या वापराबद्दल जागरुकता वाढविण्यात जिल्हा प्रशासनाला आधार देण्यासाठी, राष्ट्रीय माहिती केंद्र (एन.आय.सी.) या भारत सरकारच्या अभिकरणाने जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी एक जिल्हा माहिती केंद्र (डी आय सी) उभारले होते.

एकात्मिकृत सामाजिक सेवा केंद्रे :—

व्यवस्थापनाचे कार्य परिणामकारक व पारदर्शी होण्याच्या दृष्टीने माहिती तंत्रज्ञानाचे (आय टी) लाभ उपयोगात आणण्यासाठी राज्य शासनाने नागरिकांना काही सेवा (आय टी) वर आधारित सेतू, (आय टी) आधारित सेतू म्हणजे "पूल" या प्रकल्पाद्वारे, शासनाचा नागरीकांशी दुवा साधण्यासाठी, पुरविण्याचे ठरविले. नागरिकांना एकाच छताखाली एकाच खिडकीद्वारे ३८ सेवा पुरविण्यासाठी, प्रत्येक जिल्ह्यात तालुका पातळीवर एकात्मिकृत सामाजिक सेवा केंद्रे, जी सेतू केंद्रे म्हणून ओळखली जातात, स्थापन केली गेली सेतू केंद्रे, जिल्हा पातळी सेतू संस्थेने (डी एल एस एस) स्थापन केली. संचालक, माहिती तंत्रज्ञान (डीआयसी), राज्यातील सेतू केंद्राचे एकूण सनियंत्रण व कार्यान्वयन करण्यासाठी जबाबदार आहेत.

डी एल एस व नमुना गट लेखापरिक्षण चाचणीत असे उघडकीस आले की,

१. इलेक्टॉनिकरित्या द्यावयाच्या ३८ सेवांपैकी (मृत्यू/जन्म प्रमाणपत्रे, जात, विवाह प्रमाणपत्र, मालमत्ता कार्ड, ७/१२ मालमत्ता कार्ड, वीज, दूरध्वनी देयके इ.) फक्त पाच सेवा (शपथ पत्र, जात प्रमाणपत्र, मृत्यू जन्म प्रमाणपत्र, ७/१२, मालमत्ता व शिधापत्रिका) जिल्हा तसेच तालुका पातळीवर दिल्या गेल्या, ज्यामुळे नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांमध्ये ८६.८५ टक्के तूट झाली. जिल्हाधिकाऱ्यांनी उत्तरात (मे २०११) नमूद केली की, नागरिकांना जास्त सेवा देण्यासाठी सेतू केंद्रांची श्रेणीवाढ करण्याची प्रक्रिया सुरू होती.

२. केंद्र दिशानिर्देशांप्रमाणे स्थापन केली नव्हती. जिल्हा मुख्यालयाच्या जागी २००० चौ.फुट व तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी ५०० चौ.फुट जागेची आवश्यकता असताना जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी ५०० चौ.फुट जागेत व तहसील पातळीवर ८८ ते २५० चौ.फुट जागेत केंद्रे स्थापन करण्यात आली, ज्यामुळे नागरिकांची गैरसोय झाली.

३. जरी जिल्हा माहिती केंद्राशी (डी.आय.सी.) स्थानिक क्षेत्र नेटवर्क (लॅन) ने केंद्रे जोडली गेली होती तरी माहिती अद्ययावत करून, शासनाच्या वेबसाईट वर दाखविण्यासाठी, डी आय डी सी ने हस्तांतरीत केली नाही. वेबसाईट वर माहिती अपलोड न केल्यामुळे, डी एल एस एस च्या नागरिकांना सेवा देण्याच्या कार्याचे संनियंत्रण संचालक (आय टी) यांच्याकडून केले जाऊ शकले नाही.

४. ३८ सेवांपैकी किती सेवा पुरविण्यात येत आहेत, त्यांची यादी द्यावी.

ज्ञापन :—

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात माहिती व तंत्रज्ञान विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

एक खिडकी योजनेतून विविध विभागांच्या अनेक सेवा नागरिकांना जलद व सुलभ रितीने उपलब्ध करून द्याव्यात म्हणून दिनांक २३ ऑगस्ट, २००२ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा व तालुका स्तरावर नागरी सुविधा केंद्र सेतू ची स्थापना करण्यात आली होती. सदर शासन निर्णयान्वये पहिल्या टप्प्यात महसूल विभागाशी संबंधित सेवा देणे नियोजित होते व पुढील टप्प्यांमध्ये अन्य विभागांच्या सेवा, सेतू केंद्रामार्फत देणे प्रस्तावित होते. महसूल विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांमधील काही सेवांसाठी (उदा.७/१२ उतारा) माहितीचे डिजिटायझेशन होणे आवश्यक होते. ज्या सेवांसाठी सॉफ्टवेअर आज्ञावली विकसन सहज शक्य होते व माहितीच्या डिजिटायझेशनची गरज नव्हती अशा सेवा प्राधान्याने सेतू केंद्रामार्फत दिल्या जात होत्या. शासन निर्णय दिनांक ३ डिसेंबर २००८ अन्वये, केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स कृती कार्यक्रमांतर्गत ग्रामीण व शहरी भागात ई सेवा केंद्राची स्थापना करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला होता. ई सेवा केंद्रामार्फत द्यावयाच्या सेवांची यादीही सदर शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आली होती. सध्या १४ सेवा संपूर्णतः ऑनलाईन पद्धतीने दिल्या जात आहेत. ज्या सेवांसाठी माहितीचे डिजिटायझेशन आणि क्लिष्ट आज्ञावली विकसनाची आवश्यकता आहे अशा सेवा ऑनलाईन करण्यासाठी संबंधित विभागांना तांत्रिक सहकार्य दिले जात आहे. उपरोक्त बदलामुळे नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांवर कोणत्याही प्रकारे प्रतिकूल परिणाम झालेला नाही.

तहसिलदारांकडून प्राप्त माहितीमध्ये सेतू केंद्रातील खिडकी व त्याभोवतील जागेचा विचार करण्यात आला. मात्र संगणक कक्ष, नस्ती ठेवण्याकरिता असलेली जागा, अर्जदारांच्या उभे राहण्याकरिता आणि त्यांच्याकरिता उपलब्ध सोई सुविधेसाठी जागेचा विचार करण्यात आला नाही, त्यामुळे जागेत फार कमी दिसून येते.

अ.क्र.	तालुका	सेतू केंद्राचे क्षेत्र (चौ.फीट)
१	जिल्हा मुख्यालय	५००
२	गोंदिया	१२१७
३	सालकेसा	५००
४	तिरोडा	४२८
५	देवरी	४८०
६	गोरेगाव	५००
७	सडक अर्जुनी	५५३
८	आमगाव	५००.६२
९	अर्जनी मोरगाव	५२४

सेतू कंत्राटदारांनी ऑफलाईन मॉड्युल ची आज्ञावली तयार केली होती. त्यामुळे त्यातील माहिती स्टेट डाटा सेंटर वर उपलब्ध करणे शक्य झाले नाही. आता महाऑनलाईन पोर्टलवर असलेल्या सर्व सेतू केंद्रामधील ई-व्यवहारांचा तपशील महाऑनलाईनच्या Citizen Service Delivery Dashboard या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

शासनाने प्राधिकृत केलेल्या महाऑनलाईन आज्ञावलीचा वापर करण्यात येऊन शासनाच्या धोरणानुसार सेवा पुरविण्यात येत आहेत व शासनाने ठरविलेल्या दरानुसारच शुल्क आकारण्यात येत आहेत. सर्व माहिती सद्या महाऑनलाईनच्या वेबसाईटच्या माध्यमातून कार्यान्वित करण्यात येत आहेत. सद्या पुरविण्यात येत असलेल्या सेवा खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	पुरविण्यात येत असलेल्या सेवांचा तपशील
१	३०% महिला आरक्षण प्रमाणपत्र
२	वय, अधिवास व राष्ट्रीयता दाखला
३	जाती प्रमाणपत्र (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इ.मा. व विशेष मागासवर्ग, ई) हलफनाम्यासह
४	सर्वसाधारण प्रतिज्ञापत्र
५	उत्पन्नाचा दाखला
६	मायग्रन्ट कायट सर्टिफिकेट
७	नॉन क्रिमी लेअर
८	रहिवासी दाखला
९	वरिष्ठ नागरिक प्रमाणपत्र
१०	अल्प भूधारक दाखला
११	वंशावळीचे प्रतिज्ञापत्र

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

१.११ प्राथमिक शिक्षण :—

सर्व शिक्षा अभियान (एस.एस.ए.) हा भारत सरकारचा एक व्यापक व एकात्मिकृत ध्वजनौका कार्यक्रम आहे जो २००१-०२ मध्ये सुरू झाला. एस.एस.ए. ही केंद्र पुरस्कृत योजना जिल्हा शिक्षण अधिकारी यांनी सी.इ.ओ. जिप च्या नियंत्रणाखाली कार्यान्वित करावयाची आहे. एस.एस.ए चे मुख्य उद्दीष्ट देशात मिशन पद्धतीने प्राथमिक शिक्षण मिळविणे हे होते. सहा ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना उपयुक्त व सुसंबद्ध शिक्षण देण्याचे एस.एस.ए चे लक्ष्य होते.

नाव नोंदणीमध्ये घट

जिल्ह्यातील शिक्षणाच्या स्थितीचा आढावा घेतला असता असे उघडकीस आले आहे की, प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांच्या संख्येत वाढ होऊनही या शाळांत २००६-११ या कालावधीत लक्ष्य असलेल्या ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांच्या नावनोंदणीत घट झाली होती ज्याचा तपशील तक्ता १० मध्ये दिला आहे.

तक्ता क्र. १० शाळांमधील नाव नोंदणी

वर्षे	शाळांची संख्या (सरकारी/सहाय्यित)	शासकीय सहाय्यित शाळांमध्ये नाव नोंदणी संख्या	खाजगी विना सहाय्य शाळांची संख्या	विना सहाय्य शाळांतील नाव नोंदणी संख्या	एकूण शाळा	एकूण नाव नोंदणी
२००६-०७	१,१६४	१,८९,६२३	९५	१३,१२७	१,२५९	२,०२,७५०
२००७-०८	१,१६४	१,८६,४१०	१०१	१४,३७८	१,२६५	२,००,७८८
२००८-०९	१,२७२	१,८३,९९०	९९	१६,०९०	१,३७१	२,००,०८०
२००९-१०	१,३३४	१,८१,१९४	१०५	१७,१४०	१,४३९	१,९८,३३४
२०१०-११	१,४२२	१,७४,८१८	१३८	१९,८७०	१,५६०	१,९४,६८८

शाळांच्या संख्येत वाढ होऊनही लक्ष्य असलेल्या ६-१४ वयोगटातील नाव नोंदणीत घट झाली :

शाळांच्या स्थितीच्या एकूण आढाव्याने असे दर्शविले की शाळांची संख्या १,२५९ पासून १,५६० पर्यंत वाढली होती. जरी शासकीय/जिप/नगर परिषद व सहाय्यित शाळांची संख्या मामुली (२२.१६ टक्के) १,१६४ पासून १,४२२ पर्यंत वाढली होती, तरी या शाळांमधील लक्ष्य असलेल्या ६-१४ वर्षे या वयोगटातील बालकांची संख्या १,८९,६२३ पासून १,७४,८१८ पर्यंत इतकी कमी झाली (७.८० टक्के) असेही आढळून आले की खाजगी शाळांची संख्या ९५ पासून १३८ पर्यंत (४५ टक्के) अशी वाढली होती आणि या शाळांतील विद्यार्थ्यांच्या नाव नोंदणीची संख्या १३,१२७ पासून १९,८७० पर्यंत म्हणजे ५१ टक्क्यांनी वाढली होती.

पाच गटातील चाचणी तपासणी केलेल्या १०० शासकीय/सहाय्यित शाळांपैकी असे दिसून आले की २००६-११ दरम्यान ७२ शाळांमध्ये नाव नोंदणी मध्ये घट झाली होती तर १५ शाळांमध्ये नाव नोंदणी मध्ये वाढ दिसून आली.

जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांनी नमूद केले (ऑगस्ट २०११) की गोंदिया जिल्हा छत्तीसगड व मध्यप्रदेश राज्यांना लागून असल्याने जनजात लोकसंख्येपैकी बहुतांशी लोक कमाई करण्यासाठी त्या राज्यांत स्थलांतरित झाले होते.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार १ कि.मी. अंतरात प्राथमिक शाळा व ३ कि.मी. अंतरात उच्च प्राथमिक शाळा सुरू करण्याचे धोरण असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांची संख्या वाढलेली आहे. परंतु पालकांचा कल हा पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये शिकविण्याचा आहे. इंग्रजी माध्यमाच्या बहुतांशी शाळा या खाजगी विनाअनुदानित आहेत. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व खाजगी अनुदानित शाळांमधील पटनोंदणीत घट झाली आहे. तसेच एकंदरीत जन्मदरामध्ये दरवर्षी सातत्याने घट होत आहे.

मध्यान्ह भोजन योजना :

प्राथमिक शिक्षणाला पोषणविषयक आधार राष्ट्रीय कार्यक्रम, ज्याला सर्वसाधारणपणे मध्यान्ह भोजन (एमडीएम) योजना असे ओळखले जाते, ती ऑगस्ट, १९९५ मध्ये सुरू झाली जिचे मुख्य उद्दीष्ट बालकांची नाव नोंदणी वाढविणे, टिकवून ठेवणे व शिकण्याची पातळी वाढवून प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण अभिवर्धन करणे आणि त्याचबरोबर सहा ते १० वर्षे वयोगटातील प्राथमिक शाळा बालकांची पोषणविषयक स्थिती सुधारणे हे होते. ही योजना नंतर उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांपर्यंत वाढविण्यात आली (२००८).

सन २००६-११ या कालावधीत, शिक्षण अधिकारी (प्राथमिक), गोंदिया यांना स्वयंपाकाची किंमत व अन्य किरकोळ खर्चाकरिता रुपये ३१.९७ कोटी मिळाले. यापैकी रुपये २८.०५ कोटी खर्च केले गेले व रुपये ३.९२ कोटी मार्च २०११ ला खर्चाविना बाकी राहिले, दिसून आलेल्या उणीवा खाली चर्चिल्या आहेत.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक ११ जुलै २०११ च्या पत्रानुसार सन २०१०-११ मध्ये वितरित केलेल्या तरतूदीमधून आवश्यकतेप्रमाणे खर्च करून उर्वरित रक्कम जिल्हा निधीत ठेवण्याबाबत कळविण्यात आले होते व केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत ही सन २०१०-११ मधील अखर्चित रक्कम सन २०११-१२ मध्ये खर्च करण्यास मान्यता प्रदान करण्यात आल्याने शिल्लक रक्कम पुढील वर्षात खर्च करण्यात आली आहे.

मध्यान्ह भोजनांचा कमी वापर :

सन २००८-०९ मध्ये प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांकरिता प्रतिदिन प्रति विद्यार्थ्याला १०० ग्रॅम या आधाराने एकूण २,०४१४.६७ मे.ट. तांदूळाची आवश्यकता असताना मध्यान्ह भोजन देणाऱ्या शाळांनी फक्त १,९४७.५८ मे.ट. तांदूळ वापरला, ज्यामध्ये आवश्यकतेनुसार ६७.०९ मे.ट. ची तूट होती.

तांदूळाच्या कमी वापराने विद्यार्थ्यांना प्रतिदिन प्रति विद्यार्थी १०० ग्रॅम तांदूळ देण्याचा योजनेचा मुख्य हेतू निरर्थक ठरला. शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांनी नमूद केले (जुलै २०११) की पंचायत समितीकडून आलेल्या वापर प्रमाणपत्रानुसार १,९४७.५८ मे.ट. तांदूळ वापरला गेला. तथापि, वस्तुस्थितीचा पडताळणी झाल्यावर जबाबदारी निश्चित केल्या जाईल.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शालेय पोषण आहार ही योजना इ.१ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येते. या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्रतिदिन प्रतिविद्यार्थी प्राथमिक वर्गासाठी १०० ग्रॅम आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी १५० ग्रॅम तांदूळ वितरित करण्यात येत असून विद्यार्थी अनुपस्थितीमुळे शिल्लक राहिलेला तांदूळानुसार पुढील महिन्याची मागणी नोंदविण्यात येते.

महालेखापालाचे अभिप्राय :—

In reply to audit observation the EO had stated that verification for less utilization of food grain will be done and responsibility. Will be fixed. Whether responsibility was fixed.

विभागाचे अभिप्राय :—

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत दररोज शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती विचारात घेऊन आहार शिजविला जाते. यामुळे मंजूर तांदूळापैकी सन २००८-०९ मध्ये प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीनुसार प्रतिदिन प्रति विद्यार्थ्यांला १०० ग्रॅम प्रमाणे १९४७.५८ मे.ट. तांदूळ वापरला गेला. उर्वरित ६७.०९ मे.ट. तांदूळ शिल्लक राहिला. सदर शिल्लक तांदूळ विचारात घेऊन पुढील मागणी नोंदविण्यात आली होती. यामुळे याबाबतची जबाबदारी कोणावरही निश्चित करण्यात आलेली नाही.

मध्यान्ह भोजनांचा पुरवठा बंद करणे :

पाच नमुना गटातील १८ शाळांच्या चाचणी तपासणीत असे उघडकीस आले की विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देणे सुरू नव्हते. २००६-११ या कालावधीत खंडकाळ दोन ते ७४ दिवस या टप्प्यात होता. या खंड काळाचे कारण स्वस्त भावाने दुकानात धान्य उपलब्ध नव्हते. याने बालकांना पोषणविषयक आधाराची तरतूद सुरू ठेवण्याचा हेतू विफल झाला.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत लाभार्थी आहारापासून वंचित राहू नये याकरिता काळजी घेण्यात येत असून धान्यादी माल व इतर साहित्याचा पुरवठा आदेश पुरवठादारास प्राप्त झाल्यानंतर विहित मुदतीत पुरवठा न झाल्यास विद्यार्थी शालेय पोषण आहारापासून वंचित राहू नये यासाठी मान्य दरानुसार खुल्या बाजारातून खरेदी करण्याबाबत निर्देश आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येते.

महालेखापालाचे अभिप्राय :—

If there were orders to purchase food grain from open market, then why food could not be purchased and served in 18 schools as there were break periods upto 74 days.

When the orders for purchase of food grain from open marked were given may be stated to PAC and who had to give the orders ?

विभागाचे अभिप्राय :—

जुलै २०१० पर्यंत तांदूळाची वाहतूक अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत स्वस्त धान्य दुकानापर्यंत होत होती. मुख्याध्यापक स्वस्त धान्य दुकानातून तांदूळाची उचल करीत होते. तसेच धान्यादी मालाची खरेदी अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांद्वारे करण्यात येत होती. लेखा परिक्षणामध्ये काही शाळांमध्ये काही कालावधीकरिता शालेय पोषण आहार बंद असल्याबाबत उपस्थित झालेला मुद्दा जुलै, २०१० पूर्वीचा आहे. जुलै, २०१० पासून तांदूळाची वाहतूक व ग्रामीण भागातील शाळांपर्यंत धान्यादी मालाचा पुरवठा राज्य शासनाने निविदा प्रक्रिया राबवून नियुक्त केलेल्या संस्थांमार्फत करण्यात येत आहे. सदर पुरवठेदारांमार्फत पुरवठा वेळेत झाला नाही तर पर्यायी व्यवस्था म्हणून साहित्याची खरेदी स्थानिक पातळीवर करण्याबाबतची सूचना शिक्षण संचालनालयाच्या स्तरावरून देण्यात आल्या आहेत. यानुसार जिल्ह्यातील सर्व तालुक्यांना सूचना देण्यात आलेल्या आहे. तथापि, काही वेळा भारतीय अन्न धान्य महामंडळाकडून "फेअर ॲव्हरेज क्वालिटी (F.A.Q.)" दर्जाचा तांदूळ प्राप्त होत नाही. तांदूळाची बाजारातील किंमत योजनेंतर्गत मंजूर दरापेक्षा (रुपये ५.६ प्रति किलो) खूप जास्त आहे.

पायाभूत सुविधा :

मध्यान्ह भोजन योजनेखाली पायाभूत सुविधा जसे पाकशाळा व कोठीघर, पाकशाळा भांडी इ. व स्वच्छ पिण्याचे पाणी यांची तरतूद करावयाची असते.

असे दिसून आले की, १,९४७ शाळांपैकी १,६२४ शाळांमध्ये मध्यान्ह भोजन तयार करण्यासाठी पाकशाळा छपरी नव्हत्या. वेगळ्या पाकशाळेच्या अभावी, एकतर वर्ग खोल्यांमध्ये किंवा उघड्यावर भोजन तयार केले जात होते. जे केवळ अनारोग्यपूर्णच नव्हते तर विद्यार्थी तसेच शिक्षक यांची एकाग्रता बाधित करू शकणारे होते. शिवाय मार्च, २०११ मध्ये ६६६ शाळांमध्ये पाकशाळा भांडी नव्हती.

निवडलेल्या शाळांच्या प्रत्यक्ष पडताळणीमध्ये असे उघडकीस आले की, वर्गखोल्यांचा उपयोग कोठीघर म्हणून केला जात होता व भोजन तयार करण्याचे काम उघड्यावर केले जात होते.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत खाजगी शाळांमध्ये Plinth Area Norms प्रमाणे Type A, B, C नुसार सन २०१४-१५ मध्ये एकूण ६७ बांधकामे मंजूर करण्यात आले असून बांधकामाची कार्यवाही सुरू आहे व ३ शाळांपैकी २ ठिकाणी शाळा व्यवस्थापन समितीचा हस्तक्षेप व १ ठिकाणी जागा उपलब्ध नसल्याने प्रलंबित आहे. इतर ठिकाणी स्वयंपाकगृहे बांधकाम करण्यात आले असून स्वयंपाकगृहामध्ये स्वयंपाक करण्यात येते तसेच सर्व शाळांमध्ये ताटांची व्यवस्था करण्यात आली आहे.

महालेखापालाचे अभिप्राय :—

Audit had pointed out that 1624 schools (83%) were not having kitchen sheds upto 2010-11 but Govt. is answering about 67 schools sanctioned in 2014-15. What is the current status of all schools pointed out by audit ?

विभागाचे अभिप्राय :—

जिल्ह्यात एकूण १,३५८ शाळा शालेय पोषण आहार योजनेसाठी पात्र असून १,२८४ शाळांमध्ये शालेय पोषण आहार शिजविण्याची स्वतंत्र स्वयंपाकगृहे उपलब्ध आहेत. खाजगी अनुदानित ७१ शाळांमध्ये स्वतंत्र स्वयंपाकगृहांची बांधकामे सुरू आहेत. जिल्हा परिषदेच्या खालीलप्रमाणे एकूण ३ शाळांमध्ये स्वयंपाकगृहाची स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध नाही.

(१) जि.प.उच्च प्राथ. शाळा रावणवाडी, पं.स.गोंदिया (शाळा व्यवस्थापन समितीने शाळेत प्रिफब्रीकेटड पद्धतीने बांधकाम करण्यास नकार दिला.)

(२) जि.प.प्राथ. शाळा चिंचोली (जुनी), पं.स. अर्जुनी मोरगाव व

(३) जि.प.प्राथ. शाळा बारेगांव, पं.स. तिरोडा (या शाळांमध्ये स्वतंत्र स्वयंपाकगृह बांधकामासाठी जागा उपलब्ध नाही).

शाळांमध्ये स्वतंत्र स्वयंपाकगृह उपलब्ध असल्याने वर्गखोल्याचा उपयोग स्वयंपाकगृह व कोटीघर यासाठी केला जात नाही. तसेच भोजन तयार करण्याचे काम उपलब्ध असलेल्या स्वयंपाकगृहातच केले जाते.

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केंद्र शासन शाळांना भांडी पुरवठा करण्यासाठी प्रतिशाळा रुपये ५०००/- इतके अनुदान उपलब्ध करून देते. सदर अनुदानातून शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची टाकी, बादली, धान्य साठवण्याची कोठी, पळी, स्टेनलेस स्टिल कप्पा, ताटे इ. चा पुरवठा करण्यात आलेला आहे. तथापि, विद्यार्थी संख्या विचारात घेता सदर वस्तू कमी आहेत. यामुळे भांडी पुरविण्यासाठी विद्यार्थी संख्येनुसार निधी उपलब्ध करून देण्याबाबत किंवा प्रतिशाळा किमान रुपये १००००/- इतका मंजूर करण्याची विनंती राज्य शासनाने केंद्र शासनास केली होती. तथापि, केंद्र शासनाने सदर विनंती अमान्य केली आहे.

नगरविकास विभाग

१.१२ कचरा व्यवस्थापन :

गोंदिया शहराची लोकसंख्या १,२०,९०२, (२००१ च्या जनगणनेप्रमाणे) आहे. या नगरपरिषदेच्या अधिकार क्षेत्राखाली प्रतिदिन ४० मे.टन केरकचरा निर्माण होतो. ज्यापैकी ५९ टक्के ज्याची जैविक अवनति होऊ शकत नाही असा आहे. कचरा गोळा करण्याकरिता शहरात २०० कचरा कुंड्या व १०० कचरा टाकण्याच्या पेट्या दिल्या आहेत. सध्या, शहरात घनकचरा विल्हेवाट संयंत्रे अस्तित्वात नाहीत. नगरपरिषद, शहराच्या वेशीवरील भागात टाकून घनकचऱ्याची असंघटिक व अशास्त्रीय प्रकाराने विल्हेवाट लावते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकारपत्राखाली एक कचरा प्रक्रिया संयंत्र चालू झाले. (ऑक्टोबर, २००५) तथापि, नगरपरिषदेने कचरा टाकण्याच्या आवाराभोवती सीमाभिंत बांधली नाही. दरम्यान गावकऱ्यांनी आंदोलन केले आणि पर्यावरणातील प्रदूषण व सार्वजनिक अनारोग्याच्या धोक्यामुळे कचरा टाळण्याचे काम थांबविले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुढे अधिकार पत्राचे नूतनीकरण केले नाही व शेवटी संयंत्र बंद झाले. (मार्च २००८)

उत्तरादाखल मुख्य अधिकारी, नगरपरिषद, गोंदिया यांनी नमूद केले (फेब्रुवारी, २०११) की संयंत्र पूर्णपणे विकसित होऊ शकले नाही कारण आवश्यक जमीन विशेष भूसंपादन अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिले नाही.

निकास परिषदेत अभिक्षण मान्य करताना असे नमूद केले गेले की भूसंपादन प्रक्रिया सुरू होती.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

घनकचरा व्यवस्थापन नियम, २००० ची अंमलबजावणीकरिता ग्राम टेमणी येथे खसरा नं.३९९ मधील ३.७४ हे. जमीन भूसंपादन करण्याकरिता मा.भू-अर्जन अधिकारी (बा.व ई) क्र.३ जिल्हा कार्यालय गोंदिया यांना दिनांक १७ जुलै २००४ ला प्रस्ताव सादर केलेला होता.

३.७४ हेक्टर जमिनीपैकी ४ एकर, ४० डिसमील जमिनीचा ताबा मिळाला उर्वरित जमिनीचा निवाड्यास लागणारी निधी जमा करण्याबाबत मा.विशेष भू-अर्जन अधिकारी (बा.व ई) क्र.३ गोंदिया यांचे पत्र दिनांक २९ जानेवारी २०११ अन्वये रुपये २२,२४,००० ची मागणी केली त्याप्रमाणे

१२ वा वित्त आयोग निधीमधून घनकचरा व्यवस्थापनाकरिता रुपये २२,२४,००० चा प्रस्ताव प्रशासकीय मान्यताकरिता मा.जिल्हाधिकारी, गोंदिया यांना दिनांक ०९ मार्च २०११ ला सादर करण्यात आला. त्याला प्रशासकीय मान्यता अप्राप्त आहे.

शहरामधून प्रतिदिवस निघत असलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता पिडकेपार येथे गौशालाच्या बाजूला खोलगट भागात कचरा टाकून त्याला वेळोवेळी जे.सी.बी. मशिनद्वारे समतोल करण्यात येत आहे.

मौजा कंटगीकला येथील शासकीय जमीन गट क्रमांक ५८१/१, आरजी १.०४ हे.आर.जागेची निवड करण्यात आली होती. त्या अनुसार सदर जमीनबाबत दिनांक १६ एप्रिल २०१३ ला मा.उप विभागीय अधिकारी, गोंदिया यांचे कार्यालयात प्रस्ताव सादर केले होते. सदर प्रकरण छाननी केली असता काही त्रुटी आढळल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच विमान प्राधिकरण यांच्या नियमामध्ये सदर जमीन बसत नसल्यामुळे मा.जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ७ जुलै २०१४ ला बैठक घेण्यात आली. व सदर बैठकीत प्रस्तावित जागा कंटगीकला गावापासून १ कि.मी. अंतरावर आहे व प्रस्तावित जागा ही १.०४ हे.आर असून गोंदिया शहरामधून निघणारा नागरी घनकचराकरिता सदर कमी वाटते. घनकचरा विल्हेवाटीसाठी असणारी जागा ही पुढील २० ते २५ वर्षे पुरेल इतकी असावी. प्रस्तावित जागेवरती पाण्याचा साठा आढळून आला त्यामुळे त्या जागेवर घनकचरा टाकल्यामुळे पाण्याचा प्रदूषणाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो असे बैठकीत निर्देश देण्यात आले. नगरपरिषदेला दुसरी सरकारी जागा उपलब्ध होत असल्यास त्याकरिता पोच रस्ता आहे किंवा नाही याची खात्री करून प्रस्ताव उप विभागीय अधिकारी यांचेकडे सादर करावे.

मौजा रापेवाडा येथील जमिनीबाबत मा.जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे निर्देशानुसार गट क्रमांक ६४३ झुडपी जंगल आरजी ३५.१९ हे.ची जागेची पाहणी करून सदर जागा घनकचरा व्यवस्थापनकरिता योग्य वाटत असल्यामुळे मा.उपविभागीय अधिकारी यांना प्रस्ताव सादर करण्यात आला. त्या अनुसार दिनांक २ डिसेंबर २०१४ ला ग्राम रापेवाडा येथील सदर जागेची पाहणी करण्याकरिता महाराष्ट्र प्रदूषण मंडळ, भंडारा तसेच नगर रचनाकार, गोंदिया, मा.एस.डी.ओ., मा.तहसिलदार, तसेच मा.न.प. अध्यक्ष यांच्याद्वारे मौका पाहणी केली असता सदर जमिनीच्या बाजूला लागून पाणलोट क्षेत्र असल्यामुळे मा.उप विभागीय अभियंता, लघु पाटबंधारे विभाग यांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याकरिता दिनांक ९ डिसेंबर २०१४ ला पत्र देण्यात आले. त्या अनुसार संबंधित विभागाकडून ना हरकत प्राप्त झाले त्या अन्वये मा.उप विभागीय अधिकारी, गोंदिया यांना पुढील कार्यवाहीकरिता दिनांक २ फेब्रुवारी २०१५ ला प्रस्ताव सादर केलेला आहे.

परंतु मा.जिल्हाधिकारी यांनी मौजा टेमणी येथील जमिनीवरच घनकचरा व्यवस्थापनाकरिता कम्पांऊंड वाल बांधण्यासाठी निर्देश देण्यात आले. सदर काम UD6- अ निधी मधून करावयाचे असल्यामुळे त्याबाबत आमसभेची मंजुरी घेण्याकरिता कार्यवाही सुरू आहे.

करीता जमिनीवर घनकचरा व्यवस्थापनासाठी डि. पी. आर प्रमाणे नवीन टेक्नॉलॉजी अनुसार शास्त्रयुक्त पद्धतीने लेन्डफिल्ड साईडवर लवकरात लवकर न.प. द्वारा कामाला सुरूवात करण्याची कार्यवाही करण्याबाबत शर्तीचे प्रयत्न सुरू आहे.

नगर परिषद तिरोडा :

तिरोडा शहराची लोकसंख्या २२,५२९ (जनगणना) होती आणि या नगरपरिषदेच्या क्षेत्रात प्रतिदिन एक मे.टन केरकचरा निर्माण होत होता ज्यापैकी ४८ टक्के ज्याची जैविक अवनित होऊ शकत नाही असा होता. कचरा गोळा करण्याकरिता शहराला ६० उघडे कचरा डबे दिले होते. शहरात एकही घनकचरा विल्हेवाट संयंत्र अस्तित्वात नव्हते. नगरपरिषदेकडून कचरा गोळा केला जात होता आणि शहरापासून १० कि.मी. दूर असलेल्या शहराच्या वेशीवरील भिवापूर गावात टाकून त्याची विल्हेवाट लावली जात होती. नगरपरिषदेने कचरा प्रक्रिया संयंत्र स्थापन केले नाही. लेखापरीक्षण चमू व विभागीय अधिकारी यांच्या कचरा टाकण्याच्या आवाराच्या संयुक्त भेटीत (जुलै, २०११) असे आढळून आले की कचरा प्रक्रिया संयंत्राचे कारखान्याचे बांधकाम सुरू होते.

उत्तरादाखल मुख्य अधिकारी, नगरपरिषद, तिरोडा यांनी नमूद केले की, संयंत्र पूर्ण झाल्यानंतर ते चालविण्यासाठी अभिकरण निश्चित करण्यात येईल, निकास परिषदेत असे नमूद करण्यात आले की, कचरा व्यवस्थापन संयंत्र लवकरच काम सुरू करेल.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

तिरोडा शहराची सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या २२,५२९ आहे. तिरोडा शहरात दररोज १ टन केरकचरा निर्माण होत असून दररोज तिरोडा नगरपरिषदेच्या वाहनातून १० किमी अंतरावर असलेल्या भिवापूर गावात डम्पींग ग्राऊंड (घनकचरा व्यवस्थापन) वर गोळा करण्यात येत असून घनकचरा व्यवस्थापनाकरिता खरेदी करण्यात आलेल्या जागेवर आवार भिंत, ३ (तीन) पक्के शेड, चौकीदार कक्ष उभारणी, घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता ५ खड्डे तयार करण्यात आले. सदर जागेवर विजेची सोय व बोरवेलची व्यवस्था करण्यात आलेली आहे. ही कामे पूर्ण झालेली आहेत.

सदर जागेवर घनकचरा व्यवस्थापन अधिनिमय, (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० अंतर्गत कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंबंधात मान्यतेकरिता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे या कार्यालयाचे पत्र क्र.नपति/स्वास्थ/२६/२०१३, दिनांक १४ जून २०१३ अन्वये सादर करण्यात आले असून मान्यता अप्राप्त आहे.

भुयारी गटार सुविधा नाही-गोंदिया :

जिल्ह्यातील दोन शहरात म्हणजे गोंदिया व तिरोडा येथे भुयारी गटार सुविधा नाहीत. नगरपरिषदेजवळ मार्च, २०११ पर्यंत भुयारी गटार सुविधा देण्याची काही योजना नव्हती. याप्रकारे, या दोन शहरांचे रहिवासी गटार सुविधाअभावी कचरा व गटार यांचेबरोबर विना सरंक्षण राहिले व उघड्या जलनि:सारण पद्धतीमुळे जे आरोग्याला धोका निर्माण करते.

उत्तरादाखल, मुख्य अधिकारी, नगरपरिषद, गोंदिया नी नमूद केले (ऑक्टोबर, २०११) की गोंदिया शहरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण द्वारा भुयारी गटार पद्धतीचा प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तथापि, तिरोडा शहरात अद्यापपर्यंत प्रस्ताव सादर केला नव्हता.

लेखापरीक्षणाचे अभिक्षण मान्य करताना निकास परिषदेत असे नमूद केले गेले की, गोंदिया शहराच्या बाबतीत शासनाकडून प्रस्तावाला मंजुरी प्रतिक्षित आहे व तिरोड्याच्या बाबतीत या बाबीचा पाठपुरावा केला जाईल.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

गोंदिया नगरपरिषद येथे केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT अंतर्गत भुयार गटार योजना ३१ मार्च १२ रोजी ८२.३३ कोटी किंमतीची मंजूर झाली होती, त्यानंतर लगेच नगर परिषद, गोंदियाने दिनांक ६ ऑगस्ट १२ चे सर्वसाधारण सभेत सदर योजनेची अंमलबजावणी करणार असल्याचे ठराव पारीत केले. परंतु महाराष्ट्र जिवन प्राधिकरणामार्फत मंजूर योजनेत सुधारणा करण्याबाबत कळविले असल्यामुळे सुधारित योजना केंद्र शासनाचे मान्यतेसाठी सादर करण्यात आली. त्यान्वये शासनाने दिनांक १८ जून २०१३ ला १२५.७२ कोटी किंमतीच्या सुधारीत योजनेस मंजुरी प्रदान केली.

सुधारित योजनेची अंमलबजावणी नगर परिषद, गोंदिया करणार असल्याचे नगर परिषदेचे दिनांक १ मार्च १४ चे सभेत ठरले तथापि नगरपरिषदेची आर्थिक स्थिती, तांत्रिक कर्मचारी वर्गाची कमतरता लक्षात घेता सुधारीत योजना निश्चित कालावधीत करणे अवघड असल्यामुळे सदर योजनेचे कार्यान्वयन करण्याकरिता कार्यालयाचे पत्र क्र.नपगो/बांधकाम/८१२/१६३, दिनांक १५ ऑक्टोबर १३ ला अन्वये शासनास मार्गदर्शन पत्र सादर करण्यात आले होते.

उपरोक्त बाबींचा विचार करून शासनाने महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगर अधिनियम, १९६५ चा कलम ३११ (अ) मधील तरतूदीनुसार गोंदिया नगर परिषदेस वरीलप्रमाणे निर्देश देण्यापूर्वी हे निर्देश का देण्यात येऊ नये याबाबत १५ दिवसांच्या आत अभिवेदन सादर करण्याची संधी देण्यात येत आहे. तसे गोंदिया नगर परिषदेने या संदर्भात आपले अभिवेदन शासनास विहित कालावधीत सादर करावे. गोंदिया नगर परिषदेने विहित कालावधीत अभिवेदन सादर करण्यास कसूर केल्यास महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३१२ (अ) मधील तरतूदीनुसार शासनामार्फत पुढील कार्यवाही केली जाईल, असे दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ च्या नोटीसद्वारे कळविण्यात आले.

सदर पत्र या कार्यालयात दिनांक १२ सप्टेंबर, १४ रोजी प्राप्त झाले. त्यात सदर प्रकरणी १५ दिवसाचे आत अभिवेदन सादर करण्याबाबत कळविले होते, परंतु दिनांक १२ सप्टेंबर, १४ रोजी विधानसभा निवडणुकीची आदर्श आचार संहिता लागू झाली असल्याने या कार्यालयामार्फत निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून विशेष सभा घेण्याबाबत मार्गदर्शन अपेक्षिलेले होते. त्यानुसार मा.निवासी उपजिल्हाधिकारी, गोंदिया यांनी सदर बाब धोरणात्मक असल्यामुळे निर्णय घेणे योग्य होणार नाही असे कळविले असल्याने विशेष सभा होऊ न शकल्याने पुढील १५ दिवसांची संधी देण्याबाबत नगर परिषदेच्या पत्र क्र.नपगो/मुअ/१२५६/१४, दिनांक २५ सप्टेंबर, १४ अन्वये शासनास विनंती करण्यात आलेली होती.

त्यावर क्र.यूआयडी-२०१३/सं.क्र.२७४/नवि-३३, दिनांक १८ मार्च, २०१५ अन्वये शासनाचे निर्णय (१) सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात यावे व प्रकल्पासाठी न.प.हिश्याचा निधी गोंदिया नगर परिषदेमार्फत उभा करण्यात यावा. (२) १३ वा वित्त आयोग व इतर अनुदानातून निधी परस्पर कात करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे शुल्क अदा करण्यात यावे. (३)मंजूर प्रकल्पांचा देखभाल व दुरुस्तीचा खर्च हा गोंदिया न.प. ने नागरिकांकडून कर स्वरूपात गोळा करून सदर निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग करण्याची कार्यवाही करावी. त्या अनुषंगाने देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी करावी.

तिरोडा शहरात भुयारी गटार निर्माण करण्याच्या संबंधात सर्व्हे करण्यात आले आहे. परंतु तिरोडा शहराची पाण्याची खपत १३५ LPCD पेक्षा कमी असल्यामुळे सदर प्रस्ताव शासनास सादर करण्यात आले नाही.

नगर परिषदेचे वार्षिक लेखे सादर न करणे :

महाराष्ट्र नगर परिषद व नगर पंचायत व औद्योगिक वसाहत (एम एम सी एन पी आय टी) अधिनियम, १९९५ च्या खंड १०२ प्रमाणे व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहितांच्या नियम ५९ व ६० प्रमाणे, नरगपरिषदेच्या मुख्य अधिकाऱ्याने वार्षिक लेखे तयार केले पाहिजेत आणि ते नगरपरिषदेला ३० जूनला किंवा त्याआधी सादर केले पाहिजेत आणि ते संचालक, नगर प्रशासन व जिल्हाधिकारी यांचेकडे दरवर्षी ३१ जुलैला किंवा त्याआधी अग्रेषित केले पाहिजेत.

जरी दोन्ही नगर परिषदांनी (गोंदिया व तिरोडा) लेखे तयार केले होते, तरी ते संचालक, नगर प्रशासन व जिल्हाधिकाऱ्यांकडे २००६-११ या कालावधीत सादर केले नाहीत ही गोष्ट मान्य तरतूदींचे उल्लघंन दर्शविते.

हे अभिक्षण मान्य करताना निकास परिषदेत (नोव्हेंबर, २०११) असे नमूद करण्यात आले की, भविष्यात लेखे करार निविष्ट काळात मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

नगर परिषद गोंदिया व तिरोडा यांचेकडील सन २००६ ते ११ या कालावधीतील वार्षिक लेखे सादर करण्यास मुख्याधिकारी, न.प.गोंदिया व तिरोडा यांना सूचना देण्यात आले आहे. तसेच या नंतरचे वार्षिक लेखे सादर करण्यास मुख्याधिकारी, न.प.गोंदिया/तिरोडा यांना वेळेवर जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांस सादर करण्यास कळविण्यात आले असून यापुढे विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल तसेच सदर अनुपालन मान्य करण्यात यावी, ही विनंती.

१.१३ साक्ष :—

सन २०१०-२०११ भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या सन २०१०-२०११ च्या नागरी अहवालातील परिच्छेद क्रमांक **४.१ "गोंदिया जिल्ह्याची केंद्रीत लेखापरिक्षा"** या संदर्भात दिनांक १ ऑक्टोबर, ४ नोव्हेंबर, २४ नोव्हेंबर, २०१५ व १३ जानेवारी २०१६ रोजी ग्रामविकास विभाग सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान) विभाग, शालेय शिक्षण विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, रोजगार हमी विभाग, जलसंपदा विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने महालेखाकाराच्या अहवालातील खालील निष्कर्ष, विभागीय प्रतिनिधींना अवगत केला.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१०-२०११ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद ४.१.१२ मध्ये संपूर्ण परिच्छेदाच्या संदर्भात महालेखापाल यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविलेला आहे.

"जिल्हा नियोजन समितीने पंचवार्षिक प्रमाणबद्ध योजना किंवा जिल्ह्याच्या एकूण विकासासाठी सर्व समावेशक एकात्मिक जिल्हा योजना तयार केली नव्हती. जिल्ह्याजवळ आरोग्य केंद्रे, न्यूनतम पायाभूत सुविधा व डॉक्टर्स यांचा तुटवडा होता. ज्यामुळे जनतेला सुगम व परवडणारी आरोग्य सेवा देण्याचा हेतू सफल झाला नाही. शाळांच्या संख्येतील वाढीनंतरही विद्यार्थ्यांच्या नाव नोंदणीत घट झाली. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत खालील परिवारांना १०० दिवसांची मजुरी दिली गेली नाही. एकूण ५९ वस्त्यांमध्ये पाणी रायासायनिक द्रव्याने बाधित झाले होते. तरी, पाण्याच्या गुणवत्तेच्या बाबतीत काही उपाय केले नाहीत. जिल्ह्यातील गोंदिया व तिरोडा ही शहरे भुयारी गटार सुविधांशिवाय व कचऱ्याच्या व्यवस्थापनाशिवाय होती. सार्वजनिक वितरण प्रणाली अन्नधान्ये उचलण्यात तूट होती."

महालेखाकारांनी गोंदिया जिल्ह्याची पंचवार्षिक योजना तयार केलेली नाही. या विषयी नगरविकास विभागाच्या सचिवांनी माहिती दिली की, पंचवार्षिक योजनेसंदर्भात सूचना देणे, प्रशिक्षण देणे, मदत करणे, अशा प्रकारे पंचवार्षिक योजनेचा प्लॅन तयार करण्यात येणार असून, त्यासंदर्भात विभागाकडून योग्य तो पाठपुरावा केला जाणार आहे.

गोंदिया जिल्ह्याच्या संदर्भातील माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, लेखापरीक्षणाच्या संदर्भात जिल्हापरिषद आणि संबंधित यंत्रणेकडून प्रस्ताव आले होते. ग्रामपंचायत किंवा पंचायत समिती स्तरावरून प्रस्ताव मागविले गेले नाहीत. यासंदर्भातील माहिती त्यावेळी उपलब्ध होऊ शकली नव्हती. डीपीडीसीमध्ये जिल्हापरिषदेतील पाणी पुरवठ्याच्या संदर्भात ग्रामपंचायतीकडून ठराव करून ते स्वीकारले जातात.

हे प्रस्ताव नंतर घेतले जातात. जिल्हा नियोजन आराखडा तयार करताना ढोबळमानाने सर्व विभागातील विभाग प्रमुखांना बोलावून लघुगटासमोर तो प्रस्ताव सादर केला जातो, ही वस्तुस्थिती आहे. डीपीडीसीच्या बैठकीत आराखडा तयार करण्याची पद्धत आहे. त्या अनुषंगाने पंचायत समिती किंवा ग्रामपंचायतीकडून प्रस्ताव मागवून घेतले जातात. ही पद्धती सद्यःस्थितीत अवलंबिली जात नाही, ही वस्तुस्थिती सर्वांनी स्वीकारली पाहिजे. भविष्यात यासंदर्भातील दुरुस्ती करावी यासाठी संबंधित विभागांच्या सचिवांची साक्ष आयोजित केलेली आहे. यासंदर्भात सचिवांनी समितीला योग्य ती माहिती देण्याबाबत सूचविले.

पंचायत समिती किंवा ग्रामपंचायतीकडून प्रस्ताव मागवून घेण्याची गरज नाही, अशा प्रकारची दुरुस्ती करण्याची गरज आहे. जर सचिवांना हा नियम योग्य आहे, असे वाटत असेल तर त्याची अंमलबजावणी ही काटेकोरपणे झाली पाहिजे. या दृष्टीकोनातून विभागाने पुढील योग्य ती कार्यवाही केली पाहिजे.

जिल्ह्यात ग्रामपंचायतींची संख्या खूप जास्त असते. डीपीडीसीमध्ये जिल्हापरिषदेतील सदस्य आणि पंचायत समितीमधील सभापती काम करीत असतात. संबंधित लोकप्रतिनिधी त्यांच्या मतदारसंघातून कोणती कामे घ्यावीत, याकरिता ते प्रस्ताव देतात. जिल्हा वार्षिक योजनेचा आराखडा तयार करताना त्याचा नियतव्यय लघुगटासमोर ठेवला जातो.

माननीय वित्तमंत्री महोदयांकडे जेव्हा वार्षिक आराखडा सुधारित केला जातो, त्यावेळी त्याचा कसा विनियोग करावा यासंदर्भातील चर्चा लघुगटासमोर करण्याची पद्धत आहे काय? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, अशी पद्धत नाही.

विभागाकडे मर्यादित निधी असतो. वार्षिक आराखडा लघुगटासमोर ठेऊन तो डीपीडीसीकडे सादर केला जातो. जिल्हा नियोजनासाठी वार्षिक ७० कोटी रुपयांचा जास्त निधी मिळाला तर हा निधी कोणत्या शीर्षाखाली घ्यावा हे काम लघुगटाने केले पाहिजे. त्यानंतर ते डीपीडीसीकडे गेले पाहिजे, ही पद्धत का नाही? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, निधीची मागणी ही जास्त प्रमाणात केली जाते. या विषयी माननीय वित्तमंत्री आणि माननीय नियोजनमंत्र्याची चर्चा होत असते. जिल्ह्यामध्ये १०० कोटी रुपयांचे वाटप असेल आणि नंतर १० कोटी रुपयांची वाढ केली गेली तर लघुगटाकडे जाण्याची गरज वाटत नाही. कारण लघुगट हा जिल्हा नियोजन समितीमधूनच निर्माण केलेला गट असतो.

वार्षिक आराखडा तयार करीत असताना वर्षाअखेरीस सर्व निधी खर्च होत नसल्यामुळे दीडपट कामे घेतली जातात. जास्तीचा निधी हा अतिरिक्त कामांसाठी मिळणार आहे. सन्माननीय सदस्यांच्या लघुगटाला मूळ आराखडा तयार करावा लागणार आहे. लघुगटासमोर वाढीव आराखडा देखील येण्याची आवश्यकता आहे. सचिवांकडून जे उत्तर दिले गेले आहे, ते विसंतग आहे. लघुगटाने २५० कोटी रुपयाचा आराखडा तयार केल्यानंतर डीपीडीसीच्या बैठकीत सादर केला जातो. परंतु, मूळ आराखड्यामध्ये २० टक्के वाढ झाल्यानंतर ती सुद्धा लघुगटापुढे आली पाहिजे, जिल्ह्यातील सन्माननीय सदस्य निधी वाढवून द्यावा यासाठी माननीय वित्तमंत्री महोदयांपुढे आग्रह करीत असतात, असे मत समितीने व्यक्त केले आहे.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, लघुगटाची कल्पना ही डीपीडीसीला मदत करण्यासाठी आहे. लघुगटातील सदस्य हा डीपीडीसीमधील असतो. लघुगटाच्या माध्यमातून मूळ आराखडा डीपीडीसीकडे सादर केला जातो. डीपीडीसीच्या बैठकीत वाढीव तरतूदीची मंजुरी दिली जाते. त्यामुळे जुना लघुगट घेण्याची पद्धत नाही. कारण लघुगट हा डीपीडीसीचाच एक भाग आहे.

लघुगटाचे ते काम नाही, असे असेल तर लघुगटच कमी करून टाकावा. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत २५० कोटी रुपयांचा आराखडा अंतिम केला जातो. लघुगटातील सन्माननीय सदस्य हे अधिक वेळ काम करून अमुक ठिकाणी गरज नाही, जिल्ह्याला गरज आहे, संबंधित तालुक्याला गरज आहे अशा प्रकारे अभ्यास करून मत मांडण्याचा प्रयत्न करीत असतात. लोकप्रतिनिधींचे काय म्हणणे आहे, ते प्रशासनाकडून ऐकून घेतले जात नाही, अशा मनस्थितीत संबंधित अधिकाऱ्यांचे वागणे असते. संबंधित अधिकारी कोणत्या विभागासाठी किती निधी द्यावा हे ठरवित असतात. लघुगटातील सन्मा. सदस्यांचे अधिकार अबाधित राहिले पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले.

जिल्हा नियोजन समितीमध्ये वाढीव निधी मंजूर करून घ्यावा लागतो आणि ही नेहमीची पद्धत असते. जिल्हा नियोजन समितीमध्ये वाढीव निधी मंजूर करून घेण्यापूर्वी लघुगटाची देखील मंजुरी घ्यावी अशी समितीला सूचना केली असून, लघुगटानंतर सुप्रीम बॉडी ही डीपीडीसीची असते. यासंदर्भात सचिवांनी योग्य ती कार्यवाही करावी अशीही समितीने सूचना केली. लघुगटाने पंचायत समिती किंवा तालुका स्तरावरील प्रस्ताव घेण्याची पद्धत अवलंबिली पाहिजे. परिणामी जिल्हा नियोजनचा एक चांगल्या पद्धतीने आराखडा तयार करण्यास मदत होणार आहे.

शासनाने जलयुक्त शिवार योजना जाहीर केलेली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय डीपीडीसीकडे येतो. काही लोकांनी या योजनेस पैसे द्यावयाचे नाही म्हणून विरोध केलेला होता. परंतु, ती योजना घ्यावीच लागेल असे अधिकाऱ्यांनी सांगितले होते. यामुळे संबंधित लोकांच्या म्हणण्याला काय अर्थ राहिला? अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्य शासनाने जलयुक्त शिवार योजनेच्या संदर्भात डीपीडीसीसाठी वाटप ठरविले होते. ६ हजार कोटी रुपयांचा निधी डीपीडीसीला दिला जाणार आहे. जलयुक्त शिवार योजनेसाठी नियमानुसार जो ६ हजार कोटी रुपयांचा निधी मिळणार होता, त्यामध्ये अधिकचा १ हजार कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे.

सन १९९२ मध्ये केलेल्या घटनेच्या ७४ व्या दुरुस्तीने जिल्हयातील पंचायती व नगरपालिका यांनी केलेल्या योजनांचे एकत्रिकरण करून आरोग्य,शिक्षण,सिंचन,इमारती व रस्ते इ.असे सर्व कार्यक्रम एका एकात्मिकृत जिल्हा योजनेमध्ये समावेश करण्यासाठी एक जिल्हा नियोजन समिती स्थापन करणे आदेशित केले आहे. स्थानिक व्यवस्थापनांचे तिन्ही स्तर जसे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गट व ग्रामपंचायती यांनी वार्षिक कृती योजना प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला तयार करावयाची होती आणि वार्षिक कृती योजनेचा भाग असल्याशिवाय कुठलेही काम हाती घ्यावयाचे नव्हते.

अभिलेख्यांच्या लेखापरीक्षणातील छाननीवरून असे उघडकीस आले की जरी जिल्हा नियोजन समिती मार्च, १९९९ मध्ये स्थापन करण्यात आली तरी जिल्हयाच्या एकूण विकासासाठी एक पंचवार्षिक प्रमाणबद्ध योजना तयार केली गेली नाही. जिल्हा नियोजन समितीने जिल्हयातील पंचायती व नगरपालिकांनी तयार केलेल्या योजनांचे एकत्रिकरण करून एक एकात्मिककृत योजना तयार केली नव्हती. तथापि गट व जिल्हा स्तरावर वार्षिक कृती योजना तयार केल्या होत्या. प्रमाणबद्ध योजना व एकात्मिककृत जिल्हा योजना त्यांच्या अभावी आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक

आरोग्य, सिंचन, इमारती व रस्ते विविध कार्यक्रमांकरिता गट व ग्रामपंचायती यांच्याकडून निविष्ट तसेच समाजाच्या अपेक्षित असलेल्या गरजा आणि जिल्हयातील विविध भाग व जाती जमातींमधील विषमता अज्ञात व न मिटलेली अशी राहिली.

यावर समितीने अशी विचारणा केली की, असे असेल तर मग या निधीकरिता डीपीडीसीच्या मान्यतेची आवश्यकता होती काय? समितीकडे याच्या आऊटलेची नोंद आहे. केंद्र शासनाची योजना व त्याचा निधी डीपीडीसीच्या माध्यमातून येतो. ॲव्हॉईड केला तरी तो निधी व त्याची योजना येते. कारण केंद्राच्या काही योजनाच तितक्या लोकप्रिय आहेत. केंद्र शासनाची योजना असली तरीही त्यामध्ये राज्य शासनाची मॅचिंग ग्रांट असते. असे मिळून ही योजना राज्यांमध्ये यशस्वीपणे राबविली जाते. डीपीडीसीच्या माध्यमातून केंद्राच्या योजनांना होय किंवा नाही म्हटले तरीही ती योजना घ्यावीच लागते. असे असेल तर मग असे ठरवावे लागेल की, जिल्ह्याच्या योजना जिल्हा प्रशासनाने राबवाव्यात. राज्य शासनाच्या योजना राज्य शासनाने राबवाव्यात. केंद्र शासनाच्या योजना केंद्र शासनाने स्वतंत्रपणे राबविण्यात याव्यात. असे मत समितीने व्यक्त केले.

डीपीडीसीच्या निधीसंदर्भात नियंत्रणही डीपीडीसीचे असते. मात्र डीपीडीसीच्या कामांची निवड करण्याकरिता जी समिती गठित केलेली आहे, त्याचे पालकमंत्री अध्यक्ष असतात आणि जिल्हाधिकारी हे सचिव असतात. या संदर्भातील शासन निर्णय निघालेला आहे. कोणती कामे घ्यावयाची किंवा नाही, याबाबत निर्णय घेण्याकरिता जिल्हाधिकारी हे पालकमंत्री महोदयांना सहाय्य करीत असतात. डीपीडीसी जिल्हा नियंत्रण समितीचे अधिकारी या समितीचे कामकाज पाहत असतात. पालकमंत्री या संदर्भातील निर्णय घेत असतील तर जिल्हा निवड समितीची गरज काय? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, डीपीडीसीला मिळणा-या निधीबाबत शासनाने मागदर्शक तत्वे पाठविलेल्या असतात. नियोजन विभाग या निधीसमवेत त्याचा वापर कसा करावा किंवा कसा करू नये,याबाबत मार्गदर्शक तत्वेही जिल्हा प्रशासनाकड पाठवित असते.

यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनाही विचारात घ्यावे. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनाही विचारात घेणे आवश्यक आहे. कामांची निवड करण्याचे अधिकार पालकमंत्री महोदयांनी घेतले तर डीपीडीसी व जिल्हा निवड समिती यांना कोणतेच अधिकार राहत नाहीत. यामध्ये ग्रामपंचायतींची महत्त्वाची भूमिका आहे. ग्राम पंचायतींनी, गट कार्यान्वयन योजनांमध्ये एकत्रिकरण करण्यासाठी एक वार्षिक कार्यान्वयन योजना तयार केली पाहिजे. जिल्हा परिषदेतील जिल्हा जल व स्वच्छता मंडळाने संपूर्ण स्वच्छता मोहिमेच्या योजनांचे एकत्रिकरण करून जिल्हा कार्यान्वयन योजना तयार केली पाहिजे. वार्षिक कार्यान्वयन योजनेच्या परिणामकारक कार्यान्वयना करिता सर्वच पातळीवर मासिक व त्रैमासिक भौतिक व वित्तीय संनियंत्रण आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी विदित केले की,वर्धा जिल्ह्यात केंद्र शासनाच्या संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत रुपये ७४९ कोटी किंमतीचा प्रकल्प माहे एप्रिल,२००४ मध्ये मंजूर झाला व माहे डिसेंबर,२००६ मध्ये घन व द्रव कचऱ्याचे व्यवस्थापन या घटकाच्या समावेशामुळे रुपये १९.०० कोटी असे सुधारित केले आहे. त्यात घन व द्रव कचरा व्यवस्थापन याकरिता १.७५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. उर्वरित तरतूद ही वैयक्तिक शौचालयाची किंमत वाढलेली असल्याने झाली आहे.

घन व द्रव कचरा व्यवस्थापन या घटकावर खर्च करावयाचे होते. परंतु घन व द्रव कचरा व्यवस्थापनाबाबत गावाची निवड, करावयाची कामे व त्यावर मंजूर करावयाचा निधी याबाबत शासन निर्णय नोव्हेंबर,२०११ मध्ये आल्यामुळे घन व द्रव कचरा व्यवस्थापनाची कामे करता आली नाहीत. त्यामुळे त्यावर खर्च करता आला नाही. केंद्र शासनाचा सन २०१०-२०११ मध्ये रुपये १.०५९३ कोटी निधी दिनांक ३१ मार्च २०११ रोजी आल्याने १०० टक्के खर्च करता आला नाही.

समितीने असे सूचित केले की, या संदर्भात शासनाने योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.निधीचे वाटप मतदारसंघ निहाय होणे आवश्यक आहे.नगरविकास विभागाचा निधीचे त्या क्षेत्रातील लोकसंख्येच्या आधारावर वाटप झाले पाहिजे तसे होत नाही. या संदर्भात नगरविकास खात्याकडे कमी निधी प्राप्त होतो.निधीचे वाटप मतदारसंघ निहाय आणि लोकसंख्येच्या प्रमाणात झाले पाहिजे.

यास विभागीय सचिवांनी मान्यता दर्शविली व सांगितले की, जिल्हा निवड समितीने कामे सुचविली तरीही अंतिम निर्णय हा डीपीडीसीचाच असतो. जिल्हा नियोजन समितीपुढे कामांचा प्रस्ताव पाठविला जातो.

राज्यामध्ये ब-याच मतदारसंघांमध्ये लोकसंख्या व भौगोलिक परिस्थितीला निकष न मानता विसंगतीने निधीचे वाटप झालेले आहे, याबाबत नियोजन विभागाने दक्षता घेणे तसेच प्रत्येक जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थिती त्याप्रमाणे तेथील शेतक-यांच्या मागण्या व पाण्याची आवश्यकता यामध्ये फरक आहे. त्याप्रमाणे निधीचे वितरण करणे आवश्यक आहे. जिल्हानिहाय बॅकलॉगप्रमाणे निधीचे वितरण करणे आवश्यक आहे. जत आटपाडी सारख्या तालुक्यांमधील दुष्काळी भौगोलिक परिस्थिती त्या प्रमाणे तेथे असलेली निधीची आवश्यकता इतर तालुक्यांच्या प्रमाणात वेगळी आहे.

नियोजन विभागाने सकारात्मक दृष्टया निधीचे वाटप केले पाहिजे. राज्यातील जिल्ह्यांमधील असमतोलपणा दूर करण्याकरिता जिल्ह्याच्या आराखडयाप्रमाणे तेथील विकास कामांचा अभ्यास करून निवड समितीने कामांचे प्रस्ताव करणे, या प्रस्तावांना त्यांच्या प्राधान्य क्रमानुसार मान्यता देणे आवश्यक आहे. या माध्यमातून जिल्ह्यांमधील निरनिराळया संदर्भातील असमतोलता व विकासाच्या दृष्टीने असलेला बॅकलॉग दूर होईल. याकरिता जिल्हानिहाय व लोकसंख्येच्या प्रमाणात समान निधीची आवश्यकता आहे.

या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी सचिव आणि पालकमंत्री महोदय अध्यक्ष म्हणून डीपीडीसीमध्ये काम करतील, असे विदित होत आहे. परंतु यामुळे जिल्हा निवड समितीच्या व लघु गटांच्या कामांवर परिणाम होईल. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील डीपीडीसीमध्ये कामांची निवड

होणार असेल तर लघु गटांची आवश्यकता नाही. जिल्हा निवड समितीमध्ये आवश्यकतेप्रमाणे व प्राधान्यक्रमाने कामांची निवड होत होती. त्यानंतर त्याची छाननी लघु गटांमध्ये होत होती. आता जर नवीन शासन निर्णयाप्रमाणे माननीय पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील डीपीडीसीमध्ये कामांची निवड होऊन पुढील आवश्यक प्रक्रिया होत असेल तर मग या लघु गट व जिल्हा निवड समितींची आवश्यकताच नाही.

या संदर्भात सचिव महोदयांच्या साक्षीमध्ये आणि प्रत्यक्ष परिस्थितीमध्ये विसंगती आढळून येत आहे. जिल्हा नियोजन समितीच्या कामांतर्गत माननीय अध्यक्ष म्हणजेच पालकमंत्री महोदयांनी सूचना देणे अभिप्रेत आहे. लघु गट हे जिल्हा नियोजन समितीचे सहाय्यकारी म्हणून काम करीत असतात. या शासन निर्णयामुळे या सहायकारी म्हणून काम करणा-या लघु गटांच्या कामांवर व अधिकारांवर गदा येत आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, डीपीडीसीमध्ये निवड झालेल्या कामांचा सविस्तर आराखडा लघु गटांमध्ये आखण्यात येतो. डीपीसीमध्ये जरी कामांना परवानगी व निधी देण्यात आला तरीही त्या कामाची प्रत्यक्ष कार्यवाही व प्रक्रिया लघु गटांच्या माध्यमातून पूर्ण होत असते.

निधीचा वापर न करणे

परिच्छेद क्रमांक ४.१.९.२ निधीचा वापर न करणे, महालेखापालांच्या आक्षेपासंदर्भात माहिती देतांना विभागांनी तरतूद केलेल्या निधीचा पूर्णपणे वापर या खाली या निधीचा पूर्णपणे वापर झालेला नाही, असा मुद्दा उपस्थित झालेला आहे. सन २००६-२००७ मध्ये या संपूर्ण कामांची टक्केवारी ९९.६५ टक्के इतकी होती. सन २००७-२००८ मध्ये या कामांची टक्केवारी १०० टक्के इतकी होती. शासनाने प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी विधानसभा/ विधानपरिषद सदस्य स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांच्या कामांसाठी रुपये ८० लाखापासून रुपये १ कोटीपर्यंत निधी वाढविला. विधानसभा / विधानपरिषद सदस्य, स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या कामासाठी अर्थसंकल्पिय तरतूद आणि सन २००६-२०११ या कालावधीत त्यावरील खर्च आणि कामांची लक्ष्ये व साध्ये माहितीमध्ये दिलेली आहेत.

शासन निर्देशानुसार जिल्ह्याकरिता वार्षिक तसेच पंचवार्षिक योजना तयार केली जाते. गोंदिया जिल्हयाची सन २००६ ते २०११ या कालावधीकरिता प्रत्येक वर्षांमध्ये जिल्हा वार्षिक योजना तयार करण्यात आली असून त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

ही कामांची टक्केवारी त्या विहित वर्षातच पूर्ण केलेली आहेत की पुढील वर्षांमध्ये पूर्ण करण्यात आलेली आहेत. सन २०११ मध्ये डीपीओ कोण होता? यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, चालू आर्थिक वर्षांची कामे ३० टक्के पूर्ण झालेली आहेत. २०११ मध्ये डीपीओने अद्याप काही कामांची माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, संविधानिक समितीच्या साक्षीकरिता येतांना विभागाने माहिती संकलित करून संपूर्ण तयारीनिशी येणे अपेक्षित आहे. यामध्ये बांधकाम खाते, ल.पा.यांची चूक आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विभागाने या संदर्भातील जास्तीत जास्त माहिती संकलित करून आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदरहू कामे एका वर्षात झालेली नसून काही प्रतिशत कामे एका विहित वर्षात झालेली असून उर्वरित कामे पुढील वर्षांमध्ये टप्प्याटप्प्याने पूर्ण झालेली आहेत.

विहित मुदतीत कामे पूर्ण न झाल्यामुळे त्यांना मुदतवाढ मिळाली नव्हती, हेही खरे आहे. सुरुवातीला त्याच कामांना मंजुरी मिळाली होती. परंतु ठराविक कालावधीनंतर त्या कामांना मुदतवाढ घेणे आवश्यक होते असे मत समितीने व्यक्त केले.

विधानसभा सदस्य आणि विधानपरिषद सदस्य यांच्या निधीच्या नियोजनाबाबतची स्थिती तसेच ३१ मार्च पूर्वी व नंतरच्या कालखंडांमध्ये त्या निधीतून करावयाची कामे का पूर्ण होत नाहीत. याची विचारणा समितीने केली तसेच आमदार निधी खर्च झाला नाही तर तो त्याच्या पुढील किती वर्ष जिवंत राहतो?अशी विचारणा समितीने केली असता वापरण्याची तरतूद आहे यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, आमदार निधी नियमाप्रमाणे त्या वर्षीच खर्च करणे आवश्यक व अपेक्षित आहे. परंतु काही कामे अर्धवट राहिल्यामुळे त्या कामाकरिता असलेला विहित निधी कामांच्या अपूर्णतेमुळे खर्च करता येत नाही. पर्यायाने अपेक्षित निधी विहित वर्षामध्ये खर्च होऊ शकत नाही. सदरहू कामाच्या पूर्णत्वाच्या प्रक्रियेच्या अनुषंगाने तदानुषंगिक निधीला मुदतवाढ दिली जाते. परंतु त्याकरिता परवानगी घेणे आवश्यक असते. अपूर्ण कामांची थक हमी जमा केली तर संबंधित निधीकरिता मुदतवाढ व पुढील वर्षी वापरण्याची परवानगी मिळते. कामांकरिता अपेक्षित असलेला निधी जर दोन वर्षांमध्येही खर्च झाला नाही तर तो पुन्हा खर्च करण्याकरिता अडचणी निर्माण होतात.

विभागांची कामे वेळेवर झाली तर आणि आमदार निधीचा वापर करण्याकरिता स्थानिक कामे लवकर झाली तर आमदार निधीकरिता मुदतवाढ देण्याची गरज भासणार नाही. आमदार निधी खर्च करण्याकरिता मार्गदर्शक सूचना दिल्या गेल्या पाहिजेत. जेणकरून मतदारसंघांमधील कामांमध्ये आणि त्याकरिता खर्च करण्यात येणा-या आमदार निधीच्या विवरणामध्ये सुसत्रतता येणे आवश्यक आहे. काही कामांकरिता स्कोप असतांना देखील आमदार निधीतून पैसा नियमांमुळे खर्च करता येत नाही. त्याकरिताही विचार करणे आवश्यक आहे. काही कामे एकत्रितपणे करावी लागतात, त्यांच्याकरिता लागणारा निधी हा पुढील वर्षीचा आमदार निधी गृहित धरावा लागतो. त्यावेळी मोठया कामांकरिता लागणारा निधी हा दोन वर्षांच्या आमदार निधींमध्ये विभागावा लागतो, त्यावेळी याकरिता खास बाब म्हणून सोयीचे नियम बनविण्यात यावेत.

मतदारसंघांमध्ये आमदार निधी खर्च करण्याकरिता त्या त्या वर्षांच्या कामांवर तो खर्च होत आहे की, नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. यामुळे हा निधी खर्च करण्यामध्ये व वाढीव मर्यादेच्या कामांना त्याची मंजुरी मिळविण्याकरिता विभागाच्या माध्यमातून अडचण येणार नाही.

पुढील वर्षीच्या कार्यकाळात नवीन वर्षातील कामे व त्यांच्या मंजुरीकरिता अडचणी येणार नाहीत. नियोजन विभागाने निधीसंदर्भातील व त्याच्या खर्चाच्या बाबतीतील मार्गदर्शक सूचना व त्यांच्या अंमलबजावणीबाबत वारंवार आमदारांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे.

स्थानिक विकास निधी खर्च झाला पाहिजे. शासनाने ऑनलाईन पद्धतीने कामे करण्यास सुरुवात केलेली आहे. प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर ती ऑर्डर १५ दिवसांनी किंवा १ महिन्यात बांधकाम विभागाकडे जाते. त्यानंतर बांधकाम विभागामार्फत कामाचे टेंडर काढले जाते. यामध्ये ४-५ महिन्यांचा कालावधी जातो. एखादे काम मंजूर झाले आणि त्याची कागदपत्रे मिळाली नाहीत तर न्यायालयीन प्रकरण होऊ शकते. लोकप्रतिनिधीकडून जानेवारी महिन्यात कामे सुचविली जातात. परंतु, तो निधी खर्च होत नाही यासाठी स्थानिक विकास निधी आणि डोंगरी विकास फंडातून कामे करण्यासाठी ऑनलाईन टेंडरची पद्धत बंद करावी. जेणे करून टेंडर प्रक्रिया लवकर पूर्ण होईल.

जेवढे प्राकलन होते तेवढा निधी स्थानिक विकास निधीतून वजा केला जातो. परंतु, काही कामांमध्ये निधीची बचत होते. तो निधी सेव्हिंगमध्ये जमा व्हावयास पाहिजे. परंतु, तसे होत नाही. तो निधी आमदारांना विकास कामांसाठी मिळत नाही. आमदारांना २ कोटी रुपये स्थानिक विकास निधी मिळतो. त्या कामासाठी जेवढा निधी लागतो तेवढा निधी स्थानिक विकास निधीतून वजा केला जातो. प्रशासकीय मान्यता ५ लाख रुपयांची असेल आणि ४.९० लाख रुपये खर्च होणार असतील तर स्थानिक विकास निधीतून ४.९० लाख रुपये वजा होतात आणि १० हजार रुपये जमा राहतात.

स्थानिक विकास निधी किंवा डोंगरी विकास फंडातून जे काम करावयाचे आहे त्याबाबत पत्र दिल्यानंतर ते संबंधित विभागाकडे किती दिवसात गेले पाहिजे, संबंधित विभागाने त्याबाबतचा प्रस्ताव किंवा अंदाजपत्रक किती दिवसात तयार केले पाहिजे आणि त्याला सचिवांकडून किती दिवसात मान्यता मिळाली पाहिजे आणि संबंधित यंत्रणेने ते काम किती दिवसात सुरू करावयास पाहिजे याबाबत कालबद्ध बाऊंड कार्यप्रणाली तयार करण्याचा विभागाचा विचार आहे काय? आणि असल्यास त्याचे स्वरुप कसे असणार आहे? यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, शासनाने सन २००५ मध्ये शासकीय कामकाजातील दिरंगाई संदर्भात कायदा संमत केला आहे. त्यानुसार किती दिवसात प्रकरण निकाली काढले पाहिजे हे त्यामध्ये नमूद केले आहे. स्थानिक विकास निधी व डोंगरी विकास निधीतील कामांबाबतची प्रक्रिया आणखी सुलभ कशी करता येईल या दृष्टीने शासन गाईड लाईन्स तयार करण्याचा विचार करीत आहेत. जेणे करून कामे लवकर होण्यास मदत होईल. याविषयी विहित कालावधीत निर्णय घेण्याबाबत शासन विचार करीत आहे.

एकात्मिक सामाजिक सेवा केंद्र (माहिती व तंत्रज्ञान) उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने गुरुवार, दिनांक १ ऑक्टोबर २०१५ रोजी सामान्य प्रशासन विभागाच्या(माहिती व तंत्रज्ञान) सचिव व प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी **परि.क्र.४.१.१०, एकात्मिक सामाजिक सेवा केंद्रे (माहिती व तंत्रज्ञान विभाग) यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की,** परिच्छेदात जी वस्तुस्थिती नमूद केलेली आहे ती बरोबर आहे. जिल्हा व तालुका पातळीवरील सेतू केंद्रामार्फत लोकोपयोगी सेवा लोकांना देण्याचा धाडसी निर्णय शासनाने सन २००२ मध्ये घेतला होता. जिल्हा व तालुका पातळीवरील सेतू केंद्रामार्फत लोकोपयोगी सेवा लोकांना देण्यात येणार आहेत. त्यासाठी विकेंद्रीत पद्धतीचा वापर करून जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जे सेतू केंद्र आहेत त्यांच्या मार्फत लोकांना जलद गतीने सेवा पुरविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने जुलै, २००८ मध्ये जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी जिल्हा सेतू केंद्रासाठी वितरक निश्चित करण्याकरिता निविदा काढली होती. शासन निर्णयानुसार त्यांनी पहिल्या टप्प्यात सेवा देण्याचा निर्णय होता. परंतु, त्यापैकी त्यांनी ३८ प्रकारच्या सेवांसाठी इलेक्टेटिव्ह लिस्ट टेंडर डाक्युमेंटमध्ये दिले होते. ज्यावेळी लेखापरीक्षण झाले त्यावेळी असे दिसून आले की, ३८ पैकी फक्त ५ ते १० सेवाच ऑनलाईन दिल्या जात आहेत आणि इतर सेवांचा समावेश झालेला नाही. याचे कारण असे होते की, ३८ सेवांमध्ये काही सेवा अशा होत्या की जिल्हाधिकारीस्तरावर डायरेक्ट डिलीव्हर करणे शक्य नव्हते. सद्यःस्थितीची माहिती देताना सचिवांनी पुढे सांगितले की, सन २००८ मध्ये ई-गव्हर्नन्स करण्यात आले. त्यावेळी राज्यस्तरावर आज्ञावली विकसित करण्याचे काम दिलेले आहे. आता १४ सेवा ऑनलाईन पद्धतीने दिल्या जात आहेत. शासनाने राईट टू सर्व्हिस ॲक्ट संमत केलेला आहे. त्यामध्ये २०० पेक्षा जास्त सेवा जाहिर केलेल्या आहेत. सद्यःस्थितीत माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये ४० पेक्षा जास्त ऑनलाईन सेवा शासनाचे संकेतस्थळ "आपले सरकार.कॉम" मार्फत पुरविण्याचा कार्यक्रम सुरू आहे. तसेच,काही लोक तेवढे टेक्नोसॅव्ही नाहीत. त्यांच्याकडे डिजीटल डिव्हाईस नाहीत. त्यामुळे जे सेतू केंद्र आहेत ते देखील सुरू राहणार आहेत. लोक तालुकास्तरावर जाऊन देखील सुविधा घेऊ शकतील. माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये ४० सेवा ऑनलाईन करण्यात येत आहेत. जेवढ्या सेवा जाहिर झालेल्या आहेत तेवढ्या सेवा "आपलेसरकार.कॉम" मार्फत लोकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत. त्यावेळी जी परिस्थिती होती ती परिच्छेदात आलेली आहे. सद्यःस्थितीमध्ये आता त्यात सुधारण झालेली असून यापुढे असा प्रश्न निर्माण होणार नाही याची हमी विभागाकडून देण्यात आली.

सेतू केंद्राच्या माध्यमातून ३८ पैकी १४ सेवा ऑनलाईन पद्धतीने दिल्या जात आहेत. परंतु, लेखी उत्तरात ११ सेवा ऑनलाईन पद्धतीने दिल्या जात असल्याचे नमूद केले आहे. याबाबत सचिवांनी खुलासा केला की, सद्यःस्थितीत १४ सेवा ऑनलाईन पद्धतीने दिल्या जात आहेत. जात प्रमाणपत्रामध्ये ३-४ प्रकारची प्रमाणपत्रे आहेत. त्याचा एकच कॉलम केलेला असल्यामुळे ११ सेवा दिसत आहेत. त्याचे वेगळे वर्गीकरण करावयास पाहिजे होते. त्यावेळी आपल्याकडे विकेंद्रित पद्धतीने ऑफलाईन सॉफ्टवेअर विकसित केले होते. आता ती परिस्थती राहिलेली नाही. आता पूर्ण डॅशबोर्ड उपलब्ध आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात केंद्र निदेशाप्रमाणे २००० चौरस फुट जागा उपलब्ध करून द्यावयास पाहिजे. परंतु, गोंदिया जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात सेतू केंद्रासाठी फक्त ५०० चौरस फुट जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ज्यावेळी महालेखाकारांनी परिच्छेदाद्वारे आक्षेप नमूद केला त्यावेळी गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयात सेतु केंद्राची जागा कमी होती ती दोन महिन्यापूर्वी १२०० चौरस फुट करण्यात आलेली आहे याबाबत स्पष्टीकरण देताना विभागीय प्रतिनिधी, सांगितले की, तालुकास्तरावरील सेतू केंद्राची जागा ५०० ते ६०० स्क्वेअर फूट आहे. परंतु, जिल्हास्तरावर २००० चौरस फुटाऐवजी ५०० चौरस फुट जागा उपलब्ध असल्याचे दिसत आहे. लेखी उत्तरात मुख्यालयाची जागा ५०० चौरस फुट असल्याचे नमूद केलेले आहे. मुख्यालयातील सेतू केंद्राच्या समोरची ५०० स्क्वेअर फुट जागा आणि सेतू केंद्राच्या मागील जागा यामध्ये गृहीत धरली गेली नव्हती. त्यामुळे हा फरक दिसत आहे.मुख्यालयातील सेतू केंद्राची जागा २ हजार स्क्वेअर फुट आहे. तालुकास्तरावरील सेतू केंद्राची जागा ५०० ते ६०० स्क्वेअर फुट आहे आणि जिल्हा सेतू केंद्राची जागा ५०० स्क्वेअर फुट दर्शविण्यात आलेली आहे. जिल्हा सेतू केंद्राची जागा २ हजार स्क्वेअर फुट आहे.

ग्राम विकास व जलसंधारण विभाग :

गोंदिया जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना संगणक पुरविण्यात आले होते. परंतु, ब्रॉडबँड जोडणी उपलब्ध नव्हती. ११८ पैकी ६९ ग्रामपंचायतींमध्ये ब्रॉडबँड सेवा उपलब्ध नसल्यामुळे संगणक तसेच होते. याबाबत दिनांक १० ऑक्टोबर, २०१५ रोजी घेण्यात आलेल्या साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी समितीला माहिती देताना सांगितले की, त्यांनी आदिवासी भागात काम केलेले असल्यामुळे त्यांना गोंदिया जिल्ह्याची परिस्थिती माहीत आहे. काही ठिकाणी ऑप्टीकल फायबर नेटवर्क नसेल किंवा इतर कनेक्टिव्हिटी नसेल तर जी-सॅट उपग्रहाद्वारे देखील इंटरनेट कनेक्टिव्हिटी देता येते. ग्रामविकास विभागाला अधुनिक पद्धतीने तांत्रिक सहाय्य देण्यास शासन तयार आहे.

सन २०१०-२०११ मध्ये २९ ग्रामपंचायतींना संगणक पुरविण्यात आले होते. २९ संगणकांची ब्रॉडबँड जाडणी करण्यात आली परंतु त्याबाबत एस.आय.टी. वेळेत बसविले जाऊ शकले नाहीत. त्याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ग्रामपंचायतींना संगणक पुरविले. परंतु, २९ संगणकांची ब्राँडबँड जोडणी करण्यात आली. परंतु एस.आय.टी. जोडणी उपलब्ध नव्हती. ६९ ग्रामपंचायतींमध्ये ब्रॉडबँड जोडणी नसताना संगणक देण्यात आले. ज्यावेळी ऑडिट झाले त्यावेळी ते संगणक निष्काम होते. ब्रॉडबँड सेवा जोडण्यात आली किंवा कसे याबाबत समितीला माहिती देण्याचे समितीने सूचित केले. तसेच लोक सेतू सुविधा केंद्रात प्रकरण देतात. परंतु, तेथे काही प्रकरणे गहाळ होतात. तेथे साटेलोटे चालते. अधिकाऱ्यांना विचारणा केली तर ते सांगतात की, सेतू सुविधा केंद्राकडे विचारणा करावी. सेतू सुविधा केंद्र शासकीय असले तरी त्यावर नियंत्रण नाही. तेथे प्रकरणे गहाळ होतात. असे प्रकार सेतू सुविधा केंद्रात घडत असतात. ठेकेदार बदलले तरी काम करणारी यंत्रणा तीच असते असे मत समितीने व्यक्त केले असता.

यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, डीआरडीए, गोंदिया या विभागाने संगणक खरेदी केले होते. त्यानंतर यशदा संस्थेने सॅटकॉम मार्फत कर्मचारी व लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण दिलेले आहे. सदर ग्रामपंचायत कार्यालयात लँडलाईन सेवेद्वारे इंटरनेट उपलब्ध करता येऊ शकत नसल्यामुळे त्यांना डोंगल सेवा सन २०१०-११ मध्ये उपलब्ध करून देण्यात आली होती. विभागाने लेखापरीक्षणाच्या वेळी तसे सांगितले होते.

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीला स्थानिक संस्थांचे पदाधिकारी देखील उपस्थित असतात. त्यामुळे सदर बैठकीसाठी उपस्थित असलेल्या पदाधिकारी व अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. यासंबंधी नियोजन विभागाच्या सचिवांनी सांगितले की, डीपीडीसीचे पदाधिकारी, अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे हे शासनाला मान्य आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. प्रशिक्षण देण्याची प्रक्रिया सुरू आहे. आजपर्यंत कोणालाही प्रशिक्षण दिलेले नसून यासंबंधातील प्रशिक्षण देण्यासाठी विभागाने यशदाला नेमलेले आहे. त्याप्रमाणे विभागाने प्रस्ताव पाठवून देण्याची सूचना यशदाला केली आहे. परंतु, त्यांच्याकडून अद्यापपर्यंत प्रस्ताव आलेला नाही. यासंबंधी विभाग यशदाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. डीपीडीसी प्रशिक्षणसंबंधात वेळापत्रक करून सर्वांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

डीपीडीसीच्या बैठकीला जिल्हा परिषदेचे सदस्य उपस्थित असतात. त्यांना विभागाने प्रशिक्षण दिलेले असले तरी जिल्हा परिषद सदस्यांव्यतिरिक्त नगरपालिकांचे सदस्य देखील असतात. त्यांना देखील प्रशिक्षण देणे गरजेचे आहे असे मत समितीने व्यक्त केले.

संनियंत्रण व नियंत्रण या अंतर्गत लेखे सादर करण्यात झालेला विलंब व मुख्यलेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखे यांच्या मान्यतेशिवाय लेखे प्रकाशित करणे यासंदर्भात दिनांक १० ऑक्टोबर २०१५ रोजी झालेल्या साक्षीच्यावेळी समितीने विचारणा केली की? सन २००६ ते २०११ पर्यंत अंतर्गत लेखापरीक्षण करण्यात आलेले नाही. एकाच अधिकाऱ्याकडे दोन कार्यभार का देण्यात आले आहेत? त्या कालावधीत अंतर्गत लेखापरीक्षण केले नाही हे खरे आहे काय? यासंदर्भात ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले की, त्या कालावधीत कॅफोचे पद पाच वर्षे रिक्त होते. त्या कालावधीतील अंतर्गत लेखापरीक्षण त्यावेळी झालेले नसले तरी विभागाने नंतर काळजी घेतली आहे.

वर्ग-२ च्या अधिकाऱ्याकडे अतिरिक्त कार्यभार असताना त्याने जबाबदारीने काम करून घेतले पाहिज होते. पाच वर्षे अंतर्गत लेखापरीक्षण न झाल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान देखील झाले असेल. विभागाने आर्थिक बाबीसंबंधी गंभीर असले पाहिजे. तशी गंभीरता या प्रकरणाबाबत दिसत नाही. नंतरच्या कालखंडामध्ये लेखापरीक्षण झाले आहे काय, त्यामध्ये या पाच वर्षातील कोणती गंभीरता आढळून आलेली आहे? पाच वर्ष

कॅफो नसल्यामुळे ऑडिट करण्यात आलेले नाही. सन २००१ मधील त्रुटींची पूर्तता त्याच वर्षी करणे आवश्यक होते म्हणजे पुढील आर्थिक वर्षामध्ये ती चूक पुन्हा होणार नाही. सलग पाच वर्षे कॅफो न देण्यास कोण जबाबदार आहे? अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, अंतर्गत लेखापरीक्षणात ज्या त्रुटी आढळून आल्या होत्या त्याची पूर्तता करण्यात आली आहे. कॅफो हे पद वित्त विभागाकडून भरण्यात येते. कॅफोचे नेमणूक ग्रामविकास विभाग करीत नाही.

जिल्हा परिषदेला पाच वर्ष कॅफो नसणे हे योग्य नाही. परंतु, ज्या अधिकाऱ्याकडे कार्यभार देण्यात आला होता त्याची देखील अंतर्गत लेखापरीक्षण करून घेण्याची जबाबदारी होती. अंतर्गत लेखापरीक्षण झाले नाही हे बरोबर आहे काय? एखाद्या जिल्हा परिषदेमध्ये कॅफो नसतील तर त्याचा चार्ज त्या जिल्ह्याजवळच्या जिल्हा परिषदेच्या कॅफोकडे दिला जातो. त्याप्रमाणे विभागाने बाजूच्या जिल्हातील कॅफोकडे चार्ज का दिला नाही? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हे बरोबर नाही. साधारणपणे कॅफोनंतर जे कनिष्ठ पद असते त्यांच्याकडे कार्यभार दिला जातो. अंतर्गत लेखापरीक्षण हा विषय दुर्लक्षित झालेला आहे हे मान्य आहे. तथापि, अंतर्गत लेखापरीक्षण हे अतिरिक्त काम आहे. झालेली चूक पुन्हा पुढच्या वर्षी होऊ नये म्हणून अंतर्गत लेखापरीक्षण असते. ही लेखे तपासण्यासाठी केलेली कार्यपद्धती आहे.

अंतर्गत लेखापरीक्षण हे अतिरिक्त काम नसते असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्या काळात गोंदिया जिल्हा परिषदेसाठी पूर्ण वेळ कॅफो नव्हता. नंतर मग पूर्ण वेळ कॅफो देऊन सर्व जिल्ह्यांचे लेखापरीक्षण झालेले आहे.

रोख पुस्तिकेतील शिल्लकींचा बँकेतील शिल्लकींशी मेळ न घालणे यासंदर्भात गोंदिया जिल्हा परिषदेतील पाच पंचायत समितींपैकी तीन पंचायत समित्यांनी ताळमेळाचे काम अद्ययावत केलेले आहे मात्र दोन पंचायत समित्यांनी ताळमेळ अद्ययावत केले नसल्याचे महालेखाकारांच्या अहवालामध्ये आलेले आहे. यासंबंधी विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, ताळमेळाचे पूर्ण काम केलेले आहे.

१०९ लाख रूपये चार ते पाच वर्षे पंचायत समितीस्तरावर पडून होते. हा निधी जिल्हा परिषदस्तरावर वळवता आला असता. पंचायत समितीस्तरावर निधी पडून असल्याची बाब चार वर्षानंतर लक्षात आल्यानंतर तो निधी परत करण्यात आला आहे. सदर निधी हा पंचायत समितीस्तरावर पाच वर्षे पडून होता.

याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंदर्भात तत्कालीन डेप्युटी अकौंटंट व कर्मचारी यांच्यावर कारवाई केलेली आहे.

"व्याजाचा परतावा न करणे" यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विहित केले की, केंद्र पुरस्कृत योजनांकरिता प्राप्त झालला निधी राष्ट्रीयकृत बँकेमध्ये ठेवल्यानंतर त्यावरील मिळणारे व्याज डीआरडीकडे परत करणे आवश्यक होते अशा प्रकारचा आक्षेप काढण्यात आला आहे. सदर निधी हा पंचायत समितीस्तरावर होता. यात कोणत्याही प्रकारची अफरातफर झालेली नाही. यातील व्याजाचा निधी डीआरडीएला मिळाला पाहिजे होता. तो पंचायत समितीला मिळाला आहे.

व्याजाची रक्कम रूपये १ कोटी ९ लाख असून ती कमी नाही. जवळ जवळ ३ ते ४ वर्षे हे अनुदान पंचायत समितीकडे पडून होते. ही रक्कम बँकेत ठेवली असती तर दुप्पट झाली असती. यात शासनाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित केली आहे काय? यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सदर निधी हा पंचायत समितीवर ठेवण्यात आला होता. तो निधी डीआरडीएला व्याजासहित दिलेला आहे. त्यामुळे नुकसान झालेले नाही. पण जे काही झाले ते योग्य नाही.

यात फौजदारी गुन्हा दाखल करण्याकरिता सक्त सूचना देण्यात आलेली आहे असे नमूद केले आहे. त्याप्रमाणे कारवाई झाली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, १ सप्टेंबर, २०१५ पासून विभागाने युद्ध पातळीवर खर्च मेळाचे काम केले आहे. १५ दिवसांपूर्वी विभागाच्या लक्षात आले की, देवरी पंचायत समितीचा रूपये ८३.०० लाखाचा ताळमेळ बसत नाही. या प्रकरणी तपशीलात गेल्यावर असे निदर्शनास आले की, राज्य व केंद्र शासनस्तरावरील निधी हा ३१ मार्च पर्यंत येत असल्यामुळे त्याची नोंद रोख वही (Cash Book) त्यावेळी घेतली होती. परंतु, धनादेश एप्रिल महिन्यामध्ये बँकेत जमा झालेले आहेत.मध्यंतरीच्या काळात रकमेचा ताळमेळ होत नव्हता म्हणून सूचना निर्गमित केल्या आहेत.

फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिल्यानंतर ताळमेळ केला आहे काय? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विभागाला रूपये ८३.०० लाखाचा फरक दिसत होता. त्यामुळे फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, नंतर रकमेचा ताळमेळ लागल्यामुळे फौजदारी गुन्हा दाखल करण्याची वेळ आली नाही.

ताळमेळ बसलेला असल्यामुळे सर्व कागदपत्रे महालेखाकार यांच्याकडून तपासून घ्यावी अशी सूचना समितीने केली व ती विभागीय प्रतिनिधींनीनी मान्य केली.

"गृहनिर्माण" या अंतर्गत इंदिरा आवास योजनेसंदर्भात इंदिरा आवास योजनेमधील महालेखाकारांची आकडेवारी आणि विभागाच्या आकडेवारीमध्ये तफावत आहे. तेव्हा यातील नेमकी वस्तुस्थिती काय ती समितीला सादर करावी. विभागाने प्रत्यक्षात एकूण किती घरकुले बांधली आहेत? अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, महालेखाकारांच्या परिच्छेदामध्ये इंदिरा

आवास योजनेचे प्रत्यक्ष एकूण लक्ष्य १३५१६ असून १३११८ इतके लक्ष्य साध्य केल्याचे नमूद केले आहे. विभागाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार सन २००६-२०११ या कालावधीत इंदिरा आवास योजने अंतर्गत एकूण ८६५१ घरांचे उद्दिष्ट देण्यात आले होते व तेवढे उद्दिष्ट साध्य देखील करण्यात आले आहे. विभागाचा तक्ता आणि महालेखाकारांचा तक्ता यामध्ये तफावत आहे. सन २००६-२००७ ते २०१०-२०११ मधील एकूण ८६५१ घरांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले असून सदर घरकुलांवर रुपये ४० कोटी ४१ लाख इतका निधी खर्च करण्यात आलेला आहे. डीआरडीएने शासनाला सादर केलेल्या मार्च, २०११ च्या प्रगती अहवालामध्ये कळविले होते की, सन २००९-११ या वर्षात ३६२ घरांचे बांधकाम अपूर्ण होते. तथापि, लेखापरीक्षणाच्यावेळी चाचणी तपासणी केलेल्या गटामध्ये १२८९ घरांचे काम पूर्ण व्हावयाचे होते, असे आढळून आले आहे. डीआरडीएने शासनाला चुकीची माहिती दिली, ही बाब अतिशय गंभीर आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सदरील घरे जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत मधील होती. जिल्हा स्तरावरून सदर विषयाची माहिती संकलित करून शासनास कळविण्यात आली होती. त्यावेळी घरे बांधण्याची प्रक्रिया सुरू होती. घरांचे काम अंतिम टप्प्यात आलेले असते व राज्य शासनास त्याकरिता केंद्र शासनाकडून निधी मिळावा या हेतूने सदर माहिती कळविली जाते. सदर माहिती शासनास कळविल्यानंतर त्याच कालावधीमध्ये लेखापरीक्षण झाले व त्यांनी केलेल्या चाचणी तपासणी मध्ये १२८९ घरांचे काम अपूर्ण असल्याचे आढळून आले होते. शासनास कळविण्यात आलेली माहिती चुकीची होती परंतु सदर माहिती कळविताना त्यामागे हेतू चांगला होता. सदर प्रकरणी अवास्तव माहिती कळविलेली आहे. त्यावेळी शासनाला माहिती कळविताना सद्यःस्थितीतील माहिती डीआरडीएने कळवावयास पाहिजे होती.

याप्रकरणी डीआरडीएने शासनास माहिती कळविल्यानंतर जवळपास ७ महिन्यानंतर लेखापरीक्षण करण्यात आले होते. या पुढील काळात शासनास चुकीची माहिती देण्यात आली तर संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी, अशा प्रकारची सूचना विभागाच्या सचिवांनी सर्व कार्यालयास द्यावी असे मत समितीने सूचित केले.

विनामुल्य विद्युत जोडणीचा लाभ न देणे यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी स्पष्टीकरण करताना सांगितले की, राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेंतर्गत ५ वर्षांच्या कालावधीमध्ये १३.३१ कोटी रुपये रक्कम प्राप्त झाली होती व प्रत्यक्ष खर्च ३९.४१ कोटी रुपये झाला होता. सदर प्रकरणी २६.१० कोटी रुपये अतिरिक्त रक्कम खर्च करण्यात आली होती. सदर प्रकरणांच्या स्पष्टीकरणामध्ये विभागाने माहितीमध्ये सांगितले की, आरईसीकडून बीपीएल लाभार्थ्यांसाठी जोडणीचे पार्ट, इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट व इतर काही बाबींसाठी रक्कम प्राप्त झाली होती. सदर योजनेकरिता प्रत्यक्ष खर्च ५ वर्षांमध्ये ३९.४१ कोटी रुपये झालेला आहे. पहिल्या टप्प्यात सदर योजनेकरिता १३.३३ कोटी रुपये प्राप्त झाले होते व एकूण २९.७१ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते.

सदर योजनेसाठी २९.७१ कोटी रुपये निधी मंजूर असल्याने राज्य शासनास त्याकरिता ९.७४ कोटी रुपये निधी द्यावा लागला होता का? सदर योजनेंतर्गत १२७५ लोकांना विद्युत जोडणीचा लाभ देण्यात आला व १२२४१ लाभार्थ्यांकडे विद्युत जोडणी असल्याने त्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आला नाही, यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर योजनेचे काम पूर्ण झालेले असून कोणतेही देयक थकीत नाही. लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला असेल तर दुबार योजनेचा लाभ नियमानुसार देता येत नाही.

आरजीजीव्हीवाय ही योजना इंदिरा गांधी आवास योजनेच्या लाभार्थ्यांसाठी होती काय? सदर योजनेंकरिता इंदिरा गांधी आवास योजनेच्या लाभार्थींना गृहीत धरण्यात आले होते काय? लेखापरीक्षणाच्या वेळी चाचणी तपासणी केली त्यावेळी ६१ ग्रामपंचायतीमध्ये फक्त १८५ लाभार्थ्यांना आरजीजीव्हीवाय योजनेचा लाभ मिळाल्याचे निदर्शनास आले होते. यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर योजना बीपीएल लाभार्थ्यांसाठी होती. राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना ही एपीएल व बीपीएल लाभधारकांसाठी आहे.ज्या लाभार्थ्यांना राज्य सरकारच्या इतर योजनेंतर्गत लाभ मिळाला असेल किंवा त्याच्याकडे वीज जोडणी असेल त्यांना आरजीजीव्हीवाय योजनेंतर्गत दुबार लाभ देता येत नाही.

लेखापरीक्षणाच्या वेळी केलेल्या चाचणी तपासणीमध्ये ३५४ लाभार्थ्यांकडून माहिती संग्रहित केली होती त्यापैकी केवळ १८५ लाभार्थ्यांना लाभ मिळाला होता. सदर लाभार्थी वगळता इतर लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला होता का? मिळाला नसेल तर का मिळाला नाही? गोंदिया जिल्ह्यामध्ये ५५६ ग्रामपंचायती आहेत व त्या सर्व ग्रामपंचायतीपर्यंत लेखापरिक्षक जाऊ शकत नाही. त्यामुळे केवळ ६१ ग्रामपंचायतींची माहिती घेण्यात आली होती व त्याअनुषंगाने लेखाआक्षेप घेण्यात आला आहे असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले. त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सर्व पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

लेखापरीक्षण चाचणी तपासणीमध्ये ३५४ लाभार्थ्यांकडून माहिती संग्रहित केली होती त्यापैकी केवळ १८५ लाभार्थ्यांना लाभ मिळाला होता, उर्वरित लोकांना योजनेचा लाभ देण्यात आला होता का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडील माहितीनुसार जवळपास सर्व पात्र लाभार्थ्यांना योजनेंतर्गत लाभ देण्यात आलेला आहे. लेखापरीक्षण चाचणी तपासणीमध्ये लाभार्थ्यांकडून संग्रहित केलेल्या माहितीमध्ये उर्वरित लाभार्थ्यांकडे वीज कनेक्शन होते किंवा नाही, याबाबतची माहिती आढळून येत नाही.

लेखापरीक्षणाच्या वेळी संपूर्ण जिल्ह्याचे परिक्षण लेखापरिक्षकांनी सर्व्हे केलेला नाही, जर त्यांनी पूर्ण जिल्ह्याचे परिक्षण केले असते तर लाभ न मिळालेल्या लाभार्थींची संख्या वाढू शकली असती. यासंदर्भात विभागाने तपासणी करण्याचे आदेश द्यावेत. लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे की नाही, जर कोणाच्या चुकीमुळे मिळाला नसेल तर त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करण्याचे आदेश देण्यात यावेत. सदर प्रकरणी तपासणी करून

त्याबाबतचा अहवाल १५ दिवसांत समिती सादर करावा याबाबत विभागीय सचिवांनी आश्वासित केले की, सदर प्रकरणी लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे किंवा नाही, याची तपासणी करून शहानिशा करण्यात येईल.

सदर योजनेंतर्गत राज्यातील इतर जिल्ह्यामध्ये भरपूर लोकांना लाभ मिळालेला नाही. कंत्राटदारांना देण्यात येणारा दर कमी असल्याने त्यांना काम परवडत नाही, काही ठिकाणी जमीन कडक असते म्हणून ते काम अर्धवट सोडतात असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर वस्तुस्थिती विभागाने मान्य केली आहे. त्यामुळेच आजीजीव्हीवाय योजनेंतर्गत १० कोटी रुपये जादा खर्च करण्यात आले आहेत.

संवितरण न झालेले धनादेश :

देवरी येथील पंचायत समितीने मार्च व सप्टेंबर, २०१० मध्ये ११४ धनादेश लाभार्थ्यांना वितरित केले नव्हते, असे आढळून आले. तथापि, लेख्यामध्ये संपूर्ण अनुदान खर्च झाल्याचे दाखविण्यात आले होते, याबाबतचा खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर प्रकरणी विभागाच्या कृतीचे समर्थन करणे कठीण आहे. परंतु सदर धनादेश नंतर वाटप करण्यात आले आहेत.

लाभार्थ्यांना द्यावयाचे सप्टेंबर, २०१० मधील धनादेश हे माहे जानेवारी, २०११ पर्यंत दिले नव्हते व धनादेश तयार करून त्याचा खर्च रोखवही मध्ये दाखविण्यात आला होता, सदर बाब बँक खाते व रोखवही तपासल्यानंतर निदर्शनास आली आहे असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले.

माहे नोव्हेंबर पर्यंत लाभार्थ्यांना धनादेश वितरित करावयाचे नव्हते तर ते तयार करण्याचे कारण काय? सदर धनादेश हेतूपुरस्सर थांबविले होते काय? सदर प्रकरणी आर्थिक अनियमितता झालेली आहे, ही बाब स्पष्ट दिसून येते. सदर प्रकरणी शासनाची व लोकांची अशी दुहेरी फसवूणक करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी संबंधितावर कारवाई केली आहे काय? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, खर्चमेळाचे काम करून संबंधितावर कारवाई करण्यात येईल.

सदर प्रकरणी श्री. हाडगे, वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांच्या विभागीय चौकशीमध्ये काय आढळून आले आहे? लेखापरिक्षकांनी, पंचायत समिती देवरी यांनी धनादेश तयार करून वितरण न करता खर्च दाखविल्याची बाब रेकॉर्डवर आणलेली आहे. सदर प्रकरणी विभागीय चौकशीमध्ये कोणत्या बाबी आढळून आल्या आहेत, अनियमिततेस जबाबदार कोण आहे? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, तो कर्मचारी दुसऱ्या कारणास्तव निलंबित झाला आहे. त्याच्यावर बजावण्यात आलेल्या आरोपपत्रामध्ये अन्य आरोपांसोबत धनादेश प्रलंबित ठेवण्याचा आरोपही समाविष्ट करण्यात आला असून त्याबाबतच्या सूचना निर्गमित केल्या आहेत.

सन २०११ मधील या प्रकरणातील बाबीबाबत संबंधितास अद्यापपर्यंत निलंबित केलेले नाही? सकृतदर्शनी अनियमितता केल्याचे लक्षात आल्यानंतरही त्याला इतर कारणांकरिता निलंबित करण्यात आले. त्याच्यावरील दोषारोपपत्रामध्ये आता हा आरोप सामील करण्याबाबत सांगितले गेले. या विलंबाला कोण जबाबदार आहे? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, जिल्हापरिषदेचे लेखा अधिकारी आणि तत्कालीन बीडीओ हेच जबाबदार आहेत. त्यावर समितीने असे निदेश दिले की, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून एक महिन्याच्या आत कारवाई करावी व त्याबाबतची माहिती समितीला कळवावी.

४.९.२ इतर विकास कार्यक्रम व रोजगार निर्मिती :

या संदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, यशदा व एस.एल.एन.ए. यांनी ग्रामपंचायतींचे निवडून आलेले प्रतिनिधी व कार्यालय कर्मचारी यांना उपग्रह प्रशिक्षण देण्यासाठी मेसर्स भारत इलेक्ट्रॉनिक्स, बंगलोर यांच्याशी एस.आय.टी. पुरविणे व बसविणे यासाठी करार केला. मात्र स्थानिक पातळीवर सुविधा उपलब्ध करून न दिल्याने त्या कार्यान्वित झाल्या नाहीत. तसेच, ज्या कालावधीत प्रशिक्षण दिले पाहिजे होते, त्या कालावधीत ते दिले गेले नाही, असा महालेखाकारांचा आक्षेप आहे. या अनुषंगाने असे नमूद केले आहे की, यशदाने भारत इलेक्ट्रॉनिक्स संस्थेबरोबर केलेल्या करारानुसार साहित्य पुरवठा करूनही पंचायत समिती गटाने मार्च, २०११ पर्यंत एस.आय.टी. बसविण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा पुरविल्या नव्हत्या. तसेच, इन्स्टॉलेशनसाठी सुयोग्य परिस्थिती निर्माण करण्यात आली नव्हती. महाराष्ट्रातील काही सेंटर्सवर त्या कालावधीत इन्स्टॉलेशन झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे.नंतरच्या कालावधीत गोंदिया जिल्ह्यातील ९ पैकी ७ एस.आय.टी. कार्यान्वित करण्यात आलेल्या असून या माध्यमातून २३५४ कर्मचारी / लोकप्रतिनिधी यांचे प्रशिक्षण सॅटकॉममार्फत देण्यात आले. उर्वरित २ एस.आय.टी. पंचायत समिती गोरेगाव व तिरोडा यामध्ये भारत इलेक्ट्रॉनिक्स संस्था स्तरावरील उभारणी दोष असून तो दुरुस्त करण्यासाठी बेल बंगलोर संस्थेस पाठपुरावा करण्यात आला. सन २०१४-२०१५ या वर्षांत बी.आर.जी.एफ. जिल्ह्यांतर्गत २५ प्रलंबित एस.आय.टी. पैकी ६ एस.आय.टी. केंद्र बेल बंगलोर संस्थेने पुर्नस्थापित केले आहेत. यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील पंचायत समिती सडक अर्जुनी एस.आय.टी. चा समावेश आहे. उर्वरित प्रलंबित एसआयटी पुर्नस्थापित करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

यासंदर्भात समितीने विचारणा केली की, दोन एस.आय.टी. वर किती खर्च करण्यात आला आहे? उर्वरित प्रलंबित एसआयटी कधीपर्यंत पूर्ण करणार? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सेंटर्सकरिता एकूण ५ कोटी ३९ लाख रुपये इतका खर्च करण्यात आला आहे. याबाबत आम्ही माहिती व तंत्रज्ञान विभागाला विनंती केलेली आहे. यशदामार्फत प्रशिक्षण उपलब्ध करून देणे हा विभागीय कार्यक्रम (Agenda) आहे.

यामध्ये प्रशिक्षणाकरिता इंजिनिअर नेमण्याची गरज होती. आता इंजिनिअर नेमले असून आय.टी. विभागाकडून त्याचे इव्हॅल्युएशनकरून ६ एसआयटीमध्ये प्रशिक्षण सुरू केले आहे. तसेच, वार्षिक देखभाल दुरुस्तीकरिता नेमणूक केली आहे. काही ठिकाणी सेंटर सुरू झाले आहेत, तेथे वार्षिक देखभाल दुरुस्ती करार केली आहे. जेथे सेंटर्स सुरू आहेत तेथे एएमसी करणे आवश्यक आहे नाहीतर वॉरंटी पिरियडनंतर ते बंद पडण्याची शक्यता असल्याने या संदर्भात बेलकडून मार्गदर्शन घेऊन यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

गोंदिया येथील पंचायत समित्यांमध्ये एसआयटी सेंटर्स सुरू करण्याच्या कामासंदर्भात आतापर्यंत यामध्ये खूप कालापव्यय झालेला असल्याने दोन सेंटर्स ३ महिन्यांच्या आत सुरू होतील या दृष्टीने काम करावे असे समितीने सुचिवले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदरहू एस.आय.टी सेंटर नंतर पंचायत समिती, जिल्हापरिषदेची मालमत्ता होणार आहे. कारण शासनाची ही योजना आता बंद झालेली आहे. त्यामुळे सुविधा म्हणून वापरली तर भविष्यात सर्व प्रशिक्षणाकरिता ती वापरता येतील.

प्राथमिक शिक्षण, गोंदिया जिल्ह्याची केंद्रीय लेखापरिक्षा या अंतर्गत महालेखाकारांनी प्राथमिक शिक्षणाबाबत :

या संदर्भात दिनांक १ ऑक्टोबर २०१५ रोजी आयोजित केलेल्या साक्षीच्या वेळी शालेय शिक्षण विभागाच्या विभागीय सचिवांनी माहिती देताना सांगितले की, सन २००६-२०११ या कालावधीत जिल्ह्यातील १०३९३ पात्र विद्यार्थ्यांपैकी ९५४४ विद्यार्थ्यांना रुपये १.२७ कोटीच्या शिष्यवृत्त्या दिल्या गेल्या व अपुऱ्या संख्येने आलेले प्रस्ताव व अपुऱ्या निधीमुळे ८४९ विद्यार्थी या योजनेखालील लाभांपासून वंचित राहिले, या आक्षेपाबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षात रुपये ४२.०० लक्षांची मागणी करण्यात आली होती. परंतु, रुपये ३०.०० लक्ष तरतूद प्राप्त झाली व त्यामुळे ८४९ विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले. मात्र सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षात जादा तरतूद प्राप्त होताच प्रलंबित प्रस्ताव व त्यावर्षी जेवढे प्रस्ताव प्राप्त झाले तेवढे सर्व प्रस्ताव निकाली काढण्यात आले आहेत. त्यामुळे सन २००६-२०११ या कालावधीतील एकही विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिला नाही.

शिष्यवृत्ती विशेषतः वर्गवारीतील मुलांना तरी किमान त्या त्या वर्षीच मिळाली पाहिजे तर तिचा फायदा आहे. ज्या मुलांना अगोदरच्या वर्षी शिष्यवृत्ती मिळाली नव्हती त्यांना जेव्हा शिष्यवृत्ती दिली तेव्हा ती अगोदरच्या वर्षाची दिली की पुढच्या वर्षाची दिली? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मागच्या वर्षाची शिष्यवृत्ती देण्यात आली. याबाबतची माहिती घेऊन अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये या करिता प्रयत्न केले जातील. याबाबतच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करून त्याबाबतचा अहवाल १५ दिवसांत सादर केला जाईल. सदरहू योजना अस्वच्छ काम करणाऱ्यांसाठी मग ते मागासवर्गीय असो की सर्वसाधारण संवर्गातील असो सर्वांकरिता लागू होती.

अस्वच्छ काम करणाऱ्यांमध्ये जास्तीत जास्त लोक मेहतर समाजाचेच असतात. त्यांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. अनेकदा लोक लोकप्रतिनिधींकडे तक्रारी घेऊन येतात की, ते लोक ही कामे करीत असतानाही, त्यांना त्याबाबतचे प्रमाणपत्र मिळत नाही. यासंदर्भात अस्वच्छ कामगारांची व्याख्या काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, परंपरेने काम करणारे सफाईगार, कातडी सोलणे तसेच नवीन निकषानुसार कचरा वेचणे वगैरे कामे करणाऱ्या पालकांच्या मुलांकरिता शिष्यवृत्ती दिली जाते. या निकषामध्ये बसणाऱ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देणे आवश्यक आहे.

कातडी सोलणे वगैरे कामे आता केली जात नाहीत. मात्र तसे काम आजही सुरू असल्यास अशा किती प्रकरणे आढळली याबाबतची माहिती घेऊन ती उपलब्ध करून दिली जाईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अस्वच्छ कामगारांबाबतचे निकष जुने आहेत. आता कातडी सोलणे वगैरे अशी कामे कोणीही करीत नाही, त्यामुळे अस्वच्छ कामगारांच्या व्याख्येत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे असे मत समितीने व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०१०-२०११ मध्ये शासनाकडून कमी निधी प्राप्त झाल्यामुळे ७३२३ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली गेली नाही, तरतूद कमी पडलेली आहे. कमी निधींची मागणी केली तर, कमीच निधी मिळणार ना, मग कमी मागणी करण्याकरिता कोण जबाबदार आहे? यांसदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेंतर्गत तरतूदीची मागणी करताना मागील वर्षी साध्य झालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येवर ५ ते १० टक्के वाढ दर्शवून पुढील वर्षाचे उद्दिष्ट ठरवून संभाव्य तरतूदीची मागणी केली जाते. सन २०१०-२०११ मध्ये सदर योजनेवर आठमाही सुधारित अंदाजपत्रकामध्ये रुपये १४५ लक्ष तरतूदीची मागणी करण्यात आली होती. परंतु, त्या वर्षात शासनाकडून रुपये ६८ लक्ष तरतूद प्राप्त झाली. प्राप्त तरतूदीच्या अनुषंगाने ७३२३ मुलींना सदर शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला असून उर्वरित प्रलंबित देयके सन २०११-२०१२ व काही देयके सन २०१२-२०३ मध्ये प्राप्त तरतूदी मधून निकाली काढण्यात आलेली आहेत. त्यामुळे सन २००६-२०११ या कालावधीतील एकही विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिला नाही.

शिष्यवृत्ती दिली असली तरी शिष्यवृत्ती देण्यामध्ये विलंब झालेला आहे असे वाटत नाही का, तसेच ज्या १९३ विद्यार्थीनींचे प्रस्ताव प्राप्त झाले नव्हते, त्यांचा विचार केला का? अशी विचारणा केली असता यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००९-२०१० मध्ये प्रलंबित प्रस्ताव प्राप्त करून विद्यार्थीनींना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला.

त्यावर समितीने सूचित केले की, ज्या १९३ विद्यार्थीनींचे प्रस्ताव प्राप्त झाले नव्हते, त्यांचे प्रस्ताव प्राप्त करून त्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली होती की नाही याबाबतची विस्तृत माहिती समितीला द्यावी.

(माहिती अप्राप्त आहे.)

ई-शिष्यवृत्ती योजना :

ई-शिष्यवृत्ती योजनेच्या संदर्भात माहिती देताना शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी सांगितले की, खुलासा केला की, ई-शिष्यवृत्ती नावाची कोणतीही योजना नाही. शिष्यवृत्ती योजना वेगवेगळ्या आहेत. आता सर्व इलेक्ट्रानिक पद्धतीने कार्यवाही होत असल्यामुळे त्याला ई-शिष्यवृत्ती म्हटलेले आहे. ते फक्त शीर्षक ठेवण्यात आलेले आहे. यामध्ये दुसरे असे विशेष काहीही नाही.

सन २०१०-२०११ मध्ये ७६६२ विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहण्याची कारणे विषद करताना सचिवांनी माहिती दिली की, जिल्ह्यातील २७२ महाविद्यालयातील ४९,९५८ पात्र विद्यार्थ्यांपैकी ४६,४०२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी ४२,२९६ विद्यार्थ्यांना त्यांच्या बँक खात्याद्वारे शिष्यवृत्ती मिळाली आहे. उर्वरित ७६६२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालेली नव्हती. ४१०६ विद्यार्थ्यांच्या बाबतीत संबंधित महाविद्यालयांनी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांना चुकीचे बँक खाते क्रमांक कळविल्यामुळे त्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अदा करता आलेली नाही. ७६६२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी संबंधित संस्थांना व विद्यार्थ्यांना वेळोवेळी बँक खाते नॅशनल बँकेत उघडण्यासाठी व संस्थेची परीपूर्ण कागदपत्रे जमा करावीत यासाठी दिनांक २२/०४/२०१०, दिनांक २८/१२/२०१० व दिनांक १९/०३/२०११ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आली आहेत. त्यानंतर १५ जुलै २०११ रोजी पत्र पाठवून सर्व प्राचार्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरी देखील उपरोक्त विद्यार्थ्यांची कोणतीही माहिती कार्यालयास मिळालेली नाही. संबंधित महाविद्यालयांकडून माहिती मिळाली नसल्यामुळे शिष्यवृत्ती अदा करता आलेली नाही.

या योजनेची माहिती सर्व विद्यार्थ्यांना मिळावी यासाठी शालेय शिक्षण विभागातील समाज कल्याण अधिकारी यांनी केलेल्या प्रचार व प्रसार याबाबत विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, शिष्यवृत्ती योजनेची माहिती देण्यासाठी गट शिक्षणाधिकारी यांच्या स्तरावर बैठका घेण्यात आल्या, त्याचप्रमाणे मुख्याध्यापकांच्या बैठका घेण्यात येऊन त्यांना माहिती देण्यात आलेली आहे. व्हीजेएनटी व एसबीसी व इतर मुलांचे प्रस्ताव भरून घेण्यात येत आहेत. संबंधित जिल्ह्यातील मुख्याध्यापकांच्या बैठका घेण्यात आलेल्या आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना या योजनांची माहिती द्यावयाची आहे.

मुख्याध्यापक विद्यार्थ्यांना माहिती देतात. परंतु शासनाच्या वतीने प्रसार व प्रचार करण्यासाठी काय करण्यात येते. अनेक विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी वेळेत अर्ज करीत नाहीत. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या यंत्रणाबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या शिष्यवृत्ती योजनेची माहिती सर्वांना व्हावी यासाठी राज्य परिवहन मंडळाच्या बसवर जाहिरात करण्यात येते. रेडीओमार्फत या योजनेची माहिती देण्यात येते. दूरदर्शन संचामार्फत तळटीप दाखविण्यात येते. अनेक वेळा निवेदकांमार्फत या योजनेची माहिती सांगितली जाते. यामध्ये मुख्याध्यापकांचा मुख्य सहभाग असतो. आता ऑनलाईन प्रक्रिया झाल्यामुळे यातील बऱ्याच अडचणी कमी झालेल्या आहेत.

मध्यान्ह भोजन योजना याबाबत महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपाबाबत प्राथमिक शिक्षण अंतर्गत माहिती देताना शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी सांगितले की, सन २००६-२०११ या कालावधीमध्ये ६-१४ या वयोगटातील विद्यार्थ्यांच्या नोंदणीची संख्या घटत चालली आहे. याबाबत विभागाच्या वतीने माहिती पुस्तिकेमध्ये एक माहितीवजा तक्ता दिलेला आहे. खाजगी शाळा, अनुदानित शाळा, विनाअनुदानित शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या पटसंख्येमध्ये कशा प्रकारे घट होत चालली आहे, त्याची सविस्तर आकडेवारी त्यामध्ये दिलेली आहे. राज्यात शिक्षण संस्थांची संख्या वाढत असतांना त्यामध्ये शिकणाऱ्या ६-१४ या वयोगटातील बालकांची संख्या मात्र घटत आहे, ही चिंतेची बाब आहे.

यापूर्वी या विषयावर मुंबई शहरापुरती चर्चा केली होती. परंतु संपूर्ण महाराष्ट्रात देखील शासकीय व खाजगी शाळांमधील पट पडताळणी कमी होत चालली आहे. सन २०१० पर्यंतची परिस्थिती दिलेली आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता सन २०१५ पर्यंतची माहिती देताना सचिवांनी सांगितले की, शाळांच्या संख्येमध्ये सन २०१५ मध्ये केवळ ५८ ने वाढ झालेली आहे. १५६० हून १६१८ एवढी शाळांची संख्या वाढलेली आहे. पट नोंदणी १,९४,००० हून १,७४,००० एवढी कमी झालेली आहे. शाळांच्या स्थितीच्या एकूण आढाव्याने असे दर्शविले की शाळांची संख्या १५६० पर्यंत वाढली होती. जरी शासकीय, जिल्हापरिषद, नगरपरिषद व सहाय्यित शाळांची संख्या मामुली म्हणजे २२.१६ टक्के वाढली होती. तरी या शाळांमधील लक्ष्य असलेल्या ६-१४ वयोगटातील बालकांची संख्या १,८९,६२३ पासून १,७४,८१८ पर्यंत इतकी कमी झाली. खाजगी शाळा ९५ ते १३८ इतक्या वाढल्या. खाजगी शाळांमधील नाव नोंदणींची संख्या १३,१२७ पासून १९,८७० पर्यंत म्हणजे ५१ टक्क्यांनी वाढलेली आहे.

एका बाजूला शाळांची संख्या वाढत आहे, दुसऱ्या बाजूला त्यामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होत चालली आहे, ही बाब चिंतनीय आहे. याचा अर्थ असा की, राज्यातील शाळांमध्ये देण्यात येणाऱ्या शिक्षणाचा दर्जा खालावत चालला आहे. शाळांमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांची मुले देखील खाजगी शाळांमध्ये शिकण्याकरिता जातात, यावरून संबंधित शाळांमध्ये कोणत्या दर्जाचे शिक्षण मिळत असेल, याचा अंदाज येतो.

पालकांचा कल हा पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये शिकविण्याचा आहे. इंग्रजी माध्यमाच्या बहुतांशी शाळा या खाजगी विनाअनुदानित आहेत. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व खाजगी अनुदानित शाळांमधील पटनोंदणीत घट झाली आहे.

जन्मदरामध्ये घट झाल्याने नावनोंदणीत घट झालेली आहे, असे जर विभागाचे स्पष्टीकरण असेल तर ते अयोग्य आहे. घटत्या जन्मदराचा आणि घटत्या नावनोंदणीचा काहीही संबंध नाही असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी विदित केले की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी शिक्षणाच्या दर्जाकरिता एक कार्यक्रम आखला होता. त्यानुसार असर नावाच्या एका संस्थेने राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या दर्जाचा अभ्यास केला होता. या संस्थेने असा निष्कर्ष काढला की, खरोखर या पंधरा वर्षांच्या कालावधीत शिक्षण संस्थांमध्ये दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा दर्जा खालावलेला आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, आपले राज्य देशामध्ये शिक्षण क्षेत्रामध्ये पहिल्या तीन क्रमांकामध्येच राहिले पाहिजे. त्याकरिता राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने निरनिराळया योजना आखून व नियोजन करून त्यावर अंमलबजावणी व काम सुरू केलेले आहे.

राज्यामध्ये काही जिल्ह्यांमध्ये शासकीय व अनुदानित शाळांमधील पटनोंदणी प्रशंसनीय आढळून आलेली आहे.

याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सातारा जिल्ह्यांमध्ये कुंठे तालुक्यामधील एका शाळेमध्ये शंभर टक्के उपस्थिती दाखविण्यात आलेली आहे. वाई व मिरज तालुक्यामध्ये देखील अशा प्रकारची प्रशंसनीय उपस्थिती असलेल्या शाळा आहेत. चंद्रपूर आणि नाशिक जिल्ह्यांतील काही शाळांमध्येही चांगली उपस्थिती असल्याचे दिसून आलेले आहे. निफाड तालुक्यामध्येही काही शाळांमध्ये पटनोंदणीची परिस्थिती समाधानकारक आहे. विभागाने या सर्व शाळांच्या पटनोंदणी पद्धती व तेथील शिक्षण देण्याच्या पद्धतीचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे. विभागाने या कामांकरिता कामाने प्ररित असलेल्या अधिका-यांना पाठवून संबंधित शाळांमधील परिस्थितीचा व सर्व पद्धतींचा आढावा घेण्यास सांगितला होता.

राज्यातील ज्या तालुक्यांमधील शाळांचा उल्लेख केला त्यांची ही प्रशंसनीय परिस्थिती नैसर्गिकरित्या झालेली आहे की, त्याकरिता शासनाच्या विभागाने काही प्रयत्न केलेले आहेत का? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, आपले राज्य देशामध्ये शिक्षणक्षेत्रामध्ये पहिल्या तीन क्रमांकामध्येच राहिले पाहिजे. त्याकरिता राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने निरनिराळया योजना आखून व नियोजन करून त्यावर अंमलबजावणी व काम सुरू केलेले आहे. सदरील शाळांमध्ये शासनाच्या योजनांच्या काटेकोर अंमलबजावणीमुळे व नियोजनामुळे पटनोंदणीची चांगली परिस्थिती निर्माण झालेली आहे. ही परिस्थिती नैसर्गिक नसून तेथील शिक्षकांकडून निर्माण झालेली मानवनिर्मित परिस्थिती आहे.

विभागाने माहिती पुस्तिकेमध्ये घटत्या जन्मदराचा संबंध घटत्या पटनोंदणीशी जोडलेला आहे. देशामध्ये व राज्यामध्ये जिल्हानिहाय किती जन्मदर घटलेला आहे, याचीही माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने सूचित केले.

पुणे जिल्हयातील काही शाळांमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी माध्यमातून मराठी माध्यमात प्रवेश घेतलेला आहे, त्यांना मराठी माध्यमात देखील सेमी इंग्रजी या तत्वावर शिकविण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सेमी इंग्रजी म्हणजे गणित व विज्ञान हे विषय इंग्रजी माध्यमातून शिकविले जातात. असे विभागीय सचिवांनी विदित केले असता.

राज्यातील शिक्षणाच्या दर्जाबाबत शिक्षण विभागाने जो आढावा घेतलला आहे, त्यानुसार शिक्षणाच्या दर्जामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे, याकरिता योग्य ते नियोजन करून त्यावर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. राज्यातील शासकीय, जि.प.,नगरपरिषद, सहाय्यित शाळांमध्ये देण्यात येणाऱ्या शिक्षणांच्या दर्जामध्ये चांगल्या दर्जाचे शिक्षण दिले गेले पाहिजे. राज्यातील काही मोजक्या शासकीय शाळांमध्ये चांगल्या दर्जाचे शिक्षण दिले जाते, हे योग्य नाही असे मत समितीने व्यक्त केले.

सातारा जिल्ह्यातील शाळेमधील पटनोंदणी शंभर टक्के असल्याची कारणे शोधली का? शिक्षक गावात शाळेच्या ठिकाणी राहतात की बाहेरून येतात, त्यांची मुले ते नोकरीस असलेल्या शाळेत शिकतात का? २ बिटमधील शाळांची गुणवत्ता वाढली याची कारणे काय आहेत? शिक्षक शाळेच्या ठिकाणी राहतात का? ग्रामशिक्षण, शालेय शिक्षण समिती यांचा त्यामध्ये सहभाग असतो का? याबाबत विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, गुणवत्ता वाढीच्या कारणांमध्ये शिक्षक मुख्यालयी राहणे किंवा न राहणे याचा काहीही फरक पडत नाही किंवा शिक्षकाची स्वतःची मुले तो शिकवित असलेल्या शाळेत शिक्षण घेतात किंवा नाही याचाही काही फरक पडत नाही. शिक्षक शाळेत शिकवितात का, कोणत्या पद्धतीने शिकवितात, मुलांना प्रोत्साहित करतात का, बालमानस शास्त्राचा वापर करतात का, काही चांगल्या पद्धतींचा वापर करतात का यावर मुलांची गुणवत्ता अवलंबून असते. शिक्षकांना या गोष्टी जमल्या त्या शाळेतील मुले १०० टक्के सखोल गुणवत्तापूर्ण असलेली दिसतात. दोन्ही तालुके तसेच मिरजमध्ये हे घडू लागले आहे. चंद्रपूर, निफाड येथे घडण्यास सुरूवात झाली आहे. शिक्षकांची मुले त्यांच्या शाळेत शिकणे किंवा न शिकणे याने फरक पडत नाही लोकांचे मत आहे की, शिक्षक ज्या शाळांत शिकवितात, त्याच शाळांत शिक्षकांची मुले शिकली तर शाळांतील इतर मुलांचा दर्जा वाढेल. मात्र असे नसेल तर तेथील विद्यार्थी काय शिकणार? ग्रामीण भागातील शिक्षकांची मुले २० कि.मी. अंतरावर शिकण्यास जात असतील तर हे शिक्षक त्यांच्या मुलांना काय शिकविणार अशी तेथील लोकांची मानसिकता झाली आहे. सांगली, सातारा येथील शाळा नीट आहेत. सर्वसाधारणपणे जिल्ह्यातील प्रगत असलेल्या शाळांची परिस्थिती सांगितली. शिक्षकांनी त्यासाठी प्रयत्न केले असतील. परंतु जिल्हापरिषदेमार्फत सर्व शिक्षा अभियानांतर्गत चांगल्या सुविधा, बाबी दिल्या जातात, त्यामध्ये खूप कमतरता आहे. जिल्ह्यामध्ये शिक्षकांची संख्या कमी आहे.

जिल्ह्याच्या ठिकाणी रस्त्याला लागून असलेल्या शाळांमध्ये शिक्षक जातात. मात्र दुर्गम, आदिवासी भागात जात नाहीत. दुर्गम, आदिवासी भागात जाणाऱ्या शिक्षकांची संख्या कमी असते. मुळात शिक्षकांची संख्याच कमी आहे. शाळेच्या इमारती चांगल्या नाहीत, शिक्षण देण्यासाठी त्या योग्य नाहीत. ग्रामीण भागातील पालक अशिक्षित असल्यामुळे ते त्यांच्या मुलांकडे लक्ष देत नाहीत किंवा देऊ शकत नाहीत, ते अशिक्षित, आर्थिकदृष्ट्या दुर्बल असतात, त्यामुळे त्यांच्या मुलांना खाजगी शाळेत पाठवू शकत नाहीत. सुशिक्षित, आर्थिकदृष्ट्या सबल असणारे पालक त्यांच्या मुलांना खाजगी शाळेत पाठवितात. खाजगी शाळांचे संचालक, शिक्षक मुलांना आपल्या शाळेत खेचून आणतात. २ कि.मी.च्या बाहेर मुलांना जावे लागू नये अशी सर्व शाळांनी सोय केली आहे. २-३ कि.मी.हून शाळेत जाण्यापेक्षा खाजगी शाळेची गाडी मुलांना आणण्यासाठी येते, वाड्यावस्त्यांत, दुर्गम भागात जाते, मुलांना घेऊन येते आणि पुन्हा सोडून जाते. दुर्बल कुटुंबातील मुलांचे पालक अशिक्षित असतात, त्यांच्या पाल्यांची प्रगती काय आहे याची जाणीव त्यांना करून ? देण्यात येत नाही. शिक्षक त्यांच्याबरोबर सुसंवाद करीत नाहीत. शिक्षकांचीच इच्छा राहत नाही की, जाऊन पालकांना त्याच्या पाल्याची गुणवत्ता सांगावी. ३ महिने मुलांना शालेय पोषण आहार मिळत नाही. कुपोषित मुलांना सकस आहार मिळाला नाही असे जिल्ह्याच्या ठिकाणी पहायला मिळाले आहे. महाराष्ट्रात एका जिल्ह्यात तेथे वर्षभरात शालेय पोषण आहाराचा तांदूळ गेला नाही. शिक्षणाचा दर्जा घसरण्यामध्ये शिक्षकांची संख्या कमी असणे हे मुख्य कारण आहे. सर्व शिक्षा अभियानामध्ये सोयीसुविधांचे समन्यायी वाटप, नियोजन झाले नाही, याचा परिणाम दुर्गम ठिकाणच्या शैक्षणिक दर्जावर आणि शाळांतील विद्यार्थी, शिक्षकांवर झाला आहे. दुर्गम भागात नको असलेल्या शिक्षकांना पाठविले जाते. शिक्षक चांगल्या दर्जाचे असल्यामुळे, ते तेथे प्रामाणिकपणे काम करीत असल्यामुळे उदाहरणे दिलेल्या सातारा व मिरज येथील शाळांतील शैक्षणिक दर्जा सुधारला दुर्गम असलेल्या शाळांत तसा समतोल राखण्यासाठी विभागाकडून काय प्रयत्न केले जातात? यासंदर्भात विभागीय सचिवांनी विदित केले की, सन २०१० ला शिक्षणाचा हक्क कायदा करण्यात आला. पहिली ते पाचवी इयत्तेच्या मुलांना १ कि.मी.पेक्षा अधिक चालावे लागू नये असे ठरविण्यात आले. केळकर समितीच्या अनुषंगाने चर्चा सुरू झाली, तेव्हा असा विचार येऊ लागला की, मुलांना जास्त चालावे लागू नये. मोठ्या शाळा चालविल्या जातात, तेथे चांगले शिक्षण दिले जाते, इमारत दिली जाते, साहित्य दिले जाते, विषयांनुरूप शिक्षक दिले जातात. आता त्यावर चर्चा सुरू झाली आहे. डोंगराळ, दुर्गम भागासाठी अशी सुरूवात करण्यासाठी पाहिले जात आहे, हा विचार पुढे येऊ लागला आहे. लहान शाळांमध्ये कॉम्पिट करणे चांगली गोष्टी आहे.

सदर बाब शैक्षणिक दर्जा खालाविणे आणि मुले शाळेत न जाणे यांसंबंधी आहे. विभागाने याचा सखोल अभ्यास करण्यासाठी काही तरी व्यवस्था केली पाहिजे किंवा अशा सूचना दिल्या पाहिजेत. शिक्षकांना शिक्षणापेक्षा शिक्षणेतर अधिक काम दिले जाते. त्यामुळे आपण त्याची माहिती घेणे गरजेचे आहे. आता जिल्हा परिषद शाळांमध्ये त्याग भावनेने काम करणारी माणसे राहिलेली नाहीत. वेतनवाढ मिळते का, थकबाकी किती राहिली आहे, ती कधी मिळणार आहे यावरच शिक्षक जास्त लक्ष देतात. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मुलांना प्रवेश घेण्याचा कल वाढू लागला आहे आणि हे निर्विवाद आहे. शासनाला ही बाब मान्य करावी लागेल. जिल्हा परिषद शाळेत सेमी इंग्रजी माध्यमातून शिक्षण सुरू करणार का? विनाअनुदान तत्वावरील खाजगी शाळांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढू लागले आहे, ते त्यामध्ये इन्व्हेस्टमेंट, इन्फ्रास्ट्रक्चर करतात. मुलांचे त्या शाळांत जाण्याचे प्रमाण वाढत आहे. परिणामी शासनाच्या शाळेतील मुलांची संख्या कमी होत आहे. शासनाची शाळा व इंग्रजी माध्यमाची खाजगी शाळा यांचा पीपीपी अशा पद्धतीचा कार्यक्रम करणार का? आपण पीपीपी असे प्रयोगात्मक करून पहावे. एखादा जिल्हा निवडून पीपीपी बेसवर विनाअनुदानित सेमी इंग्रजी माध्यमातील शाळा व आपली शाळा असे प्रयोगात्मक करावे. गरीब, गरजू, दीन, दलित, अशिक्षित, वंचित, पीडित, आदिवासी विद्यार्थी त्यामध्ये समाविष्ट होतील अशा काही गाईडलाईन्स किंवा नियमावली करून पीपीपी मॉडेलवर शाळा करण्याचा काही विचार करणार आहात का? आपण हे आपल्या समाजासाठी करणार आहोत. आपण हे आज स्वीकरले नाही तरी आपल्याला १०-१५ वर्षांनी स्वीकारावे लागणारच आहे.

आपण विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेता, मात्र शिक्षकांचे काय? शिक्षकांचे अपग्रेडेशन आहे की नाही, आपल्याला हे विचारायला नको का? आपण शिक्षकांची सुद्धा वार्षिक, द्विवार्षिक परीक्षा सुरू करावी. शिक्षकांना योग्यप्रकारे शिकविणे जमले पाहिजे. शिक्षक चांगल्या ठिकाणी बदली व्हावी म्हणून बदलीसाठीचे पत्र घेण्यासाठी येतात. सरकारी नोकरीत लागल्यावर शिक्षकांना कोणत्याही ठिकाणच्या शाळेत शिक्षक म्हणून जावे लागते.

शासनाच्या शिक्षकांना सातारा, वाई अशा ठिकाणी जमते तर इतर ठिकाणी न जमण्याचे काहीच कारण नाही. या संदर्भात कालबद्ध कार्यक्रम आखून काही प्रयत्न करणार का? हे रोल मॉडेलवर बंधनकारक करावे. विभागीय संचालक असतील. प्रत्येक विभागातील किमान १०-२० शाळा गुणवत्तापूर्ण झाल्या पाहिजेत. शिक्षकांना मतदानाचे, जनगणनेचे काम दिले जाते त्या संदर्भात शासन निर्णय घेईलच. शिक्षकांनी प्रामाणिकपणे शिक्षणाचे काम करणे गरजेचे आहे.

शाळा पीपीपी तत्वावर प्रयोगात्मक पद्धतीने चालवावी. रयत शिक्षण संस्थेचे शिक्षक डिव्होशनली काम करतात. रयत शिक्षण संस्थेत शिक्षकांना पाठवावे. रयत शिक्षण संस्थेच्या शिक्षकांना आपल्या शिक्षकांना ८ दिवसांचे प्रशिक्षण देण्यासाठी आणावे. मग शासनाच्या शाळांतील पटसंख्या किती वाढली त्याची तपासणी करावी. तसेच इतर शिक्षण संस्थांद्वारा वारंवार प्रशिक्षण सुरू करावे, किमान १ दिवसाचे प्रशिक्षण द्यावे. शासनाने हे ठरवून केले तर हा प्रयोग यशस्वी होईल. असे शासन करणार का? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, शासन हेच करीत आहे. रयत शिक्षण संस्थेच्या सोबत विभागाच्या ३-४ बैठका झाल्या आहेत. सॅक म्हणजे स्टेट ॲसेसमेंट ॲण्ड ॲक्रिडिशन कौन्सिल नावाचा कक्ष करीत असून शिक्षकांचे अपग्रेडेशन करण्याबाबत सांगितले आहे. एका व्यक्तीवर लक्ष केंद्रीत करण्यापेक्षा संस्थेवर लक्ष केंद्रीत करून काम करणे

जास्त चांगले असते. त्यामुळे शाळांचेही ग्रेडेशन करणार आहे. त्या संदर्भात कायदाही करावयाचा आहे आणि त्याची तयारीही सुरू आहे. रयत शिक्षण संस्था चांगल्या गुणवत्तेच्या ६५० शाळा चालवू शकते. त्यामुळे शिक्षकांना त्यांच्याकडून प्रशिक्षण देण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. विभागाने २८ फेब्रुवारीला एक परिपत्रक काढले आहे की, प्रत्येक जिल्ह्याने २०० शाळा गुणवत्तापूर्ण कराव्यात. तत्संबंधी संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालामध्ये नोंद घेतली जाणार आहे.

यावर समितीने सूचविले की, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती यांच्या बाबतीतही असे करावे.

शिक्षकांची मुले त्यांच्याच शाळेत शिकत नसली तरी काहीही फरक पडत नाही. जिल्हापरिषद, महानगरपालिका, नगरपालिका यांच्या शाळा दुर्बल, अशिक्षित लोकांच्या मुलांसाठी आहेत, मग तेथे शासनाचा पगार घेणाऱ्या अधिकाऱ्यांची, वरिष्ठ अधिकाऱ्यांची मुले जात नाही. तोपर्यंत त्या शाळा सुधारू शकत नाहीत. शिक्षण विभागातर्फे शासनाच्या नोकरदारांना आवाहन करण्यात यावे की, शासनाच्या शाळेत मुलांचा प्रवेश करावा यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, शासनाच्या शाळांची गुणवत्ता सुधारल्यानंतर विभागाकडून या संदर्भात आवाहन करण्यात येईल.

यावर समितीने विचारणा केली की, म्हणजे आता शासनाच्या शाळांची गुणवत्ता नाही.

शासनाने योजना तयार केली आणि त्या योजनेचा हेतू मुलांची गुणवत्ता सुधारणे हा आहे. शासन सर्व शाळा सुरू करू शकत नाही म्हणून शासनाने खाजगी संस्थांना शाळा सुरू करण्याची परवानगी दिली. शासनाने सर्व शाळा सुरू केल्या असत्या तर खाजगी संस्थांना शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिली नसती. शासन हे करू शकत नाही म्हणून परवानगी दिली आहे. गडचिरोली जिल्हा हा दुर्गम जिल्हा आहे. आपण त्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा दर्जा, त्या संदर्भातील प्रमाण वाढविण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात येत आहेत? विभागाकडून आवश्यक ते प्रयत्न करण्यात येत आहेत का? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, विविध शाळांना लक्ष्यांक दिले आहेत. तसेच आयुक्तांना देखील लक्ष्यांक दिले आहे. आयुक्त, शिक्षण पुणे येथे याची नोंद असते. त्यांना अशा सूचना दिल्या आहेत की, तुम्ही राज्यात विशेषतः शैक्षणिकदृष्ट्या मागे असलेले ५ जिल्हे घ्यावेत आणि त्यातील मागे असलेल्या ४० शाळा गुणवत्तापूर्ण कराव्यात. गडचिरोली जिल्ह्यात भामरागड तालुका, नंदुरबार जिल्ह्यात धडगाव तालुका, नांदेड जिल्ह्यात हदगाव तालुका, हिंगोली जिल्ह्यात शेनगाव तालुका, परभणी जिल्ह्यात मानवत तालुका हे शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले तालुके आहेत.

गडचिरोली हा जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो, सदर जिल्ह्याची गुणवत्ता वाढविण्याच्यासंदर्भात कोणते प्रयत्न केले आहेत किंवा करण्यात येत आहेत? राज्यातील आदिवासी भागातील शाळा अपग्रेड करणे आवश्यक असल्याने याकरिता शासन स्तरावर कोणती योजना कार्यरत आहे? मागील ६७ वर्षाच्या कालखंडामध्ये शासनाने केवळ योजनाच तयार केल्या आहेत. या योजनांची अंमलबजावणी केव्हा केली जाणार आहे? खाजगी संस्थांच्या मॅनेजमेंट कडून शिकण्यासारखे आहे, आश्चर्य वाटले तसेच वाईटही वाटले. सरकारी अधिकारी सक्षम असताना देखील खाजगी संस्थांच्या मॅनेजमेंटकडून शिकण्यासारखे काय आहे?

ही सर्व व्यवस्था सुधारली नाही तर उच्च न्यायालयाने असा आदेश दिला होता की, सर्व पुढारी व शासकीय अधिकाऱ्यांच्या मुलांनी शासकीय शाळेत जाणे बंधनकारक करावे लागेल. याबाबत समितीला शासन निर्णयाची कॉपी द्यावी असे समितीने सूचित केले.

शासनाच्या मध्यान्ह भोजन योजनेकरिता कमी मालाचा पुरवठा केला गेला. ६७ टन मे.टन मालाचा पुरवठा करण्यात आला होता काय? महालेखाकारांनी असा मुद्दा उपस्थित केला की, मालाचा कमी पुरवठा झालेला आहे. या संदर्भात विभागाने दिलेल्या माहितीमध्ये असे विषद केले आहे की, जबाबदारी निश्चित करून कारवाई करू, मात्र साक्षीत असे सांगितले की, विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीमुळे माल शिल्लक राहिलेला आहे. असा आक्षेप समितीने घेतला असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, हा माल जवळजवळ १२१३ शाळांमध्ये पुरवला जाणार होता. विद्यार्थ्यांच्या कमी उपस्थितीमुळे माल शिल्लक राहिलेला आहे. शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षात घेऊन आहार शिजविला जातो. ६७ मे.टन तांदूळ शिल्लक राहिला. सदर शिल्लक तांदूळ लक्षात घेऊन पुढील मागणी नोंदवण्यात आली. साधारणपणे एक महिन्याचा साठा शिल्लक ठेवावा, असा निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे हा तांदूळ साठा फार जास्त नाही.

शासकीय शाळांमध्ये विद्यार्थी येऊ नयेत, याकरिता खाजगी शैक्षणिक संस्था प्रयत्न करतात. काही वेळा या कामाकरिता शिक्षक देखील मदत करतात. गडचिरोली जिल्ह्यामध्ये अशी प्रकरणे आढळून आली होती. त्या संदर्भात विभागाने तपासणी करावी. खाजगी संस्थांमधील शिक्षक घरोघरी जाऊन नोंदणी करतात. याउलट शासकीय शाळांमधील कोणतेही शिक्षक घरोघरी जात नाहीत. दुर्गम भागामधील शाळांमध्ये ४ शिक्षक असल्यास त्यापैकी २-२ शिक्षक आपापसात दिवस वाटून घेतात व त्यावेळी घरी राहतात याबाबत एखादे प्रकरण दाखवून दिल्यास, त्याबाबत तपासणी केली जाईल असे विभागीय सचिवांनी सांगितले, खाजगी शाळांमधील शिक्षकांवर टांगती तलवार असते. विद्यार्थी संख्या कमी झाल्यास पगार मिळेल की नाही, अशी परिस्थिती निर्माण होते. याउलट शासकीय शाळेमध्ये विद्यार्थी आले नाहीत तरी देखील शाळांमधील शिक्षकांना अशी भिती नसते. या संदर्भात शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. यावर्षी पटसंख्या कमी होणार नाही याकरिता जबाबदारी निश्चित केली पाहिजे. यासाठी शासनाने कार्यक्रम आखावा किंवा सूचना द्यावी. शिक्षक काय काम करतात याची तपासणी शिक्षणाधिकाऱ्यांनी केली पाहिजे. मागील ४० वर्षापूर्वी शिक्षणाचा दर्जा चांगला होता, याचे कारण त्यावेळी शिक्षणाधिकारी प्रत्येक शाळेला भेट देऊन तेथील तपासणी करीत होते. आज ग्रामीण भागात आपल्या पाल्याला चांगल्या दर्जाच्या शाळेमध्ये घालण्याकरिता पालकांमध्ये स्पर्धा असते. त्यांची तेवढी आर्थिक कुवत नसतानाही ते आपल्या पाल्यांना खाजगी

शाळांमध्ये घालतात. ग्रामीण भागातील शासकीय शाळांचा दर्जा आजही का सुधारला जात नाही? जळगावच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी आतापर्यंत किती वेळा शाळांना भेट दिली आहे याचा तपशील द्यावा. शैक्षणिक दर्जा सुधारण्याकरिता विभागाने कर्मचारी वर्गाच्या मानसिकतेमध्ये बदल केला पाहिजे. त्याशिवाय हे होऊ शकणार नाही. यासंदर्भात शिक्षणाधिकाऱ्यांनी भेटी दिल्या पाहिजेत हे योग्य आहे. मात्र आज त्यांची पदेच रिक्त आहेत. यासंदर्भात रिक्त पदांची यादी समितीला सूचित केले. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील २०० शाळांच्या संदर्भात जो शासन निर्णय काढलेला आहे, त्याची देखील एक प्रत समितीला द्यावी अशी समितीने सूचना केली.(तथापि अद्याप माहिती अप्राप्त आहे.)

अनेक शाळांमधून मुलांना योग्य प्रकारे मध्यान्ह भोजन मिळत नाही. जिल्हापरिषदेतील अधिकारी व जिल्हापरिषद अध्यक्ष यांच्या सोबत पंचायत समितीमध्ये बैठक होते. त्यावेळी देखील अशीच परिस्थिती दिसून येते. शाळेमध्ये एक महिना मध्यान्ह भोजन योजनेस खंड पडत असतो. पुरवठा करावा असे आदेश देऊनही प्रत्यक्षात मालाचा पुरवठा होत नाही. या योजनेकरिता ५ रुपये ६० पैसे दराने तांदूळ प्राप्त होतो. या संदर्भात विभागीय सचिवांनी माहिती दिली की, सध्या शाळांना मध्यान्ह भोजन योजनेकरिता मालाचा पुरवठा योग्य प्रकारे व्हावा, याकरिता व्यवस्था करण्यात आलेली आहे. मालाच्या पुरवठयाबाबत तक्रारी आल्यानंतर सचिव स्तरावर एक समिती नेमण्यात आली. दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ रोजी या संदर्भात निर्णय घेण्यात आला आहे.

या मध्यान्ह भोजन योजनेसंदर्भात पर्यायी व्यवस्था करण्याकरिता कोणती योजना विचाराधीन आहे, मध्यान्ह भोजन योजनेंतर्गत एमसीआयद्वारे अतिशय स्वस्त दराने धान्य मिळते. अनेकदा केंद्र प्रमुख माल खरेदी करतात मात्र तो माल दिला जात नाही. यामुळे मुले उपाशी राहतात. अशा घटना घडत असतात. या दृष्टीने शासनाद्वारे कोणती उपाययोजना केली जाणार आहे. शासनाने मध्यान्ह भोजन योजनेकरिता व्यावहारिक निर्णय घ्यावा व ही योजना चांगल्या प्रकारे राबवण्यासाठी पर्यायी व्यवस्था तयार करावी. ही व्यवस्था किती दिवसात तयार केली जाणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मालाचा तुटवडा निर्माण झाल्यानंतर आदेश दिले जातात. काही वेळा भारतीय अन्नधान्य महामंडळाकडून फेअर ॲव्हरेज क्वालिटी दर्जाचा तांदूळ प्राप्त होत नाही. फूड सिक्युरिटी अलाऊन्स बाबत केंद्र शासनाने व्यवस्था केलेली आहे. ज्या दिवशी शाळेतील विद्यार्थ्यांना धान्य देता येणार नाही, त्यादिवशी त्यांना ठराविक रक्कम देण्याची ही योजना आहे. जिल्ह्यात एकूण १६१८ शाळा शालेय पोषण आहार योजनेसाठी पात्र असून पूर्वी १५६० शाळांमध्ये अन्न शिजवण्याकरिता व्यवस्था उपलब्ध नव्हती.

या योजनेसंदर्भात समितीला १५ दिवसांमध्ये माहिती कळविण्यात यावी. अशी सूचना समितीने केली तसेच १९४७ शाळांपैकी १६२४ शाळांमध्ये मध्यान्ह भोजन तयार करण्यासाठी पाकशाळा छपरी नसल्याचे आढळून आले. या संदर्भात स्पष्टीकरण करावे असे समितीने सूचित केले. तथापि, माहिती अप्राप्त आहे.

याबाबत शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या सहीसह लेखी माहिती दिलेली आहे. या माहितीवर विश्वास ठेवायचा नाही तर कशावर ठेवावा?

असे अभिप्राय महालेखाकारांनी व्यक्त केले. चुकीची माहिती देणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे काय? ही कारवाई किती दिवसात केली जाणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१०-११ मध्ये एकूण शाळांची संख्या १९४७ असून त्यापैकी १६२४ शाळांमध्ये किचनशेड नव्हते. ६६६ शाळांमध्ये पाकशाळा भांडी व मोकळी जागा नव्हती. अशी माहिती शिक्षणाधिकारी, गोंदिया यांच्याकडून प्राप्त झालेली आहे. चुकीची माहिती देणाऱ्या तत्कालिन शिक्षणाधिकाऱ्यावर कारवाई करून व समितीला १५ दिवसाच्या आत कळविण्यात येईल.

यावर समितीने असे सूचित केले की, शिक्षणाधिकाऱ्यांनी सहीने माहिती सादर केलेली आहे. तेव्हा त्यांनी दिलेली माहिती सत्य आहे की असत्य आहे त्याबाबत शहानिशा करून त्यासंबंधीचा अहवाल द्यावा.

शिक्षणाधिकाऱ्यांनी सादर केलेली माहिती तपासून जर ती माहिती चुकीचीचे असेल तर त्यांच्यावर कारवाई करावी. जर त्यांनी दिलेली माहिती योग्य असेल तर जी अधिकची माहिती दिलेली आहे ती चुकीची आहे असे गृहीत धरावे काय? या संदर्भात चौकशी करून समितीला अहवाल सादर करावा असे समितीने सूचविले असता विभागीय सचिवांनी यास मान्यता दर्शविली.

यापुढे शाळाखोल्यांचे बांधकामाचा नकाशा तयार करताना त्यामध्ये पाकशाळेचा देखील अंतर्भाव असावा तसेच धोरण आहे. ७१ शाळांमध्ये पाकशाळा नाहीत, ६७ शाळांमध्ये बांधकाम सुरू आहे तर ३ शाळांमध्ये पाकशाळा उभारण्याबाबत अडचणी आहेत. शाळा खोल्यांचे जे बांधकाम होते त्यासाठी मुख्याध्यापकास जबाबदार धरले जाते. मुलांच्या जेवणामध्ये काही तरी घडले आणि त्यास मुख्याध्यापकास जबाबदार धरले म्हणून त्या मुख्याध्यापकाने आत्महत्या केली होती. मुख्याध्यापक हा त्या क्षेत्रातील तज्ञ नसतो. तरी देखील ती जबाबदारी मुख्याध्यापकांवर टाकली जाते. त्याबाबत विभागाकडून विचार होणार आहे काय? विद्यार्थ्यांना दुपारचे भोजन दिले जाते त्या जेवणाचा हिशोब मुख्याध्यापकांना ठेवावा लागतो. किती किलो गहू- तांदूळ लागले,किती मसाला लागला इत्यादी बाबींचा मुख्याध्यापकांना हिशोब ठेवावा लागतो. त्यामुळे मुलांना शिकविण्याचे मुख्य काम बाजूला राहते. त्याशिवाय त्यांना लहान लहान गोष्टींसाठी धमकावले जाते. याबाबत शासन विचार करणार आहे काय? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, मुख्याध्यापकांना शालेय पोषण आहारासंबंधीचे काम दिलेले आहे. त्यांना किती कामे द्यावे याचा निकाल न्यायालयाने दिलेला आहे. त्यांचेकडून हे संपूर्ण काम काढून घ्यायचे नाही असाही निर्णय झालेला आहे. मुख्याध्यापकांच्या बाबतीत वरील प्रमाणे घटना घडली होती. त्यावर भरपूर चर्चा झाली होती. पण आता काही तक्रारी नाहीत. शाळेचे बांधकाम कनिष्ठ अभियंता पाहतात. मुख्याध्यापकांवर ही तांत्रिक जबाबदारी नाही. अभियंता पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देतात.

चिचोली आणि बारेगाव या दोन शाळांमध्ये स्वतंत्र स्वयंपाकगृह बांधण्यासाठी जागा उपलब्ध नाही, ही आश्चर्याची बाब आहे. विभागाने या बाबीची चौकशी करावी. त्यांना जागा उपलब्ध करून द्यावी. त्या ठिकाणी स्वतंत्र स्वयंपाकगृह असले पाहिजे असे समितीचे मत आहे. ६६६ शाळांमध्ये पाकशाळा भांडी नाहीत. केंद्र शासन शाळांना भांडी पुरविण्यासाठी प्रतिशाळा पाच हजार रुपये अनुदान उपलब्ध करून देते. या अनुदानामध्ये १० हजार रुपयांपर्यंत वाढ करावी अशी राज्य शासनाने केंद्र शासनाला विनंती केली होती, परंतु केंद्र शासनाने ती विनंती अमान्य केली आहे. त्यावर राज्य शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे जेणेकरून सर्व शाळांमध्ये पाकशाळा भांडी उपलब्ध होतील? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, शहरी भागामध्ये बरेच पाकशाळा बांधावयाच्या होत्या पण तेथे जागा नाही आणि शाळेला गरजही नाही. त्या ठिकाणी मध्यवर्ती पाकशाळा तयार करण्यात येत आहेत. पाकशाळा न केल्यामुळे जो निधी शिल्लक राहिला आहे तो भांडी खरेदीसाठी देण्यात यावा, अशाप्रकारचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

अन्न व नागरी पुरवठा विभाग

महालेखाकारांच्या सन २००६ ते २०११ या कालावधीत अन्न धान्याची कमी उचल करण्यात आली तसेच गोडाऊन्सची क्षमता उपलब्ध असताना पाच नवीन गोडाऊन्स बांधकामाला परवानगी का देण्यात आली या आक्षेपासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००६ ते २०११ या पाच वर्षांच्या काळात गोंदियामध्ये सरासरी ९१ टक्के धान्यांची उचल झालेली आहे. सन २०१२-२०१३ मध्ये ती १०० टक्के झालेली आहे. सन २००६ ते २०११ या कालावधीत धान्यांची उचल सरासरी ९१ टक्के होती. याचा अर्थ प्रत्येक वर्षी ९१ टक्के उचल होती असे नाही तर ती सरासरी उचल होती. काही वेळेला ८५ टक्के उचल झाली असेल तर दुसऱ्यावेळेला त्याच्यापेक्षा जास्त उचल झाली असेल.

गोडाऊनना देण्यात आलेल्या परवानगीसंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, एफसीआयकडून या धान्याचा पुरवठा होतो. एफसीआय आणि रेल्वे यांचेमध्ये करार आहे. बऱ्याचवेळा रेल्वेकडून रॅक्स उपलब्ध होत नाहीत. पीएलए अकाऊन्ट मायनसमध्ये गेल्यावर पेमेंटला प्रॉब्लेम होतात. काही वेळेला असे होते की, रॅक्स उपलब्ध असतात परंतु एफसीआयच्या गोडावूनमध्ये जागा उपलब्ध नसेल तर शेवटच्या क्षणी ती जागा बदलली जाते त्यामुळे उशीर होतो. ऑगस्ट महिन्यात ९७ टक्के उचल झाली नसेल तर, ती सप्टेंबर महिन्यामध्ये पूर्ण १०० टक्के उचल करण्याचा प्रयत्न होतो. अशाप्रकारे आपण बॅलन्स करण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

विभागीय प्रतिनिधींनी ज्या अडचणी सांगितल्या त्या ठीक आहेत. परंतु जर व्यवस्थितपणे लक्ष देऊन मॅनेजमेंट केले तर, या गोष्टी मॅनेज करता येणे शक्य आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, राज्यामध्ये एकूण ४६३ गोडावून्स आहेत. रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पायलट प्रोजेक्ट केला आहे. एक गोडावून कॉम्प्युटराईज केला आहे. प्रत्येक गोडावूनमध्ये केव्हा ट्रक पोहोचला, किती माल आला, किती माल गेला याची माहिती त्वरित उपलब्ध होणार आहे. गोडावून्ससाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी एफसीआयकडे करण्यात येणार आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गोडावून्स कॉम्प्युटराईज केले आहे. परंतु तेथे एक महिना धान्य आलेले नाही असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, काही वेळेला शेवटच्या क्षणी रॅक्सची अडचण होते आणि ठिकाण बदलले जाते त्यामुळे अडचण निर्माण होते. एफसीआय आणि रेल्वेशी करार आहे. या संदर्भात रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केलेली आहे. रेल्वेची अडचण अशी आहे की,त्यांच्याकडे नवीन व्हॅगन्स येत नाहीत. एफसीआय ही शासकीय संस्था असल्यामुळे त्यांच्याकडून रेल्वेला उशिरा प्रदान होते.

विभागाने एफसीआय आणि रेल्वेच्या अडचणी सांगितल्या. पण ग्राऊंड लेव्हलवर विभागाने काही गोष्टी होतात मागील सात-आठ वर्षात अशी परिस्थिती होती की, एफसीआयकडून प्राप्त झालेल्या गहू, तांदूळाची उचल करण्याकरिता ठेकेदार नेमण्यात आला नव्हता. त्यामुळे वेळेवर माल उचलता आला नाही, विभागाच्या ज्या अडचणी आहेत त्या समितीला मान्य आहेत. पण वरील प्रमाणे वस्तुस्थिती आहे. काही वेळेला एका महिन्याचा कोटा दुसऱ्या महिन्यात येतो. लोकांनी मागणी केल्यास रेशन दुकानदार सांगतो या महिन्यात कोटा आला नाही. परंतु रेशन दुकानदार पुढील महिन्यात एक महिन्याचे रेशन देतो आणि यामध्ये दुकानदार अपहार करतो. गरीब लोकांना दर महिन्याला रास्तभावात रेशन मिळाले पाहिजे. पाच वर्षांची ९२ टक्के सरासरी आहे. पण काही वेळेला एका महिन्यात धान्य मिळत नाही. ही वस्तुस्थिती जिल्हा पातळीवरील आहे.

जळगाव जिल्ह्यातील एक व्यक्ती वेगवेगळ्या नावाने १०-११ दुकाने अनधिकृतपणे चालवित आहे. त्या व्यक्ती विरोधात अनेक तक्रारी देऊनसुद्धा त्याच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, जळगाव जिल्ह्यातील प्रकरणाबाबत तक्रार आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल सादर करण्यास सांगितलेले आहे. तेथील डीएसओ आणि तहसीलदार या दोन अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नाही. जिल्हा पुरवठा अधिकारी व तहसीलदार यांच्या अहवालात फरक होता त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल सादर करण्यास सांगितलेले आहे.

या संदर्भात स्पष्ट निर्देश देण्यात आले होते की, या प्रकरणाची चौकशी संबंधित डीएसओ कडे दिली जाऊ नये, अन्यथा सदरहू चौकशीवर पूर्वलक्षी प्रभाव पडेल असे मत समितीने व्यक्त केले असता हे विभागीय सचिवांनी मान्य केले व असे सांगितले की, सदरहू डीएसओची बदली झालेली आहे. सदरहू डीएसओकडे चौकशी दिली जाऊ नये, It might be prejudiced असे सांगण्यात आले होते. डी.सी.नाशिक या न्यूट्रल अधिकाऱ्याकडे या संदर्भातील चौकशी करण्याचे काम सोपविलेले आहे.

अन्न सुरक्षा कायदा सन २०१४ पासून लागू झाला. यानुसार प्रत्येक माणसाला विहित धान्य वाटप प्रति माह करणे क्रमप्राप्त झाले. अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत प्रती माणशी विहित धान्य पुरवठा करणे बंधनकारक झालेले आहे. रेशन दुकानदाराला किंवा इतर धान्य वाटप संस्थेला प्रति महिना आवश्यक धान्याची उचल करून त्याचे वाटप करणे आता बंधनकारक झालेले आहे.

अंत्योदय, अन्नपूर्णा आणि बीपीएल योजनेंतर्गत देखील दारिद्र्यरेषेखालील नागरिकांना स्वस्त किंवा मोफत धान्य प्राप्त होते. अन्न सुरक्षा योजनेपूर्वीच्या योजनेंतर्गत मिळणाऱ्या धान्य वाटपासंदर्भात काय परिस्थिती आहे? १९९७ ची दारिद्र्य रेषेच्या खालील यादीनुसार आता अन्न सुरक्षा योजनेंतर्गत धान्याचे वाटप केले जाते. आता दारिद्र्य रेषे खालील नवीन यादी तयार करण्याचे काम पूर्ण झालेले असून त्यासंबंधींच्या तक्रारींची सुनावणी सुरू आहे. सदरहू यादीला अंतिम स्वरूप देण्याचे काम केंद्र शासन करणार आहे. गोंदिया जिल्ह्यामध्ये दारिद्र्य रेषेवरील आणि दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांमध्ये वाढ झालेली आहे. या वाढीव लाभार्थ्यांची नावे शासकीय यादीत सामावून त्यांना संबंधित योजनांचा लाभ देणे आवश्यक आहे. ही बाब विभागीय सचिवांनी मान्य केली व सांगितले की, सदरहू यादीचे काम चालू आहे, नवीन यादीमध्ये निकषानुसार पात्र लाभार्थ्यांचा समावेश करण्यात येईल.

स्वस्त धान्य वाटप दुकानात जाऊन प्रत्यक्ष पुरवठा अधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी यावर नीट काम करीत आहेत की नाही याचेही मॉनिटरिंग होणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष दुकानावर गरीब लोकांना विहित धान्य व इतर कोटा नियमानुसार प्राप्त होतो की नाही हेही पाहणे आवश्यक आहे. प्रत्येक महिन्याचे धान्य व केरोसिन वाटप योग्य पद्धतीने त्याच महिन्यात झालेले आहे की नाही हे ही विभागाने पाहणे आवश्यक आहे. अन्यथा दुकानदार धान्याचा कोटा आल्यानंतरही तो जास्त भावाने विकण्याकरिता कोटा आलाच नाही, असे लाभार्थ्यांना सांगू शकतो. शासनाने विविध योजनांतर्गत वाटणी केलेले पूर्ण अन्नधान्य उचलण्यात विभागाला अपयश आलेले आहे. विभागाने संबंधित बाब मान्य केलेली आहे. अन्नधान्याचा वाटा वेळत उचलता न आल्याचे कारण मागणी केल्याप्रमाणे दिलेली अन्नधान्ये उचलण्याच्या वेळी पुरेशी क्षमता असलेली गोदामे उपलब्ध नव्हती. याप्रकारे अन्नधान्याचा संपूर्ण वाटा उचलण्याकरिता पुरेशी व्यवस्था केली गेली नव्हती. गोदामांच्या बांधकामांना प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. धान्याचा साठा करण्याच्या क्षमतेमध्ये वाढ करण्याकरिता शासन प्रयत्न करीत आहे.

तपासणी आणि मॉनिटरींगबाबत संदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, गोंदिया जिल्ह्यात वरील कामांची व्यवस्था जिल्हा पुरवठा अधिकाऱ्याकडून ९८१ स्वस्त भावाच्या दुकानांद्वारे पाहिली जाते. सन २००६-२०११ या कालावधीत ३३,६०१ मेट्रीक टन अन्नधान्याचा वाटा एएवाय/एपीएल/बीपीएल योजनांखाली व्यपगत झाला. संपूर्ण महाराष्ट्रात सद्यःस्थितीत स्वस्त धान्याच्या दुकानांची संख्या ५३,२३२ आहे. केरोसिन वाटप करणारी दुकाने ५१,१४९ आहेत. तसेच, काही ठिकाणी हॉकर्स आणि सेमी हॉकर्स यांनाही केरोसिन वाटपाची जबाबदारी डीएसओ यांच्या नियंत्रणांतर्गत सोपविलेली आहे.

मागील काळात या सर्व दुकानांचे तपासणी करीत असतांना त्यामध्ये काही अनियमितता आढळून आली होती त्यावेळी काही दुकानांचे परवाने रद्द केले होते.

विदर्भातील तीन जिल्ह्यांमध्ये जुलै आणि ऑगस्ट महिन्यांमध्ये रेशनिंग दुकानावर साखर मिळत नव्हती. फैजपूर येथे साखर कारखाने आहेत. फैजपूर येथील कारखान्यात तयार होणारी साखर पश्चिम महाराष्ट्रात जात होती. पश्चिम महाराष्ट्रात तयार होणारी साखर फैजपूर येथे आणली जात होती. वाहतुकीचे दर इतक्या मोठ्या प्रमाणात वाढलेले असतांनाही अशाप्रकारे साखरेची अनावश्यक वाहतूक करून शासनावर या खर्चाचा बोजा टाकण्यात आला होता. हा द्रविडी प्राणायाम केवळ वाहतुकदार व व्यापाऱ्यांच्या फायद्याकरिता होता का? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक ०१ जुलै २०१४ पासून साखरेचे भाव ई-ग्लोबलाईज करून त्याला सहकार मान्यता देण्यात आली होती. सद्यःस्थितीत साखरेचे ओपन ग्लोबल ॲनॉनिमस ऑक्शन केले जाते. तसेच, साखरेच्या भावाची बोली मल्टिपल तऱ्हेने लावण्याची मुभा या प्रकारच्या ऑक्शनमध्ये देण्यात आलेली आहे. पुरवठा विभागाच्या नवीन नियमानुसार एखादा फुड सप्लायर्स ट्रक नियमानुसार आढळून आला नाही तर, तेथेच थांबवून त्या ट्रकमधील धान्याचा लिलाव केला जातो.

जर अन्नधान्य नियतानाच्या तुलनेत साठवणूक क्षमता सुमारे दीड पट होती, तर विभागाकडून गोंदिया जिल्ह्यात ६८४० मे.टन क्षमतेच्या ५ गोदाम बांधकामांना प्रशासकीय मान्यता का देण्यात आली याबाबतचा खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र शासनाच्या सुचनेनुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अन्नधान्य साठवणूकीसाठी मासिक नियतनाच्या सुमारे तीन पट क्षमतेची गोदामे राज्य शासनाकडे असणे अपेक्षित आहे. या सुचनांच्या अनुषंगाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत धान्य गोदामे बांधण्याचा कार्यक्रम हाती घेतला त्या अंतर्गत गोंदिया जिल्ह्यामध्ये ६८४० मे.टन क्षमतेच्या ५ गोदाम बांधकामांना सन २०१३-२०१४ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरहू गोदामांचे बांधकाम प्रगती पथावर आहे.

१९९७ च्या दारिद्र्य रेषेखालील यादीनुसार अंत्योदय, अन्नपूर्णा व इतर योजनांचे लाभार्थी ठरवून त्यांना लाभ दिला जातो. इंदिरा आवास योजनांचे लाभार्थी निवडतांना मात्र या यादीचा वापर उचित प्रक्रियेनुसार केला जात नाही. ग्रामीण भागामध्ये खरोखर जो बेघर आहे, ज्याला हक्काच्या निवाऱ्याची गरज आहे, त्याला या योजनेचा लाभ होणे आवश्यक आहे. १९९७ च्या दारिद्र्य रेषेखालील यादी ऐवजी आता नवीन यादीचा वापर करणे आवश्यक आहे.

१९९७ च्या बीपीएलच्या यादीनुसार ज्या कुटुंबातील व्यक्ती विभक्त झालेली आहेत, त्यांची नावे दारिद्र्य रेषेवरील च्या यादीमध्ये गेलेली आहेत. या विभक्त झालेल्या कुटुंबीयांना देखील दारिद्र्य रेषेखालील यादीचा लाभ मिळणे आवश्यक आहे. प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेच्या धर्तीवर विभक्त दारिद्र्य रेषेखालील यादीधारक कुटुंबातील सदस्यांनाही नियमानुसार विहित लाभ मिळणे अपेक्षित आहे, याकरिता विभागाकडून आवश्यक ती पावले उचलली गेली पाहिजेत असे समितीने सूचविले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, अन्न सुरक्षा कायद्याच्या लाभार्थ्यांकरिता १९९७ च्या दारिद्र्य रेषेखालच्या यादीचा संदर्भ घेतला जात आहे. नवीन यादी तयार होण्याचे काम पूर्ण झालले असून त्यासंबंधींच्या तक्रारींची सुनावणी सुरू आहे. सदरहू सुनावणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित यादी केंद्र शासन अंतिम करेल. त्यानंतर त्या यादीनुसार शासनाच्या योजनांप्रमाणे लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल. ज्यांचे दरडोई उत्पन्न खरोखर कमी आहे, त्यांनाही दारिद्र्य रेषेखालील यादीमध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. विभागाच्या माध्यमातून अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत अन्नधान्य वाटपाकरिता निधीची जी कॅपिंग करण्यात आली आहे, त्यामध्ये बदल करण्याकरिता नवीन यादी व दरडोई उत्पन्न खरोखर कमी असणाऱ्या व्यक्तींच्या यादीचा आधार घेणे आवश्यक आहे. देशामधील अत्यंत गरीब व दुर्बल घटकांना त्यांच्या अन्न सुरक्षेचा अधिकार या योजनेच्या माध्यमातून त्यांना मिळणे आवश्यक आहे. दारिद्र्य रेषेखालील आणि दारिद्र्य रेषेवरील यादीचे शास्त्रोक्त पद्धतीने विश्लेषण केले जाईल. शहरी भागामध्ये नवीन यादी बनविण्याचे काम नगरविकास विभाग करीत आहे. ग्रामीण भागामध्ये ही नवीन यादी बनविण्याचे काम ग्रामविकास विभाग करीत आहे. नवीन यादीमध्ये जुन्या दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्य रेषेवरील यादीतील वगळलेल्या लाभार्थ्यांनाही नवीन निकषानुसार समाविष्ट केले जाईल.

१९९७ च्या दारिद्र्य रेषेखालील यादीनुसार ज्या कुटुंबातील व्यक्ती विभक्त झालेली आहेत, त्यांची नावे एपीएल च्या यादीमध्ये गेलेली आहेत. या विभक्त झालेल्या कुटुंबीयांना देखील दारिद्र्य रेषेखालील यादीचा लाभ मिळणे आवश्यक आहे. प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेच्या धर्तीवर विभक्त दारिद्र्य रेषेखालील यादीधारक कुटुंबातील सदस्यांनाही नियमानुसार विहित लाभ मिळणे अपेक्षित आहे. जोपर्यंत दारिद्र्य रेषेखालील यादी तयार होत नाही, तोपर्यंत विभाग काहीही निर्णय घेणार नाही काय? अशी विचारणा समितीने केली असता, यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, शासन आता राज्यामध्ये जो यादीकरिता सर्व्हेक्षण करीत आहे, ते सामाजिक आर्थिक सर्व्हेक्षण आहे. यामध्ये व्यक्ती व कुटुंब यांची आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमी व परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना लाभार्थी म्हणून यादीमध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे. ग्रामीण भागामध्ये सामाजिक आर्थिक सर्व्हेक्षण ग्राम विकास विभागाकडून केला जाणार असून नागरी भागात नगर विकास विभागाकडून केला जाणार आहे.

अद्याप या सर्व्हेला सुरुवातच झालेली नाही. केंद्र शासनाने दारिद्र्य रेषेखालील जेवढे लाभार्थी निश्चित केले त्या सर्वांना लाभ मिळत नाही. दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांचा एक गट करून त्यांना दारिद्र्य रेषेच्या बाहेर काढले पाहिजे व त्या नंतर पुढच्या लाभार्थ्यांना लाभ दिला पाहिजे. अन्यथा सर्व लाभार्थ्यांना लाभ देता येणार नाही. काही लाभार्थी वंचित राहतील. टप्प्याटप्प्याने सर्वांना लाभ द्यावयाचा असून दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या वाढवायची नाही असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ही योजना लागू करताना केंद्र शासनाने प्रत्येक राज्याला आदेश दिले. त्यावेळी दारिद्र्य रेषेखालील सवलत धारकांची संख्या ७ कोटी होती. कोणाला दारिद्र्य रेषेखालील ठरवायचे, यंत्रणा कशी राबवावी याचे अधिकार केंद्र शासनाने राज्याला दिले. मंत्रिमंडळामध्ये या संदर्भात चर्चा झाली त्यावेळी शास्त्रोक्त पद्धतीने विश्लेषण करून योजनेला मान्यता देण्यात आली होती. दारिद्र्य रेषेखालील लोकांचे जीवनमान उंचावणे महत्त्वाचे आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

ग्रामीण भागामध्ये सर्व्हेक्षण करताना उत्पन्नाच्या दाखल्यामध्ये विसंगती दिसून येते. पूर्वी तलाठ्याने जो उत्पन्नाचा दाखला दिलेला असतो, तोच दाखवला जातो. यामुळे गरिबांना लाभ मिळत नाही. नवीन सर्व्हेक्षण झाले तर या योजनेमधील बराचसा दोष कमी होईल. जे लाभार्थी वंचित राहिले आहेत, त्यांना लाभ दिला जाईल काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, अन्न सुरक्षा अधिनियम लागू करताना लाभार्थ्यांची मर्यादा ७ कोटी असावी अशी मर्यादा घालून देण्यात आलेली आहे. मंत्रिमंडळामध्ये चर्चा झाल्यानंतर एक उप समिती तयार केली. महाराष्ट्र राज्यात १ कोटी लाभार्थी अंत्योदय योजनेत होते, २ कोटी लाभार्थ्यांचा समावेश दारिद्र्य रेषेखालील मध्ये होता. राज्यात एकूण ५.७७ कोटी लोक दारिद्र्य रेषेवरील होते. मात्र योजनेमध्ये केवळ ४ कोटी लोकांचाच समावेश करणे शक्य होते. यामुळे १.७७ कोटी लोकांना कसे वगळावे असा प्रश्न होता. यामुळे ग्रामीण भागात ४४ हजार रुपये वार्षिक उत्पन्न व नागरी भागात ५९ हजार रुपये वार्षिक उत्पन्न या प्रमाणे मर्यादा निश्चित करण्यात आली. उर्वरित १.७७ कोटी लोकसंख्येकरिता वेगळी योजना सुरू केली जाणार आहे. १ कोटी ७७ लाख लोकांपैकी ६८ लाख शेतकरी असून ते १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमधील आहेत.

हा विषय महत्त्वाचा आहे. दारिद्र्य रेषेवरील १.७७ कोटी लोक शिल्लक राहिले आहेत. त्यांना मदत देण्याकरिता धान्य देण्याचा निर्णय पूर्वी शासनाने घेतला होता. मात्र या नंतरच्या काळात हा निर्णय बदलण्यात आला. यामध्ये एकूण २३ लाख शेतकरी आहेत. पूर्वी शासनाने महिन्याला १२० कोटी रुपये खर्च करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार ५-६ महिने खर्च केला मात्र त्या नंतर ही योजना बंद केली. १.७७ कोटी लोकांना मदत देण्याकरिता काय अडचण आहे, या करिता शासन खर्च करणार आहे काय? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, १.७७ कोटीपैकी २३ लाख शेतकरी आहेत. १.७७ कोटी लोकांना धान्य द्यावयाचे की नाही,याबातचा निर्णय विचाराधीन आहे.

५ गोदामांना प्रशासकीय मान्यता दिली असून ३ प्रगतीपथावर आहेत. उर्वरित २ गोडाऊनचे बांधकाम कधी सुरू केले जाणार आहे? तसेच सुरू झालेली कामे कधी पूर्ण होतील? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, ५ गोदामांना प्रशासकीय मान्यता मिळाली होती ५ पैकी २

गोदामांचे काम सुरू आहे. देवरी व नवेगाव येथे बांधकाम सुरू आहे. इतर ३ ठिकाणी वन विभागाच्या जमिनीचा मुद्दा उपस्थित झाला. सौंदाळे येथे काम सुरू केले होते, मात्र नंतर कामामध्ये अडचण आली. ३ ठिकाणी काम सुरू होण्याकरिता वन विभागाशी सतत पाठपुरावा सुरू आहे. देवरी, नवेगाव येथील गोदामाचे काम मार्च, २०१६ पर्यंत पूर्ण होईल.

आदिवासी विकास विभाग

आदिवासी विकास विभागाच्या परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांनी माहिती दिली की, महालेखाकारांच्या अभिप्रायात विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी पात्र विद्यार्थ्यांच्या नाव नोंदणीची माहिती शिक्षण विभाग किंवा शैक्षणिक संस्थांकडून मागवली नाही. संस्थांकडून आलेल्या प्रस्तावांच्या आधारावर शिष्यवृत्ती दिली, यामुळे लाभार्थी वंचित राहिले, असा आक्षेप महालेखाकारांच्या अहवालात काढण्यात आलेला आहे. सन २००६-२००७ पासून देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीच्या संदर्भात तक्तानिहाय माहिती दिलेली आहे. सन २०११-२०१२ मध्ये ५०१८ लाभार्थ्यांना पोस्टमॅट्रीक शिष्यवृत्ती दिलेली असून त्याकरिता ३ कोटी ७३ लाख रुपयांचा खर्च आलेला आहे. सन २०१२-२०१३ मध्ये ३ कोटी ७८ लाख रुपये खर्च आला असून ४७१५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिलेली आहे. जेवढे अर्ज प्राप्त झाले, त्या सर्वांना शिष्यवृत्ती देण्यात आली. सन २०१३ -२०१४ मध्ये ५६०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली असून त्याकरिता ३ कोटी ९९ लाख रुपये खर्च करण्यात आला. सन २०१४-१५ मध्ये ऑनलाईन ॲप्लिकेशन व्हेरिफिकेशन केल्यामुळे शिष्यवृत्तीच्या संख्येमध्ये १० ते १५ टक्क्याने घट झाली. चालू वर्षामध्ये २१४ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

महालेखाकारांचा आक्षेप आहे की, समाज कल्याण अधिकाऱ्यांच्या माध्यमातून शैक्षणिक संस्थांकडून माहिती घेण्यात आली नाही असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागाय सचिवांनी सांगितले की, सन २०१५ या वर्षापासून कॉलेजमधील मुख्याध्यापक व अधिकाऱ्यांची एक बैठक घेण्यात येणार आहे. जेणेकरून विभागाकडे किती अर्ज आले, ते ग्राह्य केले काय हे समजू शकेल. कॉलेजेस अर्जाची तपासणी करून विभागाकडे पाठवतात व त्यांना मान्यता मिळाल्यानंतर ते कोषागाराकडे पाठवले जातात. या संदर्भात सध्या विभागाकडे कोणतीही तक्रार आलेली नाही, तक्रार आल्यास त्याबाबत तपासणी केली जाईल.

शिष्यवृत्ती देण्यापूर्वी विद्यार्थ्यांचे नाव व इतर माहिती याची तपासणी केली गेली नाही. केवळ संस्थांकडून आलेल्या प्रस्तावाच्या आधारे शिष्यवृत्ती देण्यात आली. महालेखापालांनी आक्षेप घेतलेला मुद्दा योग्य आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यापूर्वी विधिग्राह्यीकरण केले नव्हते. मागील वर्षीपासून ऑनलाईन ॲप्लिकेशन सुरू केले आहे. शिकवणी फीची रक्कम कॉलेजला दिली जाते त्यामुळे कॉलेजची देखील जबाबदारी आहे. पूर्वी समाज कल्याण अधिकारी आदिवासी विकास विभागातील होते. आता हे पद स्वतंत्र केलेले आहे. या योजनेत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला जात आहे. आता असे प्रकार घडणार नाहीत.

एक विद्यार्थी दोन-दोन ठिकाणी शिष्यवृत्ती घेतो. शिष्यवृत्तीकरिता किती तरतूद केलेली आहे?अशाप्रकारच्या घोटाळ्यामुळे देशस्तरावर शासनाची बदनामी होते. या प्रकरणामध्ये किती जणांवर कारवाई झालेली आहे? यासंदर्भात विभागीय सचिवांनी विदित केले की, शिष्यवृत्तीकरिता २१४ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. पूर्वी अशा घटना घडल्या होत्या. त्या बाबत विभागाने चौकशी देखील केलेली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई केलेली आहे. समाज कल्याण अधिकारी, प्रकल्प अधिकारी तसेच कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई केलेली आहे. या प्रकरणामध्ये संबंधितांवर कारवाई झालेली आहे.

जलसंधारण व रोजगार हमी योजना विभाग

सन २००६ ते २०११ या कालावधीत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कमी जॉब कार्डस् उपलब्ध होते तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत ग्रामीण भागातील कुटुंबांना वर्षातून १०० दिवसांचा रोजागार उपलब्ध करून दिला जातो. परंतु तो कमी देण्यात आला यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडून मागणीनुसार रोजगार उपलब्ध करून देण्यात येतो. कुटुंबाला १०० दिवसांचा रोजगार उपलब्ध करून देण्याची हमी आहे. १०० दिवस पूर्ण झालेल्या कुटुंबांची संख्या कमी आहे, त्यामुळे या योजनेचा हेतू साध्य झालेला नाही असा आक्षेप आहे. सन २००८-०९ मध्ये राज्यामध्ये १०० दिवसांचा रोजगार मिळालेल्या कुटुंबाची संख्या जॉबकार्डनुसार ३.५९ टक्के होती. गोंदिया जिल्ह्यामध्ये ६ टक्के होती. सन २००९-१० मध्ये ही टक्केवारी ४ टक्के होती तर गोंदिया जिल्ह्यामध्ये ०.९ टक्के होती. सन २०१०-११ मध्ये ६ टक्के आणि गोंदिया जिल्ह्यामध्ये ४ टक्के होती. या वर्षी देश पातळीवर विचार केला तर १०० दिवस रोजगार मिळालेल्या कुटुंबाची टक्केवारी १.७४ टक्के आहे, तर राज्याची सरासरी टक्केवारी ८.७२ टक्के आहे. गेल्या वर्षी गोंदिया जिल्ह्याची टक्केवारी ९ टक्के होती. विभागाने कुटुंबाला १०० दिवसांचा रोजगार उपलब्ध करून दिला तरी त्यातील सर्वच जण १०० दिवस काम करतात असे होत नाही. काहीजण थोडे दिवस कामावर जातात किंवा नंतर जात नाहीत.

आता राज्यात मनरेगा ही योजना राबविण्यात येते पूर्वी मालगुजारी तलावांची दुरुस्ती रोजगार हमी योजनेच्या कामामध्ये घेण्यात येत होती. गोंदिया, भंडारा या भागात मालगुजारी तलाव आहेत. आता मालगुजारी तलावाच्या दुरुस्तीची कामे घेतलेली नाहीत त्यामुळे त्याचा परिणाम कुटुंबाला १०० दिवस रोजगार उपलब्ध न होण्यात झालेला आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांना सांगितले की, विदर्भात

मोठ्या प्रमाणात मालगुजारी तलाव आहेत. मालगुजारी तलावांची दुरुस्ती राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून घेतली होती. त्यातून काही तलाव दुरुस्त झाले. रोजगार हमी योजनेतून गाळ काढण्याचे काम केलेले आहे. परंतु ही कामे मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून केलेली आहेत.

विभागाने शासन निर्णय काढून रोजगार हमी योजनेतून मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीचा त्यामध्ये अंतर्भाव केला. त्यावेळेला कामे कमी झाली असतील. मनरेगामध्ये मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीची कामे घेण्याबाबत विभाग शिफारस करणार आहे काय? तसेच रोजगार हमी योजनेच्या कामासाठी जो कर गोळा होतो तो वर्षाला किती जमा होतो? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मालगुजारी तलावातील गाळ काढण्याचे काम रोजगार हमी योजनेमध्ये घेता येते. सेल्फवर ही कामे आहेत, लोकांनी मागणी केल्यास त्यांना हे काम देता येते. रोजगार हमी योजनेच्या कामासाठी जो कर गोळा होतो तो फक्त रोजगार हमी योजनेच्या कामावर खर्च करायचा आहे. जो काही कर जमा होतो तो सेंट्रल किटीमध्ये जमा होतो.

व्यवसायावरील कर जमा करून ती रक्कम रोजगार हमी योजनेच्या कामावर वापरण्यात येते. तो कर किती जमा होतो? जमा झालेल्या रकमेमधून किती टक्के रक्कम रोजगार हमी योजनेसाठी दिली जाते याची माहिती समितीस द्यावी असे समितीने सूचित केले यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, हा निधी वित्त विभागाकडे जमा होतो. वित्त विभागाकडून माहिती घेऊन समितीस कळविण्यात येईल. (अद्याप माहिती अप्राप्त)

गोंदिया, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या भागामध्ये मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीसाठी आणि पुनर्बांधणीसाठी अर्थसंकल्पात १००कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. या मालगुजारी तलावांवर रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून किती निधी खर्च करण्यात आला व किती लोकांना रोजगार मिळालेला आहे? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, यासाठी तरतूद योजनांतर्गत निधीमधून केलेली आहे. २०१५ च्या तृतीय अधिवेशनामध्ये ती मागणी केली असून जो काही निधी उपलब्ध करून दिला जाईल त्यातून कामांची निवड करून ती कामे हाती घेण्यात येतील.

रोजगार हमी योजनेच्या कामासाठी जो कर जमा करतो ती रक्कम फार मोठी आहे. मागील वेळी ती रक्कम साधारणतः अडीज हजार कोटी रुपये होती. आता ती रक्कम पाच-सहा हजार कोटी रुपये झाली असेल. गाव शिवार योजनेला ११०० कोटी रुपये देण्याचे प्रस्तावित आहे. खरे म्हणजे रोजगार हमी योजनेचा निधी या कामासाठी वापरावयाचा परंतु त्याची अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली असे दाखवावयाचे. कारण विभागाने १०० कोटी रुपये मागितले तर तो निधी मिळत नाही. हा सर्व निधी त्या कामासाठी वापरला पाहिजे त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्याची गरज का पडावी?

आता तो निधी वेगळा ठेवलेला नाही तसा कायदा मंजूर केलेला आहे. ज्यावेळी शासनाने तिजोरीमध्ये हे पैसे घेतले त्यावेळी २ हजार कोटी रुपये शिल्लक ठेवले. म्हणजे दोन हजार कोटी रुपये शिल्लक ठेवून उर्वरित रक्कम शासनाकडे वळती केली. याचा अर्थ तो पूर्ण निधी शासनाने घेतला असे नाही. हा निधी खर्च व्हावा हा दृष्टीकोन होता. जलसंधारणाकरिता, मालगुजारी तलावांकरिता १०० कोटी रुपये मागावे लागत आहेत असे मत समितीने व्यक्त केले. मागेल त्याला काम अशी रोजगार हमी योजनेची संकल्पना आहे. परंतु गोंदिया मतदारसंघात सन २००६ ते २०११ या कालावधीत कामाची मागणी करूनही मजुरांना काम मिळालेले नाही म्हणून बेरोजगार भत्ता देण्यात यावा अशी मागणी केली होती. काही ठिकाणी काम मिळत होते तर काही ठिकाणी काम वेळेवर मिळत नव्हते. शासनाकडे कामाच्या मागणीचा फॉर्म भरल्यानंतर सात दिवसात काम द्यावे लागते. शासनाने काम उपलब्ध करून दिले नाही तर बेरोजगार भत्ता द्यावा लागतो. कामाची मागणी केली आणि काम मिळाले नाही अशी स्थिती गोंदिया जिल्ह्यामध्ये अनेकदा येत असते. ज्यांनी कामाची मागणी केल्यानंतर त्यांना काम उपलब्ध करून देण्यास शासनास काही अडचण निर्माण झाल्यास त्यांना बेरोजगार भत्ता देण्याची भूमिका शासन अवलंबिणार आहे की नाही? अजूनपर्यंत कोणालाही बेरोजगार भत्ता देण्यात आलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. बेरोजगार भत्ता देण्याच्या बाबत काय निर्देश आहेत? जो दुर्गम भाग आहे, नक्षलग्रस्त भाग असेल त्या ठिकाणी काम उपलब्ध करून देता आले नाही तर त्यांना बेरोजगार भत्ता द्यावा. या नियमामध्ये शिथिलता आणून गरजेप्रमाणे बेरोजगार भत्ता देण्यास काही हरकत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या मजुरांना काम पाहिजे असेल त्यांनी लेखी स्वरूपात नमुना ४ मध्ये माहिती सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्या मजुरांना नमुना ७ मध्ये काम उपलब्ध करून दिले जाते. मजुरांना १५ दिवसांत काम उपलब्ध करून देण्याचे बंधन आहे. ५८५ लोकांना काम उपलब्ध करून दिलेले नाही, याबाबत बैठकीत प्रश्न उपस्थित झाला आहे. परंतु विभागाने काम उपलब्ध करून दिलेले आहे. बेरोजगार भत्ता देण्याची तरतूद आहे. परंतु सेल्फवरील कामांची संख्या खूप मोठी आहे. २०-२५ कि.मी. अंतरावर काम काढले तर इतक्या लांब मजूर कामावर जाऊ शकत नाहीत.

याबाबत सभागृहात देखील विषय उपस्थित झालेला आहे असे नमूद करून जर काम देणे शक्य झाले नाही आणि जर बेरोजगार भत्ता देण्याची आवश्यकता वाटत असेल तर, तो देण्यात आला पाहिजे अशी समितीने सूचना केली.

रोजगार हमी योजनेअंतर्गत रस्त्याची आणि पाणंद रस्त्याची कामे घेण्यात येतात. या कामासाठी लागणाऱ्या मुरुम आणि खडी यासाठीची रॉयल्टीची रक्कम खूप मोठी असते. रोजगार हमी योजनेचे काम असेल तर मुरुम आणि खडीवरील रॉयल्टी घेऊ नये. रॉयल्टी घेण्यात आल्यामुळे अनेक रस्त्यांची कामे अर्धवट अवस्थेत राहतात. मातीचे काम केल्यानंतर काम सोडून देण्यात येते आणि पुन्हा दोन वर्षांनी ते काम घ्यावे लागते.

रोजगार हमी योजनेच्या कामावरील खडी आणि मुरुमासाठी रॉयल्टी घेऊ नये. या धोरणामध्ये शिथिलता आणण्याच्या दृष्टीने विभागाने करावयाच्या प्रयत्नासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, रॉयल्टी हा विषय महसूल विभागाशी संबंधित आहे. यातून जर सूट मिळत असेल तर तसे सर्वांना कळविण्यात येईल.

सार्वजनिक बांधकाम विभाग

गोंदिया जिल्ह्यातील मरमजोब मासुलका घोनडी मार्ग या रस्त्याकरिता जमीन ताब्यात नसतांनाही रस्त्याच्या कामाच्या निविदा काढण्यात आल्या होत्या. प्रकल्पाची जमीन ताब्यात नसतांनाही नियमानुसार निविदा काढता येतात का? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, मुद्द्यत्वे जमीन ताब्यात असतांना या निविदा काढण्यात आलेल्या आहेत. परंतु या निविदांचा काही उपयोग झालेला नाही. त्या कामाकरिता फेर निविदा काढण्याची वेळ आलेली आहे. त्यावेळी लोकांच्या मागणीप्रमाणे सदरहू प्रकल्पाच्या कामाकरिता अंशतः जमीन ताब्यात असतांनाही पूर्ण रस्त्याच्या कामाच्या निविदा काढण्यात आल्या होत्या.

७ पैकी ३ रस्त्यांचीच जमीन केवळ ताब्यात होती. असे असतांनाही पूर्ण लेनच्या रस्त्याच्या कामाच्या निविदा काढण्यात आल्या होत्या. हे नियमाला धरुन आहे का? संदिग्ध धोरणामुळे शासन म्हणून विभाग जनतेचे कल्याण करून राज्याचे प्रगती साधण्याचा प्रयत्न करणार का? यामध्ये किती निधीचे वाटप करण्यात आले होते? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, हा केंद्र शासनाचा प्रकल्प असून यामध्ये नंतर निधीची प्रतिपूर्ती केली जाते.

लोकांच्या मागणीनुसार अंशतः जमीन ताब्यात असतांनाही नियमाच्या बाहेर संपूर्ण कामाच्या निविदा मागविण्याचे काम स्थानिक अधिकाऱ्यांनी त्यांचे न्यायिक अधिकार वापरुन केलेले आहे का? याबाबत विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

केंद्र भाग निधी देत असतांना भारत सरकारने काहीतरी मार्गदर्शक तत्वे घालून दिली असतील ना? त्यांचे पालन या प्रकल्पासंदर्भात करणे आवश्यक आहे. संपूर्ण जागा ताब्यात नसतांनाही संपूर्ण कामासंबंधीच्या निविदा काढणे त्या भारत सरकारच्या रस्त्यासंबंधीच्या मार्गदर्शक तत्वांना धरुन आहे का? लोकांचा कितीही आग्रह असला तरीही कामाच्या अंदाजपत्रकाला मान्यता व कामाला प्रशासकीय मान्यता मिळत असतांना संपूर्ण जागा ताब्यात आहे का याकडेही लक्ष दिले पाहिजे. नियमबाह्य निविदा मागवून कार्यादेश दिला. काम चालू असतांना जमीन ताब्यात नाही म्हणून काम थांबले. या सर्व निविदा प्रक्रियेमध्ये शासनाचा निधी वाया गेलेला आहे असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

केंद्र मार्ग निधीमध्ये जे ५ कोटी रुपयांचे परावर्तन झालेले आहे, ते विभागाने तपासून करून घेतलेले आहे. महालेखाकार यांनी मान्य केलेले आहे की, वरच्या पातळीवर मासिक प्रगती अहवालाच्या माध्यमातून अभियंत्यांकडून चुकीची माहिती गेलेली आहे, त्यामुळे हे घडलेले आहे. या संदर्भातील जबाबदारी विभागाने निश्चित करणे आवश्यक आहे. महालेखाकारांनी या पाच कोटी रुपयांच्या परावर्तनाचे खर्चाचे ताळमेळाचे काम केलेले आहे.

याबाबत महालेखाकारांनी समितीस अवगत केले की, यासंदर्भात लेखापरीक्षणाकरिता बिल्स पाठविले गेले होते. मासिक प्रगती अहवालात देयकापेक्षा जास्त रक्कम खर्च झाल्याचे दाखविण्यात आले होते. मासिक वाढत्या खर्चानुसार कामावर देयकापेक्षा जास्त खर्च झाल्याचे दिसून येत होते. असे अहवालामध्ये न दाखविता, जो खर्च झाला आहे तो सुस्पष्टपणे दाखविणे आवश्यक होते. त्यामुळे यावर लेखापरिक्षकांनी आक्षेप घेतला होता. लेखापरिक्षकाच्या परिशिष्टामध्ये मासिक प्रगती अहवालामध्ये जी रक्कम दाखविली आहे ती आर.ए.बिलापेक्षाही जास्त आहे. कार्यकारी अभियंत्यांनी लेखापरिक्षेने अशा प्रकारची चुकीची माहिती का पाठविली याची कारणे लेखापरीक्षणाला कळविली पाहिजेत.

यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, केंद्रिय मार्ग निधी अंतर्गत दुसऱ्या कामांवरील खर्चही मासिक प्रगती अहवालामध्ये दाखविण्यात आलेला आहे. तो खर्च त्यामधील बाबींमध्ये अंतर्भूत किंवा समाविष्ट करून एकत्रितपणे दाखविल्यामुळे त्या रक्कमा अधिकच्या दिसून येत आहेत. वास्तविक पाहता त्यामधील काही रक्कम वेगळया कामांकरिता खर्च करण्यात आली होती.

याप्रकरणी सकृतदर्शनी समितीला संबंधित कार्यकारी अभियंत्याची चूक दिसून येत आहे. त्यामुळे विभागाने याबाबतचे स्पष्टीकरण संबंधित कार्यकारी अभियंत्यांकडून मागवून समितीला पंधरा दिवसांच्या आत सादर करावे अशी सूचना समितीने केली व विभागीय सचिवांनी ती मान्य केली (तथापि माहिती अप्राप्त आहे.)

इटखेडा सिरोली बुटाई केशोरी मार्गावर कि.मी. १४ ला गाढवी नदीवर मोठा पूल बांधणे व सिरोचा आष्टी गडचिरोली कोहमारा बालाघाट मार्ग रा.म.मार्ग २७५ कि.मी. २८२ ते २९१ ची सुधारणा या कामाच्या व्याप्तीमध्ये बदल करण्याची मूळ कारणे काय आहेत? ५० एमएमबीएम काम पूर्ण लांबीत करण्याबाबत सिरोंचा आष्टी गडचिरोली उमरी रोडच्या कामासाठी अधीक्षक अभियंता वाढीव खर्च केंद्रीय मार्ग निधी यांनी मंजूर केला काय? जर नसेल तर वाढीव खर्च कसा भरुन काढण्यात आला? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या कामाचा अंतिम खर्च प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत असल्यामुळे केंद्र शासनाच्या मान्यतेची गरज नाही. याबाबतच्या अधीक्षक अभियंता यांच्या टिप्पणीत असे नमूद आहे की, अर्जूनी मोरगांव तालुक्यातील सिरोंचा-आष्टी-गडचिरोली-कोहमारा-गोंदिया -बालाघाट रस्त्याचे काम केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत रुपये ४७५ कोटी रुपये मंजूर आहेत. सदर कामाच्या रुंदीकरणामध्ये मुरुम व रेती, अस्तरीकरण, जाडीचा एक थर, ७५ मीमी जाडीचा बीवीएम चा एक थर व ५० मीमी जाडीचा बीएमचा एक थर व त्यानंतर ५.५० मीटर रुंदीत २५ मीमी जाडीचा एसडीबीसी चा थर असा कामाचा वाव आहे.

निरीक्षणाच्या वेळी खडीने रुंदीकरणाचे काम झाले असल्याचे आढळले. तसेच डाव्या बाजुकडील रुंदीकरणाचे काम प्रगतीत असल्याचे दिसते. राष्ट्रीय महामार्ग २७२ ची वाहतूक सदर रस्त्यावर वळविण्यत आल्यामुळे अस्तित्वातील डांबरी पृष्ठ भागाचे केंबर व प्रोफाईल क्षतिग्रस्त झालेले असून रस्त्यांचा पृष्ठ भाग ठिक-ठिकाणी दबलेला आहे. यामध्ये निविदा १७ टक्के कमी रकमेची होते, तरीही ती स्वीकारली गेली. यामुळे उर्वरित निधी खर्च करण्याकरिता डांबरीकरण व रुंदीकरणामध्ये बीएमवी चा लेयर देण्याच्या कामाचा व्याप वाढविण्यात आला होता. तसेच गाढवी नदीवरील पूलाच्या कामासंदर्भातही हेच करण्यात आलेले आहे. त्यामुळे ठेकेदार आणि अधिकारी यांनी उर्वरित निधी कुठेतरी जुळविण्यासाठी रचलेले हे षडयंत्र आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक ८ सप्टेंबर २००९ मध्ये अधीक्षक अभियंता यांनी असे लिहून दिलेले आहे. अंतिम मान्यता मुख्य अभियंता यांच्याकडून दिली जाते.

एवढ्या मोठ्या रक्कमेची खालच्या पातळीवर जुळवाजुळव होत नाही. या प्रकरणात मोठ्या कामाची निविदा असताना देखील फेर निविदा काढलेली नाही. मूळ अंदाजपत्रकामध्येच हे काम का घेण्यात आले नाही? या कामाला मुख्य अभियंतांनी भेट दिली होती काय? मूळ अंदाजपत्रकापैकी किती काम वाढविण्याची तरतूद आहे? सदर प्रकरणात किती काम वाढवण्यात आले? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर रस्त्याची लांबी वाढली तसेच दर्जामध्ये देखील बदल झाला. श्री.डी.आर.भोंगे, वरिष्ठ अभियंता यांनी भेट दिली होती. निविदेमधील तरतूदीनुसार २५ टक्क्यापर्यंत काम वाढवता येते. सदर बाब नवीन नाही. ती निविदेमध्ये समाविष्ट केलेली होती. कामाचा दर्जा वाढवण्यात आला. सदर कामाची किंमत ४७५ लाख रुपये होती. कामाचा वाव वाढला असला तरी खर्च ४६९ लाख रुपये झालेला आहे.

याबाबत साक्षीत दिलेली कारणे त्यावेळच्या अभियंत्याला देखील माहिती असली पाहिजेत. यासाठी वरिष्ठ अभियंता किंवा मुख्य अभियंता यांच्या आदेशाची वाट पाहणे आवश्यक नव्हते असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले.

शिल्लक राहिलेला निधी खर्च करण्यासाठी मूळ अंदाजपत्रकामधील काम वाढवण्यात आले, याबाबत केलेला खुलासा समितीला समाधानकारक वाटत नाही. या संदर्भात संबंधितांवर कारवाई करून त्याबाबतची माहिती समितीला देण्याबाबत समितीने सूचना केली.

मरामजोब मासुलकसा घोनाडी रस्त्याच्या कामाचे क्षेत्र बदलण्यात आले काय? कंत्राटदार काम पूर्ण करु शकत नाही म्हणून त्याला दुसरे काम द्यावे, ही कोणती पद्धत आहे? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सदर काम दोन महिने बंद ठेवण्यात आले होते. या बाबत पत्र दिलेले आहे. कंत्राटदारास काम करण्यात अडचण निर्माण झाली. तेथील एका सरपंचाची हत्या झाली होती. तेथे बिकट परिस्थिती निर्माण झाली होती. हा भाग नक्षलग्रस्त असून संवेदनशील आहे. त्यामुळे दोन महिने काम बंद होते. रस्त्यावर खडीचा थर टाकावयाचा होता. याकरिता मजुरांचे काम मोठ्या प्रमाणात होते. मशिनच्या सहाय्याने हे काम ३ ते ४ दिवसात होऊ शकत होते. ज्यावेळी निविदा तयार केली त्यावेळी तेथे अशी परिस्थिती नव्हती. त्यामुळे अतिरिक्त रक्कम देण्यात आली नाही. ही तरतूद नोव्हेंबर, २०१० पासून करण्यात आली आहे.

सदर रस्त्याची लांबी १४ किमी असून तो नक्षलग्रस्त भागातून जाणारा आहे, याची कल्पना होती. किंमत ठरवताना कंत्राटदाराने १८.२५ टक्के रकमेत लिलाव केला. याचाच अर्थ कंत्राटदाराला या कामाची किंमत कमी करणे परवडत होते. म्हणून त्यांनी कमी किमतीला टेंडर दिले. असे असताना कामाचे वाव का बदलण्यात आले? अशी विचारणा महालेखाकारांनी केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, खडी फोडण्यासाठी मोठ्या प्रमाणात मजूर लागतात. मात्र अडचणीची परिस्थिती असल्यामुळे कामाचा वाव बदलण्यात आला. तेथे बीबीएमचा थर तयार करावयाचा होता.

नक्षलग्रस्त भागात काम करण्यासाठी अडचणी येतात यामुळेच कंत्राटदाराला १५ टक्के अतिरिक्त रक्कम दिली जाते. बीबीएम ऐवजी बीएम च्या लेयरचे काम केले. यामुळे किती निधी अतिरिक्त द्यावा लागला? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, यासाठी १.२० कोटी रुपये द्यावे लागले.

निविदा १०० कोटी रुपयांची काढण्यात आली होती ही खडी दुसरीकडून आणता आली असती. १ कोटी २० लाख रुपये जास्त द्यावे लागले असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, येथील परिस्थिती वेगळी असल्यामुळे किंमत वाढली. येथे नक्षली कारवाया वाढल्या होत्या. त्यामुळे कामात बदल करणे आवश्यक होते. अन्यथा काम थांबले असते. कामात बदल केल्यामुळे हे काम होऊ शकले. बीबीएममुळे बचत झालेली आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षकांच्या सन २०१०-२०११ च्या नागरी अहवालातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परिच्छेद क्र. ४.१.४.१ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मार्च, २०११ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनने गोंदिया जिल्ह्यामध्ये सुविधेच्या संदर्भात प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र पीएचसी, सबसेंटर्सचे सर्वेक्षण केले होते व त्या सर्वेक्षणाची माहिती प्रपत्रामध्ये आहे. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याची माहिती अशी होती की, २००१ च्या जनगणनेनुसार १० सीएससीची, ४४ प्राथमिक आरोग्य केंद्रांची व २६६ उप केंद्रांची आवश्यकता लागणार आहे. आवश्यकतेनुसार १० सीएससी उपलब्ध होते. ४४ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी ३९ उपलब्ध होते व उप केंद्र २६६ पैकी २३८ उपलब्ध होते. ही कमतरता दूर करण्याच्या दृष्टीने जमिनी संपादन करणे, बांधकामासाठी प्रस्ताव सादर करणे, यानुसार तेव्हापासून निकषाप्रमाणे व अंतराप्रमाणे काम सुरू करण्यात आले आहे. १२ उपकेंद्राची कामे सुरू आहेत. १२ ठिकाणापैकी ७ ठिकाणी विभागास जमीन उपलब्ध झाली नाही परंतु भुसंपादनाची कार्यवाही सुरू आहे. पीएचसीसाठी ७ पैकी एका ठिकाणचे काम प्रगतीपथावर असून १० ठिकाणी

जमिनी ताब्यात घेण्याचे काम सुरू आहे. सीएससीमध्ये एकचा कमतरता होता परंतु ते काम देखील आता सुरू आहे. त्यामुळे १० च्या १० सीएससी उपलब्ध आहेत.

सुविधेच्या संदर्भात सर्वेक्षण झालेले नाही असा महालेखाकारांचा आक्षेप आहे. विभागाची महालेखाकारांबरोबर बैठक झाल्यानंतर म्हणजे ऑक्टोबर, २०११ मध्ये सुधारणा झाली आहे असे विभागाकडून सांगण्यात आले होते. परंतु महालेखापालांचे पथक गेले होते, त्यावेळेस सुविधेचे सर्वेक्षण झालेले नव्हते असे आढळून आले होते व ही बाब त्यावेळच्या डीएचओने मान्य सुद्धा केली होती. यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, सर्वेक्षण सगळीकडे सुरू होते परंतु गोंदिया जिल्ह्याचे सर्वेक्षण थोडे उशीराने सुरू झाल्यामुळे त्याचे अहवाल सुद्धा उशिरा प्राप्त झाले. परंतु सर्व जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षण झाले आहे ही वस्तुस्थिती आहे.

डीएचओने हे मान्य केले होते की, सुविधेच्या संदर्भातील सर्वेक्षण झाले नसल्याचे डीएचओने महालेखाकारांच्या पथकाला सांगितले होते. परंतु ऑक्टोबर, २०११ मध्ये असे सांगण्यात आले होते की, आता सर्वेक्षण पूर्ण केले आहे. त्यामुळे सर्वेक्षण न करण्याची कारणमिमांसा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सर्वेक्षण न करण्याचे काहीच कारण नाही. संपूर्ण जिल्ह्याचे सर्वेक्षण झालेले आहे. मात्र सर्वेक्षण करणारे पथक या जिल्ह्यामध्ये उशिराने गेल्यामुळे सर्वेक्षणाचे काम थोड्या उशिरा म्हणजे ऑक्टोबर, २०११ मध्ये झालेले आहे.

विभागाने दिलेल्या ज्ञापनामध्ये जिल्हा सबसेंटर, प्राथमिक आरोग्य केंद्रांची माहिती नमूद आहे. सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या प्राथामिक आरोग्य केंद्र याबाबतची माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सर्वेक्षण ऑक्टोबर, २०११ मध्ये झाले त्या वेळच्या स्थितीची ही आकडेवारी आहे. उपकेंद्र प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये किती सुविधा सुरू असल्या पाहिजेत याबाबतचे निकष असतात. त्या अनुषंगाने जेव्हा सर्वेक्षण झाले होते त्यावेळी इन्फ्रास्ट्रक्चर व एच.आर. बाबतच्या त्रुटी आढळल्या होत्या. सन २०१३-२०१४ मध्ये सुविधा वाढविण्यासाठी शासननिर्णय काढला होता. त्यानंतर त्यामध्ये वाढ झाली. सद्य:स्थितीत ३८ पीएचसी कार्यरत आहेत. सन २०११ च्या सर्वेक्षणाप्रमाणे ३९ पीएचसी होत्या. त्यानंतर सन २०१३-२०१४ मध्ये काढलेल्या शासन निर्णयानंतर त्यामध्ये वाढ झाली आहे. ३९ पीएचसी होत्या त्यामध्ये एक पीएचसी ची वाढ झाली आहे. अशाप्रकारे कार्यरत पीएचसी व सबसेंटरमध्ये मंजूर कर्मचारीवर्ग आहे. मात्र तो न भरल्याने सद्य:स्थितीत कर्मचारीवर्ग अपूरा आहे. काही पीएचसीचे २९ उपकेंद्रे मंजूर आहेत आणि २० उपकेंद्रांचे काम प्रगतीपथावर आहे. सदरहू काम कधीपर्यंत पूर्ण होणार आहे? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सबसेंटरच्या सुरू असलेल्या कामाबाबत बरीचशी कामे मानव विकास कार्यक्रम, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत केलेली आहेत. एकूण १२ कामे सुरू झालेली असून त्यांचे काम ७५ ते ८० टक्क्यांपर्यंत पूर्ण झालेले आहे. तसेच, पदभरतीचे काम सुरू झाले असून परिक्षाही घेतली गेलेली आहे. अशाप्रकारे मनुष्यबळाचा प्रश्न देखील सुटेल. जी कामे राहिलेली आहेत त्यामध्ये काही ठिकाणी जागेचा तर काही ठिकाणी विभागीय समस्या आहेत.

हे अंतर्गत प्रश्न कधीपर्यंत सुटणार व हे काम कधी सुरू होणार. ३ किंवा ६ महिने अशा विशिष्ट कालावधीत हे काम पूर्ण झाले पाहिजे असे काही नियोजन हे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने केले आहे काय? याची तरतूद विभागच करणार ना? जागा मिळण्याकरिता विभागाने काय प्रयत्न केले, जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली आहे काय, त्यांनी याबाबत काय सांगितले आहे? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, जमीन ताब्यात आल्यानंतर व अर्थसंकल्पीय तरतूद प्राप्त झाल्यावर ते काम करणे शक्य होईल. याबाबत पाठपुरावा सुरू असला तरी, नेमका किती कालावधी लागेल हे आताच सांगता येणार नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी ६ महिन्यांनी हे काम होईल असे सांगितलेले आहे.

मुळात डीपीडीसीच्या माध्यमातून सबसेंटर, पीएचसी दिल्या जातात. परंतु, त्यामध्ये पैशाची खूप अडचण असते. लोकप्रतिनिधी याकरिता प्रसंगी भांडून पैसे मिळवितात. खरेतर जागेची काहीच अडचण नाही. अडचणी अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे येत आहेत, असा अनुभव आहे. केवळ १-२ महिन्यांत पूर्ण होणारी कारवाई असते. २९ सबसेंटरकरिता १ महिन्यात जागा उपलब्ध करून देता येईल. सबसेंटरकरिता १ हेक्टर इतकी मर्यादित जागा लागते. डीपीडीसीला या वर्षी २ कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. त्यामध्ये किती काम घेणार? जर सबसेंटर, पीएचसीकरिता जागा उपलब्ध झाली तर असे सांगितले जाते की, प्रथम ८० टक्के बांधकाम करा त्यानंतर पदभरती होईल. मात्र डीपीडीसीकडे त्यासाठी पैसे नसतात. त्यामुळे डीपीडीसीला निधी उपलब्ध करून देणे ही सुद्धा विभागाची जबाबदारी आहे किंवा राज्यस्तरावर निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. जागेच्या अडचणीबाबत सांगितले जाते मात्र जागेची अडचण दुय्यम आहे. झुडपी जंगलाच्या बाबतीत १ हेक्टरपर्यंत जागेला परवानगी देण्याचे अधिकार डीएफओला आहेत. निधीची अडचण दूर करण्याच्या दृष्टीने निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभाग देखील त्याच्या पातळीवर हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. त्या अनुषंगाने अलीकडेच विभागाने रिक्त पदे भरण्याबाबत विनंती केली आणि त्याला मंजुरी देखील मिळाली. ही बाब केवळ गोंदिया जिल्ह्याबाबत नसून संपूर्ण राज्याच्या दृष्टीने सर्वसाधारण माहिती आहे. मध्यंतरी काढलेल्या शासन निर्णयानुसार रिक्त पदे भरण्यास मुभा नव्हती. मात्र विभागाने केलेल्याविनंतीनंतर माहे नोव्हेंबर, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यामध्येच 'अ', 'ब', 'क' व 'ड' अशा चारही वर्गवारीतील ७५ टक्क्यांपर्यंत रिक्त पदे भरण्यास शासनाची परवानगी मिळालेली आहे. विभागाने ४६९ कर्मचाऱ्यांचे नेमणूक आदेश काढले असून, त्यातील १५ डॉक्टर गोंदिया जिल्ह्यामध्ये गेलेले आहेत.

समितीने सचिव महोदया केवळ गोंदिया जिल्ह्याच्या बाबतीतील माहिती सांगत आहेत असे निदर्शनास आणून दिले व संपूर्ण राज्याची माहिती सांगण्याबाबत सुचविले असता विभागीय सचिवांनी ती माहिती उपलब्ध नसल्याचे सांगितले व संस्थाबाबत माहिती देताना सांगितले की, ७५ टक्के

किंवा त्यापेक्षा अधिक बांधकाम झालेल्या संस्थांची देखील त्या संस्था विभागाने माहिती घेतली आहे. शासनाला पदभरतीला परवानगी देण्याबाबत विनंती करीत आहेत. संस्था होण्यास काही वेळ लागेल. परंतु, तेव्हा पद भरतीला परवानगी नव्हती. असे हे एकात एक गुंतलेले प्रश्न असून विभाग एक-एक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. यादृष्टीने मंत्रीमंडळासमोर जो मास्टरप्लान विभाग आणणार आहे, त्यामध्ये थोडेसे बदल करावे लागतील.

जमिनीचा विषय तितका महत्त्वाचा नाही. अनेक ठिकाणी निधी अभावी बांधकाम सुरू करता आलेले नाही. मुख्यमंत्री महोदयांसमवेत एक बैठक झाली होती तेव्हा हा विषय उपस्थित करण्यात आला होता. नियोजन विभागास पहिल्या वर्षी किती निधी द्यावा याप्रमाणे टप्प्याटप्प्याने निधी देण्याबाबत विनंती केली आहे. अशाप्रकारे एक एक विषय संपविण्याचा प्रयत्न विभाग करीत आहे.

सद्य:स्थितीत राज्यभरात डॉक्टर व अन्य कर्मचाऱ्यांची किती पदे कमी आहेत याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, वैद्यकीय अधिकाऱ्यांची वर्ग १ ची, गट अ व गट ब धरून एकूण ९८०४ पदे आहेत. त्यातील ७०७७ पदे भरलेली असून २७२७ पदे रिक्त आहेत. एकूण २७.८० टक्के पदे रिक्त आहेत. यातील ४६९ लोकांचे नियुक्ती आदेश काढलेले आहेत. जिल्हास्तरीय समिती प्रत्येक जिल्ह्यात असते. त्यांना पदवी व कामाचा अनुभव पाहून कौन्सिलद्वारे वॉक इन इंटरव्ह्यूद्वारे नेमणूक करण्याबाबत सांगितलेले आहे. याबाबतचा असा अनुभव आहे की, लोकांना रिमोट एरियामध्ये पाठविल्यानंतर ते काही दिवस काम करतात व नंतर निघून जातात. या परिस्थितीमध्ये सुधारणा होईल अशी अपेक्षा आहे.

निधीच्या कमतरतेबाबतच्या अनुषंगाने समितीने अशी सूचना केली की, आदिवासी विकास विभाग किंवा समाजकल्याण विभागाचा घटक आदिवासी बहुल लोकसंख्या विचारात घेता त्या त्या जिल्ह्यांना उपलब्ध करून दिल्यास पीएचसी व उपकेंद्रांच्या बांधकामास निधी उपलब्ध होऊ शकेल.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी असे सांगितले की, निधीच्या अभावी किती दुरुस्तीची कामे व किती नवीन बांधकामे प्रलंबित आहेत याचा अंदाज विभागाने घेतलेला आहे. त्यानुसार एकूण ८०० प्राथमिक आरोग्य केद्रांचे काम करावयाचे आहे. त्यातील ३०० प्राथमिक आरोग्य केंद्र नवीन असून ५०० प्राथमिक आरोग्य केंद्राची अवस्था अतिशय खराब आहे, त्यांचे नूतनीकरण करणे गरजेचे आहे. एकूणच या कामाकरिता जवळपास ४ हजार कोटी रुपये एवढा खर्च अपेक्षित आहे. एवढा मोठा निधी एकदम उपलब्ध होऊ शकणार नाही. याचे नियोजन करण्याबाबत पुढच्या वर्षाच्या तरतूदीबाबत डिसेंबर मध्ये बैठक आहे.

आदिवासी विकास विभाग व समाजकल्याण विभागाची अर्थसंकल्पीय तरतूद आदिवासी बहुल लोकसंख्येनुसार संबंधित जिल्ह्याने मागणी केल्यास उपलब्ध करून दिल्यास, तसेच नियोजन विभागाशी चर्चा केल्यास हा प्रश्न मार्गी लागू शकेल असे समितीने सूचविले असता विभागीय सचिवांनी याकरिता निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील व डिसेंबरच्या बैठकीत देखील हा मुद्दा उपस्थित करण्यात येईल असे आश्वासित केले.

२७२७ पदे रिक्त असल्याबाबत साक्षीत सांगण्यात आले मात्र यापेक्षा अधिक पदे रिक्त असतील, पीजीसाठी जाणारेही काही लोक असतात, त्यांचे पद रिक्त असल्याचे घोषित केले जात नाही. त्यांचीही जर मोजणी केली तर रिक्त पदांची संख्या अधिकच असणार आहे. एका तालुक्याबाबत सांगावयाचे झाले तर, तेथील ११ लोक पीजीसाठी गेले आहेत. एका तालुक्यात ही स्थिती असताना पूर्ण राज्यातील संख्या पाहिली तर आपल्याला वेगळेच चित्र दिसेल. ही बाब अतिशय गंभीर आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, याची विभागास कल्पना आहे. मात्र विभाग ही बाब गांभीर्याने घेत नाही असे नाही. जे डॉक्टर पीजी करिता जातात त्यांचे पद टेक्नीकली रिक्तअसते. त्यांचा पगार विभागाला काढावा लागतो. पगाराच्या मुद्यामुळे ते पद भरता येत नाही. त्यामुळे टेक्नीकली ते पद रिक्त राहते.सर्व ठिकाणाहून पीजीची रिक्त पदे भरण्याबाबत मागणी होत असून विभागाने याबाबत जी सूचना केली आहे, ती प्रगती पथावर आहे. पीजीची टेक्नीकली रिक्त पदे भरल्यास पीजीचा पगार काढणे कठीण आहे. पीजीकरिता जाणाऱ्या डॉक्टरांची संख्या जवळपास ८०० ते ९०० आहे. विभागाने असा प्रस्ताव दिला आहे की, ही संख्या सुपरन्युमरी करून द्यावी, सामान्य प्रशासन विभागाच्या स्तरावरून त्यांचा पगार काढला जाईल. मात्र शासनाने याला मान्यता दिलेली नाही. पीजीची सिट मिळाली असेल तर विभाग कोणालाही थांबवू शकत नाही.

पीजीसाठी जाण्याला हरकत नाही. मात्र पीजीला गेलेल्यांचा पगार काढावयाचा आहे म्हणून त्यांची सिट रिक्त दाखवायची नाही हे चुकीचे आहे. पगार काढायचा की नाही काढायचा हा प्रशासनाचा प्रश्न आहे असे मत समितीने व्यक्त केले. यासंदर्भात विभागाने वित्त विभागाकडे विनंती केली आहे की, सुपरन्युमरिक पोस्ट तयार करून द्याव्यात. जेणेकरून पीजीसाठी गेलेल्या डॉक्टरांमुळे रिक्त झालेल्या पदांवर अन्य डॉक्टर भरता येतील. हा नियोजनाचा भाग असून शासनाने मान्यता दिली तर तशी कार्यवाही सार्वजनिक आरोग्य विभागाला करता येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सचिवांनी वॉक-इन-इंटरव्ह्यूच्या माध्यमातून डॉक्टरांची पदे भरली जातात, अशी माहिती दिली परंतु, समितीने हे निदर्शनास आणून दिले की, ही योजना केवळ कागदावर आहे. कारण, पात्र डॉक्टर्स सार्वजनिक आरोग्य विभागाकडे अर्ज करतात. परंतु, त्यांना सहा-सहा महिने नियुक्ती दिली जात नाही, ही वस्तुस्थिती आहे. खरोखर विभागाला जर वॉक-इन-इंटरव्ह्यूच्या माध्यमातून पदे भरावयाची असतील तर सिव्हिल सर्जन यांच्या अध्यक्षतेखाली एखादी स्थानिक समिती नेमता आली तर योग्य ठरेल जेणेकरून स्थानिकस्तरावर डॉक्टरांची तातडीने नियुक्ती ही समिती करू

शकेल. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ही सर्व वस्तुस्थिती विचारात घेऊन जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली, त्या जिल्ह्याचे सिव्हिल सर्जन व जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा समावेश असलेली, जिल्हास्तरीय समिती गठित करण्याबाबतचा प्रस्ताव विभागाने सादर केला होता. आता हा प्रस्ताव मान्य झाला असून या संदर्भातील सविस्तर शासन निर्णय विभागाकडून काढण्यात येणार आहे. ही कार्यपद्धती अवलंबिल्यामुळे निश्चितच यामध्ये फरक पडेल, त्याचप्रमाणे अस्थाई स्वरूपात भरती करण्याऐवजी नियमित भरती करण्याबाबतचा प्रस्ताव देखील विभागाने शासनाला सादर केला होता, त्याचा पाठपुरावा देखील करण्यात आला आणि त्यासही मंजुरी मिळालेली आहे. वित्त विभागाकडून मान्यता मिळाल्यानंतर भरतीबाबतची कार्यवाही सुरू होईल. आरोग्य सेवेचे काम जलद आणि सुरळीतपणे व्हावे, असा विभागाचा प्रयत्न आहे.

समितीने अशी विचारणा केली की, बांधकामासाठी विभागाकडे निधी उपलब्ध नाही. तसेच ७५ टक्के बांधकाम पूर्ण होत नाही तोपर्यंत पदे भरता येणार नाहीत. निधीची अडचण ही नेहमीच राहणार आहे. गोंदिया जिल्ह्यासाठी ६ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि २१ उप केंद्रे मंजूर केली आहेत. समितीने गोंदियाच्या बाबतीत शासनाच्या निदर्शनास आणून दिले की, काही प्राथमिक आरोग्य केंद्रांची तातडीने आवश्यकता आहे. खमानी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ४ उप केंद्र सुरू केली आहेत. विभाग निधीअभावी बांधकाम करू शकत नाही. अनेक ठिकाणी जागा उपलब्ध नसल्यामुळे बांधकाम करता येत नाही. अनेक ठिकाणी निधीची अडचण आहे. परंतु, पर्यायी जागा उपलब्ध असेल तर अशा ठिकाणी विभाग आरोग्य उपकेंद्र सुरू करण्याबाबत का विचार करीत नाही? ज्याप्रमाणे गोंदिया जिल्ह्यात खमानी येथे पर्यायी जागेमध्ये उपकेंद्र सुरू केले आहे, त्याप्रमाणेच विभाग संपूर्ण महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी पर्यायी जागा उपलब्ध आहे त्या ठिकाणी उपकेंद्र सुरू करण्याचा प्रयत्न का होत नाही? तात्पुरती व्यवस्था म्हणून उपलब्ध पर्यायी जागेवर उपकेंद्र सुरू करावीत, अशी समितीची अपेक्षा असून विभाग तशा प्रकारचा प्रयत्न करणार होणार आहात का? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, आतापर्यंत अशा प्रकारे पर्यायी जागेवर आरोग्य केंद्र सुरू करण्यात आलेले नाही. गोंदिया जिल्ह्यात देखील ते तात्पुरत्या स्वरूपात करण्यात आलेले आहे.

गोंदिया येथील २४ पैकी ४ प्राथमिक आरोग्य केंद्रे पर्यायी जागेवर सुरू करण्यात आलेली आहेत. विभागाने निधीची अडचण देखील सांगितली आहे आणि ती अडचण एका दिवसात संपुष्टात येणारी नाही. संपूर्ण महाराष्ट्रातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रे यांच्या इमारतींच्या बांधकामासाठी लागणाऱ्या खर्चाची फार मोठी रक्कम सांगितली आहे. याबाबत समितीने असे निदर्शनास आणून दिले की, आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी भागातील आरोग्य केंद्रांच्या इमारतीच्या बांधकामासाठी निधी मिळविला तर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या खर्चातील मोठी रक्कम कमी होईल.

आरोग्य केंद्रांच्या इमारतींच्या बांधकामासाठी शासनाकडे निधी नाही आणि एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी प्राप्त होण्यास किती कालावधी लागेल, हे सांगता येणार नाही. निधी नसल्यामुळे आरोग्य केंद्रांच्या इमारतींचे बांधकाम होणार नाही आणि तोपर्यंत विभागास डॉक्टरांच्या पदनिर्मितीसाठी किंवा भरतीसाठी शासनाकडून परवानगी मिळणार नाही. अशी परिस्थिती असेल तर ग्रामीण भागातील लोकांनी आरोग्य सेवेसाठी किती वाट बघायची? म्हणूनच आरोग्य केंद्रांच्या इमारती पूर्ण होईपर्यंत समाजमंदिर किंवा अन्य उपलब्ध जागेवर तात्पुरत्या स्वरूपात विभागाने आरोग्य उप केंद्रे सुरू करावीत. जेणेकरून ग्रामीण भागातील लोकांना आरोग्य सुविधा मिळू शकतील. उप केंद्रांसाठी आपल्याला डॉक्टरांची देखील आवश्यकता नाही. अे.एन.एम.ची नियुक्ती केल्यास उप केंद्र सुरू करता येतील. अे.एन.एम.साठी विभागाने अर्ज मागविले तर १००० अर्ज प्राप्त होतील. म्हणजे हे मनुष्यबळ मिळण्यात देखील अडचण नाही असे मत समितीने व्यक्त केले. आदिवासी क्षेत्रात एकूण किती उपकेंद्रे सुरू करावयाची आहेत, त्या उपकेंद्रांसाठी एकूण किती खर्च अपेक्षित आहे, आदिवासी विकास विभागाकडून किती निधी प्राप्त होऊ शकतो, याबाबतची तपशिलवार माहिती तसेच शासनाचा इकॉनॉमिकली बॅकवर्ड रिजन फंड आहे. या निधीतून देखील ही बांधकामे करता येतील. नागपूर भागात अनेक महसूल मंडळांमध्ये ही कामे झालेली आहेत. या सर्व गोष्टींचा विचार केला तर उपकेंद्रांच्या बांधकामासाठी ४ हजार कोटी रुपयांपेक्षा कमी निधी लागेल, याबाबतची माहिती समितीला सादर केली तर या बांधकामांसाठी किती निधी लागणार आहे, याचा अंदाज बांधता येईल अशी सूचना समितीने केली याबाबत विभागीय सचिवांनी ही माहिती समितीला सादर करण्यात येईल असे सांगितले. (माहिती अप्राप्त आहे).

विभागीय सचिवांनी असेही सांगितले की, आरोग्य केंद्राचे ७५ टक्के बांधकाम पूर्ण असेल किंवा पूर्ण होण्याच्या मार्गावर असेल तर त्या ठिकाणी तातडीने पदनिर्मिती करून द्यावी. जेणेकरून बांधकाम पूर्ण झाल्याबरोबर त्या ठिकाणी डॉक्टर्स उपलब्ध करून देता येतील असा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडून शासनास सादर करण्यात आला आहे. सदर अहवालाची प्रत समितीस देण्याबाबत समितीने सूचित केले. (माहिती अप्राप्त).

वाशिम येथे २०० खाटांचे रुग्णालय पूर्ण झाले आहे. परंतु, अद्याप पदनिर्मिती झालेली नाही. रुग्णालय इमारत पूर्ण आहे, अन्य सुविधा आहेत. परंतु, डॉक्टर्स व अन्य कर्मचारीवर्ग अद्याप मिळालेला नाही. गेल्या ७/८ वर्षांपासून हे रुग्णालय १०० खाटांच्या रुग्णालयास मंजूर असलेल्या मनुष्यबळावर काम करीत आहे, यासंदर्भात ही बाब तपासण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. या अनुषंगाने समितीने अशी सूचना केली की, विभागाने रुग्णालयांचे ग्रेडेशन केले पाहिजे व त्यानुसार स्टाफिंग पॅटर्न निश्चित केला पाहिजे.

महालेखाकारांच्या अक्षेपानुसार सडक-अर्जुनी तहसील येथील ग्रामीण रुग्णालय ३० खाटांचे मंजूर होते. परंतु, प्रत्यक्षात त्या ठिकाणी ६ खाटांचे रुग्णालय सुरू होते. याबाबत विभागीय सचिवांनी विदित केले की, जिल्हा शल्य चिकित्सकांनी गेल्या तीन वर्षांपासून ३० बेडेड हॉस्पिटल सुरू आहे असे सांगितले आहे.

सडकअर्जुनी ग्रामीण रुग्णालयाला भेट दिली त्यावेळी डॉक्टर उपलब्ध नव्हते. बहुतांश ग्रामीण रुग्णालयांची अशीच परिस्थिती आहे. काही ठिकाणी ४ पदे मंजूर असली तरी २ डॉक्टर उपलब्ध आहेत. काही ठिकाणी तर एकाच डॉक्टरांवर काम सुरू आहे २०१२-२०१३ मध्ये १८ पदांची निर्मिती करण्यात आली त्यापैकी ५ ते ६ पेक्षा अधिक डॉक्टर्सची भरती केलेली नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सडकअर्जुनीच्या अपग्रेडेशनसाठी सन २०१३-२०१४ व सन २०१४-२१०१५ मध्ये ८ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. परंतु, तो खर्च झाला नाही. तेथे विशेषज्ञांची नेमणूक करण्यासाठी विभागाने परवानगी दिली होती. परंतु, त्यांच्यामार्फत पदे भरलेली नाहीत. एनआरएचएम यंत्रणेची ती जबाबदारी होती.

विभागाने डॉक्टरांची पदे भरण्यास मान्यता दिली होती. त्यानुसार किती वेळा जाहिराती काढण्यात आल्या, त्या जाहिरातींना किती प्रतिसाद मिळाला, एनआरएचएमची पदे भरलीच जात नाहीत असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सडकअर्जुनीसाठी ३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी २ भरलेली आहेत. मंजुरी दिल्यानंतर देखील पदे भरली जात नाहीत. त्याचे कारण असे आहे की, जाहिराती काढल्या जातात. परंतु, डॉक्टरांकडून प्रतिसाद मिळत नाही. आता तर कंत्राटी पद्धतीवरील डॉक्टरांना शासनाने १ लक्ष रुपयांपर्यंत मानधन देऊ केले आहे. जिल्ह्यातील सिव्हिल सर्जन, जिल्हा आरोग्य अधिकारी या संदर्भात त्यांच्यास्तरावर भरपूर प्रयत्न करतात. सोयीचे ठिकाण नसेल तर डॉक्टर येत नाहीत आणि त्यांनी नियुक्ती स्वीकारली तर रुजू झाल्यानंतर ते पी.जी.साठी निघून जातात आणि तेही जमले नाही तर सोयीच्या ठिकाणी बदली करून घेण्यासाठी विविध मार्गाने प्रयत्न करतात. विभागाने डॉक्टरांच्या नियुक्तीसंदर्भात काही नियम तयार केले आहेत. नियुक्ती झाल्याबरोबर त्यांना शहरी विभागात नियुक्ती दिली जात नाही. सुरुवातीची तीन वर्षे त्यांना ग्रामीण भागात सेवा करावी लागते. अशा वेळी ग्रामीण भागात नियुक्ती करण्यात आलेले डॉक्टर्स स्थानिक लोकप्रतिनिधींमार्फत शहरी विभागात बदलीसाठी प्रयत्न करतात, विभागाकडे वारंवार पाठपुरावा करतात आणि ग्रामीण भागातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत असतात. विभागाचा असा अनुभव आहे की, जेवढ्या लोकांना विभागाने नियुक्तीचे आदेश देतो त्यापैकी केवळ ५० ते ६० टक्के डॉक्टर्स नियुक्ती स्वीकारून सेवेत रुजू होतात. ही परिस्थिती केवळ महाराष्ट्र राज्यात आहे, असे नाही तर अन्य राज्यातही आहे.

दुसऱ्या बाजूला असेही घडते की, एखाद्या डॉक्टरने मुळशी किंवा वरुर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नियुक्ती मागितली तर त्याचे प्रकरण मंत्रालय पातळीवर प्रलंबित राहते. आता मुळशी किंवा वरुर हा भाग ग्रामीण भागातच आहे. सडकअर्जुनी येथील नॉनइनफेक्शिअस डिसिजेस ट्रिट करणाऱ्या डॉक्टरांची पदे रिक्त आहे. सिव्हिल सर्जन यांनी जाहिरात काढली होती. परंतु, अजुनही ते पद रिक्त आहे असे मत समितीने व्यक्त करून अशी विचारणा केल की, एनआरएचएमअंतगर्त येणाऱ्या पदांसाठी किती वेळा जाहिरात काढली गेली, सडकअर्जुनी येथील रिक्त पदे भरण्यासाठी किती वेळा प्रयत्न केले गेले? या संदर्भात विभागीय सचिवांनी जिल्हाचिकित्सक यांनी दिलेल्या माहितीवरून सांगितले की त्याठिकाणी पद मंजूर नाही.

समितीने नाराजीने असे मत व्यक्त केले की, याच विषयावर आरोग्य सचिवांची तीन वेळा साक्ष झाली आहे. परंतु प्रत्येक वेळी योग्य ब्रिफिंग घेऊन साक्षीसाठी येत नाहीत. यावर विभागीय सचिवांनी आश्वासित केले की, सडकअर्जुनी आणि अर्जुनी मोर याबाबतची माहिती समितीला लेखी सादर करण्यात येईल तथापि अद्याप माहिती अप्राप्त आहे.

आयपीएचएससाठी सिव्हिल सर्जन यांच्याकडून प्रयत्न केले जात नाहीत. केंद्राचा निधी मिळविण्यात शासन कमी पडते. विभागाने या संदर्भातील आढावा घेतला आहे का? आपल्या राज्याला आयपीएचएसमधून किती फायदा झाला आहे? नॉन इनफेक्शिअसचीपदे का रिक्त आहेत? यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, गोंदिया जिल्ह्यामध्ये ५२ फॅसिलिटी सेंटर्स आहेत. आतापर्यंत विभागाने आयपीएचएस अंतर्गत ७० मनुष्यबळाची भरती केली आहे व ३० सेंटर्स आयपीएचएसखाली घेतली आहेत. केंद्र शासनाचे या संदर्भात काही निकष आहेत. ते पूर्ण होत नाहीत तोपर्यंत विभागास निधी मिळत नाही.

सीएससीसाठी १० पॅरामिटर्स आहेत. आयपीएस स्टँडर्डवर आणण्यासाठी विविध पॅरामिटर्सची पूर्तता करण्याची आवश्यकता आहे. यासाठी आवश्यक प्रमाणात मनुष्यबळ असणे आवश्यक असते. आयपीएसच्या स्टँर्डसाठी विभाग प्रयत्न करीत नाही,सीएस प्रयत्न करीत नाही, डेप्युटी डायरेक्टर प्रयत्न करीत नाही. त्यामुळे १० खाटाचे हॉस्पिटल्स पूर्ण करण्याची जबाबदारी विभाग का निश्चित करीत नाही? विभागाकडे सल्लागार येण्यास तयार आहेत. त्याच गावामध्ये प्रॅक्टीस करणारे लोक काम करण्यास तयार असतात. एक सिजर होत नाही. विभागाच्या अकार्यक्षमतेमुळे विभाग आयपीएचएस स्टँर्डवर येऊ शकत नाही. डीपचओ, सीएस, डेप्युटी डायरेक्टर यांनी चांगल्या प्रकारे काम केले तर हे शक्य आहे. केंद्राच्या निधींची विभाग फायदा घेऊ शकत नाही. त्यामुळे यावर नियंत्रण ठेवले पाहिजे. यासंदर्भातील जबाबदारी कोणावर तरी निश्चित केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, आयपीएचएसच्या निकषासाठी मनुष्यबळ असणे गरजेचे आहे. केंद्र सरकारने यासंदर्भात बऱ्याच अटी घातलेल्या आहेत. विशेष मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. यामध्ये राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने बिंदू नामावली प्रमाणे पद भरणे आवश्यक केल्यामुळे पदे भरण्याची संख्या थोडी कमी झाली आहे. तसेच नियमितपणे जे पद भरावयाचे होते त्यामध्ये स्थगिती आली होता परंतु नवीन शासन निर्णयानुसार ही स्थगिती आता उठवण्यात आली आहे. आता परिस्थिती थोडी सुधारते आहे. केंद्र शासनाच्या नॉर्म्समध्ये बसवून आयपीएचएससाठी विभाग तयार आहे.

वाशिम जिल्ह्यात गायनॉकॉलॉजिस्टसाठी सीएस, डेप्युटी डायरेक्टर यांच्या नियुक्तीबाबत परंतु ६-६ महिने होऊन सुद्धा ऑर्डर काढली जात नाही. आयपीएचएससाठी आणि नॉन इन्फेक्शीअस डिसीजसाठी करार पद्धतीवर डॉक्टर लावले तर लोकल डॉक्टर्स चांगल्या प्रकारे उपलब्ध होऊ शकतात व हॉस्पिटल्स चांगल्या प्रकारे चालू शकते. परंतु दुर्दैवाने डेप्युटी डायरेक्टर या दोन्ही गोष्टीकडे लक्ष देत नसल्यामुळे एक्सपर्ट डॉक्टर्स मिळत नाहीत. अशी नाराजी समितीने व्यक्त केली असता याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, या दोन्ही प्रश्नाची नोंद घेतली असून डेप्युटी डायरेक्टर आणि संबंधित अधिकाऱ्याबरोबर बसून यासंदर्भात आढावा घेऊन लवकरात लवकर पदे भरली जातील आणि विभागाला केंद्राकडून मिळणारा निधी कसा मिळेल यासंदर्भात निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील.

सडक अर्जुनीमध्ये आपण बराच खर्च केलेला आहे बांधकाम व इतर कामासाठी ९.५ कोटी रुपये खर्च केले असून आता डॉक्टर्स उपलब्ध आहेत अशी माहिती दिलेली आहे. त्यामुळे त्या प्रमाणे बेड ऑक्यूपेन्सी असली पाहिजे. या ठिकाणी बेड ऑक्यूपेन्सी किती आहे? यासंदर्भात विभागीय सचिवांनी आश्वासित केले की, या विषयाची संपूर्ण लेखी माहिती उपलब्ध करून देण्यात यईल तथापि माहिती अप्राप्त आहे.

सडकअर्जुनी येथील हॉस्पिटलमध्ये ऑपरेटर नाही, टेक्नीशियन्स नाहीत, चार डॉक्टर्सची नावे आहेत परंतु त्यापैकी दोनच डॉक्टर्स उपस्थित असतात, पदे भरली जात नाहीत. यंत्रसामग्री आहेत परंतु त्याचा वापर करणारे टेक्नीशियन्स आणि ऑपरेटर नसल्यामुळे त्यांचा वापर होत नाही असे समितीच्या निदर्शनास आले. विषयाच्या संदर्भातील संपूर्ण माहिती पुढील साक्षीच्या वेळी आपण आणावी. आपल्याला अजून खूप काही ब्रिफिंग घ्यावयाचे आहेत.

महालेखाकारांच्या आक्षेपांमध्ये पायाभूत सुविधा आणि देखरेख नाही अशा पीएचसी आणि सीएससीची संख्या दिलेली आहे. परंतु विभागाने त्यांच्या उत्तरामध्ये सर्व सुविधा पुरविण्यात आल्या आहेत अशी माहिती दिलेली आहे. २६ प्राथमिक आरोग्य केंद्र व ८७ उपकेंद्र हे २४ तास सुरू असून त्या ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध आहेत असे म्हटले आहे. परंतु या सुविधा २०११ पर्यंत उपलब्ध नव्हत्या परंतु आता त्या सुविधा उपलब्ध आहेत असे जे उत्तर दिलेले आहे ते खरे आहे काय? याबाबत विभागाकडून उत्तर आले नाही.

गोंदिया जिल्ह्यातील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तसेच पाण्याची गुणवत्ता यांसदर्भात साक्षीच्यावेळी प्रादेशिक पाणीपुरवठ्याच्या योजनेसंदर्भात राज्य शासनाचे धोरण काय आहे याची सविस्तर माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्याच्या ग्रामीण पाणीपुरवठ्याची परिस्थिती पाहिली तर राज्यात एकंदर ३४ जिल्हे असून ३५१ तालुके असून २७९२३ ग्रामपंचायती असून जवळपास ४१ हजार गावे आहेत. पाणीपुरवठ्याच्या संदर्भात विभाग दर वर्षी १ एप्रिल रोजी त्या त्या जिल्हापरिषदेमार्फत पाणीपुरवठ्यामध्ये हॅबिटेशन्स काढत असतो. ज्या ठिकाणी १०० पेक्षा अधिक घरे असतील त्या ठिकाणी पाणीपुरवठा कसा उपलब्ध करून द्यावयाचा यासंदर्भात विभाग प्रयत्न करीत असतो. राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम योजना केंद्र शासनाच्या सहकार्याने चालवली जाते तसेच यासंदर्भातील केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वे आहेत. यातील ५० टक्के हिस्सा राज्य शासन व ५० टक्के केंद्र शासनाचा आहे. सद्यःस्थितीत ग्रामीण पाणीपुरवठ्याची राष्ट्रीय पेयजल योजना आहे. अहवालानुसार १ लाख ६३९ हॅबिटेशन्स महाराष्ट्र राज्यात होते व त्यापैकी ८९,४५५ हाताळले आहेत. हाताळलेल्या हॅबिटेशन्समध्ये बोअरवाईज, विहीर वाईज, नळ पाणीपुरवठा योजनेद्वारे हाताळले आहेत. ११ हजार हॅबिटेशन्स हाताळले गेले नव्हते. यासाठी दर वर्षी जिल्हा परिषद, राज्य शासन आणि केंद्र सरकार एआयपी (ॲन्यूअल इम्प्लीमेंटेशन प्लॅन) तयार करीत असते. पाणीपुरवठ्याच्या कोणत्याही योजना न केलेल्याची संख्या ११ हजार असून या वस्त्या आपल्याला पुढील दोन वर्षात हाताळवयाच्या होत्या. यामध्ये काही निकष आहेत. ४० एमसीटीची गावे कोणती,त्यापेक्षा कमी एमसीटीची गावे कोणती असे निकष होते व त्या निकषाप्रमाणे विभागाने सर्व माहिती गोळा केली. ग्रामीण पाणीपुरवठ्यामध्ये राज्य सरकारने आतापर्यंत ३७९,८१ नळ पाणीपुरवठा योजना तयार केल्या आहेत. प्रादेशिक योजना ७०१ आहेत. राज्यामध्ये एकंदर ३९ हजार नळ पाणीपुरवठा योजना तयार केल्या आहेत. एकंदर १६८ प्रादेशिक पाणीपुरवठ्याच्या योजना बंद आहेत. १७९० स्वतंत्र योजना पूर्णपणे बंद आहेत. बंद योजनांमध्ये सुद्धा दोन कॅटेगरीज आहेत. कायम स्वरुपी बंद. यासाठी वेगवेगळी कारणे असतात. एकतर त्या योजनेचे जीवनमान संपलेले असते, काही योजनांचा उद्‌भव कोरडा झालेला असतो. यामध्ये स्वतंत्र १०६५ योजना बंद आहेत. ८१ ठिकाणच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना बंद आहेत. यामध्ये दुसरी कॅटेगरीज अशी आहे की, यापैकी कोणती योजना पुर्नजिवीत होऊ शकते हे शोधण्यात आले असून ५५७ स्वतंत्र योजना पुर्नजिवीत होऊ शकतात. तसेच यामध्ये ५७ प्रादेशिक योजना पुर्नजिवीत होऊ शकतात. सद्यःस्थितीत एकंदर ६४४ योजना बंद आहेत. यामध्ये थकीत वीज बिलापोटी ६३ योजना बंद पडल्या आहेत. देखभाल दुरुस्ती अभावी २०७ योजना बंद आहेत. उद्‌भव कोरडा झाल्यामुळे २१२ योजना बंद आहेत. योजना पुनरजिवीत होण्यासंदर्भात महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ ५० टक्के वीज देयक माफ करणार असून ५० टक्के वीज देयक राज्य शासन भरणार आहे. ५० टक्के वीज देयक राज्य शासन भरणार आहे त्यामध्ये या वर्षीच्या चौदाव्या वित्त आयोगाचे पैसे मिळणार आहेत, त्यामध्ये हप्ते बांधून दिले जाणार आहेत. हा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या बैठकीत ठेवला जाणार असून यामुळे विभागाचे बऱ्याच ठिकाणचे प्रश्न मार्गी लागतील. पाणीपुरवठा योजनेला विजेचे जे दर लावले जातात ते दर अनुदानित दराने मिळाले पाहिजे अशी विभागाची मागणी आहे.

याबाबत एमएसईबीकडे मागणी केलेली आहे. पाणीपुरवठा योजनेसाठी अनुदानित दराने वीज दर द्यावे अशी मागणी वारंवार होत आहे.बऱ्याच ठिकाणी १८ ते २० तास पंपिंग असते. त्यामुळे एक्सप्रेस फिडर घ्यावा लागतो. मात्र जास्तीत जास्त प्रादेशिक योजनांच्या तरतूदीमध्ये एक्सप्रेस फिडरची तरतूद नाही. कॅपिटल कॉस्टमध्ये दुरुस्ती होत नाही. त्यामुळे या स्कीममध्ये देखभाल दुरुस्तीची फार अडचण होते. देखभाल व दुरुस्तीच्या

कारणामुळे २०७ योजना बंद झाल्या आहेत. देखभाल, दुरुस्ती व उद्‌भव कोरडा होणे या कारणामुळे बंद पडणाऱ्या योजना लक्षात घेऊन विभागाने एक योजना प्रस्तावित केलेली आहे. राज्याची स्वतःची ग्रामीण पाणीपुरवठ्याची कोणतीही योजना नाही. याकरिता मुख्यमंत्री ग्रामीण पाणीपुरवठा योजना प्रस्तावित आहे. केंद्र शासनाचे असे निदेश आहेत की, राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत कोणतीही नवीन योजना हाती घेता कामा नये. अशाप्रकारे या कार्यक्रमांतर्गत नवीन योजनेवर निर्बंध घातलेला आहे. राज्यातील योजनांची संख्या दीड हजारपेक्षा अधिक आहे त्या योजनाच राष्ट्रीय पेयजल योजनेच्या निधीतून पूर्ण केल्या पाहिजेत असे केंद्र शासनाचे मत आहे. याकरिता विभाग एक नवीन योजना प्रस्तावित करीत असून त्यानुसार ३० टक्के निधी देखभाल, दुरुस्तीसाठी राखावे ठेवला जाणार आहे, जेणेकरून पुनरुज्जीवित करण्याजोग्या योजना दुरुस्त करता येतील. यापुढे ज्या जिल्हापरिषद किंवा ग्रामपंचायती या योजना चालवित असतील त्यांना १५ टक्के रक्कम अनुदानाच्या स्वरूपात मिळेल. अर्थात ज्या जिल्हापरिषद किंवा ग्रामपंचायतीची पाणीपुरवठ्याच्या देयकांची वसुली ८० टक्क्यांपेक्षा जास्त असेल त्यांनाच शासनाकडून ही १५ टक्क्यांची मदत मिळेल अशाप्रकारचे काही निकष असणारी एक योजना विभाग आणत आहे. परिणामी कायम स्वरूपी बंद असलेल्या काही योजना पुन्हा सुरू करणे शक्य आहे.

एक निश्चित आहे की भूजलाची पातळी खोल होत चाललेली आहे. म्हणून काही पाणीपुरवठा योजना सरफेस वॉटरच्या कराव्या लागतील. विदर्भात प्रादेशिक योजनेतंर्गत काही स्कीम्सचे काम हाती घतलेले आहे. परंतु, अनुभव असा आहे की, लोकांची सुरुवातीला मागणी असते, त्याप्रमाणे जिल्हापरिषद ठराव करते. कालांतराने देखभाल दुरुस्तीवर जास्त पाणीपट्टी येऊ लागली की, ग्राऊंड वॉटरवर आधारित अन्य सोर्स मधून लोक पाणी घेण्यास सुरुवात करतात. ते पाणीपट्‌टी देखभाल दुरुस्तीकडे लक्षच देत नाहीत. विदर्भातील अमरावती व नागपूर विभागामध्ये ग्राऊंड वॉटर लेव्हल चांगली आहे. नागपूर विभागामधील परिस्थिती पाहिली तर २० प्रादेशिक व ८४ स्वतंत्र पाणीपुरवठा योजना बंद आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील परिस्थिती पाहिली तर, सर्व गावांमध्ये स्वतंत्र स्कीम आहे. अशा ठिकाणी प्रादेशिकच्या स्कीम लोक फक्त टंचाईच्या २-३ महिन्यांच्या कालावधीपुरत्या वापरतात. त्यामुळे वर्षभराचा खर्च भरून निघत नसल्याने काही ठिकाणी त्याही योजना बंद आहेत. काही योजना त्यांनी स्वतंत्र योजनेत परावर्तित केलेल्या आहेत. एका योजनेत समजा १० गावे असतील त्यातील जी गावे देखभाल दुरुस्तीचा खर्च करण्याकरिता तयार असतील व ज्यांची मागणी असेल, त्यांना परवानगी देणे हे एक धोरण आहे. तसेच, जुन्या योजनांना पुनर्जिवीत करणे ही प्राथमिकता आहे.

काही गाव देखभाल दुरुस्तीचा खर्च करतात तर काही गावे करीत नाहीत. यामागे जिल्हापरिषदची आर्थिक परिस्थिती किंवा इतर काही कारणे असतील. याबाबतीत धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. योजना २-३ गावांपुरतीच असावी. एखाद्या योजनेत १५-२० गावे घेतल्यास ती बंद होते. काही ठिकाणी २-३ महिने योजना चालविणे परवडते. किती तरी गावांना प्रादेशिक योजना मिळत नाही. संपूर्ण जिल्हापरिषद मेटेनन्सची जबाबदारी घेत असेल तरच योजना केली पाहिजे. अन्यथा करता कामा नये.

वीज बिलाबाबत निती आयोग किंवा चौदाव्या वित्त आयोगाचा पैसा ग्रामपंचायतीला डायरेक्ट मिळाला पाहिजे. ग्रामसेवकांनी त्यातून वीज बिले भरली पाहिजेत. याबाबत जबाबदारी निश्चित केली पाहिजे. जेणेकरून वीज बिल भरले नाही, या कारणामुळे तरी योजना बंद होणार नाही. आरडीडीशी समन्वय साधला केले तर विज बिलाचा विषय सुटू शकेल.

विभागीय सचिवांनी या विषयाच्या अनुषंगाने माहिती दिली की, विभाग राज्यामध्ये सोलार पंपाचा प्रयोग करित असून या करिता अनुदान आहे व गेल्यावर्षी विभागाने १०० ते ३५० सोलार पंपाचे काम केले आहे. सौर ऊर्जा पंपांच्या दर कराराबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी पुढे नमूद केले की, मेढा या टेक्निकल संस्थेने सोलर पंपाचे काम करून दिले पाहिजे. ती संस्था ३ हॉर्सपॉवरच्या पुढच्या पंपाचे दर करार करतात. विभागाला या योजनेकरिता १ ते २ हॉर्सपॉवरचे पंप लागतात. विभागाची देखील मागणी आहे की मेढा या संस्थेने विभाग आरसी करून दिली तर ही योजना यावर्षी सुद्धा राबविता येईल. एमजेपीच्या प्रादेशिक योजनेत १-२ ठिकाणी सोलार पंप आणण्याचा प्रयोग करण्यात येत आहे. कर्नाटकमध्ये काही ठिकाणी हा प्रयोग झालेला आहे. जळगाव जामोद येथील एका स्कीममध्येही हा प्रयोग करण्यात येत आहे.

विभागीय सचिवांनी गोंदिया जिल्ह्याशी संबधित प्रश्न असतानाही संपूर्ण महाराष्ट्रभरातील परिस्थितीची अतिशय चांगली माहिती दिली आहे. असे मत व्यक्त करून या संदर्भात काही सूचना करताना समितीने सांगितले की, खरे तर सरफेस वॉटरसाठी काही प्राधान्यक्रम असला पाहिजे. कारण सरफेस वॉटर मधील दूषित पाण्यामुळे अडचण येते. जलयुक्त शिवार ही योजना राबविताना असा काही निकष ठरविले होते काय की, ज्या गावांमध्ये टँकरद्वारे जास्त पाणीपुरवठा करावा लागतो तेथे ही योजना राबवावयाची? तसेच जेथे भूगर्भातील पाण्याचा स्त्रोत असतो त्याच्या शेजारीच जलयुक्त शिवाराचे कामे केली आहेत काय? जलयुक्त शिवार योजनेतील कामे ही गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या स्त्रोताचा शेजारी करावीत. तसेच, सौर ऊर्जेकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबतच्या विषयाबाबत मुख्यमंत्री पाणीपुरवठा योजनेतून काही तरतूद करता येणे शक्य असल्यास ती करावी. वॉटर रिसोर्सेससाठी ट्रिपल आर योजना आहे. काही योजना पुनर्जिवित करणे गरजेचे आहे. त्यांना खर्चही कमी येणार आहे. ४० ते ४५ गावांचा समावेश असलेल्या योजना निष्फळ ठरलेल्या आहेत असेच दिसून येईल. याकरिता गाव तेथे योजना असे धोरण राबविले तर फायदाच होईल असे मत समितीने व्यक्त केले.

अशी किती गावे आहेत की जेथे टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो, किती ठिकाणी दूषित पाण्यामुळे योजना यशस्वी झालेली नाही. सदरहू गाव व वाड्या टँकरमुक्त करण्याकरिता कोणत्या उपाययोजना केल्या आहेत? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, ५४० गाव व ८९०

वाड्यांमध्ये अगदी यावर्षी नोव्हेंबर अखेर पर्यंत देखील ७४९ टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. हाच आकडा जून महिन्यामध्ये २००० पर्यंत होता. जलयुक्त शिवार अभियानाची कामे पाणीपुरवठ्याच्या उद्‌भवाच्या शेजारी करणे किंवा वॉटर सोर्सचे डबल मेझर्स घेतले पाहिजेत.

सदरहू गाव व वाड्या टँकरमुक्त करण्याकरिता विभागाने केलेल्या उपाययोजना कोणत्या आहेत. अनेक प्रादेशिक योजना बंद आहेत. त्या मागची कारणे पाहिली तर, योजनेच्या देखभाल व दुरुस्तीची तरतूद नव्हती. अनेक गावांकरिता ही योजना होती, मात्र वीज बिल भरावे लागणार वगैरे कारणांमुळे योजनेतून काही गावे बाहेर पडली व जी गावे या योजनेत राहिली त्यांच्यावर वीज बिलाचा भार पडला. बोदवड, मुक्ताईनगर अशा तालुक्यांचा अनुभव पाहिला तर पाणी पातळी नसतानाही नव्या योजना घेतल्या गेल्या त्यातील बहुतांश योजना निष्फळ ठरल्या. मग या योजना केल्याच कशाला? शाश्वत पाण्याचा स्त्रोत असूनही लक्ष दिले गेले नाही. अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे या योजना मोडकळीस आलेल्या आहेत. बिलाचा जो प्रश्न आहे त्याबाबत ज्या नगरपालिका, महानगरपालिका पाणी पट्टीही भरू शकत नाहीत त्या, ७ ते ८ हजारांची पाणी बिले देणार कशा? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, जेथे टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे, तेथे स्वतंत्र योजना ग्राऊंड वॉटरवर होते. मराठवाड्यामध्ये सरफेस वॉटरचा आढावा घेतला होता.तेथे पाण्याची पातळी ४ ते ५ मीटर खाली गेल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू झाला. या अनुषंगाने काही योजना स्वीकारता याव्यात म्हणून मधली सर्व गावे घेतली जातात. कारण २-३ गावे घेतली तर योजना करणे परवडत नाही.

तामिळनाडू, गुजरातमध्ये एकाच प्राधिकरणाकडे औद्योगिक पाणीपुरवठा, नागरी पाणीपुरवठा व ग्रामीण पाणीपुरवठा आहे. या तिन्ही प्रकारच्या योजना तेथे एकच संस्था करते. कोणत्याही योजनेच्या यशस्वितेकरिता अशी परिस्थिती आवश्यक असते की, ग्राहक आले पाहिजेत. विभागाची योजना २-३ योजना एकत्र करून केली असती व ही योजना शहरात राबविली असती आणि ग्रामीणचा काही भाग अनुदानित करता आला असता. परंतु, विभागाकडे केवळ ग्रामीण पाणीपुरवठा आलेला आहे. नागरी योजना विभागाकडे नाही. आमच्याकडे उद्योगाचे पाणी दिले असते किंवा शहराचे दिले असते तर निश्चितपणे सर्व योजना सस्टेशन झाल्या असत्या. मात्र अशाप्रकारची सुधारणा यापुढे केली पाहिजे.

काही ठिकाणी २ ते ३ महिने प्रादेशिकच्या योजना केल्या जातात. गोंदियासारख्या ठिकाणी १२०० ते १३०० मिलीमीटर एवढा पाऊस पडतो. तेथे प्रत्येक गावाच्या पाण्याच्या मुख्य स्त्रोताला जोडून नळ दिले आहेत. प्रादेशिक पाणीपुरवठ्याची संकल्पना युतीच्या काळात करण्यात आली. त्यानंतर जेव्हा जेव्हा टंचाईची परिस्थिती होती तेव्हा तेव्हा ती योजना वापरण्यात येते. गोंदिया येथे अशा ४-५ योजना आहेत की, ज्यांचा काही ठिकाणी फक्त टंचाईच्या वेळी वापर केला केला होता. त्याबाबत दोन महिन्यांपासून डीपीडीसीच्या माध्यमातून दबाव आणून देयक घेऊ नये याकरिता प्रयत्न सुरू आहेत. तसेच पाऊस झाल्यानंतर या योजना बंद झाल्या व काही ठिकाणी पाईपलाईन मोटार यांची चोरी झालेली आहे. विभागाने काही गावात स्वतंत्र योजना केलेल्या आहेत. कृती आराखड्यामध्ये सामील केलेल्या गावांना राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत योजना मिळत नसेल तर, त्यांना मुख्यमंत्री योजनेत सामील करणार काय? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, संपूर्ण राज्यासाठी विभागाने कृती आराखडा तयार केला आहे. केंद्राच्या योजनेत ज्या योजनांचा समावेश झालेला नाही त्या सर्व योजनांचा समावेश कृती आराखड्यात केलेला आहे.

प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेसाठी विभागास कोठून निधी मिळणार आहे? लोकांकडून पाणीपट्टी वसूल होत नाही आणि विजेची बिले देखील लोक भरत नाहीत. त्यामुळे देखभाल दुरुस्ती आणि विजेचे बिल भरणे ग्राम पंचायती आणि जिल्हा परिषदांना शक्य होत नाही. या योजना सुरू ठेवण्यासाठी लागणाऱ्या खर्चाची कोणतीही तरतूद त्यांच्याकडे नसते. अशा परिस्थितीत नळ पाणीपुरवठा योजना बंद पडतात. मागील काळात प्रत्येक गावासाठी शासनाने प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना सुरू केली. या योजनांवर शासनाचे पैसे खर्च झालेले आहेत. या योजनासाठी त्या काळात ५-१० लाख एवढा खर्च झाला आहे. सद्य:स्थितीत त्यासाठी ४० ते ५० कोटी रुपये खर्च येईल. काही गावांसाठी विभागाने विभागीय योजना केल्या आणि काही गावांसाठी केलेल्या नाहीत. ज्या गावांसाठी विभागीय योजना विभागीय केलेल्या नाहीत व जी गावे प्रादेशिक योजनेमध्ये समाविष्ट आहेत, त्यांच्यासाठी स्वतंत्र योजना सुरू करण्यात येणार का? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, योजना पूर्ण झाल्यानंतर त्या ग्राम पंचायतीला किंवा जिल्हा परिषदेला हस्तांतरित केल्या जातात. असे अपेक्षित आहे की, या योजना सुरू राहण्यासाठी ग्रामपंचायतीने किंवा जिल्हा परिषदेने योजनेत समाविष्ट असलेल्या लोकांना पाणीपट्टी बसविली पाहिजे व ती लोकांकडून वसूल केली पाहिजे. राज्यात दोन प्रकारची उदाहरणे आहेत. काही प्रादेशिक पाणीपुरवठा योजना अतिशय चांगल्या प्रकारे सुरू आहेत. तर काही बाबतीत अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळेच मुख्यमंत्री ग्रामीण पाणीपुरवठा योजनेमध्ये ५० टक्के खर्च देण्याचे प्रयोजन आहे.

जिल्हा परिषदेला नळ पाणीपुरवठा योजना सुरू ठेवण्यासाठी शासनाने सबसिडी दिली पाहिजे. या योजना सुरू राहण्यासाठी विद्युत मंडळाने योजनेच्या वीज दरामध्ये सुट दिली पाहिजे. असे समितीने सुचविले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कोणत्याही पाणीपुरवठा योजनेमध्ये एकूण खर्चाच्या ६० टक्के खर्च हा वीज देयकाचा असतो. हा खर्च कमी झाला तर या योजना व्यवहार्य होतील.

कुथडी येथील पाणीपुरवठा योजना सुरू करावयाची असेल तर त्यासाठी ४० ते ५० लक्ष रुपये खर्च येणार असून याबाबत जिल्हा परिषदेने तरतूद करण्यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या योजना पुनरुज्जीवित करावयाच्या आहेत त्या विभागाने शोधल्या आहेत त्या योजना देखील विभाग प्रस्तावित करीत आहे. एकूण उपलब्ध निधीपैकी ३० टक्के निधी या योजनांसाठी राखून ठेवण्यात येणार आहे. या योजना पुनरुज्जीवित करून जिल्हा परिषदेला हस्तांतरित केल्या जातील.

पुनरुज्जीवित करावयाच्या योजना, हा वेगळा विषय आहे. त्या योजनांसाठी तर शासनाने मदत केलीच पाहिजे. परंतु, ग्राम पंचायती किंवा जिल्हा परिषदेकडून पाणीपट्टी, वीज बिल यांची वसुली होत नाही. जिल्हा परिषदेकडे पाणीपुरवठा योजना चालविण्यासाठी अन्य निधी नसतो व त्यामुळे योजना बंद पडतात. या योजना सुरू राहण्यासाठी शासनाने जिल्हा परिषदेला सबसिडी दिली पाहिजे. याबाबत शासन काही विचार करणार आहे का? तसेच ज्या गावांमध्ये पाण्याची मुबलक उपलब्धता आहे, त्या ठिकाणी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना प्रस्तावित न करता गावासाठी योजना तयार कराव्यात. ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता नाही त्या गावांसाठी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना घ्याव्यात. काही भागात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो व प्रत्येक गावामध्ये पाण्याची उपलब्धता आहे. त्यामुळे त्या ठिकाणी प्रत्येक गावासाठी योजना सुरू करावी. सन १९९५ ते सन १९९९ या काळात गोंदिया येथे अनेक प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना सुरू झालेल्या आहेत. परंतु, त्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी आणि वीज देयकासाठी जिल्हा परिषदांकडे पैसे नसल्यामुळे त्या योजना बंद पडल्या आहेत. आता त्या सुरू करण्यासाठी आणि पुढे सुरू राहण्यासाठी शासनानेच मदत केली पाहिजे. या योजनांवर पूर्वी शासनाकडून खर्च झालेला असल्यामुळे त्यांचा फायदा लोकांना झाला पाहिजे, या दृष्टीकोनातून शासनाने आर्थिक मदत करण्याची आवश्यकता आहे असे मत समितीने व्यक्त केले.

रामपुरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेसंदर्भात सविस्तर खुलासा समितीस सादर करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, रामपुरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना (१० गाव १ वाडी), ता.अर्जुनी मोरगांव या योजनेतून सर्व गावांना पाणीपुरवठा योजना सुरळीत सुरू आहे. तसेच पाणीपट्टी वसुलीची टक्केवारी ७० टक्के आहे.

सन २००५-०६ या वर्षात जलस्वराज्य प्रकल्पामार्फत पाणी नमुने चाचणी घेण्यात आली असून त्यामध्ये २१६ गावे/वाड्या विविध घटाकंमुळे बाधित असल्याचे ऑगस्ट, २००७ मध्ये प्राप्त अहवालावरुन निदर्शनास आले. त्यापैकी १५७ गावे ही मार्च, २०१० अखेर हाताळण्यात आली आहेत. ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम हे मागणी अधारीत धोरण असल्यामुळे गावांच्या मागणीप्रमाणे व विभागाने सर्वेक्षण केल्यानुसार ५९ गावांपैकी सन २०१० ते २०१५ अखेर एकूण ५३ गावे हाताळण्यात आली. तसेच उर्वरित ६ गावांमध्ये अस्तीत्वातील असलेल्या पाणीपुरवठा साधानांद्वारे ग्रामपंचायत मार्फत पाणीपुरवठा सुरू आहे. याचाच अर्थ असा की, उर्वरित ६ गावांचा प्रश्न अजून कायम आहे. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, क्वालिटी ऑफ वॉटर हा विषय गेल्या वर्षापर्यंत आरोग्य विभागाकडे होता. आरोग्य विभागाकडून नमुने (sample) गोळा करून त्याची प्रयोगशाळेमध्ये तपासणी करण्यात येते. तथापि, सन २०१५ या पासून ही पूर्ण जबाबदारी पाणीपुरवठा विभागाने घेतली आहे. जीएसडीअेअंतर्गत महसूल विभागीय स्तरावर ६ ठिकाणी आणि अन्य २०० ठिकाणी प्रयोगशाळा (लॅब) सुरू केल्या आहेत. प्रत्येक तालुक्याला प्रयोगशाळा (लॅब) स्थापन करणार आहोत. या प्रयोगशाळांमध्ये पाण्याची तपासणी होईल. पाणीपुरवठा करण्यापूर्वी पाणी चांगले असले तरी वितरणामध्ये ते दुषित (कंटॅमिनेटेड) होते व मूळ पाणीपुरवठाच दुषित (कंटॅमिनेटेड) असणे, असे दोन प्रकार आहेत. यामुळे सरफेस वॉटर स्किम्स करण्याची आवश्यकता आहे. याबाबत दुसरा पर्याय असा आहे की, एक्झिस्टिंग सोर्सवर आर.ओ.यंत्रणा बसविणे. गेल्या वर्षी पहिल्यांदा राज्यामध्ये बुलढाणा जिल्ह्यामध्ये १०० आर.ओ.यंत्रणा बसविण्यात आल्या आहेत व त्यांच्या मेंटेनन्सची जबाबदारी ७ वर्षासाठी कंत्राटदारांकडे दिलेली आहे. कंत्राटदार १ वर्ष स्वतः ही यंत्रणा कार्यान्वीत ठेवेल आणि नंतर १० पैसे प्रति लिटर या प्रमाणे वसुली करील व त्या निधीत तो ही यंत्रणा चालविणार आहे. ही योजना बुलढाणा जिल्ह्यात यशस्वी झाली आहे. याच धर्तीवर अन्य ठिकाणी यंत्रणा बसविण्याचा प्रयत्न विभागाकडून करण्यात येणार आहे. त्यामुळे हा कमी खर्चाचा उपाय ठरणार आहे. जल स्वराज्य प्रकल्पामार्फत २१६ गावांपैकी २१० गावांची पाणी नमुना चाचणी घेतलेली आहे. उर्वरित ६ गावांबाबत विभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१५-२०१६ च्या प्लॅनमध्ये त्यांचा समावेश केलेला आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, गोंदिया मार्फत ७ प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. परंतु त्यापैकी ४ पाणीपुरवठा प्रादेशिक योजना संबंधित गांवानी हस्तांतरित न करून घेतल्यामुळे सदर ४ योजना बंद आहेत. या ४ गावांबाबत कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे? त्या गावांसाठी जिल्हा परिषदेला कायमस्वरूपी मदत करण्यात येणार आहे का? कारण शासनाने मदत केल्याशिवाय तेथील गावातील लोकांना फायदा मिळणार नाही अशी समितीची भावना असल्यामुळे याबाबत शासनाची मान्यता घेऊन एक महिन्याच्या आत समितीला अहवाल सादर करावा असे निदेश समितीने विभागास दिले. परंतु विभागाकडून सदर माहिती अद्यापपर्यंत अप्राप्त आहे.

गोंदिया शहरातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाबाबतची सद्यःस्थिती सांगताना सचिवांनी माहिती दिली की, मौजे टेमणी येथे खसरा नं.३.९९ मधील ३.७४ हेक्टर जमीन अधिग्रहित करण्याचा नगरपरिषदेचा प्रस्ताव होता. त्यापैकी ४ एकर ५० आर जमिनीचा ताबा नगरपरिषदेकडे आहे. उर्वरित जागा ताब्यात घेणे आवश्यक आहे. ही जागा नगरपरिषदेच्या ताब्यात आली तर स्वच्छ भारत अभियान किंवा चौदाव्या वित्त आयोगाचा निधी घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेकरिता वापरता येईल. चौदाव्या वित्त आयोगाचा निधी जागा अधिग्रहित करण्याकरिता वापरण्याबाबतच्या प्रस्तावास मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिलेली असून या बाबतचा शासन निर्णय लवकरच काढण्यात येईल. याबाबत गोंदिया तसेच इतर सर्वच नगरपालिकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना यांचे प्रमुख केलेले असून त्यांनी नगरपालिकांवर देखरेख करून त्यांच्याकडून सूचनांचे पालन करून घेणे आवश्यक आहे.

जागेच्या अधिग्रहणाशिवाय घनकचऱ्याचे व्यवस्थापन कसे होणार? मध्यंतरीच्या काळात नगरपालिकेने जी जागा निवडलेली आहे, तेथे घनकचरा नेण्यास लोकांचा विरोध होता. ती जागा घ्यायची की नाही घ्यायची याबाबतचा वाद नगरपालिका व गावातील लोकांमध्ये सुरू आहे.

कलेक्टरच्या माध्यमातून अशी माहिती देण्यात आली की, नवीन वेगळा रस्ता करण्यात येत आहे. तो रस्ता झाल्यानंतरच तेथे घनकचरा नेता येईल, नवीन ठिकाणाची अशी परिस्थिती आहे. याची काही विभागाकडे माहिती आहे काय? हे काम १० वर्षांत होऊ शकलेले नाही. मग नवीन रस्त्याचे काम कधी होणार, तो पर्यंत घनकचऱ्याचे व्यवस्थापन कोठे करणार हा प्रश्न अनुत्तरित आहे. केवळ जागा घेतल्याने हा प्रश्न संपणार नाही. घनकचरा व्यवस्थापनाबाबतची सद्य:स्थिती पाहून त्यातून लवकरात लवकर मार्ग निघेल याविषयी समितीने शंका व्यक्त केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, गोंदिया जिल्ह्याच्या अनुषंगाने सर्वच नगरपरिषदा हागणदारीमुक्त कशा करता येतील याबाबत आणि घनकचरा व्यवस्थापनाबाबत १०० टक्के प्रयत्न करण्यात येणार आहेत. स्वच्छ भारत अभियानांतर्गत त्याकरिता स्थानिक नियोजन काय करावयाचे, जिल्हाधिकारी यामध्ये काय करणार याबाबतचा अहवाल त्यांच्याकडून मागितलेला आहे. नागपूर अधिवेशन कालावधीत याबाबत केलेल्या नियोजनाच्या अहवालाबाबत बैठक घेण्यात येईल.

२०१४ च्या मागील नागपूर अधिवेशनात राज्यमंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात १५ दिवसांत जिल्हाधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन घनकचऱ्याचा प्रश्न मार्गी लावू असे सांगितले होते. आता त्याला एक वर्ष होत आले तरी हा प्रश्न सुटलेला नाही. रस्त्याचा प्रश्नही प्रलंबित आहे. तो कधी पर्यंत पूर्ण होणार आहे, त्यातून मार्ग कधी निघणार आहे, तोपर्यंत कचऱ्याचे व्यवस्थापन कसे होणार, कचरा इकडेतिकडे पडणार त्याचे काय? गोंदिया नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये कचरा पसरलेला असतो ही दुर्दैवाची गोष्ट आहे. ही बाब लज्जास्पद आहे. याबाबत तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता आहे. शिवाय तेथे मनुष्यबळाचीही आवश्यकता आहे. विशेषतः सफाईगारांची संख्या खूपच कमी आहे. २५ वर्षांपूर्वी जे सफाई कर्मचारी होते, त्याच्यातील अर्धे सफाई कर्मचारी आता अधिकारी झाले आहेत. काही अनुकंपा तत्वावर घेतलेले कर्मचारी दुसऱ्या पदावर गेले त्यामुळे सफाईगार कर्मचारी अतिशय कमी आहेत. काम जास्त आणि कर्मचारी कमी असल्याने कचऱ्याचे व्यवस्थापन कोण करणार, अशी परिस्थिती आहे. जागा मिळाली की विषय संपला असे हे नाही. वाढत्या शहरांच्या तुलनेत कर्मचाऱ्यांची संख्या घटत आहे. ५० वर्षांपूर्वीची कर्मचारी संख्या आता नाही, याबाबतही विचार झाला पाहिजे. याबाबत विभागाने काही उपाययोजना केली असल्यास त्याबाबतची माहिती द्यावी असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सर्वच जिल्हाधिकाऱ्यांना याबाबतचा सविस्तर आढावा घेण्यास सांगितलेले आहे. प्रत्येक स्थानिक पातळीवर वेगळी परिस्थिती असते. त्यामुळे त्या त्या ठिकाणची स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन दिनांक २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत कचऱ्याचे वर्गीकरण, गोळा करणे, वाहतूक, त्यावर प्रक्रिया कशी करणार याबाबतचे नियोजन जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक स्तरावर करून घेणे आवश्यक आहे.चौदाव्या वित्त आयोगाने त्याकरिता ५० टक्के निधी राखीव ठेवलेला असून या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत. विशेष प्रकारचे काम करण्याची आवश्यकता असेल तरीही प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत. गोंदिया जिल्ह्याबाबतचा सविस्तर अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राप्त करून सादर करण्यात येणार आहे. गोंदिया बरोबरच सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत सूचना देण्यात येणार आहेत.

जर नगरपरिषदेने दारोदारी कचरा जमा करण्याकरिता खाजगी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली तर, शासनावर कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतन वगैरेचा बोजा पडणार नाही. वाशिम नगरपालिकेमध्ये गेली ३ वर्षे अशाप्रकारे काम सुरू आहे. त्यामुळे एक तर शासनावर बोजा पडत नाही शिवाय कामाची जबाबदारीही निश्चित करता येते. संपूर्ण राज्याकरिता याबाबत काही धोरण घेतले पाहिजे. परंतु, ज्या नगरपालिका हे काम चांगल्याप्रकारे करतील त्यांच्यासाठीच ते आहे. बहुतांश नगरपालिका कंत्राट देतात परंतु, ते केवळ नावासाठी असते. कागदोपत्री कचरा उचलला जातो. प्रत्यक्षात तो जशाचा तसा असतो. त्यामुळे यावरही नियंत्रण असले पाहिजे असे केल्यास दिर्घ मुदतीत राज्यावर पैशाचा बोजाही पडणार नाही. गोंदियाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी एका कार्यक्रमांतर्गत प्रत्येक गल्लीतील कचरा साफ कलेला आहे. परंतु, काही नगरपालिका काम करीत नाहीत ही देखील वस्तुस्थिती आहे.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी विदित केले की, स्वच्छ भारत अभियानांतर्गतचे कार्यक्रम या राज्यात प्रभावीपणे राबवावयाचे असतील तर, जिल्हाधिकाऱ्यांना काही अधिकार व जबाबदारी दिली पाहिजे. कारण शेवटी ते त्या जिल्ह्याचे पालक असतात. त्यांनी सर्व नगरपरिषदा, ग्रामपंचायतींकडून काम करून घेणे अपेक्षित आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनाही कारवाई करण्याचे अधिकार दिले पाहिजेत. सन २०१९ पर्यंत याबाबतच्या सूचना करावयाच्या असल्याने त्याचा आराखडा कधीपर्यंत तयार करणार? रायगड जिल्ह्यात जागेची अडचण आहे. याकरिता काही कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला नाही तर, वर्षभर यामध्ये काही प्रगती होणारच नाही. त्यामुळे हे काम सन २०१९ पर्यंतही होणार नाही ते त्याच्याही पुढे जाईल यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, कचऱ्यावर प्रक्रिया करून, घन कचऱ्याची समस्या सोडविण्याबाबत वेगवेगळया महानगरपालिका किंवा नगरपरिषदा वेगवेगळया टप्प्यात आहेत. महाराष्ट्रातील काही नगरपरिषदा अशा आहेत की ज्या ३१ मार्च २०१६ पर्यंत १०० टक्के कचऱ्यावर प्रक्रिया करणार आहेत. तर काही नगरपरिषदांची जागेची अडचण आहे. त्यामुळे प्रत्येक विभाग व जिल्ह्यातील परिस्थितीनुसार त्या त्या स्तराचे नियोजन करण्यात आलेले आहे.

यावर समितीने सूचित केले की, अशा नगरपालिका किंवा नगरपरिषदांवर टप्प्याटप्प्याने तसेच मुदतीत काम करावयास सांगावे. जसे की, पहिल्या टप्प्यात काय केले पाहिजे, दुसऱ्या टप्प्यात काय केले पाहिजे हे ठरवून देण्यात यावे. तसेच, जागा निश्चित या वर्षीच झाली पाहिजे असे काही तरी नियोजन केले पाहिजे. कारण शेवटी नियोजनानुसारच कार्यवाही केली जाते. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ज्यांच्याकडे

जागा नाही त्यांना दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यंत जागा निश्चित करण्यास सांगितले जाईल. शासनाची जागा असेल तर हस्तांतरण लवकर होते. मात्र शासनाची जागा नसेल तर ती संपादित करावी लागेल, तशा सूचना देण्यात येतील.

घनकचऱ्यावर प्रक्रिया करून खत निर्मिती करणाऱ्या काही कंपन्या आहेत. विभागाने त्या करिता जागा व इतर सुविधा दिल्यास स्थानिक लोक हे काम करण्यास तयार होतील. त्यामुळे घनकचऱ्याचे व्यवस्थापन तर होईलच शिवाय स्थानिक रोजगाराचाही प्रश्न काही प्रमाणात सुटेल. शासनालाही या खताचे वाटप करता येईल असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, महाराष्ट्रात याबाबत ज्या काही कार्यपद्धती आहेत त्याचे एकत्रिकरण करण्यात येत आहे.हे काम १-२ महिन्यांत पूर्ण होईल. त्यामध्ये समितीने सुचविलेल्या बाबीचा देखील अंतर्भाव आहे.

घनकचरा व्यवस्थापनाकरिता नवीन रस्ता करण्याबाबत सांगितले गेले. यामध्ये काही तोडगा निघत असल्यास पाहावा. तसे नसेल तर किमान कचरा नेण्याकरिता अच्छादित ट्रॉलीचा, ट्रकचा वापर करावा. कारण गावातील लोक स्वास्थ्याच्या दृष्टीने उघड्या ट्रॅक्टर मधून कचरा नेण्यास परवानगी देणार नाहीत. त्यामुळे कचऱ्याकरिता गावाच्या बाहेर रस्ता केला तर ठीक आहे. ओपन बाऊंड्रीकरिता या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद नसल्याने नगरपालिकांना ते काम स्वतःच्या खर्चातून किंवा चौदाव्या वित्त आयोगाच्या पैशातून करावे लागणार आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबत माननीय उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. नगरपरिषदेने अशी भूमिका घेतली आहे की, हा जो निधी आहे त्याचा विनियोग स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत करणे अपेक्षित आहे. परंतु, ते काही बंधनकारक नाही. शासन यावर वेगळया प्रकारचा निर्णय घेऊ शकते. शासनाने असा निर्णय का घेतला याबाबत शासनाची बाजू माननीय उच्च न्यायालयासमोर सादर करण्यात येईल.

याप्रकरणी सर्वच नगरपालिका, जिल्हापरिषदा न्यायालयात जाऊन स्थगिती मिळू लागल्या आहेत. त्यामुळे यावर निर्णय करण्याची गरज आहे. प्रत्येक नगरपालिका अशी भूमिका घेऊ लागल्या तर करायचे काय? विभागाने या प्रकरणाकरिता चांगल्या वकिलाची नियुक्ती करावी जेणेकरून या प्रकरणी चांगला निर्णय होईल व तो संपूर्ण राज्यभरासाठी लागू होईल. स्थानिक संस्था सांगतात लोक १० टक्के लोकवर्गणी देण्यास तयार नाहीत. मात्र भूमिगत गटाराचे काम स्थानिक संस्था करतील असे त्या सांगतात. असे करण्यामागे त्यांचा काय उद्देश आहे, यामध्ये त्यांचा काही हेतु आहे काय हे पाहिले पाहिजे. कारण योजना तर पूर्ण झाल्याच पाहिजेत, नाही तर त्याचा त्रास सर्वांनाच होणार आहे. याकरिता विभागाने या प्रकरणी चांगला वकिल नेमावा व महालेखाकारांनाही याबाबत अवगत करावे. कारण एमजेपी अमृत योजना करणार असून त्या योजनेलाही चॅलेंज केलेले आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याचे परिणाम केवळ गोंदिया पुरते मर्यादित राहणार नाहीत तर, ते संपूर्ण महाराष्ट्रभर होणार असल्याने समितीच्या सुचनेप्रमाणे महालेखाकारांना याबाबत न्यायालयात उपस्थित राहण्याची विनंती करून शासनाने घेतलेला निर्णय कसा योग्य आहे, याबाबत माननीय उच्च न्यायालयात सांगण्यात येईल.

यासंदर्भात समितीने वाशिम जिल्हापरिषदेचे उदाहरण दिले. ती जिल्हापरिषद कोर्टामध्ये गेली व ती जिंकली देखील. त्यामुळे योजना मंजूर करताना नगरपालिकेकडे असलेला कर्मचारीवर्ग व योजना राबविण्याकरिता आवश्यक असलेली यंत्रणा यांचाही विचार झाला पाहिजे. अन्यथा पैशाचा अपव्यय होतो. गोंदिया येथे भूमिगत गटाराचे काम निधी अभावी ४ वर्षांपासून प्रलंबित आहे. तरी स्थानिक संस्थाचे लोक वेगळया हेतूने ते करु इच्छितात. योजना देताना संबंधित स्थानिक संस्थेकडे ती राबविण्याकरिता कर्मचारीवर्ग तसेच यंत्रणा आहे काय याबाबतची माहिती घेतली पाहिजे. नाही तर नंतर योजना तर अपूर्ण राहतातच शिवाय स्थानिक संस्था शासनाच्या विरोधात कोर्टात जातात. आर्थिक व तांत्रिक क्षमती नसलेल्या संस्थांना योजना मंजूर करताना विचार व्हावा. याबाबत शासनाने कायद्यात दुरुस्ती करावी आणि निदान राज्य शासनाच्या पैशांचा वापर करताना नगरपालिका, जिल्हापरिषदांची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही किंवा त्यांनी हस्तक्षेप करणे अपेक्षित नाही असे करावे. कारण जर नगरपालिका विरोधी पक्षाची असली तर, ते नाहरकत प्रमाणपत्र देत नाहीत असे मत समितीने व्यक्त केले.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, जेव्हा शासन एखाद्या योजनेला निधी देते तेव्हा ती योजना कार्यान्वित करणारी यंत्रणा कोणती असावी हे ठरविण्याचे अधिकार देखील शासनाला आहेत. या सर्व परिस्थितीचा विचार करून राज्य शासनाने एक निर्णय घेतलेला आहे. अमृत अभियानामध्ये संपूर्ण राज्यासाठी असा निर्णय घेतलेला आहे की, योजना कार्यान्वित करणारी यंत्रणा ठरविण्याचे अधिकार शासनाचे आहेत. ही सर्व माहिती माननीय उच्च न्यायालयासमोर जेव्हा हे प्रकरण येईल तेव्हा तांत्रिक क्षमतेसहीत सांगण्यात येईल.

शासनाने काहीही मंजूर करून दिलेले असले तरी जिल्हा परिषद किंवा नगर परिषद यांना त्यांच्या सर्वसाधारण बैठकीमध्ये ते मंजूर करून घ्यावे लागते. आमदारांनी सूचविलेले काम करायचे की नाही करायचे हे त्यांच्या सर्वसाधारसा बेठकीमध्ये ते संमत करून घ्यावे लागते. राज्य शासनाने मंजूर केलेला निधी देखील जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण बैठकीमध्ये जेव्हा मंजूर होतो, त्यानंतरच निधीचा वापर करता येतो अन्यथा नाही. हा चुकीचा नियम असून यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले. स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी आवश्यक आहे, कारण त्याची देखभाल दुरुस्तीचे काम स्थानिक संस्थांना करायचे असते. त्याच्या मंडळाची मंजूरी हवी हे चूकीचे आहे. त्या नियमामधून 'मंडळाची मंजूरी हवी' हे शब्द काढायला पाहिजे. त्या संस्थेची मान्यता का हवी असते कारण त्याच्या देखभाल दुरुस्तीचे काम त्यांना करायचे असते.

जेव्हा विभाग योजना मंजूर करतो तेव्हा स्थानिक स्वराज्य संस्थाकडून प्रस्ताव घेण्यात येतो आणि प्रस्ताव घेताना त्यांची मान्यता घेण्यात येते की, योजनेची स्थानिक स्वराज्य संस्था देखभाल दुरुस्ती करतील. यापुढील जे काम असते, ते कोणी करावे याला नगरपालिकेची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. याबाबतच्या नियमात दुरुस्ती करावी. The Government has taken initiative in this scheme. अमृत योजनेमध्ये अट घालण्यात आली आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, आता याबाबत मंत्रिमंडळाचा निर्णय झालेला आहे.

नगरपरिषदेने वार्षिक लेखे सादर केले नाहीत. Non submission of Annual Accounts by the Municipal Council याबद्दल विभागाचे काय म्हणणे आहे. त्याबद्दल विभागाकडून उत्तर आले नाही. शेवटचा मुद्दा अंतर्गत लेखा परिक्षण केले नाही हा आहे.

मंडळाची मान्यता घेतली पाहिजे. ३० जूनच्या अगोदर जिल्हाधिकाऱ्याला अहवाल सादर केला पाहिजे. २०१५ पर्यंत स्टेटमेंट ऑफ अकाऊंट दिले नाही. जिल्हाधिकाऱ्याकडून बजेट मंजूर करून घेतले का? अंतर्गत लेखा परिक्षण केले का? अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, स्टेटमेंट दिले आहे. विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, दरवर्षी बजेट मंजूर घेतले जाते. वार्षिक लेखा अहवाल मुदतीमध्ये पाठवायला पाहिजे होता तो थोडा उशीरा पाठविला. दोन्ही नगरपरिषदने सन २०१२-२०१३ पर्यंत सर्व अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाला सादर केले. अहवाल सप्टेंबर, २०१५ मध्ये सादर केले.

अहवाल सप्टेंबर २०१५ मध्ये सादर केले. यावरुन यामध्ये आर्थिक अनियमितता आहे हे स्पष्ट होते. याबाबतची जबाबदारी कोणावर निश्चित केलेली आहे व त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात अशी विचारणा समितीने केली.

यासंदर्भात महालेखाकारांनी असे मत व्यक्त केले की, सन २००६ ते २००८ चा जे लेखे होते ते त्यांनी लेखापरिक्षकाच्या प्रमाणपत्राशिवाय प्रसिद्ध केले होते. आता सुद्धा जे लेखे आहेत त्याला ऑडिट चे सर्टिफिकेशन आहे किंवा कसे, की पुन्हा तसाच प्रकार सुरू आहे हे तपासावे लागेल.

यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, आता जो महालेखाकारांनी जो मुद्दा काढला आहे. त्याबाबत तपासून माहिती देण्यात येईल.

लोकल फंड ऑडीटकडून हे सर्व तपासून घेतले पाहिजे. तरच कलेक्टरला स्टेटमेंट सादर करणे समर्थनिय होईल असे मत समितीने व्यक्त केले याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, त्यांनी वेळोवेळी विहित मर्यादेत सादर करणे महत्त्वाचे आहे.

सन २०११ मध्ये पॅरा आला. त्यानंतरसुद्धा चार वर्षे झाली. लेखापरीक्षण लोकलेखा समितीची साक्ष लागली म्हणून लेखे सादर केलीत हे योग्य नाही. साक्ष लागली नसती तर आतापर्यंत अहवाल सादर केला नसता. आमचा मुद्दा असा आहे की, ज्यांनी दिरंगाई केली त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी तसेच त्यांच्यावर कारवाई करून याबाबत समितीला कळवावे विभागीय सचिवांनी यास मान्यता दर्शविली.

याबाबत ज्या काही योजना आहेत. त्यामध्ये अनेक योजनांचे पैसे आहेत. त्यामध्ये वैशिष्टयपूर्ण योजना असो, दलित वस्ती सुधार योजनेचे पैसे असो, तेराव्या वित्त आयोगाचे पैसे असो, गोंदियामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदनामध्ये काम करणाऱ्या लोकांना मी विचारले की, निधी मिळाल्याशिवाय स्टेटमेंट काढत नाहीत किंवा कामाचे नियोजन करीत नाही. निधी आल्यानंतर तो निधी नगरपालिकेच्या करंट अकाऊंटमध्ये एक ते दिड वर्षे पडून राहतो. मागच्या चार, पाच वर्षापासून त्यांना सांगत आहे, हे सर्व पैसे फिक्स डिपॉझीटमध्ये ठेवणे आवश्यक आहे. त्यावर दरवर्षी ५० ते ६० लाख रुपये व्याज मिळेल. हया पैशांचे नियोजन त्या योजनेसाठी केले पाहिजे. वैशिष्टयपूर्ण योजनेमधील पैसे खर्च करता येत नाही. परंतु त्याबाहेर पैसे खर्च झाले आहेत. या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यकाळात सुद्धा अंडर ग्राऊंड ड्रेनेज योजनेचे पैसे सुद्धा तसेच इतरत्र खर्च झाले.

ही अत्यंत गंभीर गोष्ट आहे. व्याजाचे ४ ते ५ कोटी रुपये सर्व नगरपालिकांनी वाया घालविले. सन २००९ पासूनचे पूर्ण लेखापरीक्षण आपण तपासण्यात यावे. त्यामध्ये व्याजाचे पैसे किती आहेत, ते पैसे त्याच योजनेवर खर्च झाले का, नाही झाले असतील तर ते पैसे कोठे खर्च झाले, व कोणी खर्च केले. तसेच नियमाविरुद्ध दुसऱ्याच योजनेवर खर्च केला असल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून त्याला निलंबित केले पाहिजे असे समितीने सूचित केले तयावर सांगितले की, यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना कळविलेले आहे.

अंतर्गत लेखा परिक्षण न करण्याचे कारण काय आहे? अशा प्रकारचा घोळ करून चार ते पाच वर्षे घालवायची, नंतर सर्व आलबेल आहे असे दाखवण्यात येते.

पाणीपुरवठा योजना असो, इंटरर्नल ड्रेनेज सिस्टीम असो, दलित वस्ती योजना असो, १३ वा वित्त आयोग असो ज्या योजनेचे पैसे असतील त्याच योजनेवर खर्च केले पाहिजे. ज्या योजनेच्या पैशाचे व्याज आले असेल ते व्याज त्याच योजनेवर खर्च करायला पाहिजे. १२५ कोटी रुपयांची अंडर ग्राऊंड ड्रेनेज सिस्टीमची योजना आहे. जेव्हा ही योजना पूर्ण होईल तेव्हा १७५ कोटी रुपये लागतील. योजनांच्या व्याजाचे पैसे स्थानिक संस्थेचे पदाधिकारी नगरपालिकेवर खर्च करून टाकतात. कारण मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विभागाने स्वाक्षरीचे पूर्ण अधिकार दिलेले आहेत. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यामध्ये १०० टक्के जबाबदार आहे. त्यांनी काही अनियमिता केली असल्यास त्यांना निलंबित केले पाहिजे. याबाबतची मागिल पाच वर्षातील माहिती घेवून समितीला एक महिन्याच्या आत केलेल्या कार्यवाहीची माहिती सादर करावी. तसेच यासंदर्भात ज्यांनी चुका केल्या असतील त्यांच्यावर कारवाई करावी अशी सूचना समितीने केली.

विभाग इतक्या राज्याच्या योजना मंजूर करतो त्यामध्ये भूमीगत गटार योजना असो की कोणतीही पाणीपुरवठा योजना असो त्यांना अंतर्गत लेखापरीक्षण करून मागच्या वर्षीपर्यंतचे लेखापरीक्षण अहवाल मागवून घ्यावेत. महाराष्ट्रातल्या ९० टक्के मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी येथे माहिती दिली असेल की, दुपटीने वाढ लागू केली. परंतु १० टक्के सुद्धा लागू झाली नाही. तेव्हा स्थानिक स्वराज्य संस्था कोणतीही योजना मंजूर करत असतांना विभागाने त्यांच्याकडून आवश्यक गोष्टी पूर्ण केल्या व त्याबाबतची नोंद घेतल्यानंतरच त्याच्या योजना घेण्यात याव्यात व प्रस्ताव मंजूर करावेत.

यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, या सूचनेची नोंद घेतली आहे. १४ व्या वित्त आयोगातून ९० टक्के निधी सरसकट नगरपरिषदांना त्यांच्या हक्काचा निधी म्हणून मिळणार आहे. परंतु १० टक्के निधी त्यांनी ऑडीटकरिता राखून ठेवला आहे. ऑडीट लेखे सादर झाले तर १० टक्के निधी प्राप्त होणार. ऑडीटबद्दल दोन-तीन सूचना करतो. राज्यात ऑडीटचे पॅनेल तयार केले पाहिजे. डी.ए.टी.ने पॅनेल केले आहे.

लेखापरीक्षणाबद्दल सूचना करताना समितीने सांगितले की, राज्यात लेखापरीक्षणाची नामिका तयार करण्यात यावी. अमरावती, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, खांदेश यामध्ये अंतर्गत लेखापरीक्षणाची नामिका तयार केल्यानंतर त्या संस्थेला दोन वर्षाचे लेखापरीक्षण एका नगरपालिकेला द्यायचे नंतर चक्रानुक्रमाने बदलून टाकायचे. ते मोठ्या संस्थांना देण्यात यावे. लेखापरीक्षणाचे पैसे त्या नगरपालिकेला अदा करण्यास सांगावे.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली व सांगितले की, लेखापरीक्षणाबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाने नामिका तयार केली आहे. 'अ' वर्ग नगरपालिकेकडे लेखापरिक्षक नाही म्हणून मागच्या चार ते पाच वर्षापासून त्यांना वित्त विभागाकडून लेखापाल उपलब्ध करून दिला होता. सध्या लिपिकाला लेखापाल म्हणून नेमणूक देण्यात येते कोणालाही लेखापरिक्षक म्हणून नेमणूक द्यायची. कमीत कमी अ-वर्ग नगरपालिकेला लेखापाल आणि लेखापरिक्षकाची पदे वित्त विभागाच्या माध्यमातून दिली तर एक प्रकारची आर्थिक शिस्त बसू शकेल. कोणालाही नेमणूक दिली तर आर्थिक शिस्त राहणार नाही. शासनाने गोंदिया जिल्ह्याला लेखापाल आणि लेखापरिक्षक दिले पाहिजे अशी सूचना समितीने केली.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी वित्त विभागाच्या प्रतिनिधींना विनंती केली की, त्यांनी प्राधान्याने नोंद घेऊन गोंदियासाठी अकाऊंटंट आणि ऑडीटर दिले पाहिजे. यावर सचिव, वित्त यांनी संदर्भातील प्रस्तावाचा तपशिल देण्याबाबत सांगितले.

हे काम दोन भागामध्ये करू. जेथे पद मंजूर आहेत तेथे वित्त विभागास मंजूर असलेले पद भरून देण्याबाबत विनंती करण्यात येईल. जेथे पद नसेल तेथे पद निर्मितीची प्रक्रिया करण्यात येईल. अ-वर्ग नगरपालिकांमध्ये सर्व ठिकाणी पदे असून वित्त विभागाला पद भरण्यासाठी विनंती करण्यात येणार आहे. ज्या ज्या नगरपालिकेमध्ये कार्यक्षम लोक नाहीत. तेथे प्रतिनियुक्तीने कर्मचारी पाठविण्यात यावा. गोंदियामध्ये लेखापाल कार्यक्षम नाही. याची मुख्य कार्यकारी अधिकारी यांना माहिती द्यावी. या नगरपालिकेमध्ये लेखापाल वित्त विभाग पुरवित नाही. पर्यायाने ही आर्थिक अनियमितता सुरू आहे. ते कोणालाही लेखापाल म्हणून नेमणूक देण्यात येते. पदे केडरवर भरली पाहिजेत. क्लार्कला त्या ठिकाणी पदोन्नती देऊन पदे भरली जातात. त्यामुळे ह्या अडचणी निर्माण होतात. ज्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी पद शासन देते त्याप्रमाणे लेखापालाचे पद दिले पाहिजे. गोंदिया नगरपालिकेने लेखापालाची मागणीसुद्धा केलेली आहे.

मागे बी.डी.ओ. व इतर खालच्या पदावरील लोकांना नगरपालिकेमध्ये ५-७ वर्षापूर्वी पदोन्नती देऊन मुख्य अधिकारी केले. ज्यांची योग्यता नाही असे लोक मुख्य अधिकारी झाले. त्यांना एका स्वाक्षरीमध्ये सर्वकाही करण्याचे अधिकार दिले. येणाऱ्या भविष्यकाळात मुख्य अधिकारी हा मालक झालेला असेल. कमीत कमी अशा लोकांना प्रमोशन देऊन मुख्य अधिकारी करू नये असे समितीने सुचविले.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणी केली होती की, त्याप्रमाणे १५० नवीन मुख्य अधिकारी १ मे २०१३ रोजी मिळतील.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नवीन १५० मुख्य अधिकाऱ्याबाबत समितीने सूचना केली की, त्यासर्वांना मोठ्या नगरपालिकेत दोन-दोन वर्षे डेप्युटी चिफ ऑफिसर, डेप्युटी कमिशनर म्हणून नेमणूक द्यावी. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, विभाग याबाबत धोरण तयार करतो आहे त्यानुसार पहिली नियुक्ती ही मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून न देता सहायक आयुक्त किंवा उप आयुक्त म्हणून 'अ' वर्ग नगरपालिकेत देण्यात येईल. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सहायक आयुक्त व उप आयुक्त हे मेट्रोमधून बाहेर येणार नाहीत.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, विभाग याबाबतही धोरण तयार करतो आहे. नगरविकास विभाग हा असा एक विभाग होता की, ज्याच्यामध्ये बदलीचे धोरण नव्हते. यासंदर्भात ३० डिसेंबर पर्यंत धोरण तयार करतो आहोत. बदलीचे धोरण सर्व विभागांमध्ये आहे त्याच्या निकषाबद्दल माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, पूर्वी महाराष्ट्रात आलेल्या प्रत्येक आय.ए.एस. ऑफिसरला जिल्हा परिषदेला पाठवायचे. आता विभागाने सामान्य प्रशासन विभागाला विनंती केली आहे की, सामान्य प्रशासन विभागाकडे १० परिविसाधीन आय.ए.एस. अधिकारी आले तर त्यातील ५ अधिकारी ग्रामीण भागाला द्यावेत. तसेच दुसरे ५ आय.ए.एस. अधिकारी एस.डी.ओ. झाल्यानंतर नगरविकास विभागाला देण्यात यावे म्हणजे 'अ' वर्ग नगरपालिका व 'क' आणि 'ड' वर्ग महानगरपालिकेमध्ये त्यांना नियुक्ती द्यावी.

दिनांक २४ नोव्हेंबर २०१५ ला साक्ष झाली, त्यामध्ये पीजीच्या संदर्भातील विषय उपस्थित झाला होता. पीजीला जे डॉक्टर जातात, त्यांची पदे नीट दाखवत नाही. विभागाने त्याबद्दल सांगितले होते की, त्या संदर्भात वित्त विभागाला प्रस्ताव पाठविला आहे. समितीने सांगितले होते की, त्या प्रस्तावाची एक प्रत समितीला द्यावी. परंतु अजून ती प्रत दिलेली नाही. वॉक-ईन-इंटरव्यू संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती झाली आहे. विभागाने शासन निर्णय काढला आहे की, त्यांना या संदर्भातील अधिकार आहेत. आपण त्या संदर्भातील शासन निर्णय देणार होता, तो सुद्धा दिलेला नाही.

किती उप केंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र यांची कामे प्रलंबित आहेत, किती खर्च होणार आहेत? त्याचा पूर्ण आढावा देण्यात येणार होता. यासाठी जवळपास ४ हजार कोटी रुपये लागणार आहेत असे विभागाने सांगितले होते. त्या संदर्भातील विस्तृत माहिती देणार होता. मात्र ती सुद्धा अजुनपर्यंत दिलेली नाही. विभागाने या तीनही विषयांच्या संदर्भात माहिती द्यावी किंवा तत्संदर्भातील कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, पीजीला डॉक्टर जातात त्यांची अधिसंख्या पदे निर्माण करण्याबाबत त्यांच्यासाठी अधिसंख्या पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाला यापूर्वीच सादर झाला आहे. सध्या तो प्रस्ताव नियोजन विभागाकडे आहे. मुख्य सचिवांकडे तत्संदर्भातील बैठक देखील झाली होती. तेथे सुद्धा त्यावर थोडी चर्चा झाली होती, त्यांनी सांगितले होते की, विभागाने फाईल सादर करावी. तसेच जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर समिती करून त्यांना अधिकार देण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी प्रलंबित आहे. अजून कार्यवाही झालेली नाही. याबाबतचा शासन निर्णय काढलेला नाही शासन निर्णय काढणारच.

एक प्रस्ताव विभागाने यापूर्वी शासनाला सादर केला होता आणि त्यास ४/५ दिवसांपूर्वीच मान्यता मिळाली आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली त्या जिल्ह्याचे सिव्हिल सर्जन व जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा समावेश असलेली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्याबाबतचा प्रस्ताव विभागाने सादर केला होता. आता हा प्रस्ताव मान्य झाला असून या संदर्भातील सविस्तर शासन निर्णय विभाग काढणार आहोत. ही कार्यपद्धती अवलंबिल्यामुळे यामध्ये निश्चितच फरक पडेल असे वाटते.

आम्ही या संदर्भात दोन गोष्टी केल्या आहेत. डॉक्टरांची भरती हा एक विषय आहे. विभागामध्ये अ, ब, क, ड वर्गासाठी असलेली सर्व रिक्त पदे भरण्याची कार्यवाही पॅरलली सुरू आहे. शासनाकडून ती पदे भरण्यासाठी परवानगी मिळाली असून त्याची प्रक्रिया देखील सुरू झाली आहे.

७५ टक्के पदे भरण्यासंदर्भात आपल्याला मान्यता मिळाली आहे. ही रूटिन प्रोसेस आहे. सदर भरती थांबलेली होती. ३ टक्क्यांच्या वर भरती करू नका असे सांगितले होते. आता ७५ टक्के भरती झाली आहे. विभागीय सचिवांनी समितीला सांगितले की, त्यांना वॉक-इन-इंटरव्यूची ऑर्डर मिळाली आहे, शासन निर्णय काढला आहे. आता शासन निर्णय काढला नाही असे सांगण्यात येत आहे. आपण त्यावेळी दिलेली माहिती चुकीची होती का?

४-५ दिवसांपूर्वीच मान्यता मिळाली आहे असे सांगितल आहे. कदाचित कॉन्व्हर्सेशन चुकीचे झाले असेल. समितीला शासन निर्णयाची अपेक्षा होती. शासन निर्णय मिळाला नाही म्हणून शासन निर्णया संदर्भात विचारले. यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यांनी चुकीची माहिती दिली नाही. विभाग लवकरच आदेश काढणार आहे. फक्त विभाग दिनांक २४ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या कार्यवृत्ताची वाट पहात होता. त्यावरून माहिती दिली असती.

यावर समितीने अशी सूचना केली की, आपण आमच्या कार्यवृत्ताची वाट न पाहता विभाग जी काही माहिती सादर करण्याचे आश्वासन देतो ती द्यावी. आपणाकडून यामध्ये वेळ देखील सांगण्यात आला असून १०-१५ दिवसांत माहिती द्यावी असे सांगितले आहे. आम्ही झालेल्या साक्षीच्या आधारे आणि दिलेल्या कागदपत्रांच्या आधारे अहवाल तयार करतो. समितीने वारंवार तोच विषय कशासाठी निदर्शनास आणून द्यायच्या? योगायोगाने बैठक जवळपास ५० दिवसांनी होत आहे. समितीला या दृष्टीने वाटले की, ही सर्व कागदपत्रे विभागाकडे आली असतील म्हणून विचारले. नेमकी प्रोसिजर काय आहे? विभागीय सचिव साक्ष देतात, त्यावेळी जीआर काढू असे सांगितले जाते. साक्षीच्या वेळी नोटिंग येथे केले जाते की कार्यवृत्त पाठविल्यावर केले जाते, अधिकारी स्वतः नोट डाऊन करतात की नाही?

स्टाफ नोट करीत असतात. स्टाफने नोटिंग केले नसेल तर एवढा ताफा कशासाठी आणायचा, एवढा ताफा सरकारचा पगार वाया घालवायला आणता का? पाठीमागे बसून ते फिडिंग करणार नसतील तर ते योग्य नाही. प्रधान सचिवांनी समितीला पुरवायला काय सांगितले आहे ते पाहिले पाहिजे. समितीच्या कार्यवृत्तासाठी विभाग थांबत असेल तर ते ठीक नाही. नवीन पद्धत सुरू होणार आहे की, आपण बैठकीचे कार्यवृत्त पाठवायचे आणि त्या आधारे विभाग कार्यवाही करणार. मग कार्यवृत्तावर सर्वांची स्वाक्षरी झाली का ते पाहिले जाईल. विभागाचे लोक पाठीमागे बसलेले असतात.

समितीच्या सुचनेवरून जीआर निघालेले नाहीत. सचिव महोदयांनी सांगितल्याप्रमाणे अगोदरच कार्यवाही केली आहे. माहिती दिली पाहिजे होती. कार्यवृत्तासाठी थांबले जाते हे बरोबर नाही.

एखाद्यावर कारवाई करायची आहे अशी समितीची सूचना असेल तर त्यासाठी कार्यवृत्त पाहिजे. माहिती पुरविण्यासाठी कार्यवृत्ताची गरज नाही. विभाग ती माहिती पुरवित नसेल तर ते बरोबर नाही. आज जी माहिती दिली ती वस्तुस्थितीला धरून नाही. आपत्तीजनक आहे असे मत समितीने खेदाने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, समितीला अपेक्षित असणारी माहिती देण्यात येईल. तथापि अद्याप माहिती प्राप्त नाही.

पुढील मुद्दा बांधकामासाठी लागणाऱ्या निधीबाबत होता. विभाग मंजूर करीत असलेल्या पीएचसी, आरएच यांची कामे डीपीसीतील तरतूद झाल्याशिवाय होत नाहीत. त्यामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशनात नियम ९७ चा प्रस्ताव विधानपरिषदेत घेण्यात येणार आहे. एखाद्या ठिकाणी पीएचसी किंवा आरएच मंजूर करतो, त्याची तरतूद केल्याशिवाय मंजुरी देऊ नये. कारण जिल्हा स्तरावर डीपीसीशिवाय हे देत नाही. डीपीसी हे त्या भागातील डिस्ट्रिक्ट मिनिस्टरचे प्रेरोगेटिव्ह आहे. एखाद्याला द्यायचे आहे, द्यायचे नाही, कोणत्यापक्षाचा, गटाचा, संघटनेचा आहे किंवा नाही हेही असते. गावातील पीएचसी, शाळा या बाबींच्या बांधकामाला अर्थसंकल्पीय तरतूदच करावी असा आग्रह मांडण्यासाठी कागदपत्रे हवी होती असे मत समितीने व्यक्त केले.

संपूर्ण राज्यातील पीएचसी, सब सेंटर यांच्या बांधकामांसाठी पैसे लागणार आहेत. वस्तुस्थिती आहे की, डीपीसीमध्ये ज्यांना पैसे मिळणार आहेत त्यांनाच मिळणार आहेत, बाकीच्यांना मिळणार नाहीत. त्यामुळे संपूर्ण राज्यासाठी राज्य निधीतून शासनाने पैसे दिले पाहिजेत या दृष्टीने प्रस्ताव आणला पाहिजे. कारण डीपीसीच्या डिस्ट्रिक्ट प्लॅनमधून पीएचसीला पैसे मिळतात किंवा पूर्वी एनआरएचएमच्या पीआयपीमध्ये पैसे मिळत होते. आता मिळत नाहीत. सदर विषय शासनाचा आणि लोकप्रतिनिधींचा आहे. विभागाला किती निधी पाहिजे या संदर्भातील राज्याचा आराखडा तयार असला आहे. आपल्याला ५०० पीएचसींची दुरूस्ती करावयाची आहे असेही सांगितले आहे. त्यामुळे त्या दृष्टीने निधीची किती आवश्यकता आहे, किती बांधकाम नियोजन आहे या संदर्भात काही आराखडा तयार केला पाहिजे. इतक्या मोठ्या प्रमाणात सब सेंटर, पीएचसी मंजूर केल्या तर आराखडा दरवर्षी ठरला पाहिजे. एकाच वेळी सर्व होणार नाही, त्यामुळे या दृष्टीने शासनाने केलेल्या नियोजनाबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, अधिसंख्या पदनिर्मितीबाबत प्रस्ताव शासनाला पाठविला आहे. सध्या तो प्रस्ताव नियोजन विभागाकडे आहे. बांधकामासाठी किती निधी लागणार आहे? केळकर समितीचा अहवाल आला होता, त्या अनुषंगाने संपूर्ण राज्यात किती अनुशेष राहतो, किती निधी हवा आहे, मास्टर प्लॅनप्रमाणे आजपर्यंत इन्स्टिट्युशन बांधता आल्या नाहीत याची संपूर्ण माहिती विभागाने तयार केली आहे. ती देखील शासनाला सादर करण्यात येणार आहे. ती अजून सादर केलेली नाही. कारण शासनाने ती मागितली नाही. एका बैठकीत माननीय वित्त मंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, अनुशेषासाठी लागणाऱ्या निधीच्या संदर्भात संपूर्ण आराखडा करून द्या, मग पैसे देऊ. त्यांनी ही सूचना वित्त विभागाला केली होती, विभागाने त्या अनुषंगाने माहिती तयार करणे सुरू केले. मास्टर प्लॅनप्रमाणे सर्व ठिकाणी इन्स्टिट्युशन करण्याची वेळ आली तर जवळपास ४ हजार कोटी रूपयांपर्यंतचा हिशेब निघतो.

जेव्हा या विषयावर एका बैठकीमध्ये मुख्य सचिवांसमोर चर्चा झाली त्यावेळी असे निदर्शनास आले की, या सर्व कामांसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणावर एकदम निधी देणे शक्य होणार नाही. शिवाय केवळ बांधकामाचा नव्हे तर पदनिर्मितीचा प्रस्ताव सुद्धा शासनासमोर आणावा लागेल. एकंदरीत त्या बैठकीमध्ये असे ठरले की, ज्या ठिकाणी बांधकाम सुरू आहे आणि निधी उपलब्ध आहे त्या ठिकाणी ७५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त बांधकाम झालेल्या संस्थांची तसेच त्या ठिकाणी आवश्यक असलेल्या पदांची यादी तयार करावी. त्यासाठी नेमक्या किती पदांची आवश्यकता आहे त्याची माहिती सादर करावी. तद्नंतर त्या कामी दरवर्षी टप्प्याटप्प्याने निधी देण्यात येईल. ७५ टक्क्यांपेक्षा जास्त बांधकाम झालेल्या संस्था साधारणतः १५० पेक्षा जास्त आहेत. या संस्थांच्या २ हजार पदांना मान्यता देण्यासाठी विभागाने मागच्या महिन्यात शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे. २०१६-१७ मध्ये एकूण किती बांधकामासाठी नेमक्या किती निधीची आवश्यकता आहे त्याचा वेगळा प्रस्ताव तयार करून नियोजन विभागाकडे अर्थसंकल्पीय तरतूदीच्या मागणीसाठी सादर केला आहे. उदाहरणार्थ या सर्व कामासाठी ४ हजार कोटी रुपयांची गरज असली तरी टप्प्याटप्प्याने निधीची मागणी करण्यासाठी पहिल्या टप्प्यातील प्रस्ताव सादर केला आहे. कारण हे काम एकाच वेळी होऊ शकत नाही.

राज्याच्या बृहत आराखड्यानुसार राज्यात किती प्राथमिक आरोग्य केंद्रे वा उप केंद्रे मंजूर झाली व निधीअभावी किती केंद्रांचे बांधकाम सुरू झाले नाही, या संदर्भातील विभागनिहाय माहिती समितीला दिली तर ते सोयीचे होईल. तसेच या कामासाठी डीपीसी मधून तरतूद करावी. मी जाणून घेऊ इच्छितो की, ग्रामीण रुग्णालयाला डीपीसी मधून निधी दिला जातो काय? गोंदिया जिल्ह्यात २०११ च्या अनुषंगाने सर्व्हे झाला होता. त्यावेळी सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत ३१ संस्थांचा अनुशेष निघाला होता. विभागाने कालांतराने तेथे २९ उप केंद्र आणि ७ प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर केले. सदरहू संस्थांचे बांधकाम करण्यासाठी किंवा अनुशेष दूर करण्यासाठी विभाग काय नियोजन करणार? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, या संदर्भातील माहिती समितीला उपलब्ध करून देण्यात येईल. ग्रामीण रुग्णालय यासाठी राज्य निधीतून निधी दिला जातो.

परंतु एका ग्रामीण रुग्णालयाला तेथील सिव्हील स्ट्रक्चरसाठी डीपीसीकडून पत्र आलेले आहे याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, आरएच किंवा एसडीएचसाठी राज्य निधीतूनच निधी दिला जातो. प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम डीपीसीमधून करण्यात येते.

राज्यात ४०० प्राथमिक आरोग्य केंद्रे मंजूर केले असतील तर प्रत्यक्षात ५-५० ठिकाणीच काम झालेले असते. त्यामुळे कॅरिफॉरवर्ड करण्यात आलेली रक्कम पूर्वीएवढीच असते. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करताना अर्थसंकल्पीय तरतूद केल्याशिवाय ते मंजूर करता कामा नये असे केल्यास आदिवासी भागात निधीअभावी जी बांधकामे करणे शक्य नाही ती कामे पूर्ण होऊ शकतील. किंबहुना दरवर्षी ३० मार्च रोजी जे पुनर्विनियोजन होते ते होणार नाही. समाजकल्याण विभाग व आदिवासी विकास विभागाकडे जादा निधी असतो. त्यामुळे त्या विभागाने त्या त्या भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा उप केंद्रांसाठी निधी वळता करून दिला तर ती कामे होऊ शकतील.अनेकदा निधी खर्च व्हावा म्हणून ३० मार्चला योजना बदलली जाते. सर्वसाधारण अनुभव असा आहे की, ३० मार्चला ऑर्डर आणि देयक एकाच दिवशी मंजूर केले जाते. आदिवासी

भागात माडा किंवा मिनी माडा असेल त्या क्षेत्रात प्रस्तावित नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा उप केंद्राचे बांधकाम करण्यासाठी निधीची अडचण असेल तर त्यासाठी समाजकल्याण किंवा आदिवासी विकास विभागाचा निधी वळता केला तर ते बांधकाम पूर्ण करता येईल. यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाला अगोदर समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग आणि वित्त व नियोजन विभाग या सर्व विभागांशी चर्चा करावी लागेल. शासनाकडे तालुक्याच्या शेवटच्या व्यवस्थेचे नियंत्रण करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ नाही. यासाठी डीपीसीमधून हे काम झाले तर त्याचे सुपरव्हिजन जिल्हा स्तरावरुन होऊ शकेल असे मत समितीने व्यक्त केले, यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, या संदर्भात लोक लेखा समितीने शासनाला डायरेक्शन्स द्याव्यात. आदिवासी विकास विभाग आणि समाजकल्याण विभागाचा जो आराखडा आहे त्या अनुषंगाने आदिवासी भागातील बांधकाम निधीअभावी थांबले असेल आणि ते बांधकाम उक्त विभागाच्या निधीतून करण्यास सांगितले तर चांगलेच होईल.

राज्यात आरोग्य केंद्रांचे बांधकाम करण्यासाठी मोठ्या स्वरूपात आराखडा तयार केला जातो. परंतु त्यातील कोणती कामे प्राधान्याने सुरु करावीत हे ठरविले जात नसल्यामुळे अनेक ठिकाणी निधीअभावी कामे अर्धवट अवस्थेत राहतात. एखाद्या प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा उप केंद्राच्या इमारतीचे बांधकाम १ कोटी रुपयात होत असेल तर त्यासाठी विभाग केवळ ६० लाख रुपये देतो. परिणामी ते काम पूर्ण होत नाही. विभागाने बांधकामाच्या बाबतीत प्राधान्यक्रम ठरविल्याशिवाय हे काम होऊ शकणार नाही. तसेच कामे पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

जी बांधकामे निधीअभावी पूर्णत्वास येत नाहीत ती बांधकामे आदिवासी विकास विभाग किंवा सामाजिक न्याय विभागाच्या निधीतून करण्याबाबत समितीने जे सुचविले त्याच्याशी विभाग सहमत आहे काय? यासंदर्भात विभागीय सचिवांनी समितीच्या सूचनेचे स्वागत केले व सांगितले की, आदिवासी आणि मागास भागात आरोग्य केंद्रांची गरज आहे, परंतु निधीअभावी ती बांधकामे पूर्ण होत नसतील तर त्या ठिकाणी नियमित निधी व्यतिरिक्त उक्त विभागाच्या निधीतून बांधकाम पूर्ण झाल्यास चांगलेच आहे.

अनेकदा आदिवासी विकास विभागाची बहुतांश रक्कम ३० मार्च रोजी अखर्चित म्हणून परत जाते. परंतु अनेकदा मूळ योजनेमध्ये ३० मार्च रोजी सकाळी बदल करून सायंकाळपर्यंत संबंधितांच्या स्वाक्षरीसह ती योजना बदलली जाते. त्यामुळेच आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय विभागाचा निधी अशाप्रकारे या भागात खर्च करण्याच्या समितीच्या मताशी विभाग सहमत आहे काय? याबाबत विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली व सांगितले की, काहीना काही कारणामुळे अनेकदा निधी अखर्चित राहतो. तो निधी बृहद आराखड्यानुसार त्या भागातील गरज पूर्ण करण्यासाठी मिळाला तर त्यातून अनेक बांधकामे पूर्ण होऊ शकतात. कारण सार्वजनिक आरोग्य विभागाकडे उक्त बांधकामे करण्यासाठी सध्या निधी नाही.

समितीची अपेक्षा एवढीच आहे की, जर निधीअभावी बांधकामे होत नसतील तर ती आदिवासी उपयोजनेमध्ये बसवून पूर्ण करावयास पाहिजेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी आदिवासी उपयोजनेतून निधी दिला तर निधीची अडचण उद्‌भवणार नाही.

चुकीच्या प्रथा टाळण्यासाठी या संदर्भातील जी काही कार्यवाही करावयाची असेल ती १५ मार्च तारीख गृहीत धरुन करावी लागेल. १५ मार्च रोजीच आपल्याला कळेल की, कोणत्या विभागाचा किती निधी अखर्चित राहणार आहे. कामे करताना प्राधान्यक्रम ठरवून ती कामे पूर्ण केली पाहिजेत.

पण जोपर्यंत अशी कामे त्या विभागाच्या कामाच्या यादीमध्ये समाविष्ट करणार नाही तोपर्यंत हा निधी वर्ग करता येणार नाही. माननीय वित्त मंत्र्यांनी असे सांगितले आहे की, कोणतीही देयके १५ मार्चपूर्वी मंत्रालय पातळीवर यावयास पाहिजेत. १५ मार्च नंतरच्या देयकांचा स्वीकार केला जाणार नाही.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडून बराच निधी कम्युटेड करून ठेवला जातो. त्यामुळे ३१ मार्च नंतर सुद्धा तो निधी व्यपगत होत नाही. तो निधी दुसऱ्या वर्षात कॅरिफॉरवर्ड होतो. प्रत्येक विभागाला अंदाज असतो की, आमच्या विभागाच्या माध्यमातून अमुक इतका निधी खर्च होणार नाही. त्यामुळे प्रत्येक विभाग तो निधी कम्युटेड करून ठेवतो. त्यामुळे मास्टर प्लान करताना प्रत्येक विभागाशी समन्वय साधून आपली कोणती कामे करावयाची आहेत या बाबत अभ्यास करावा लागेल.

आदिवासी विकास विभागाकडे निधीची कमतरता नाही. त्यामुळे आदिवासी विभागाच्या प्लानमध्ये त्या भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच उप केंद्रांचे बांधकाम करण्याच्या अनुषंगाने विभागाने या संदर्भात मागणी करावी असे मत समितीने व्यक्त केले.

गोंदिया जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उप केंद्रांच्या ठिकाणी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यामध्ये काही प्रमाणात विलंब झाला होता. कालांतराने तेथे सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. सध्याच्या परिस्थितीत गोंदिया जिल्ह्यात सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत २९ केंद्रांचे बांधकाम सुरू आहे त्याची यादी समितीला द्यावी. उक्त जिल्ह्यामध्ये किती प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम सुरू आहे? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, खोडशिवनी येथे प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम सुरू आहे. शिवाय काही विषय हे वेगवेगळ्या विभागामध्ये प्रलंबित आहेत. खोडशिवनी येथे एनआरएचएमच्या माध्यमातून बांधकाम सुरू आहे. त्यांच्याकडून बांधकामासाठी ७० लाख रुपयांची मागणी करण्यात आली आहे. या मागणीचा विभागाने या वर्षीच्या पीआयपीमध्ये समावेश केला आहे. ते लवकरच सादर करण्यात येईल. त्यामुळे हा निधी विभागाला मिळेल. कारण हे काम सुरू राहणारे आहे.

सन २०१५-१६ च्या पीआयपी अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील आरोग्य केंद्रांच्या बांधकामासाठी मिळालेला तसेच गोंदिया जिल्ह्यात मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणावर असलेली कमतरता व कामाच्या सद्यःस्थितीबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, २०१५-१६ मध्ये एनआरएचएम अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी २. ५५ कोटी आणि उप केंद्रांसाठी २.९१ कोटी, अशाप्रकारे एकूण ५. ८४ कोटी रुपये मिळाले आहेत. जर त्या वर्षी बांधकाम सुरू झाले नाही तर ती रक्कम दुसऱ्या वर्षात कॅरिफॉरवर्ड सुद्धा करता येईल.

खोडशिवनी येथील काम सुरू आहे. हे काम जवळजवळ ८५ टक्के पेक्षा जास्त झाले आहे. या कामासाठी अजून पीआयपी मधून निधी मिळेल. उर्वरित बांधकामे विविध स्तरावर प्रलंबित आहेत. त्या संदर्भातील पाठपुरावा सुरू आहे. खमारी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या बाबतीत चार बाबी आहेत. पहिली बाब म्हणजे ती जागा वन विभागाची होती. आता त्या जागेचा ताबा मिळाला आहे. या संदर्भातील प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी महसूल विभागाकडे पाठविला होता. महसूल विभागाने त्या प्रस्तावामध्ये खूप त्रुटी काढल्या होत्या. त्या त्रुटींची पूर्तता करून तो प्रस्ताव पुन्हा महसूल विभागाकडे सादर केला आहे. आता या विषयी जिल्हाधिकारी स्पॉट व्हिजीट करून अहवाल देणार आहेत.

गोंदिया जिल्ह्यात २९ उप केंद्रांचे काम प्रगतीपथावर आहे. २९ पैकी १२ कामे मानव विकास मिशन आणि एनआरएचएमच्या माध्यमातून सुरू आहेत. यातील जवळजवळ ८०-९० टक्के कामे प्रगतीत आहेत. या कामांसाठी निधीची अडचण नाही. उर्वरित १७ कामांमध्ये वेगवेगळा पाठपुरावा सुरू आहे.

१२ कामांमध्ये ८० टक्क्यांपेक्षा जास्त काम झाले आहे. त्यामुळे उक्त ठिकाणी आवश्यक पदनिर्मितीबाबत विभागीय सचिवांनी विदित केले की, समाजमंदिरामध्ये आरोग्य सेवेची व्यवस्था करण्याबाबत विभागाने पदनिर्मितीचा प्रस्ताव अगोदरच दिलेला आहे. पदनिर्मितीला मान्यता मिळाली तर कार्यवाही करता येईल.

विभागाने पदनिर्मितीचा प्रस्ताव सादर केला आहे. परंतु प्रस्तावाच्या आधारावर प्रत्यक्षात मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे काय, विभागाने सादर केलेला प्रस्ताव शासनाकडून मान्य होणार आहे काय, सदरहू प्रस्तावाची सद्यःस्थिती काय आहे, मार्चपूर्वी पदनिर्मिती होणार आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, गोंदिया जिल्ह्यातील काही ठिकाणी पदनिर्मितीच्या प्रस्तावांना मंजुरी सुद्धा मिळालेली आहे आणि त्या संदर्भातील प्रक्रिया सुद्धा सुरू करण्यात आली होती. परंतु काही ठिकाणी कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी भरती प्रक्रियेत जागा राखीव ठेवाव्यात म्हणून उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये याचिका दाखल केली आहे. मुख्यतः कंत्राटी पद्धतीवर असलेल्या एएनएम यांनी न्यायालयात दाद मागितली. त्यामुळे सद्यःस्थितीत हे प्रकरण न्यायालयात आहे. विभागाने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन प्रतिक्षा यादी सुद्धा तयार करून ठेवलेली आहे. माननीय उच्च न्यायालयाने स्थगिती उठविल्यानंतर, शासनाने पदनिर्मितीला दिलेल्या मंजुरीनुसार भरती प्रक्रिया सुरू करण्यात येईल. कंत्राटी कर्मचाऱ्यांची मागणी आहे की, त्यांच्यासाठी जागा राखीव ठेवाव्यात. परंतु मुळात कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्यांसाठी पदे राखीव ठेवण्याचे शासनाचे धोरण नाही. त्यामुळे विभागाने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे की, माननीय न्यायालयाचा स्थगनादेश उठला तर तातडीने ती पदे भरु शकतो आणि त्या संस्था त्वरित सुरू होऊ शकतात.

समितीने असे मत व्यक्त केले की, गोंदिया जिल्ह्यात सर्वसाधारण अनुभव असा आहे की, काही जण न्यायालयात जाऊन काम थांबविण्याचा किंवा व्यवस्था कोलमडविण्याचा प्रयत्न करतात. या माध्यमातून शासनाची कायदेशीर बाजू कमजोर केली जाते. गोंदिया जिल्ह्यात प्रत्येक कार्यालयात कंत्राटी पद्धतीवर काम करणारे लोक नवीन भरती प्रक्रिया राबवू देत नाहीत. ते प्रत्येक वेळा भरती प्रक्रियेमध्ये कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्यांना प्राधान्याने संधी द्यावी म्हणून आग्रह धरतात. परिणामी, प्रत्येक कार्यालयातील पदे रिक्त आहेत. अनेक कार्यालयात भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. परंतु शेवटच्या टप्प्यात कंत्राटी पद्धतीवरील कर्मचाऱ्यांनी त्या भरती प्रक्रियेवर स्थगिती आणली. त्यामुळे शासनाने या बाबतीत ठोस भूमिका घेतली पाहिजे.

यासंदर्भातील वस्तुस्थिती विभागीय सचिवांनी मान्य केली व सांगितले की, कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मागणी आहे की, प्रथम त्यांना सेवेत कायमस्वरुपी सामावून घ्यावे व त्यानंतर नवीन भरती प्रक्रिया राबवावी. कंत्राटी कर्मचाऱ्यांनी विभागाच्या जाहिरातीला अनुसरुन अर्ज करावा. भरती प्रक्रियेत कंत्राटी पद्धतीवरील कर्मचाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल, अशी विभागाची भूमिका आहे. परंतु कंत्राटी पद्धतीवरील कर्मचाऱ्यांसाठी जागा राखीव ठेवता येणार नाहीत. त्यामुळेच या प्रकरणी न्यायालयीन खटला दाखल झाला आहे. विभागाने न्यायालयात शासनाची बाजू मांडलेली आहे. लवकरच न्यायालयाची स्थगिती उठेल अशी विभागाला अपेक्षा आहे.

कॉन्ट्रॅक्टवरील कर्मचारी कोर्टात गेले आणि भरती प्रक्रिया थांबविली हा नेहमीचा येणारा विषय आहे. काम थांबू नये म्हणून कॉन्ट्रॅक्टवर उमेदवारांची नेमणूक करण्यात येते. अशी पद भरती विभाग थांबवू शकत नाही. यासंदर्भात समितीने सूचना केली की, करारावर उमेदवारांची भरती न केल्यास हा प्रश्नच उद्‌भवणार नाही. कारण करारावरील कर्मचाऱ्याने २, ४, ५ वर्षे काम केल्यावर त्यांना कायम करण्यात यावे, अशी त्याची अपेक्षा असते. त्यामुळे करारावरील पदे भरताना त्या, त्या पदावरील उमेदवाराची नियुक्ती शासकीय नियमानुसारच केली पाहिजे. जेणे करून काही वर्षांनी त्यांना कायम करण्याची वेळ आल्यावर चांगले उमेदवारच त्या पदावर नियुक्त होतील. परंतु करारावर पदांची भरती करायची असल्याने यामध्ये गांभीर्य घेतले जात नाही. उमेदवाराची शैक्षणिक पात्रता न पहाता त्याला कामावर घेतले जाते. परंतु त्या उमेवाराकडून काही वर्षांनी कायम करण्यात यावे, असा आग्रह केला जातो. त्यामुळे या विभागाची पदे करारावर भरताना शासकीय भरती प्रक्रियेप्रमाणेच किंवा त्या, त्या पदांची भरती

ज्या नियमानुसार, शैक्षणिक पात्रतेनुसार होते, त्याच नियमानुसार करारावरील पदांची भरती करण्यात यावी असे झाल्यास त्या कर्मचाऱ्यांना कायम करावे लागल्यास, कॉलीफाईड व अनुभवी उमेदवारांची त्या पदावर कायम स्वरुपी नियुक्ती होईल.

गोंदिया जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्यामुळे ती आयपीएचएसमध्ये बसत नाहीत. गोंदिया जिल्ह्यातील केवळ दोनच आरएच आयपीएचएसमध्ये बसतात. या बाबतीत शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, गोंदिया जिल्ह्यांमध्ये जिल्हा रुग्णालय, महिला रुग्णालय, एसडीएच, आरएच आणि पीएचसी मिळून एकूण ५२ इन्स्टीटयुटस आहेत. विभागाला ८१ इन्स्टीटयुटस आयपीएचएस अंतर्गत घ्यावयाची आहेत त्यासाठी दरवर्षी पीआयटीमध्ये मागणी करण्यात येते. परंतु याबाबत मान्यता मिळत नाही. या वर्षी मान्यता मिळालेली आहे. आयपीएचएसखाली २९ सेंटर्सला मान्यता दिलेली आहे. गोंदिया जिल्ह्यामध्ये पीआयटीखाली ८४ कोर्सेस ॲप्रुव्हड आहेत.

एकूण ८४ पदे मंजूर आहेत, परंतु आपण ८८ पदे भरलेली आहेत. ५२ संस्थापैकी जिल्हा रुग्णालय -दोन, महिला रुग्णालय- दोन, उप केंद्र-१, दहा ग्रामीण रुग्णालयापैकी ४ आणि ३९ प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी २२ आरोग्य केंद्रे ही आयपीएचएसखाली कव्हर झालेली आहेत.

आयपीएचएसखाली देवरी, तिरोडा, मोरेगाव आणि मोरगाव अर्जुनी ही चार ग्रामीण रुग्णालये कव्हर झालेली आहेत.

सडक-अर्जुनीसंबंधी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने समितीने अशी सूचना केली की, आयपीएचएसमध्ये सर्व ग्रामीण रुग्णालयांचा समावेश झाला पाहिजे. कारण त्या ठिकाणी मोठमोठी इन्फ्रास्ट्रक्चर असतात, चार-चार डॉक्टर्स असतात, एक्स-रे मशीन्स असतात. समितीच्या मताशी विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली व सांगितले की, सन २०१२-२०१३ फक्त एकच ग्रामीण रुग्णालय आयपीएचएसखाली होते. परंतु आता चार ग्रामीण रुग्णालये आयपीएचएसखाली आहेत. विभाग सर्व ग्रामीण रुग्णालये आरपीएचएसखाली कव्हर करण्याचा प्रयत्न करीत आहे.

एखादी संस्था आरपीएचएसखाली आणली जाते. त्यावेळी आपणास भारत सरकारचे निकष पाळावे लागतात. एखाद्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये १० पेक्षा कमी डिलिव्हरी होत असतील तर त्या प्राथमिक आरोग्य केंद्राला आयपीएचएसखाली आणू शकत नाही. ग्रामीण रुग्णालयासाठी २० पेक्षा कमी नसाव्यात आणि जिल्हा रुग्णालय व महिला रुग्णालयांसाठी कमीत कमी १५ डिलिव्हरी होणे आवश्यक आहे, अशाप्रकारच्या अटी आहेत. जर परफॉर्मन्स कमी आला तरी विभाग कर्मचारी वर्ग काढून घेत नाही.

त्यावर समितीने असे निदर्शनास आणून दिले की, रजेगाव येथे वर्षभरात फक्त पाच-सहा डिलिव्हरी होतात. परंतु अशी परिस्थिती अन्य ग्रामीण रुग्णालयांमध्ये नाही. बाकीची ग्रामीण रुग्णालये आयपीएचएसच्या नॉर्म्सखाली येतात. विभागास आयपीएचएसचा चांगला उपयोग करावयाचा असेल तर ज्या ठिकाणी जास्त ओपीडी आहेत त्या रुग्णालयाचा आयपीएचएसमध्ये समावेश केला पाहिजे आणि जी ग्रामीण रुग्णालये नॉर्म्समध्ये बसत असतील त्यांना प्राधान्य दिले पाहिजे, अशी सूचना समितीने केली.

याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, जी रुग्णालये नॉर्म्समध्ये बसत आहेत त्या सर्व रुग्णालयांना प्राधान्य दिलेले आहे. दहा ग्रामीण रुग्णालये आयपीएचएसच्या नॉर्म्समध्ये बसत असतील तर ती रुग्णालये यामध्ये समाविष्ट होऊ शकतील त्यासाठी तेथे २० डिलिव्हरी होणे आवश्यक आहे.

रजेगाव वगळता अन्य सर्व भागांतील रुग्णालये आयपीएचएसमध्ये बसतात. आयपीएचएसच्या नॉर्म्समध्ये जी ग्रामीण रुग्णालये येतात त्यांचा समावेश सन २०१६-२०१७ मध्ये करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल.

ग्रामीण भागातील उप केंद्र आणि प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वर्ग-१ ते वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांची किती पदे रिक्त आहेत?

या जिल्हा शल्यचिकित्सकाकडे वर्ग-१ ची ३५ पदे मंजूर असून त्यापैकी २५ पदे रिक्त आहेत. एकूण ६९ पदे आहेत. त्यापैकी १८ पदे रिक्त आहेत. पीजीवर चारजण गेले आहेत. अलीकडे भरती केल्यामुळे ही २२ पदे रिक्त आहेत. कौन्सीलिंगद्वारे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मेडिकल ऑफीसरची पदे भरण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. तरी सुद्धा काही उमेदवार हजर झाले नाहीत. परंतु मागील वर्षाचा अनुभव पाहता यावर्षी कौन्सीलिंगद्वारे पोस्टींग प्रक्रिया केली, त्यामध्ये विभागाला थोडेसे यश मिळालेले आहे. म्हणजे रुजू होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. पूर्वी नियुक्ती दिल्यानंतर १८ ते २० टक्के उमेदवार रुजू होत होते. परंतु यावर्षी समुपदेशन करून नियुक्ती दिल्यामुळे ५० ते ६० टक्के उमेदवार रुजू झाले आहेत. त्यामुळे राज्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एक तरी वैद्यकीय अधिकारी आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दोन डॉक्टर्स असतात आणि ते देखील बीएएमएस असतात. जेथे पीजीसाठी पाठविण्यात येणाऱ्या ठिकाणी किमान एक डॉक्टर एमबीबीएस असला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले. विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

गोंदिया हा आदिवासी आणि नक्षलग्रस्त जिल्हा आहे. तेथील रिक्त पदे भरण्यासंदर्भात विभागीय सचिवांनी माहिती दिली की, आता रिक्त पदांसाठी पुन्हा जाहिरात दिलेली आहे. मागील ऑक्टोबर, २०१५ महिन्यात भरती प्रक्रिया पूर्ण केली. त्यावेळी ५० टक्के उमेदवार हजर झाले तर उर्वरित ५० टक्के उमेदवार हजर झाले नाहीत. जे उमेदवार रुजू झाले नाहीत त्यांच्या नेमणुका रद्द केलेल्या आहेत. विभागाकडे बिंदू नामावली तयार असल्यामुळे विभागाने त्वरित २६० पदांची दुसरी जाहिरात काढली असून ती प्रोसेस सुरू आहे. तसेच आम्ही नवीन बिंदू नामावली तयार करीत आहे. त्यानंतर एक जाहिरात काढण्यात येणार आहे. ही नेहमीची प्रक्रिया आहे.

सीएसच्या अंतर्गत असलेल्या रुग्णालयातील डॉक्टर्स आणि इतर संवर्गातील रिक्त पदे केव्हा भरणार आहात? वर्ग-१ च्या ३५ पदांपैकी ९ पदे भरलेली आहेत तर २७ पदे रिक्त आहेत याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सीएस अंतर्गत २५ पदे रिक्त आहेत, जिल्हापरिषद अखत्यारितील रुग्णालयात २ पदे आणि कुष्ठरोग अधिकाऱ्याचे एक पद अशी एकूण वर्ग-१ ची २८ पदे रिक्त आहेत. आयपीएचएस आणि एनएचएमखाली स्पेशालिस्ट भरण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सीएचसी स्तरावरील रिक्त पदे एनएमएचमार्फत स्पेशालिस्टची २२ पदे भरण्यात आली आहेत. त्याशिवाय एनएचएमद्वारा सी.एसमध्ये स्टाफ नर्सेस-३५,लॅब टेक्निशियन-१३,पीओ- २९, मेडिकल ऑफीसर ६७, एएनएम, डीपीएम अशी एकूण २७० पदे भरलेली आहेत. डीएचओ स्तरावरील रिक्त पदांसाठी एनएमएच आणि आयपीएचएसद्वारा ४०१ चा कर्मचारी वर्ग दिलेला आहे. त्यामध्ये एएनएम, स्टाफ नर्स, लॅब टेक्निशिअन, एनएचबी, बीपीएम अशी पदे भरलेली आहेत ही सर्व पदे कंत्राट बेसिसवर आहेत. जागा रिक्त असेल तर ती आयपीएचएस आणि परफॉर्मन्स बेसिसवर भरण्यात येतात. या ठिकाणी जागा रिक्त होती आणि काही ठिकाणी कामगिरी चांगला होता म्हणून विभागाने सीएस स्तरावर आयपीएचएसद्वारा २७० मनुष्यबळ दिलेले आहे आणि डीएचओ स्तरावर ४०१ मनुष्यबळ दिलेले आहे अशी एकूण ६७१ पदे भरली आहेत.

चिंचगड आणि सालेकसा ग्रामीण रुग्णालयातील एक्स-रे मशीन्स नादुरुस्त झालेल्या आहेत. त्यासाठी काही तरतूद केलेली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, चिंचगड आणि सालेकसा ग्रामीण रुग्णालयातील एक्स-रे मशीन्स खराब झालेल्या आहेत. सडक अर्जुनी येथील ग्रामीण रुग्णालयातील एक्स-रे मशीन बंद पडलेली आहे.

राज्यातील सर्वच रुणालयांतील एक्स-रे मशीन, सिटी स्कॅन मशीन्स बंद आहेत. काही ठिकाणी एक्स-रे मशीन आहेत पण ऑपरेटर नाही. ऑपरेटर्स नसल्यामुळे मशीन बंद राहून त्या खराब झालेल्या आहेत. त्या संदर्भात आपण कोणती कार्यवाही करणार आहात? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, भारत सरकारने फ्री डायग्नोस्टिक करण्याचे ठरविले आहे. तसेच बायो मेडिकल इक्विपमेंटचा सर्व्हे करण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्रामध्ये जेवढी इक्विपमेन्टस आहेत त्याचा सर्व्हे करण्यासाठी भारत सरकारने एचएएल एजन्सी नेमली आहे. त्या एजन्सीमार्फत किती इक्विपमेन्टस चालू स्थितीत आहेत आणि किती बंद अवस्थेत आहेत याचा अभ्यास करून आरएफपी आणि टेंडर प्रोसेस काढलेली आहे. तसेच त्या इक्विपमेन्टसची अेएमसी होईल. अमुक एका ठिकाणची मशीन बंद आहे अशी माहिती मिळाली की, त्या एजन्सीमार्फत ती मशीन सुरू करण्यात येईल. ही प्रक्रिया अंतिम स्तरावर आहे.

बंद मशीन सुरू करता येईल परंतु जेथे ऑपरेटर्स नसतील तेथे काय करता येईल? काही ठिकाणी एमआरआय आणि सिटी स्कॅन मशीन चालविणारे ऑपरेटर्स नाहीत. एमआरआय,सिटीस्कॅन, डायलेसिस अमुक इतक्या किंमतीमध्ये करून देण्यात येतील असा एक प्रस्ताव आला होता त्याचा विभागाने विचार करावा. कारण मशीनची किंमत, देखभाल दुरुस्ती, ऑपरेटिंग कॉस्ट, डॉक्टर्स या सर्व गोष्टींचा विचार केला तर बाहेरुन काम करून घेण्याचा प्रस्ताव फार स्वस्त पडतो. आपण या सर्व गोष्टी राजीव गांधी योजनेमध्ये करु शकता. आपण या पद्धतीचा विचार केला पाहिजे, असे मला वाटते. आपण आता जे काही करीत आहात त्यामुळे काही होणार नाही.

एक्सरे मशीन किंवा सीटी स्कॅन मशीन बऱ्याच ठिकाणी घेतलेल्या आहेत, परंतु ऑपरेटरची भरती केलेली नाही. त्यामुळे त्या मशीन धूळखात पडलेल्या आहेत. जळगाव जिल्ह्यात सीटी स्कॅन मशीन आहे, परंतु ती ०८ वर्षांपासून बंद आहे. या जिल्ह्यामध्ये १५ तालुके असून आठ वर्षांपासून सीटी स्कॅन मशीन बंद असल्याची बाब गंभीर आहे. यामुळे रुग्णांची मोठ्या प्रमाणात हेळसांड होते. त्यामुळे राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये एक्सरे मशीन, सीटी स्कॅन मशीन येण्यापूर्वी ऑपरेटची भरती करण्यात यावी. राज्यात बऱ्याच ठिकाणी ग्रामीण रुग्णालये व ट्रामा केअर सेंटर्स मंजूर करण्यात आलेले आहे. त्यांची बांधकामे पूर्ण व्हायला आली असून तेथील भरती प्रक्रियेबाबत निर्णय झालेला नाही. सदरहू रुग्णालयांचे बांधकाम काही दिवसांनी पूर्ण होईल, परंतु कर्मचारी वर्ग नसल्यामुळे ते सुरू होणार नाही. त्यामुळे भरती प्रक्रियेबाबत तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. जळगाव जिल्ह्यातील भूसावळ येथील ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण होत आले आहे. तेथील कर्मचारी वर्गाबाबत चौकशी केली असता, त्याबाबत कोणतीही प्रक्रिया करण्यात आली नसल्याची माहिती मिळाली. सदरहू रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर कर्मचारी वर्ग नसल्यामुळे किंवा आवश्यक त्या सुविधा नसल्यामुळे ते सुरू होणार नाही. त्यामुळे भुसावळ येथील व राज्यातील ज्या ग्रामीण रुग्णालय किंवा ट्रामा केअर सेंटरचे बांधकाम पूर्ण होत आले आहे, त्या ठिकाणची भरती प्रक्रिया समांतर पद्धतीने सुरू करण्यात आली आहे काय? तशी भरती प्रक्रिया सुरू केली किंवा कसे याबद्दल मला सद्या तरी माहीत नाही. तसेच पदांच्या भरती संदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडे माहिती घेतली असता तेथे देखील प्रक्रिया पूर्ण झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे सहा महिन्यांनी किंवा वर्षभरामध्ये राज्यातील ज्या ग्रामीण रुग्णालय किंवा ट्रामा केअर सेंटरचे बांधकाम पूर्ण होणार आहे, अशा ठिकाणी भरती प्रक्रिया तातडीने सुरू करावी असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जी सूचना केली ती अतिशय रास्त आहे. आम्ही देखील त्यावर विचार सुरू केलेला आहे. कितीही प्रयत्न केले तरी विभागास पुरेसे मनुष्यबळ मिळत नाही आणि मनुष्यबळ उपलब्ध झाल्यास तो जास्त दिवस टिकत नाही. म्हणून विभागाने दोन कामे सुरू केलेली आहेत. विभागाची समांतर हालचाल सुरू आहे. त्या व्यतिरिक्त ज्या ठिकाणी मशीन आहे तेथे उपलब्ध असलेला मनुष्यबळ स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरू केलेली आहे जेणेकरून त्या ठिकाणी मशीन आणि मनुष्यबळ यांची सांगड बसेल. स्थानिक भागात निविदा काढून डायग्नोस्टिक सेंटर्स चालविण्यास द्यावयाचे आणि खरेदी व देखभाल दुरुस्तीच्या प्रक्रियामधून बाहेर पडायचे असा विभागाचा प्रयत्न आहे. त्यासाठी थोडा वेळ लागत आहे कारण राज्यभरातून माहिती गोळा करायची आहे आणि शासनाची परवानगी मिळायची आहे.

चिंचगड आणि सालेकसा हे अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त भाग आहे. तेथील रुग्णालयांमध्ये एक्स-रे मशीन्स आणि इतर मशीन्स असणे अत्यंत गरजेचे आहे. ही दोन्ही ठिकाणे अतिशय संवेदनशील आहेत. त्या ठिकाणी चांगल्या सोयीसुविधा असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने विभागाने लक्ष द्यावे अशी सूचना समितीने केली. रावणवाडी, इंदोरा, मुल्ला आणि सौदड या प्राथमिक आरोग्य केंद्रावर खूप ताण आहे. तसेच धावेवाडा, नागन, कावलेवाडा आणि गर्स या उपकेंद्रावर देखील खूप मोठा ताण आहे. तेव्हा त्या दृष्टीने केलेल्या कार्यवाहीबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, त्या ठिकाणी विभागाने एक नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र आणि २९ नवीन उप केंद्रे सुरू केलेली आहेत.

रावणवाडी, इंदोरा, मुल्ला आणि सौंदड या प्राथमिक आरोग्य केंद्रावर खूप ताण आहे. त्यापैकी सौंदड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रुपांतर केले आहे त्याप्रमाणे रावणवाडी, इंदोरा व मुल्ला या प्राथमिक आरोग्य केंद्राची माहिती देताना विभागीय सचिवांनी विदित केले की, सौंदड येथे नवीन ग्रामीण रुग्णालय सुरू झाल्यामुळे तेथील प्रश्न सुटलेला आहे. खमारी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू झालेले असल्यामुळे तेथे देखील थोडा दिलासा मिळालेला आहे. मुल्ला आणि इंदोरा येथे सात नवीन उप केंद्र सुरू करण्याचे प्रस्तावित होते, त्या ठिकाणी अजून कर्मचारी वर्ग नाही. कर्मचारी वर्ग मिळाल्यानंतर मुल्ला आणि इंदोरा येथील ताण कमी होईल.

समिती प्रमुख : आपण उप केंद्र सुरू केल्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रावरील ताण कसा कमी होईल? उप केंद्रामध्ये आलेले रुग्ण प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जाणारच. सौंदडबद्दल समिती समाधानी आहे. खमारी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू केले पण त्या ठिकाणी कर्मचारी वर्ग दिलेला नाही. त्याच बरोबर दोन ठिकाणी नवीन सबसेंटर्सचे बांधकाम पूर्ण झाले नसल्यामुळे या दोन्ही पैकी एकाही ठिकाणी सबसेंटर्स सुरू झालेले नाही.सदरहू इमारत केव्हा पूर्ण होणार आहे, पदे केव्हा भरण्यात येणार आहे. या गावातील लोकसंख्येचे पुर्नर्नियोजन केले पाहिजे. या गावातील एकाच पीएचसीवर असलेला लोड कमी केला पाहिजे. इंदोरा आणि मुल्ला हे आदिवासी क्षेत्रातील गावे असून तेथे २० हजार लोकसंख्येची मर्यादा आहे. परंतु मुल्ला येथील लोकसंख्या ४५ हजार आहे. सबसेंटर्स सुरू झाल्यावर पीएचसीचा लोड कमी होणार आहे काय? त्या ठिकाणी नवीन पीएचसी करणे आवश्यक होते. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, खमारी येथील आकृतीबंध मंजूर झालेला आहे. मुल्ला आणि इंदोरा येथील दोन्ही पीएचसीमध्ये पॉप्युलेशन नुसार वाटप करण्यासाठी एक रिऑर्गनायजेशनची ॲक्शन सुरू करण्यात आलेली आहे. जेणे करून या दोन्ही पीएचसीमधील ताण विभागाला जाऊ शकेल. सदरहू कार्यवाही सुरू आहे. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर ताण कमी होईल.

सदरहू कार्यवाही किती वर्षामध्ये पूर्ण होईल. हा अहवाल दिनांक ३१ मार्च २०१२ रोजी आलेला आहे. ३१ मार्च २०१६ ही तारीख जवळ येत आहे. पुर्नर्नियोजनच्या कामास एक दिवस पुरेसा आहे. चार, चार वर्षे हे होत नसेल तर ही बाब योग्य नाही. विभागाला केवळ पुर्नर्विनियोजन करायचे आहे. अधिकाऱ्यांना सांगून देखील ते पुर्नर्नियोजन करीत नाही. संबंधित गावाला दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या पीएचसीला न जोडता १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या पीएचसीला जोडले जाते, हे योग्य नाही असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले. तसेच याबाबत उदाहरण दिले की, शिरपूरचे अटेचमेन्ट रावलवाडी येथे न करता १५ किलोमीटर अंतरावरील काटी या गावाला केले. कित्येकदा सांगून देखील त्याबाबत कार्यवाही केली जात नाही. महालेखाकार यांचा परिच्छेद येऊन देखील विभाग चार, चार वर्षे पुर्नर्नियोजन करु शकत नाही. असे असेल तर यामध्ये सुधारणा कधी होणार आहे? याबाबत विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने कार्यवाही करण्यात यावी व कोणती कार्यवाही करण्यात आली, त्याबाबतची माहिती समितीला सादर करण्यात यावी अशी सूचना समितीने केली. त्यावर विभागीय सचिवांनी आश्वासित केले की, पुर्नर्विनियोजनाचे काम त्वरीत करण्यात येईल व ज्या अधिकाऱ्यांनी या कामाला विलंब केला आहे, त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तथापि अद्याप माहिती समितीस प्राप्त झालेली नाही.

रावलवाडी जवळील रजेगाव येथे आधुनिक पद्धतीचे ग्रामीण रुग्णालय उभारण्यात आले आहे. गोंदिया जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयांपैकी ते सर्वोत्कृष्ट आहे. परंतु त्याचा परफॉर्मन्स झिरो आहे. तेथील ओपीडी ६० ते ६५ होते. परंतु ५० टक्के पदे रिक्त आहेत. डॉक्टर्सची पदे भरण्यात आलेली नाहीत. त्यामुळे तेथे डिलीव्हरी करण्यास कोणीही तयार होत नाही. डिलीव्हरी रुग्ण या हॉस्पीटलमध्ये न येता समोर असलेल्या सबसेंटरमध्ये डिलीव्हरीकरिता जातात. सदरहू सबसेंटर्समधील डिलीव्हरी विभाग बंद करण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी पेशंट कसे, येऊ शकतील याबाबत विचार करण्यात यावा. सर्वात चांगला आरएच असताना देखील आम्ही रावलवाडीच्या शेजारी आरएच उभा केला. परंतु तेथे एक्स रे ऑपरेटर नाही. गोंदिया येथून सीएस लॅब दोन दिवसाकरिता पाठविली जाते व चार दिवस बंद रहाते. तेथे पॅथॉलॉजिस्ट, एक्स रे ऑपरेटर, डॉक्टर्स यांची आवश्यकता आहे. असे होत नसेल तर ते बंद करण्यात यावे. तेथे या वर्षी केवळ एक डिलीव्हरी झालेली आहे. यादीमध्ये नमूद आहे. पगारांवर १५, १५ कोटी रुपये खर्च केला जातो आणि अशा पद्धतीने परफॉर्मन्स मिळत असेल तर काय उपयोग आहे. यावर विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले की, समितीला रजेगाव येथील ग्रामीण रुग्णालयात येत्या एक महिन्यामध्ये निश्चितच फरक झालेला दिसेल. सब सेंटर्समध्ये डिलीव्हरी होते परंतु आरएच मध्ये होत नाही. या सर्व बाबींचा आढावा घेऊन संबंधित ठिकाणी योग्य रितीने आरएच सुरू होण्याकरिता कार्यवाही करण्यात येईल.

नर्सिंग कॉलेजच्या निधीला एक्सप्रेसफिडरसाठी डायव्हर्ट करण्यात आले असा एक परिच्छेद आहे. एक्सप्रेस फिडर सद्या सुरू आहे किंवा कसे यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, नर्सिंग कॉलेजला तीन वेळेस पीआयपी मधून वेळोवेळी पैसे देण्यात आले होते. २००७-२००८ मध्ये ४५ लाख रुपये, २००९-२०१० मध्ये ९.११ लाख रुपये आणि २०१०-२०११ मध्ये १० लाख रुपये देण्यात आले होते. असे एकूण ६४.११ लाख

रुपये देण्यात आले होते. परंतु तत्कालीन अभियान संचालक यांनी सदरहू निधी वर्ग करून एक्सप्रेस फिडर लाईनसाठी हेडक्वॉर्टर मधुन मंजुरी दिल्यामुळे त्यामध्ये काही पैसे खर्च झाले. यासंदर्भात पाठपुरावा केला होता. प्रधान सचिव यांनी सांगितल्याप्रमाणे २००७-२००८ मध्ये एकूण २५ लाख रुपयांचा निधी हा नवीन नर्सिंग कॉलेजच्या कन्स्ट्रक्शनकरिता आलेला होता. २००९-२०१० मध्ये ९.११ लाख आणि २०१०-२०११ मध्ये १० लाख रुपये देण्यात आले होते. असे एनएचएम मार्फत एकूण ६४.११ लाख रुपये देण्यात आले होते. २००७-२००८ मधील ४५ लाख रुपये नवीन कन्स्ट्रक्शनसाठी होते. त्यापैकी १९.११ लाख रुपयांचा निधी दुरुस्तीच्या कामावर खर्च करण्यासाठी आला होता व तो निधी संबंधितांनी खर्च केला. नवीन बांधकामासाठी आलेले ४५ लाख रुपये जागेची अडचण असल्यामुळे खर्च करता आले नाही. हा पैसा लॅप्स होऊ नये म्हणून दिनांक ३० मार्च २००९ रोजीच्या ऑर्डरच्या अनुषंगाने एक्सप्रेस फिडर केटीएस हॉस्पीटलमध्ये एमडी यांच्या ऑर्डरनुसार देण्यात आले. त्या संदर्भातील एमडी यांच्या ऑर्डरची प्रत उपलब्ध आहे. त्यावेळी एमडी यांना पुनर्विनियोजनाचे पूर्ण अधिकार होते. तसे अधिकार आता नाहीत. आता रिॲप्रोप्रिएशन करायचे असल्यास इसी यांची मान्यता घ्यावी लागते. परंतु त्यावेळी एमडी यांच्याकडे रिॲप्रोप्रिएशन करण्याचे पूर्ण अधिकार होते. विजेची सतत उपलब्धता असावी, हाच त्यामागचा हेतू होता. सदरहू ४५ लाख रुपयांचा निधी लॅप्स होऊ नये म्हणूनच एक्सप्रेस फिडरवर पैसे खर्च करण्याचे आदेश दिले.

विभागाने नर्सिंग कॉलेजेस् (एएनएम) सुरू केलेली आहेत. त्याकरिता एकूण ४० कर्मचारी लागणार आहेत. त्यापैकी केवळ १० पदे भरण्यात आलेली आहेत. त्यामध्ये रेग्युलर २६ पदे पाहिजे. रेग्युलर २६ पदांपैकी केवळ २ पदे भरलेली आहेत. परंतु कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर भरावयाच्या १४ पदांपैकी ८ पदे भरलेली आहेत. उर्वरित पदे केव्हा भरण्यात येणार आहे? तसेच नर्सिंग कॉलेजेस सोबत ग्रामीण रुग्णालयांतील पदे देखील रिक्त आहेत. राज्यातील अनेक ग्रामीण रुग्णालयांचे बांधकाम पूर्ण होणार असून तेथे अजूनही पदांची निर्मिती केलेली नाही. रुग्णालयांचे बांधकाम पूर्ण होतील परंतु डॉक्टर्स व इतर कर्मचारी वर्ग नसल्यामुळे रुग्णालय सुरू होणार नाही. त्यामुळे अशा रुग्णालयांमधील सर्व पदे भरण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात कोणती कार्यवाही करणार आहात? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, रेग्युलर २६ पदे मंजूर आहेत. उपलब्ध असलेल्या माहितीनुसार कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने १० पदे भरण्यात आलेली आहेत.

१० पदे भरण्यात आली, परंतु त्यातील ८ पदे कॉन्ट्रॅक्ट पद्धतीवर असून केवळ २ पदे रेग्युलर भरलेली आहेत. सदरहू पदांची निर्मिती झालेली असून पदे मंजूर आहेत. २६ पदे रेग्युलर असून त्यापैकी केवळ २ पदे रेग्युलर भरलेली आहेत. सदरहू कॉलेज ३ वर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे ही पदे कॉन्ट्रॅक्ट पद्धतीवरच भरणार काय? रेग्युलर पदांची भरती केली जाणार आहे किंवा कसे? सदरहू पदे रेग्युलर भरण्यास कोणती अडचण आहे?सदरहू पदे भरण्याबाबत आतापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंदर्भातील प्रक्रिया वारंवार करण्यात आलेली आहे. गोंदियासह राज्यभरातील सर्वच नर्सिंग कॉलेजचा आढावा काही दिवसांपूर्वी घेण्यात आला होता. पद भरतीला पुरेसा प्रतिसाद मिळत नाही. काही ठिकाणी उमेदवार जाऊ इच्छित नाही. त्यामुळे काही पदे रिक्त रहातात. विभागाकडून नियमित जाहिरात देण्याचा प्रयत्न करीत आहोत. परंतु त्यास पुरेसा प्रतिसाद मिळत नाही. विभागाकडून प्रयत्न करण्यात येतात. इतर कॉलेजेसमध्ये देखील पदे रिक्त आहेत. जेव्हा एचपीसीमध्ये गोंदियाचा प्रस्ताव गेला होता. तेव्हा अशी सूचना मिळाली होती की, रिक्त पदांमधून ही पदे पुनर्नियोजित करावीत आणि त्यानंतर ती इकडे भरण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे तेव्हा एकूण १० पदांचीच मंजुरी देण्यात आली होती. गोंदियासह बऱ्याच ठिकाणी पदे रिक्त असल्यामुळे एचपीसीने इतर पदांची मंजुरी दिली नाही. पदे भरण्याकरिता सतत प्रयत्न केला जात असून त्याकरिता पुन्हा प्रयत्न करण्यात येईल.

कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर भरलेल्या पदांसंदर्भात समितीचे काही प्रश्न नाही. परंतु मंजूर पदांपैकी बरीच पदे रिक्त आहेत. सदरहू रिक्त पदे भरण्यासाठी कोणकोणती कार्यवाही करण्यात आली, त्यासंदर्भातील माहिती देण्यात यावी. हे खूपच आक्षेपार्ह आहे. तसे पाहिले तर सदरहू नर्सिंग कॉलेज खूप उशिरा सुरू करण्यात आले असून केवळ २ पदेच भरलेली आहेत. गोंदिया येथील नर्सिंग कॉलेजवर प्राध्यापक पदांकरिता उमेदवार मिळत नाही, हे मला मान्य नाही. त्यामुळे ही पदे तातडीने भरली पाहिजे. सर्वच्या सर्व २६ पदे भरा असे मी म्हणणार नाही, परंतु अर्धी पदे तातडीने भरण्यात यावी, अशी समितीने सूचना केली यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, या पदांच्या बाबतीत माहिती घेतलेली असून या पदांच्या भरतीचा प्रस्ताव डीडीएस, नर्सिंग स्तरावर पाठविण्यात आलेला आहे. त्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल. तसेच एनआरएचएम अंतर्गत नर्सिंग कॉलेजला मागच्या वेळीप्रमाणे पुढील वेळी देखील एनआरएचएम अंतर्गत नर्सिंग कॉलेजच्या बांधकामाकरिता निधी देण्यासंदर्भात सांगितले की,जानेवारीमध्ये पीआयपीफायनल होणार आहे. जिल्हावार याबाबतचा प्रस्ताव आल्यास ते पीआयपीमध्ये टाकण्यात येईल.

एएनएम सुरू झालेले असून जीएनएमच्या पदांच्या निर्मितीसह सर्व पक्रिया पूर्ण झालेली आहे. आता केवळ महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलची मान्यता मिळणे बाकी आहे. ऑगस्ट मध्ये सुरू करावे, असे त्यांनी कळविल्यास ते ऑगस्टमध्ये सुरू करणार आहात काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलने मीड सेशन सुरू करण्यासाठी होकार दिलेला नाही. पुढील वर्षी सेशन सुरू होईल तेव्हा यास परवानगी मिळेल यासाठी विभागाची तयारी आहे.

भुसावळ शहरातील ग्रामीण रुग्णालय तीन, चार वर्षे पर्यत्न केल्यानंतर ते मान्य करून घेतले. भुसावळ येथील नगरपालिका 'अ' वर्ग नगरपालिका आहे. भुसावळ येथे आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाचे जंक्शन आहे. तेथे एक दिवसाआड पीएम करण्यासाठी केस येते, परंतु ग्रामीण रुग्णालयात व नगरपालिकेच्या रुग्णालयात त्याबाबतची साधने नसल्यामुळे ते करता येत नाही. अशा केसेस जळगाव किंवा वरणगाव येथे पाठवाव्या लागतात. यासंदर्भातील मुद्दा विधानसभेमध्ये अनेक वेळा उपस्थित केलेला आहे. नगरपालिकेचे रुग्णालय असल्यामुळे आरोग्य

विभागाकडून तेथे डॉक्टर देता येत नाही. तसेच त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाने भुसावळ येथील रुग्णालय १०० बेडचे असावे, असा प्रस्ताव मागितला होता. परंतु सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी त्यामध्ये बदल करून प्रस्ताव ५० बेडचा बनविला. सचिवांनी सांगून देखील खालील अधिकाऱ्यांनी त्यामध्ये बदल करण्याचे काहीही कारण नव्हते. भुसावळ येथे उप जिल्हा रुग्णालय होण्याची आवश्यकता आहे. भुसावळ येथील लोकसंख्या अडीच लाखापेक्षा जास्त आहे. दीड लाख मतदार आहेत. तेथे उप जिल्हा रुग्णालय झाले पाहिजे. ग्रामीण रूग्णालय तरी होऊ द्या म्हणून ते मंजूर करून घ्यावे लागले, नाही तर तेही झाले नसते. खालच्या खाली फिरवाफिरवी झाली. १०० बेडचे रूग्णालय प्रस्तावित असताना सुद्धा ते रद्द करून ५० बेडचे रुग्णालय केले आणि ५० बेडचे ट्रॉमा केअर सेंटर केले. वरील अधिकाऱ्यांनी त्यावर लक्ष दिले पाहिजे. महत्त्वाची ठिकाणे असतात. लोकप्रतिनिधींना एवढ्या मोठ्या इमारती बांधून ठेवण्याची हौस नाही किंवा स्टाफ गुंतवून ठेवायचा नाही. आवश्यकता आहे तेथेच मागणी करण्यात येते. पीएमसाठी १ केस येते आणि धावपळ होते. मोठे गाव असताना, लोकसंख्या असताना, आवश्यकता असताना तेथे ते दिले पाहिजे होते.

विभागाने डिसेंबर, २०१५ मध्ये ग्रामीण रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटरला निधी दिला. नागपूर अधिवेशनाच्या पुरवणी मागण्यांत तो मंजूर झाला. पण तो अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर दिसला नाही. मला सांगितले होते की, अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर टाकण्यात आला नाही त्यामुळे ट्रॉमा केअर सेंटरचे काम थांबले. ग्रामीण रूग्णालय व ट्रॉमा केअर सेंटर यांच्या निधीसाठी लक्ष दिले तर बरे होईल असे समितीने सुचविले.

ॲक्युट रेस्पिरेटरी इन्फेक्शनबद्दल केलेली कार्यवाही केली आणि त्यातून काय निष्पन्न झाले याची माहिती तसेच ते कमी करण्याच्या दृष्टीने विभागाने काय केले? याची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००६ ते सन २००८ या कालावधीत ॲक्युट रेस्पिरेटरी इन्फेक्शनच्या एकूण १२६ केसेस समोर आल्या, तेव्हापासून सन २०१२-१३ पर्यंत इम्युनायझेशनची प्रोसेस सुरू आहे. तत्संदर्भातील कार्यक्रम गोंदिया जिल्ह्यामध्ये सुरू आहे. या केसेसमध्ये हळुहळू घट झाली आहे असे दिसून आले आहे. साधारणपणे ० ते १ वर्ष वयोगटातील काही मुलांना इम्युनायझेशन करतेवेळी, म्हणजे जन्माला आल्यानंतर १२ महिन्यांपर्यंत रिॲक्शन येत होत्या, त्याची कारणमीमांसा करण्यात आली आहे. आशाताई गावोगावी असतात. दुर्घटना झाले तेथे जाऊन चौकशी केली. तसेच आरबीएसकेच्या टीम आहेत.

आकडेवारी काय आली? याबाबतची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०११-१२ ची आकडेवारी आहे. सन २०११-१२ मध्ये एकूण ३९ प्रकरणे समोर आली. सन २००६ व सन २००८ मध्ये ही संख्या १२६ होती. सन २०१०-११ मध्ये ४२, सन २००९-१० मध्ये ४६ व सन २००८-०९ मध्ये ३४ प्रकरणे होती. सन २०१४-१५ ची आकडेवारी नाही.

सन २००६ व सन २००८ ची १२६ ही संख्या दोन वर्षांची होती. सन २००८-०९ मध्ये ३४ केसेस समोर आल्या. सन २००९-१० मध्ये ४६ केसेस समोर आल्या. सन २०१०-११ मध्ये ४२ केसेस समोर आल्या आणि सन २०११-१२ मध्ये ३९ केसेस समोर आल्या, म्हणजेच या आकडेवारी खाली आली आहे. सदर बाबतीत अजून कोणती कार्यवाही केली या संदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन २०११-१२ मध्ये ३९ प्रकरणे आहेत. मागच्या वर्षांची तुलना केली तर बरीच प्रगती झाली आहे असे दिसत आहे. नियंत्रण करण्यासाठी बऱ्याच योजना विभागामार्फत राबविल्या जातात. आरबीएसके म्हणजेच राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम मार्फत मुलांचे स्क्रिनिंग करण्यात येते. अडचणीच्या प्रकरणांना आरएच, एसडीएच, डीएचला पाठविण्यात येते आणि इम्युनायझेशन कार्यक्रम राबविण्यात येतो. अक्युट रेस्पिरेटरी इन्फेक्शन नियंत्रण करण्यासाठी नसल व्हॅक्सिनेशन सुद्धा सुरू केले आहे. सन २००८ ते आतापर्यंत यामध्ये वाढ झाली आहे. सन २०१३-१४ मध्ये ९८ टक्के इम्युनायझेशन झाले आहे. ९ ते १५ महिन्यांच्या मुलांना ९८ टक्के इम्युनायझेशन झाले आहे.

ते १०० टक्के न होण्याची कारण मिमांसा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ती मुले स्थलांतरित होतात. विभागाकडे माहिती आहे, त्यानुसार जवळपास २३९ मुले स्थलांतरित झाली होती, त्यामुळे त्यामध्ये घट आली आहे. सन २०१२-१३ मध्ये १०० टक्के प्रमाण होते. परंतु यावेळी जी आकडेवारी आहे त्यावरून असे दिसते की, २३९ मुले स्थलांतरित झाल्यामुळे त्यामध्ये घट आली आहे.

गोंदिया जिल्ह्याच्या आयबँकबद्दल काय नियोजन आहे? गोंदियाला आयबँक नाही. आयबॉल गोळा केले जातात आणि दुसऱ्यांना दिले जातात. माहितीमध्ये जागा उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे. हे गंभीर आहे. जागा नाही हे अशक्य आहे. परंतु प्रत्यक्षात भरपूर जागा आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर बाबतीत दोन कारणे आहेत. आयबँक प्रस्तावित आहे, ते मेडिकल कॉलेज आहे. आयबँक सुरू करण्यामध्ये अशी काही अडचण नाही. आयबँक सुरू होऊ शकते. फक्त त्यासाठी आम्हाला तेथे मेडिकल कॉलेज आहे, त्यामध्ये हे करावे लागणार आहे. कारण तेथेच आपल्याला तज्ज्ञ मिळू शकतील. जिल्हा रुग्णालयाला तज्ज्ञांची सोय होणार नाही. त्यामुळे मेडिकल कॉलेजमध्ये आयबँक केलेली बरे होईल.

आयबँक सुरू न करण्याची कारणे काय आहेत, त्यामध्ये अडचणी काय आहेत? सध्या २ वर्षे मेडिकल कॉलेजला ते दिले आहे. शेवटी तेथे आयबँक असली पाहिजे या दृष्टीने आपण केलेली कार्यवाही, अडचणी सांगाव्यात, जेणेकरून शिफारस करता येईल.

सन २०१०-११ चे ऑब्झरर्व्हेशन आले, त्यावेळी मेडिकल कॉलेजची संकल्पना नव्हती. ४-५ वर्षानंतर साक्ष होत आहे. मेडिकल कॉलेज फक्त तात्पुरत्या स्वरूपात घेतले आहे. पुढे मेडिकल कॉलेज राहणार नाही. स्वतःची इमारत बांधण्याचे काम सुरू होत आहे. त्यामुळे विभाग केटीएसमध्ये आयबँक स्थापित करणार का, आतापर्यंत ती स्थापन न करण्याची कारणे काय आहेत? अहवालामध्ये कारणे दिली आहेत, त्यामध्ये

सांगितले आहे की, जागा नाही, तज्ज्ञ नाहीत असे मत समितीने व्यक्त केले असता यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, अडचण अशी आहे की, गोंदिया जिल्ह्यात नेत्रपिढी नाही, तेथे आयबँक होणे शक्य नाही. कारण जिल्ह्यात कॅरेटोप्लास्टी करण्याकरिता आवश्यक नेत्रतज्ज्ञ लागतात, मात्र त्यांची कमतरता आहे. तेथे मेडिकल कॉलेज स्थापन झाले, ते हस्तांतरीत केले. त्यांच्यासोबत करारनामा देखील केला आहे. करारनामा दिनांक २६ नोव्हेंबर २०१४ ला झालेला आहे. त्यामध्ये म्हटले होते की, मेडिकल कॉलेज ते नेत्रपेढीचा विभाग सुरू करेल. सिव्हिल सर्जनकडे फक्त मोबाईल युनिट राहील. बाकी विभागामार्फत होईल. बाकी आयबँक वगैरे या संदर्भात त्यांची जबाबदारी राहील असा करारनामा झालेला आहे.

मेडिकल कॉलेज सुरू होणार म्हणून तेथे आयबँक सुरू करणार आहे. कारण त्यांनी जबाबदारी घेतली आहे. पण ते फक्त २ वर्षांसाठी आहेत. भविष्यात आयबँकसाठी काय नियोजन आहे. हे तात्पुरते आहे. फक्त जागेचा वापर करतात. सार्वजनिक आरोग्य विभागाकडे उपलब्ध नाही. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग सुरू करेल परंतु ते गेले की केटीएसला याची आवश्यकता नाही. मेडिकल कॉलेज मागच्या वर्षी आले. विभागाने ३ वर्षांपर्यंत काय केले? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, ते मेडिकल कॉलेजशी संबंधित आहे. जिल्ह्यात कॅरेटोप्लास्टी करण्यासाठी आवश्यक तज्ज्ञांची कमतरता आहे. गोंदिया जिल्ह्यात वर्ग-१ च्या ३५ पदांपैकी २५ पदे रिक्त आहेत, विभागाला तज्ज्ञ मिळत नाहीत.

२-३ वर्षांपासून म्हणजे सन २०११-१२ पासून प्रयत्न करण्यात आले, परंतु ती सुविधा मेडिकल कॉलेजशिवाय सस्टेनेबल राहणार नाही, ते मेडिकल कॉलेजशी जोडावे लागेल. हे स्वतंत्रपणे करणे अवघड जाईल.विभागाकडे वर्ग-१ ची रिक्त पदे खूप आहेत. मात्र तज्ज्ञ मिळत नाहीत ही अडचण आहे. विभागाला हे करायचे नाही अशातील भाग नाही. तेथे करणे अवघड जात आहे. तेथे मेडिकल कॉलेज आल्यावर हे होऊ शकते तसेच वर्ग-१ ची पदे कमी आहेत, त्या संदर्भातही विभाग प्रयत्न करीत आहे.

इमर्जन्सीमध्ये एखाद्याला आवश्यकता वाटली की, नेत्रदान करायचे आहे तर काय करायचे? याबाबत आयबॉल काढण्यात येतात पण तेथे आयबँक नाही असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

राष्ट्रीय कुष्ठरोग कार्यक्रमात १० हजाराला १ असे प्रमाण पाहिजे असा नियम आहे. पण त्यापेक्षा पुढे गेलेला विषय आहे. सदर वर्षात याबाबतीत गोंदिया जिल्ह्यात थॅलेसेमिया व सिकलसेल यांचा मोठ्या प्रमाणात प्रादूर्भाव आहे यासंदर्भात सचिवांनी माहिती दिली की, कुष्ठरोग निवारण कार्यक्रमांतर्गत सन २००६ ते सन २०११ ची आकडेवारी पाहिली तर डिक्लायनिंग ट्रेंड दिसत आहे. कुष्ठरोग निवारण कार्यक्रम सुरू आहे. त्यामध्ये निश्चितपणे यश मिळत आहे. सन २००६ मध्ये प्रिव्हलेन्स रेट ०.७६ होता, पण हळुहळु सन २०११ मध्ये तो २.९२ वर आला. कारण विभागाच्या सर्वेक्षणाच्या कार्यक्रमाला वेग आला. प्रॉपर रिपोर्टिंगमुळे तो रेट वर गेला. परंतु सन २०१० ते सन २०१५ पर्यंत हा रेट २.९२ पासून आता १.९७ वर आलेला आहे. प्रिव्हलेन्स रेट कमी झालेला आहे. हा रेट १ च्या खाली आहे.

तो रेट कमी झाला मात्र उपचार घेत असलेल्या आणि नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या दुप्पट झाली आहे यासंदर्भात विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, नोंदणीत वाढ झाली आहे, कारण विभाग सखोल डिटेल सर्वेक्षण करतो. योग्य नोंद घेतल्यामुळे नोंदणीमध्ये वाढ झाली आहे. जे रूग्ण लपवत होते, उपचाराला येत नव्हते, ते आता आम्ही आणले आहेत. गोंदिया जिल्ह्यात कुष्ठरोग कार्यक्रम चांगला चालला आहे. प्रमाण एक खाली आणण्यासाठी वार्षिक कृती आराखडा तयार केला आहे आणि त्यामध्ये विशेषत्वाने हा जिल्हा अंतर्भूत केला आहे. एलिमिनेशनसाठी प्रिव्हलेन्स रेट कमी करण्यासाठी विभाग प्रयत्नशील आहे. स्क्रिनिंग वाढविले असून पूर्ण उपचार देण्यात येत आहे. रुग्णाने मध्येच उपचार सोडू नये, ड्रॉप आऊट होऊ नये यासाठी जास्त चांगले प्रयत्न करण्यात येत आहेत. मंथली लिप्रसी पीएचसी चालते. कॉंटॅक्ट एक्झामिनेशन करण्यात येत आहे. त्यामुळे लवकर समजते. विभागाकडून प्रशिक्षण चांगले देण्यात येत आहे. सद्यःस्थितीत गोंदिया जिल्ह्यात कुष्ठरोग नाही.

गोंदिया जिल्ह्यात दलित वस्ती व गलिच्छ वस्ती येथे राहणाऱ्या लोकांमध्ये थॅलेसेमिया व सिकलसेलची मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. ते कुष्ठरोगाप्रमाणे आहे. गोंदिया जिल्ह्यात सेपरेशन युनिट पाहिजे.विभागाने या दृष्टीने काही उपाययोजना केली आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सिकलसेलच्या संदर्भात गोंदिया जिल्ह्यात एनजीओंचा फॉलोअप आहे. तेथे प्रबुद्ध कल्याणकारी संस्था आहे. सर्व स्तरावर फॅसिलिटी पुरविण्यात येते. फ्री सॉल्युबिलिटी टेस्टिंग केली जाते. तसेच काऊन्सिलिंग केले जाते आणि वेगवेगळी कार्ड दिली जातात. ऑक्टोबर, २०१५ पर्यंत गोंदिया जिल्ह्यात एकूण ७८७ रूग्ण या आजाराने त्रस्त आहेत. प्रोप्रायटरी ट्रिटमेंट म्हणजे फॉलिक ॲसिड, व्हिटमिन-सी दिले जाते, कारण त्या लोकांना खूप अशक्तपणा असतो. जवळपास ७४२ रूग्णांना प्रोप्रायटरी ट्रिटमेंट देण्यात येत आहे. सिम्पोथेटिक ट्रिटमेंट म्हणजे ॲण्टीबायोटिक, पेन किलर असे उपचार १८४ रूग्णांना देण्यात आले. हायड्रॉलिक युरिया ३३ रूग्णांना दिली आहे. ब्लड ट्रान्सफ्यूजनचे उपचार ५८३ रूग्णांना दिले आहे. ६६६ रूग्णांना डे केअर युनिटमध्ये उपचार देण्यात आले. काही रूग्ण असे असतात की, ज्यांना हायर सेंटरला रेफर करावे लागते, असे १७ रूग्ण आहेत. दुर्गम भागात टेलिमेडिसिनचा वापर करण्यात येतो. दुर्गम भागात टेलिमेडिसिनचा वापर करून ४९३ जणांना उपचार दिले आहेत, त्यांना तज्ज्ञांमार्फत सल्ला देण्यात आला आहे. सिकलसेल संदर्भात अशी स्थिती आहे.

थॅलेसेमियाच्या संदर्भात काय कार्यवाही करीत आहात या संदर्भात माहिती द्यावी. थॅलेसिमीया आजारासाठी यावर्षी तरतूद करण्यात येणार आहे. परंतु दोन्ही आजारांची ट्रिटमेंट सिस्टीम जवळजवळ सारखीच आहे.

गोंदियामध्ये ब्लड सेपरेशनच्या व्यवस्थेसंदर्भात जेपीआयपी तयार करण्यात येत आहे त्यामध्ये थॅलेसिमीयासाठी तरतूद करण्यात येत आहे. पूर्वी अशा प्रकारची तरतूद न केलेली नव्हती. पूर्वी फक्त सिकलसेलच्या बाबतीत काम सुरू होते. परंतु आता थॅलेसिमीया आजारासाठी सुद्धा तरतूद करण्यात येणार आहे.

मध्यंतरी राज्यातील कुष्ठरोग्यांची संख्या कमी होण्याऐवजी वाढल्याचे निदर्शनास आल्यामुळे कुष्ठरोगाचे निर्मूलन करण्यासाठी सन्माननीय सदस्यांसमवेत एक बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी कुष्ठरोग निर्मूलन करण्यासाठी नियुक्त केलेला कर्मचारी वर्ग कमी करण्यात आल्याबाबत तक्रारी केल्या होत्या. तसेच कुष्ठरोगाचे निर्मूलन करण्यासाठी काम करणाऱ्या संस्थांना निधी कमी मिळत होता. कुष्ठरोगाचे निर्मूलन करण्यासाठी दिलेला कर्मचारी वर्ग अन्य आजारांचे निर्मूलन करण्यासाठी वापरण्यात आल्याबाबतच्या तक्रारी त्या बैठकीत करण्यात आल्या होत्या. या संदर्भातील सद्यःस्थिती सांगताना विभागीय सचिवांनी विदित केले की, कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम हा आरोग्य विभागाचा सर्वांत जुना कार्यक्रम आहे. दरम्यानच्या काळात या कार्यक्रमावरील स्टाफ हळूहळू कमी होत गेला. या कार्यक्रमासाठी नवीन कर्मचारी वर्ग निर्माण करण्यात आला नाही. त्यामुळे हा कार्यक्रम थोडासा बाजूला पडला. परंतु कालांतराने केंद्र सरकारच्या पुन्हा मार्गदर्शक सूचना आल्या की, देशातून कुष्ठरोगाचे पूर्णतः निर्मूलन झालेले नाही म्हणून, कुष्ठरोग निर्मूलनाचा कार्यक्रम पुन्हा जोरात हाती घ्यावा. सन्माननीय समावेश झालेल्या बैठकीमध्ये आढावा घेऊन विभागाने या अनुषंगाने प्रामुख्याने दोन-तीन महत्त्वाच्या गोष्टी केल्या. पूर्वी प्रत्येक जिल्ह्यासाठी कुष्ठरोग अधिकारी नव्हते. त्यामुळे काही ठिकाणी संबंधित अधिकाऱ्यांकडे कुष्ठरोग अधिकाऱ्यांचा अतिरिक्त कार्यभार देऊन ते पद भरले. तसेच कृती आराखडा तयार करून त्यांना एका महिन्यात किती काम करावयाचे आहे याचे उद्दिष्ट ठरवून दिले. या कामासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग देण्यासाठी पीआयपीमध्ये मागणी केली. विभागाने केंद्र सरकारकडे विनंती केली की, हा कार्यक्रम राबविण्यासाठी स्टाफला मंजुरी द्यावी.. त्यानुसार या हा कार्यक्रम राबविण्यासाठी २८७ इतक्या कर्मचारी वर्गाला मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे आता कुष्ठरोग्यांच्या सर्वेक्षणाच्या कामाला गती मिळाली आहे.

यासाठी पदे नव्याने निर्माण करण्यात आली नसून या कार्यक्रमातील २८७ पदे कमी करण्यात आली होती. ही बाब पुरवणी मागणीमध्ये नमूद केल्यामुळे त्यास आता मंजुरी मिळाली आहे.

सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम :

सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत घेण्यात येत असलेल्या क्षय रोग पेशंटच्या कंडक्टींग टेस्टबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००६ ते २०११ या कालावधीत क्षय रोगाचे किती रुग्ण नोंदणीकृत केले, किती रुग्णांवर उपचार केला आणि किती रुग्ण बरे झाले या बाबतचा तपशील लेखी माहितीमध्ये दिलेला आहे. सन २००८ ते २०१० या कालावधीत ३ हजार पेक्षा जास्त रुग्ण नोंदणीकृत केले होते. यापैकी ८० ते ९० टक्के रुग्णांची तपासणी करण्यात आली. या तपासणीमध्ये साधारणतः ५० टक्के लोक हे बाधित असल्याचे निदर्शनास आले व त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले. परंतु महत्त्वाचा प्रश्न होता की, त्यांच्यावरील उपचार नियमितपणे कसे सुरू ठेवावयचे. कारण गोंदिया जिल्ह्यात रुग्णांना सामाजिक पाश्वभुमी आहे. तेथील रुग्ण कामासाठी दुसरीकडे स्थलांतरीत होतात. विभागाचा क्यूअर रेट ८० ते ८५ टक्क्यांमध्ये येत होता. हा दर इच्छा असूनही वाढवू शकलो नाही. त्यामुळे हा रेट वाढविण्यासाठी आम्ही 'दृष्टी' या स्वयंसेवी संस्थेची मदत घेतली. या संस्थेला कम्युनिकेशन आणि सपोर्टसाठी विभागासोबत जोडले आहे. रुग्णांनी स्पुटमचे नमुने रुग्णालयात द्यावेत म्हणून या संस्थेच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत.

कर्मचारी काय करतात, विभागाकडे प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपलब्ध असताना व ते ही कामे करु शकत नाहीत काय? सुद्धा विभाग स्वयंसेवी संस्थेला पैसे का देत आहे? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाचे कर्मचारी सुद्धा काम करतात. परंतु अशा प्रकारच्या सपोर्ट सर्व्हीसेसच्या अनुषंगाने एनजीओला सहभागी करून घेण्यासाठी केंद्र सरकारकडून निधी मिळतो. मध्यंतरी कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम थोडासा बाजूला पडला होता. या कार्यक्रमावरील काही स्टाफ निघून गेला आणि काही कर्मचारी वर्ग इतर कार्यक्रमाकडे वळता केला. त्यामुळे या कामासाठी स्टाफची कमतरता भासली होती. पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे सर्वेक्षणाचे काम थोडेसे बाजूला पडले होते. तसेच स्पुटमचे नमुने तपासणीसाठी आणण्यामध्ये विभाग थोडेसा कमी पडत होता. त्यामुळे रुग्ण आणि रुग्णालय यांच्यात कम्युनिकेशन साधण्यासाठी तसेच या बाबतीत प्रचार आणि रुग्णांनी केंद्राला जाऊन तपासणी करून घेण्यासाठी त्यांना प्रवृत्त करण्याकरिता एनजीओची मदत घेतली. या संस्थेची मदत घेतल्यामुळे परिस्थितीमध्ये निश्चितपणे फरक पडला. रुग्णांचे एकूण नोंदणीचे प्रमाण हळूहळू वाढले आहे.

विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ असताना विभागाला एनजीओची नेमणूक करण्याची गरज का भासते? २०१५-१६ मध्ये विभागाने एनजीओ ची नेमणूक केली. एनजीओ ची मदत घेतल्यामुळे या कालावधीत काय फरक पडला? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, २००८-२०१० या कालावधीत वार्षिक १२०० ते १३०० रुग्ण नोंदणीकृत होत होते. परंतु २०११-२०१२, २०१२-१३ मध्ये हे प्रमाण १२०० पर्यंत खाली आले व त्यानंतर हे प्रमाण ११०० पर्यंत सुद्धा खाली आले होते. २०१४-१५ या वर्षात केवळ ११९९ रुग्ण नोंदणीकृत झाले. यावरुन असे निदर्शनास येते की, वार्षिक १३०० वरुन ११०० पर्यंत रुग्णांच्या नोंदीचे प्रमाण खाली आले. परंतु एनजीओने या लोकांशी समन्वय साधून लोकांना सेंटरपर्यंत आणण्यासाठी प्रयत्न केले. या संस्थेला आपल्यासोबत जोडल्यामुळे काय परिणाम झाला हे २०१५-२०१६ वर्षामध्ये निदर्शनास येईल. या संस्थेचा फायदा झाला तर ठीक आहे. परंतु फायदा झाला नाही तर त्या संस्थेला दूर करण्यात येणार आहे.

गोंदिया जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आरोग्य उप केंद्र आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. या केंद्रातील स्टाफ उपलब्ध असतानासुद्धा विभागाला एनजीओच्या मदतीची गरज का भासते? विभागाचे कर्मचारी रुग्णांचे समुपदेशन का करु शकत नाहीत? विभागाकडे प्रत्येक गावासाठी अंगणवाडी सेविका, आशा सेविका कार्यरत आहे. या सेविका काय काम करतात, हे कर्मचारी केवळ पगार घेतात काय? या लोकांची मदत न घेता, खाजगी एनजीओकडून कामे करून घेणे योग्य नाही. एनजीओचा खर्च केंद्र सरकार देत असले तरी तो शेवटी लोकांचाच पैसा आहे. त्यामुळे या कामासाठी विभागाकडे कर्मचारी उपलब्ध असतानासुद्धा खरोखरच खाजगी संस्थेची नेमणूक करण्याची गरज आहे किंवा कसे या बाबत विचार करावा असे मत समितीने व्यक्त केले.

आरोग्य व्यवस्थापनात समाजाचा सहभाग :

आरोग्य व्यवस्थापनामध्ये समाजाचा सहभाग, या कार्यक्रमा अंतर्गत गोंदिया येथील काही आरोग्य केंद्राच्या ठिकाणी बोर्ड वा डिस्प्ले लावण्यात आले नव्हते. आता अशा प्रकारची व्यवस्था करण्यात आली आहे काय? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की,

श्रीमती सौनिक : महोदय, सर्व संस्थांमध्ये रुग्ण कल्याण समिती कार्यरत आहेत. जिल्हा रुग्णालयाच्या रुग्ण कल्याण समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतात. उप जिल्हा रुग्णालय आणि ग्रामीण रुग्णालयाच्या रुग्ण कल्याण समितीचे अध्यक्ष सिव्हील सर्जन असतात. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा उप केंद्राच्या रुग्ण कल्याण समितीचे अध्यक्ष गट विकास अधिकारी असतात. विभागाकडून मागे जे काही घडले आहे ते लक्षात घेऊन असे नियोजन करण्यात येत आहे की, रुग्ण कल्याण समितीच्या बाबतीत सुधारित मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येत आहेत. यामध्ये लोकांचा सहभाग आणि पेशंटचा फिडबॅक तसेच आपल्या संस्थेमध्ये स्वच्छता किती आहे, इन्फेक्शन कंट्रोल मेकॅनिझम किती आहे, या सर्व गोष्टींकडे अधिक लक्ष देण्यासंदर्भातील फेर प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. या प्रस्तावाला शासनाची मान्यता मिळाल्याबरोबर या बाबी निर्गमित करण्यात येतील.

रुग्ण कल्याण समितीवर नियुक्ती करताना शक्यतो स्थानिक व्यक्तींना प्राधान्याने सहभागी करून घ्यावे. एका प्राथमिक आरोग्य केंद्राच्या हद्दीमध्ये दोन तीन जिल्हा परिषद सदस्य असतात. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या राहणाऱ्या स्थानिक जिल्हा परिषद सदस्याला समितीवर सामील करून घेण्यास प्राधान्य दिले तर चांगले काम होऊ शकेल अशी सूचना समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, उप केंद्र आणि प्राथमिक आरोग्य केंद्राच्या रुग्ण कल्याण समितीवर जिल्हा परिषदेचे सदस्यच कार्यरत असतात.

लोकसंख्येच्या आधारावर नेमणूक करण्याचा विभागाचा निकष आहे. लोकसंख्येच्या निकषाशिवाय स्थानिक जिल्हा परिषदेच्या सदस्याला त्या समितीवर काम करण्यासाठी प्राधान्याने संधी देण्यात यावी. जेणेकरून गावातील लोकांची गैरसोय होत असल्यास ती व्यक्ती तातडीने त्या स्थानिक सदस्याकडे जाईल. परिणामी त्यांच्याकडून उचित ती कार्यवाही करून त्या रुग्णाची गैरसोय दूर करता येईल. या अनुषंगाने विभागाने योग्य ती कार्यवाही करावी अशी सूचना समितीने केली.

अभिप्राय व शिफारशी :

नियोजन विभाग

१.१४ भारत सरकारच्या नियोजन आयोगाने बहाल केलेले महत्व विचारात घेऊन एकात्मिक स्थानिक क्षेत्रीय विकासासाठी वित्तीय हस्तांतरण करण्याकरीता भारत सरकारच्या जिल्हा-केंद्रीत पद्धतीसाठी, गोंदिया जिल्ह्याचे जिल्हा केंद्रीत लेखापरीक्षण वर्ष २००६-१० साठी केले गेले. हे लेखापरीक्षण जिल्ह्यातील विविध सामाजिक-आर्थिक विकास उपक्रमांच्या अंमलबजावणीच्या परिणामांचा आणि दर्जाचा आढावा घेण्यासाठी केले गेले होते. राज्य शासनाकडून प्रत्येक जिल्ह्याकरिता योजनांतर्गत निधीचे वाटप करण्यात येते व जिल्हा नियोजन समितीमार्फत त्या-त्या जिल्ह्यामधील योजनांना मंजूरी देवून निधी उपलब्ध करून देण्यात येतो. गोंदिया जिल्ह्यातील सन २००६-०७ ते सन २०१०-११ या वित्तीय वर्षात जिल्हा नियोजन समितीस उपलब्ध निधी व योजनानिहाय खर्चाबाबत विभागीय सचिवांच्या साक्षीमध्ये चर्चा करताना असे निदर्शनास आले की, राज्यातील बऱ्याच मतदारसंघामध्ये लोकसंख्या व भौगोलिक परिस्थितीचे निकष न मानता विसंगतीने निधीचे वाटप झाले आहे. राज्याच्या समतोल विकासाच्या दृष्टीने विसंगत पद्धतीने निधीचे वाटप करणे संयुक्तीक नाही. **यास्तव जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती, शेतकऱ्यांची मागणी, पाण्याची आवश्यकता, जिल्ह्याचा प्रादेशिक व आर्थिक अनुषेश, जिल्ह्यामधील विकासाचा असमतोलपणा व लोकसंख्येचे प्रमाण या बाबी विचारात घेवून निधीचे वाटप करणे आवश्यक आहे. तसेच जिल्हा नियोजन समितीस प्राप्त निधीचे योजनानिहाय वाटप करताना स्थानिक पातळीवरुन प्राप्त झालेल्या प्रस्तावांची तपासणी लघु गटामार्फत करण्यात यावी, लघु गटाकडून पंचायत समिती / तालुका स्तरावरील प्रस्ताव प्राप्त करून सदर प्रस्तावांच्या छाननीअंती जिल्हा नियोजन समितीमध्ये विचारात घ्यावयाच्या योजनांची शिफारस करावी व त्यानुसार जिल्ह्याकरिता आवश्यक योजनांचा प्राधान्यक्रम ठरवून त्यानुसार निधी उपलब्ध करून द्यावा व संपूर्ण निधी वर्षाअखेर खर्च होवून सदर योजनांचा लाभ त्या-त्या जिल्ह्यातील लाभार्थ्यांना मिळावा यादृष्टीने आवश्यक ती उपाययोजना विभागाने करावी व विहित कार्यपद्धतीनुसार लघु गटाकडून प्रस्ताव प्राप्त करून न घेतल्यास त्याची जबाबदारी जिल्हाधिकारी व संबंधित अधिकारी यांच्यावर**

निश्चित करण्यात यावी. सदर जबाबदारी योग्यरित्या पार न पाडणाऱ्या अधिकाऱ्यांवर आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

गोंदिया जिल्ह्याचा सन २००६-०७ ते २०१०-११ या पाच वर्षामध्ये जिल्हा नियोजन समितीस मंजूर निधी व झालेला खर्च यांचा आढावा घेतला असता मंजूर निधीचा पूर्णपणे खर्च झालेला नव्हता, या योजनेंतर्गत निधीच्या १०% रक्कम अनुसूचित जातीच्या लोकांच्या लाभासाठी वापरावयाची होती. तथापि, संबंधित विधानसभा/विधानपरिषद सदस्यांनी अनुसूचित जाती क्षेत्रात कामे सुचविलेली नव्हती किंवा जिल्हा नियोजन प्राधिकाऱ्यांनी सुद्धा अनुसूचित जातीच्या लोकांच्या लाभासाठी विकासाची कामे करण्यासाठी निधी राखून ठेवला नव्हता असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविलेला आहे. याबाबत विभागाने सादर केलेला खुलासा स्वीकारण्यासारखा नाही. **विभागाने निश्चित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार अनुसूचित जातीच्या लोकांना लाभ मिळण्याच्यादृष्टीने आवश्यक तो निधी राखून ठेवण्याबाबत गोंदिया जिल्हा नियोजन समिती व राज्यातील इतर सर्व जिल्हा नियोजन समित्यांना स्पष्ट सूचना द्याव्यात. ज्या जिल्ह्यात अनुसूचित जातींच्या लोकांच्या लाभाचा अनुशेष राहिला असल्यास पुढील वर्षी त्या प्रमाणात वाढीव तरतूद करावी व त्यानुसार निधी खर्चाची कार्यवाही होत आहे याबाबत वेळोवेळी आढावा घेण्याबाबत उपाययोजना करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

गोंदिया जिल्ह्याकरिता सन २००९-१० व सन २०१०-११ या वित्तीय वर्षात मागास क्षेत्र अनुदान निधी (BRGF) या केंद्रपुरस्कृत कार्यक्रमांतर्गत वितरीत निधी खर्च होवू शकला नाही, या आक्षेपावरील चर्चेअंती जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उपस्थित स्थानिक संस्थांचे प्रतिनिधी व अधिकारी यांना जिल्हा नियोजन निधीमधून हाती घ्यावयाच्या योजना व सदर योजनांवर करावयाचा खर्च याबाबत प्रशिक्षण देण्याची आवश्यकता असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. **विभागीय सचिवांनी सदर बाब मान्य करताना DPDC चे पदाधिकारी व अधिकारी यांना यशदा संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यास सहमती दर्शविली. तथापि, विभागाने 'यशदा' या संस्थेमार्फत प्रशिक्षणाचा आराखडा तयार करावा व अन्य लोकप्रतिनिधी, जिल्हापरिषदेचे सदस्य, नगरपालिकांचे सदस्य व संबंधित अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाचे नियोजन करावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

१.१५ ग्रामविकास व जलसंधारण विभाग

महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती संहितेच्या नियम २७ मध्ये असे करारनिविष्ट केलेले आहे की, धनादेश आदात्याला ताबडतोब वितरीत करावयाचा असेल तेव्हाच त्याच्यावर स्वाक्षरी करावी. गट विकास अधिकारी, देवरी यांचे लेखापरिक्षणात असे आढळून आले की, इंदिरा आवास योजनेंतर्गत एकूण रु.१०.१७ लाखाचे ११४ धनादेश संबंधित व्यक्तींना वितरीत केले गेले नव्हते. **तथापि, लेख्यामध्ये संपूर्ण अनुदान खर्च झाल्याचे दाखविले होते. सदर बाब गंभीर आहे. या संदर्भात विभागाने खुलासा सादर करताना संबंधित वरिष्ठ सहाय्यक (लेखा), पंचायत समिती, देवरी यांना निलंबित करण्यात आल्याचे स्पष्ट केले. तथापि, सदर प्रकरणाचे गांभीर्य विचारात घेवून संबंधित सर्वच अधिकारी/कर्मचाऱ्यांची सर्वंकष चौकशी करून दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी. तसेच अशाप्रकारच्या चुकांची पुनरावृत्ती भविष्यात टाळण्यासाठी विभागाने सर्व संबंधितांना यासंबंधी स्पष्ट मार्गदर्शक सूचना पुन्हा एकदा निर्गमित कराव्यात व याबाबतचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

इंदिरा आवास योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांच्या लेखापरिक्षणात असे आढळून आले की, सदर योजनेतील १२८९ घरांचे काम अपूर्ण असताना DRDA ने सदर योजनेतील घरे पूर्ण झाली असल्याचा अहवाल शासनाला सादर केला, ही बाब अतिशय गंभीर व बेजबाबदारपणाची आहे. **DRDA ने शासनास माहिती कळविल्यानंतर जवळपास ७ महिन्यानंतर लेखापरिक्षणात ही बाब निदर्शनास आली. अशी चुकीची माहिती देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर विभागाने तातडीने कारवाई करावी व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती होणार नाही याबाबत उपाययोजना करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

१.१६ नियोजन (स्थानिक संस्था, रोहयो)

पंचायत समिती व नगरपालिकेमध्ये निवडून आलेल्या सर्व प्रतिनिधींना त्यांची जबाबदारी जास्त चांगल्यारितीने पूर्ण करण्यासाठी ज्ञान व कौशल्य वाढविण्यासाठी प्रशिक्षण देणे, पंचायतीमध्ये किंवा पंचायतीच्या निकट काम करणाऱ्यांनी परिणामकारकरित्या पंचायतीची सेवा करणे व पंचायतीने त्यांच्याकडे आलेले काम सुलभ करणे व त्यांची कार्यपद्धती सुधारण्यासाठी प्रशिक्षण देणे या हेतूने DRDA, गोंदियाकडे सन २००९ ते २०११ या कालावधीत रु.१.६४ कोटी एवढे अनुदान उपलब्ध झाले व सदर अनुदान कार्यालय व संनियंत्रण स्वयंचलनावर (Automization) खर्च केले. या संदर्भातील लेखापरिक्षणात असे आढळून आले की, यशवंतराव चव्हाण विकास व्यवस्थापन अकादमी (यशदा) व राज्य

पातळीवरील नोडल एजन्सी (State Level Nodal Agency) यांनी ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेले प्रतिनिधी व कार्यालयीन कर्मचारी यांना उपग्रह प्रशिक्षण देण्यासाठी मेसर्स भारत इलेक्ट्रॉनिक्स, बंगलोर यांचेशी Satellite Interactive Terminal (SIT) पुरविणे व बसविणे यासाठी करार केला. कंपनीने सन २००९-१० या वर्षात सर्व गटाना SIT पुरविले. **तथापि, एकाही नमुना चाचणी गटाने माहे मार्च, २०११ पर्यंत SIT बसविण्यासाठी आवश्यक पायाभुत सुविधा पुरविल्या नाहीत त्यामुळे SIT वेळेच्या आत बसविले जावू शकले नाहीत व त्यात त्याचा हमी कालावधी देखील संपला. याशिवाय एकही नमुना चाचणी गट यशदा, पुणे यांचेशी ऑनलाईन जोडला गेला नव्हता. परिणामी एकाही निवडून आलेल्या प्रतिनिधीला किंवा ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले गेले नाही. याशिवाय DRDA गोंदिया यांनी ११८ ग्रामपंचायतींना ११८ संगणकांचा पुरवठा केला व त्यावर रु.५४.१४ लाख एवढा खर्च केला. तथापि, ६९ संगणकांना ब्राडबॅन्ड जोडणी उपलब्ध करुन दिलेली नाही, त्यामुळे सदर संगणकांचा वापर देखील होवू शकला नाही. विभागाने सादर केलेल्या खुलाशात याबाबत कार्यवाही प्रगतीपथावर असल्याचे नमूद केले. या संदर्भात विभागाने सर्व SIT सेंटर कार्यरत करुन लोकप्रतिनिधी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी व पुरवठा केलेल्या सर्व संगणकांना ब्राडबॅन्ड जोडणी देवून ते उपयोगात आणावे तसेच सदर विलंबास जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

१.१७ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, आदिवासी विकास विभाग

अस्वच्छ स्वरुपाचे व्यवसाय करणाऱ्या बालकांना शालांतपूर्व शिक्षणासाठी आर्थिक सहाय्याची तरतूद करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून ५०:५० या प्रमाणात खर्चाच्या योजना कार्यान्वित करण्यात येतात. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हापरिषद, गोंदिया यांनी सन २००६ ते २०११ या कालावधीत जिल्ह्यातील १०३७३ पात्र विद्यार्थ्यांपैकी ९५४४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला व अपुऱ्या निधीमुळे ८४९ विद्यार्थी या योजनेखालील लाभापासून वंचित राहिले असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविलेला आहे. या संदर्भात साक्षीदरम्यान विभागाने खुलासा सादर करताना सन २०११-१२ या वित्तीय वर्षात जादा तरतूद प्राप्त करून शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला असल्याचे नमूद केले आहे. **तथापि, विभागाने भविष्यात असा विलंब टाळावा व सर्व पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव वेळीच प्राप्त करून त्या-त्या वेळी योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना मिळेल याबाबत दक्षता घ्यावी. तसेच अस्वच्छ कामगार ठरविण्याबाबतचे शासनाचे निकष फार जुने आहेत. त्यात सुधारणा करून ते अद्ययावत करण्याची आवश्यकता आहे. याबाबत विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

१.१८ शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनावर साक्षीदरम्यान शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या राज्यातील शाळांमधील अनेक त्रुटी समितीच्या निदर्शनास आल्या. **ज्यामध्ये जिल्ह्यातील शिक्षकांची संख्या कमी असणे, दुर्गम आदिवासी भागात शिक्षकांची पदे रिक्त असणे, शाळांच्या इमारती चांगल्या नसणे, ग्रामीण भागातील पालक अशिक्षित असल्याने ते त्यांच्या मुलांकडे लक्ष न देऊ शकणे, ते आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणे, परिणामी ते मुलांना खाजगी शाळेतही पाठवू शकत नसणे, सदर पालकांच्या पाल्यांची प्रगती काय आहे याची जाणीव त्यांना करवून देण्यात न येणे, शिक्षक पालकांसोबत सुसंवाद न करणे, ३-३ महिने मुलांना शालेय पोषण आहार न मिळणे, सर्वशिक्षा अभियानाअंतर्गत सोयी-सुविधांचे वाटप अथवा त्याचे नियोजन न होणे, त्याचा परिणाम शैक्षणिक दर्जावर आणि शाळांतील विद्यार्थ्यांवर होणे, राज्यातील आदिवासी भागातील शाळा अपग्रेड करणे आवश्यक असतानाही त्या अपग्रेड न करणे, विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होणार नाही याची जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता असणे, शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळांना आवश्यक त्या प्रमाणात भेटी न देणे, शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजविण्यासाठी शाळांमध्ये व्यवस्था उपलब्ध नसणे, गोंदिया जिल्ह्यातील १९४७ शाळांपैकी १६२४ शाळांमध्ये मध्यान्न भोजन तयार करण्यासाठी पाकशाळांवर छप्परच (किचन शेड) नसल्याचे आढळून येणे, राज्यातील अन्य शाळांतही साधारण अशीच स्थिती असणे, ६६६ शाळांमध्ये पाकशाळा भांडी नसणे अशा गंभीर व आक्षेपार्ह बाबी समितीच्या निदर्शनास आल्या. या सर्व बाबींचा थेट परिणाम हा शिक्षणाच्या गुणवत्तेवर होतो. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील शिक्षणाच्या गुणवत्तेतील दरी वाढत आहे. या संदर्भात विभागाने तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या उपाययोजनेची माहिती समितीला सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

१.१९ अन्न व नागरी पुरवठा विभाग

गरीब लोकांना रास्त भावात धान्य उपलब्ध करून देणे ही केंद्र तसेच राज्य शासनाची प्रमुख जबाबदारी आहे. अन्नधान्य प्रापण, साठवण, वाहतूक स्वरुपात वाटप इ. केंद्र सरकारची जबाबदारी आहे, तर स्वस्त धान्य दुकानांचे जाळे निर्माण करून अन्नधान्याचे वाटप व वितरण, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे ठरविणे, शिधापत्रिका निर्गमित करणे, स्वस्त धान्य दुकानांचे पर्यवेक्षण व त्याचे संनियंत्रण ही राज्य शासनाची जबाबदारी आहे. गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडून ९८१ स्वस्त धान्य दुकांनाद्वारे उपरोक्त व्यवस्था पाहिली जाते. लेखापरिक्षणाच्या छाननीत असे

निदर्शनास आले की, ५० दिवस करारनिविष्ट कालावधीत अन्नधान्याची उचल न केल्यामुळे सन २००६ ते २०११ या कालावधीत ३३६०१ मेट्रीक टन अन्नधान्याचा वाटा एएवाय/एपीएल/बीपीएल योजनेखाली व्यपगत झाला. **या संदर्भात खुलासा करताना विभागाने पतमर्यादा उपलब्ध नसणे अथवा वाहतूकी संदर्भातील अडचणींमुळे अन्नधान्याच्या उचलीवर परिणाम झाल्याचे मान्य केले. या संदर्भात गोंदिया जिल्ह्यातील व राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये एएवाय/एपीएल/बीपीएल लाभार्थ्यांना आवश्यक अन्नधान्याचा पुरवठा होण्याच्या दृष्टीने राज्यातील ज्या-ज्या ठिकाणी गोदाम बांधकाम प्रगतीपथावर आहे या सर्व कामांचा आढावा घेवून अपूर्ण कामे विहित वेळेत पूर्ण करावी, अन्य ठिकाणी स्वस्त धान्य दुकानापासून विशिष्ट अंतरावर साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी गोदाम बांधणेबाबत आराखडा तयार करण्यात यावा. व गोदाम बांधकामाची कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण करावी तसेच केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अन्नधान्याचा साठा उचल, वाहतूक व आवश्यक सर्व बाबींसाठी निधी उपलब्ध करून द्यावा व सदर योजनेचा लाभ राज्यातील सर्व एएवाय/एपीएल/बीपीएल लाभार्थ्यांना वेळीत प्राप्त होईल, प्राप्त साठा व्यपगत होणार नाही तसेच तो खराब न होता सुस्थितीत राहील याबाबत विभागाने निश्चित उपाययोजना करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

१.२० शालेय शिक्षण विभाग

समाजातील दुर्बल घटकांना आणि विशेषतः अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधाचे प्रवर्तन करण्यासाठी विविध शिष्यवृत्ती योजना भारत सरकारच्या आर्थिक पाठिंब्याने राज्य शासन कार्यान्वित करीत आहे. **जिल्हा पातळीवर या योजना विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेकडून कार्यान्वित केल्या जात आहेत. यासाठी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी पात्र विद्यार्थ्यांची नावे निवडण्यासाठी शिक्षण विभागाकडून प्रस्ताव न मागविता शैक्षणिक संस्थांकडून आलेल्या प्रस्तावाच्या आधारे शिष्यवृत्ती देण्यात आली ही बाब अतिशय गंभीर आहे. याप्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

१.२१ सार्वजनिक बांधकाम विभाग

गोंदियातील मरणजोब, मासुलकसा, घोनाडी मार्ग किमी ७/०० ते २१/०० ची सुधारणा करण्याचे काम एका कंत्राटदाराला अंदाजित किंमत रु.५.२० कोटीच्या १८.२५% कमी दराने देण्यात आले. मुळ अंदाजपत्रकात तसेच करारनाम्यात ७५ मी.मी. जाड बीबीएम रस्ता पृष्ठभागाची तरतूद करणे व बांधणे ही बाब समाविष्ट होती. तथापि, विभागाने या बाबीच्या ऐवजी अतिरिक्त नविन बाब हॉटमिक्स, हॉट लेड बीट्युमन्स् मेडामिनस मॅकॅडमची तरतूद करणे व टाकणे ही बाब मंजूर केली व त्यानुसार कार्यवाही केली. सदर बाब मंजूर करारनाम्यामध्ये समाविष्ट नव्हती. त्यामुळे मुळ मंजूर बाबीच्या तुलनेत रु.२.४० कोटी अतिरिक्त खर्च करण्यात आला असा आक्षेप लेखापरिक्षणात नोंदविलेला आहे. मरणजोब, मासुलकसा, धानोडी या रस्त्याचे ५०% काम बीबीएम ऐवजी बीएम ही बाब कार्यान्वीत करून करण्यात आले आहे**. बीबीएम अंतर्गत सदर रस्त्याचे काम पूर्ण केले असते तर ते १८.२८% कमी दराने घेतले असते व करारातील अटी व शर्तीनुसार योग्य होते. तथापि करारात नमूद नसलेल्या बीएम अंतर्गत रस्त्याचे काम पूर्ण केले व त्यावेळी १८.२८% करारात नमूद कमी दराचा विचार केला नाही तसेच निविदेला बगल देण्याचा प्रयत्न केला व कंत्राटदारास त्यावेळी जो दर बाजारात होता त्यानुसार रक्कम अदा केली आणि कमी दराच्या निविदेमुळे झालेली बचत आणि बीएमला रद्द केल्याने झालेली बचत अशी पूर्ण राशी अतिरिक्त बाबीत खर्च केल्याने प्रशासकीय मर्यादेत काम पूर्ण केल्याचे दाखवून समितीची दिशाभूल केली आहे असे समितीला वाटते. शासनाचे ४६ ते ४७ लाख रुपयांचे नुकसान केले आहे ही बाब अत्यंत गंभीर असून या कामाला मान्यता देणाऱ्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात करावा अशी समितीची शिफारस आहे.**

१.२२ नगरविकास विभाग

गोंदिया शहराची लोकसंख्या १,२०,९०२ (सन २००१ च्या जनगणनेनुसार) आहे. या नगर परिषदेच्या अधिकार क्षेत्राखाली प्रतिदिन ४० मेट्रीक टन कचरा निर्माण होतो. ज्यापैकी ५९% ज्याची जैविक अवनती होवू शकत नाही असा आहे. कचरा गोळा करण्याकरिता शहरात २०० कचराकुंड्या व १०० कचरा टाकण्याच्या पेट्या दिल्या आहेत. सध्या शहरात घनकचरा विल्हेवाट संयत्रे अस्तित्वात नाहीत. गोंदिया नगर परिषद शहराच्या वेशीवरील भागात कचरा टाकून घनकचऱ्याची असंघटित व अशास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावते. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाराखाली एक कचरा प्रक्रिया केंद्र माहे ऑक्टोबर, २००५ मध्ये चालू करण्यात आले. तथापि, गावकऱ्यांनी केलेले आंदोलन आणि पर्यावरणातील प्रदुषण व सार्वजनिक अनारोग्याच्या धोक्यामुळे कचरा टाकण्याचे काम थांबले आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने पुढे अधिकार पत्राचे नुतनीकरण केले नाही व शेवटी माहे मार्च, २००८ मध्ये कचरा प्रक्रिया संयंत्र बंद झाले असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविलेला आहे. यासंदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीमध्ये गोंदिया शहरातील घनकचरा व्यवस्थापनाकरिता निश्चित स्वरुपाचा तोडगा काढावा, तो पर्यंत कचरा

नेण्यासाठी पूर्णपणे झाकलेली (covered) ट्रॉली व ट्रकचा वापर करावा अशी सूचना समितीने केली. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल एका महिन्याच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे. तसेच राज्यातील सर्वच नगरपालिका क्षेत्रा अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनाबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. शासनाने १४ वा वित्त आयोग, अमृत योजना अथवा अन्य योजनांमधून याकरिता निधी उपलब्ध करून द्यावा अशी समितीची शिफारस आहे. **तसेच नगरपालिकांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या निधीमधून खर्च करताना नगरपालिकेची मंजुरी घ्यावी लागते हिच स्थिती सर्व स्थानिक संस्थांच्याबाबत लागू आहे. अनेकवेळा स्थानिक संस्थांकडून अशा मंजुऱ्या दिल्या जात नाहीत अथवा विलंबाने दिल्या जातात. त्यामुळे शासनाचा निधी वेळेवर खर्च होत नाही व निधी उपलब्ध असूनही जनतेला योजनेचा लाभ मिळत नाही अशी परिस्थिती निर्माण होते. यास्तव शासनाने मंजूर केलेल्या योजना व वितरित निधीबाबत पुन:श्च स्थानिक संस्थांची मंजुरी घ्यावी लागणार नाही याबाबत कायद्यातील तरतुदींमध्ये आवश्यक ती सुधारणा करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

नगर परिषदेचे वार्षिक लेखे सादर न करणे याबाबत आक्षेप नोंदविताना नगर परिषद गोंदिया व तिरोडा यांचेकडील सन २००६ ते २०११ या कालावधीतील वार्षिक लेखे सप्टेंबर, २०१५ पर्यंत सादर करण्यात आलेले नाहीत. याबाबत ज्या कालावधीचे लेखे वेळीच सादर केलेले नाहीत त्या सर्व कालावधीचे लेखे स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाकडून तपासून घेण्यात यावेत व त्यानंतर लेखे जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात यावेत. तसेच सदर लेखे सादर करण्यात दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. **राज्यातील सर्वच नगरपालिकांचा याबाबत आढावा घेण्यात यावा. ज्या 'अ' वर्ग नगरपालिकांमध्ये लेखापाल आणि लेखापरिक्षकांची पदे रिक्त आहेत, ती सर्व पदे तातडीने भरणेबाबत कार्यवाही करण्यात यावी, आवश्यकता असेल तर वित्त विभागाकडून अधिकाऱ्यांची मागणी करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

UIDSSMT ह्या योजनेअंतर्गत भूमिगत गटार योजनेचा लाभ अजूनपर्यंत काम सुरू न झाल्यांमुळे गोंदिया शहराला मिळाला नाही. अध्यक्ष, नगरपरिषद, गोंदिया यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल केलेल्या याचिकेबाबत योग्य लक्ष देऊन शासकीय अधिवक्ता यांचेकडे पाठपुरावा केला जाईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिल्यावरही शासनाकडून न्यायालयात आपले म्हणणे न मांडल्याने उच्च न्यायालयाने एकतर्फी निकाल दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी दिला. विभागाकडून दुर्लक्ष केल्यामुळे शासनाच्या निर्णयाविरूद्ध निकाल लागला त्याबद्दल शासनाने त्वरित दखल घ्यावी तसेच न्यायप्रविष्ठ असलेल्या अनेक केसेसमध्ये शासनाचा पराभव अशाच प्रकारे होत असलेल्या दुर्लक्षामुळे होतो म्हणून याबाबत योग्य त्या उपाययोजना निश्चित करण्यात याव्या अशी समितीची शिफारस आहे.

१.२३ पाणीपुरवठा विभाग

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामधील विविध पाणीपुरवठा योजनांवर विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेताना असे निदर्शनास आले की, शाश्वत पाण्याचे स्त्रोत नसताना योजना राबविण्यात आल्या, वीज देयके न भरल्यामुळे तसेच देखभाल दुरूस्तीच्या कारणास्तव काही योजना बंद पडल्या, विभागीय सचिवांनी सादर केलेल्या खुलाशावरील चर्चेच्याअंती समितीने निर्देश दिले की, **राज्यातील ज्या-ज्या प्रादेशिक योजना कार्यान्वित करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे त्या-त्या ठिकाणी राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करून द्यावा, नवीन योजना सुरू करताना शाश्वत पाण्याचे स्त्रोत असल्याची खात्री करावी. तामिळनाडू व गुजरात राज्यामध्ये औद्योगिक पाणीपुरवठा, नागरी पाणीपुरवठा व ग्रामीण पाणीपुरवठा या तीनही प्रकारच्या योजना एकाच विभागामार्फत राबविल्या जातात. महाराष्ट्रात मात्र या तीनही योजना वेगवेगळ्या विभागामार्फत राबविल्या जातात. त्यामुळे त्यात समन्वयाचा अभाव दिसून येतो. राज्यातील पाणीपुरवठा योजना सुरळीतपणे कार्यान्वित राहतील व जनतेला आवश्यक तो पाणीपुरवठा करता येईल. याबाबत इतर राज्यांचा पण सर्वंकष अभ्यास करून योग्य ती कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, गोंदियामार्फत ज्या ७ प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्यात आली त्यापैकी ४ पाणीपुरवठा प्रादेशिक योजना बंद आहेत. त्यामुळे त्या गावातील लोकांना या योजनाचा फायदा होत नसल्याने सदर ४ पाणीपुरवठा योजना ज्या जिल्हा परिषदेद्वारे राबविण्यात येत आहेत. **तसेच राज्यातील इतर जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांचाही आढावा घेण्यात यावा व ज्या ठिकाणी निधीअभावी योजना बंद आहेत त्या ठिकाणी राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करून द्यायच्या दृष्टीने कार्यवाही करावी. तसेच त्या जिल्हा परिषदेला कायमस्वरूपी मदत कशी करता येईल याबाबत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

जलस्वराज्य प्रकल्पामार्फत २१६ गावांपैकी २१० गावाची पाणी नमुना चाचणी घेतलेली असून ६ गावांची पाणीपुरवठा योजना नमुना चाचणी प्रमाणे सुधारित करण्याचे व नमुना चाचणी घेण्याबाबत सन २०१५-१६ च्या प्लॅनमध्ये समावेश करण्यात येणार असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले होते. त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

१.२४ सार्वजनिक आरोग्य विभाग

सडकअर्जुनी येथील ग्रामीण रुग्णालय सन २००४ पासून एका प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीमध्ये सुरु आहे. ग्रामीण रुग्णालयाकरिता ३० खाटांची संख्या मंजूर होती. तरीही फक्त ६ खाटाच कार्यरत होत्या. ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचे काम अपूर्ण होते. त्यामुळे सडकअर्जुनी येथील जनता आरोग्य देखरेख पायाभूत सुविधांच्या लाभापासून वंचित राहिली. याबाबत विभागाने इमारतीचे बांधकाम आता पूर्ण झाले असून इमारत रुग्णालयाकरिता हस्तांतरीत करण्यात आल्याचा खुलासा समितीसमोर केला. यासंदर्भात राज्यातील सर्वच रुग्णालयांच्या इमारतीच्या बांधकामाबाबत आढावा घेतला असता बऱ्याच ठिकाणी रुग्णालयांचे बांधकाम अपूर्ण आहे, ज्या ठिकाणी इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले त्याठिकाणी आवश्यक यंत्रसामग्री उपलब्ध करून दिलेली नाही. तर काही ठिकाणी इमारत व यंत्रसामग्री उपलब्ध असूनही डॉक्टर, टेक्नीशियन व कर्मचाऱ्यांअभावी जनतेला आरोग्याच्या सेवा उपलब्ध होऊ शकल्या नाही ही बाब समितीच्या निदर्शनास आली.

ज्या ठिकाणी उपकेंद्र स्थापन करणे आवश्यक आहे त्या ठिकाणी जागेअभावी उप केंद्र स्थापन केली नसल्यामुळे ग्रामीण जनता रुग्णालयातील सेवेपासून वंचित राहत आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या उपरोक्त स्थितीबाबत समितीने गंभीर चिंता व्यक्त केली व ज्या इमारतींची बांधकामे अपूर्ण अवस्थेत आहे त्याकरिता प्राधान्याने निधी उपलब्ध करून ती तातडीने पूर्ण करण्यात यावीत. **ठेकेदारामुळे विलंब होत असल्यास त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी, इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेल्या ठिकाणी आवश्यक ती यंत्रसामग्री व मनुष्यबळ तातडीने उपलब्ध करून देण्यात यावे, जेणेकरून इमारत बांधकामावर झालेला खर्च विनियोगात येईल व तेथील जनतेला रुग्णालयीन सेवेचा तातडीने लाभ मिळेल. तसेच ज्या गावामध्ये उपकेंद्राकरिता जागा उपलब्ध नाही किंवा निधीअभावी बांधकामाला उशीर होत आहे त्या ठिकाणी समाजमंदिर व अन्य इमारतींमध्ये तात्पुरत्या स्वरूपात उपकेंद्र सुरू करून ग्रामीण जनतेला रुग्णालयीन सेवेचा लाभ देण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत अ, ब, क व ड या संवर्गातील जवळपास एकूण ९८०४ पदांपैकी २७२७ पदे रिक्त असून एकूण २७.८०% पदे रिक्त आहेत. रुग्णालयात कार्यरत डॉक्टरांपैकी जवळपास ८०० ते ९०० डॉक्टरर्स पदव्युत्तर (PG) शिक्षणाकरिता गेल्यामुळे तांत्रिकदृष्ट्या सदर पदे भरलेली दिसतात परंतु प्रत्यक्षात डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे जनता रुग्णालयातील सेवेपासून वंचित राहते. **पदव्युत्तर शिक्षणाकरिता गेलेल्या डॉक्टरांचे वेतन आहरण करण्यासाठी अधिसंख्य (सुपरन्युमरी) पदे उप संचालक/संचालक यांचे स्तरावर निर्माण करून या सर्व डॉक्टरांचे वेतन व भत्ते त्या पदावरून आहरण करण्यात यावी व प्रत्यक्ष रुग्णालयातील पदे अन्य डॉक्टरांमार्फत भरण्यात येऊन ग्रामीण जनतेला रुग्णालयातील सेवा देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

राज्यातील ग्रामीण रुग्णालये, उप जिल्हा रुग्णालये व जिल्हा रुग्णालयांमधील तज्ञ डॉक्टरांची पदे फार मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्यामुळे तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवा उपलब्ध न होण्याबाबत असंख्य तक्रारी लोकप्रतिनिधींकडे प्राप्त होतात. **विशेष तज्ज्ञांची पदे भरण्याबाबत विभागाने तातडीने कार्यवाही करावी. सदर पदे भरेपर्यंत राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फत तात्पुरत्या स्वरूपात विशेष तज्ज्ञ उपलब्ध करून द्यावेत. राज्यातील सर्वच रुग्णालयांमध्ये विशेष तज्ज्ञांची पदे रिक्त राहणार नाहीत याची विभागाने दक्षता घ्यावी. उपरोक्त सर्व कार्यवाहीबाबत विभागाने निश्चित उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

परिशिष्ट - अ

विवरणपत्र क्र. १

दिनांक 31 मार्च 2011 रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल क्र.2 (नागरी)

परिशिष्ट 4.1.1 (संदर्भ : परिच्छेद 4.1.7.2; पृष्ठ 178) रोख शिलकीचा बँकेतील शिलकीशी ताळमेळ न घालणे					(₹ लाखांमध्ये)
गट	योजनेचे नांव	ताळमेळ घातला पर्यंत	31 मार्च 2011 ची शिल्लक		फरक
			रोख पुस्तिका	बँक	
अर्जुनी मोरगांव	आयएवाय	मार्च 2010	103.12	123.04	19.92
	आय ए वाय (एन)	मार्च 2010	45.42	46.64	1.22
	आर जी एन वाय-1	March 2010	9.62	9.53	0.09
	एम जी एन आर ई जी एस	मार्च 2010	30.51	17.04	13.47
	एस जी एस वाय	मार्च 2010	6.49	11.93	5.44
देवरी	एम जी एन आर ई जी एस	मार्च 2010	1.23	2.03	0.80
गोंदिया	आय ए वाय	घातला नाही	87.84	230.71	142.87
	आय ए वाय (एन)	घातला नाही	89.81	87.62	2.19
	एस जी एस वाय	घातला नाही	11.32	9.63	1.69
	आर जी जी एन वाय-1	घातला नाही	13.55	23.86	10.31
	एम जी एन आर ई जी एस	घातला नाही	41.88	67.74	25.86
सडक-अर्जुनी	आय ए वाय-I	घातला नाही	45.03	49.77	4.74
	आय ए वाय-II	घातला नाही	44.40	87.54	43.12
	आय ए वाय (एन)	घातला नाही	11.89	16.65	4.76
	एस जी एस वाय	मार्च 2009	16.41	19.97	3.56
	आर जी एन वाय-I	मार्च 2009	2.01	2.70	0.69
तिरोडा	आय ए वाय	मार्च 2010	31.19	35.15	4.96
	आय ए वाय (एन)	मार्च 2010	42.01	47.00	4.99
	आय ए वाय (256)	मार्च 2010	10.56	18.20	7.64
	एस जी एस वाय	मार्च 2010	21.16	23.00	1.84
	एम जी एन आर ई जी एस	मार्च 2010	2.26	16.13	13.87
	आर जी एन वाय-I	मार्च 2010	7.15	8.13	0.98
				एकूण	315.01

विवरणपत्र क्र. २

परिशिष्ट 4.1.4 (संदर्भ: परिच्छेद 4.1.11; पृष्ठ 204) पुढील विभागांत अंतर्गत लेखापरीक्षण केले नाही		
अ.क्र	विभागाचे नांव	कालावधी
1	बांधकाम विभाग	2006-07 व 2010-11
2	पाटबंधारे विभाग	2006-07 व 2010-11
3	कृषी विभाग	2006-07 व 2010-11
4	पशुसंवर्धन विभाग	2006-07 व 2010-11
5	सामान्य प्रशासन विभाग	2006-07 व 2010-11
6	आरोग्य विभाग	2010-11
7	महिला व बाल विकास विभाग	2006-07 व 2010-11
8	एकात्मीकृत बाल विकास योजना	2006-08 व 2010-11
9	समाज कल्याण विभाग	2006-07 व 2010-11
10	ग्रामीण पाणीपुरवठा विभाग	2006-07 व 2010-11
11	शिक्षण विभाग	2006-07 व 2010-11
12	पंचायत समिती आमगांव	2007-09 व 2010-11
13	पंचायत समिती अर्जुनी मोरगांव	2006-07 व 2008-09
14	पंचायत समिती सडक अर्जुनी	2006-08 व 2010-11
15	पंचायत समिती देवरी	2006-08 व 2010-11
16	पंचायत समिती गोंदिया	2010-11
17	पंचायत समिती गोरेगांव	2010-11
18	पंचायत समिती सालेकसा	2006-07 व 2010-11

विवरणपत्र क्र. ४

A-1

COMPLETION CERTIFICATE

1) Name of work — Construction of New Two Line ROB adjoining existing ROB on

2) Agency — M/s Super Construction Co. Nagpur

3) Aggrement No & Date — B1/434/DL/2008-09
B1/531/DL/2012-13

4) Date of start — 04/12/2008
28/01/2013

5) Due date of completio — 03/03/2010
27/01/2014

6) Extension Granted — 31/12/2013
27/04/2014

7) Actual date of comple — 31/12/2013
27/04/2014

8) Aggrement Amount — 193126755.00
79062639.00
Total — 272189394.00

9) Executed Amount — 282969107.00
102312498.00
Total — 385281605.00

10) Final bill recorded by — Shri. L.G. Mundada, Sec. Eng.

11) Recorded in M.B No — 1042

12) Recorded in F.B No — 1042

13) Incumbancy of A.E.Gr.I/S.D.E/S.D.O — Shri D.K. Bhagat, SDO

14) Incumbancy of Executive Engineer — Shri K.P. Janbandhu

CERTIFICATE

1 Certified that the work
Aggrement No.B--1/ 434 /DL of2008-09
had been completed by the said contractor / piece worker in all respect and as per thr standard specification.

2 Certified that no observation memo of vigilance and quality control circle /Inspection Note of Higher Officer pen work.

3 Certified that no recovery other than proposed in final bill is due from contractor

4 Certified that no machinery / Special T & P and other departmental materials has been issued on hire to

5 Certified that the M.S.A is mentioned / Not required to be mentioned.

6 Certified that the dismantelled material obtained as per statement enclosed is accounted for in the

Sub Divisional Officer
T R P. Sub Division
Gondia

A-2 (2)

COMPLETION CERTIFICATE

1 Certfied that the work of Improvement to Sironcha - Gadhchiroli - Wadsa - Kohmara - Gondia - Balaghat Road Km 350/00 to 365/800

alloted to Shri M/s M S Walia & Brothers, Gondia.

vide Agreement No./Rate lis

had been executed as per standard specification of the department.

2 Certified that there is no any observaton memo pending for this work as concerned with the contractor.

3 No dues are outstanding against the contractor for thjs work.

4 No dues are outstanding against the contractor on a/c of hire charges of Govt. machineries or T&P.

5 Work completed in all respect on dated 25.3.12

Sec. Engg.

Sub Divisional Engineer
P W. Sub Division no. 1,
Gondia

A-3

Name of work :- Improvement To Singandoh Palandur Road M.D.R.40

Agency :-M/S M.S.Walia & Bros @ Gondia.

	Agrtt. No.	B1/~~363~~ 636/ D.L. 2009-10
	Sr No. of Bill	6 Th & Final
3	Date of Aggrement.	31/08/2009
4	Date of Start	31/08/2009
5	Due to of completion	:- 6 Month i.e. 13/04/2012
6	Extension Granted	30/04/2012
7	Actual Date of completion	25/05/2011
8	Agreemnet Amount	19931753.00
9	Executed Amount	~~13147252.00~~ 13 14 5596
10	% Excess & /Saving	34.04 Saving %
11	Final bill recorded by	Shri S.U. Katre Sec. Engineer
12	Mts. Recorded in M.B. No/P.No.	967 84 To 93
13	Bill Recoded in M.B. F.B. No/P.No.	967 33 to 40
14	Inclub of A.E.Gr-1/S.D.E./S.D.O.	Shri D.B.Uikey S.D.O.
15	Incumbency of Executive Engineer	Shri K.P. Janbandhu E.E.

CERTIFICATE.

Certificate that the work is Completed in all menner . There is no any O.M.is pending on this work. No. any recovery is balance near agency.

Sub Divisional Officer
P.W.Sub Division
Deori

OMPLETION REPORT

A- 4

Name of Work : Const. of Major Singel Lane Submersible Bridge @ River Gadvi on Kesori Umerpaili Ghogra Palandur Singandoh Road.

2	Agency	M/S Mayur Const. Co. @ Gondia
3	Agrtt. No. Bl : 880 / D.L. 2008-09	
4	Date of Start	02/03/2009
5	Due to of completion	01/03/2009
6	Extension Granted	30/04/2012
7	Actual Date of completion	15/03/2012
8	Agreemnet Amount	13761286.00
9	Executed Amount	~~13367713.00~~ 13371745 ~~13371683.00~~
10	% Excess & /Saving	2.86 % Saving
11	Final bill recorded by	Shri S.U. Katre. Sec Engineer.
12	Mts. Recorded in M.B. No/P.No.	969 / 98 to 99
	[illegible] No/P.No.	1727 13 To 19
14	Inclub of A.E.Gr-1/S.D.E./S.D.O.	Shri D.B. Uikey.
15	Incumbency of Executive Engineer	Shri K.P.Janbandhu.

CERTIFICATE.

The work is completed in all rispect. There a O.M. is pending on this work. There is no any recovery is balance near agency.

Sub-Divisional Officer
P.W. Sub-Division,
Deori

विवरणपत्र क्र. ५

परिशिष्ट 4.1.2
(संदर्भः परिच्छेद 4.1.9.1; पृष्ठ 194)
कामाच्या व्याप्तीतील बदल

(₹ लाखांमध्ये)

अनु. क्र.	कामाचे नांव	प्रशासकीय मान्यतेची रक्कम व काम मंजूर झाल्याची तारीख	अंदाजित किंमत	निविदेची किंमत	मार्च 2011 पर्यंत केलेला खर्च	मंजूर प्रकल्पांतर्गत असलेल्या नसलेल्या अतिरिक्त बाबींचे विवरण	अतिरिक्त बांधीवरील खर्च	विभागाचे अभिप्राय
1.	इटखेडा सिरोली बुटाई केशोरी मार्गावर कि मी 14 ला गाढवी नदीवर मोठा पूल बांधणे	378 28-08-2008	339.67	318.82	332.85	पोच रस्त्यांची संरक्षक भिंत व झीज मार्ग	20.11	हे काम अ अ सा बां मं नागपूर यांच्या अनुदेशाप्रमाणे केल्या गेले.
2.	सिरोंचा-आष्टी-गडचिरोली कोहमारा-गोंदिया-बालाघाट मार्ग रा म मार्ग 275 कि मी 282 ते 291 ची सुधारणा	475 28-08-2008	424.90	348.29	408.80	सध्या अस्तित्वात असलेल्या 3.70 मी कॅरेज ऐवजी 50 मि मि बी एम घालणे	67.24	जास्त वाहतुकीमुळे रस्त्याला खूप हानी पोचली होती हे काम अ अ, सा बां म, नागपूर यांच्या अनुदेशाप्रमाणे निष्पादित केल्या गेले.

विवरणपत्र क्र. ६

नागरी अहवाल. क्र. २. ४-५

श्री. बी.आर. लुंगे, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांची गोंदिया जिल्हयातील सा.बां. उप विभाग अर्जुनी मोर अंतर्गत कामाची दि. ८/९/२००९ रोजीची निरिक्षण टिप्पणी.

निरिक्षणाचे वेळी उपस्थित असलेले अधिकारी :-

१. श्री. जे.एच. भानुसे, कार्यकारी अभियंता, रो.ह.यो. (सा.बां) विभाग गोंदिया
२. श्री. आर.जी. खोत, उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सा.बां. प्रादेशिक विभाग, नागपूर
३. श्रीमती. जे.ए. ठाकरे, सहाव्यक अभियंता श्रेणी-१, सा.बां. उप विभाग अर्जुनी/ मोरगांव
४. श्री. एम.जे. बिसेन, शाखा अभियंता/ श्री व्ही.बी. वासनिक, शा.अ. व श्री ए.आर.जांभुळकर शा.अ. सा.बां. उप वि. अर्जुनी मोर.

(१) अर्जुनी/ मोरगांव तालुक्यातील ईटखेडा-सिरोली, बुटाई-केशोरी (प्रजिमा-३९) रस्त्यावर कि.मी. १४/० मध्ये गाढवी नदिवर मोठया पुलाचे बांधकाम करणे.

सदर काम केंद्रिय मार्ग निधी अंतर्गत रु. ३७८.०० लक्ष किमंतीस मंजूर असून कामाची तांत्रिक मान्यता किमंत रु. ३४०.०० लक्ष आहे. कामाची निविदा निश्चित झालेली असून नागपूर येथील मेसर्स उदय कन्स्ट्रक्शन कं. ज्याचे ६.२७ टक्के कमी दराचा देकार स्विकारण्यात आलेला आहे. पुलाचे बांधकाम ६ मिटरचे -२८ गाळे पूर्ण झालेले असून काम समाधानकारक आहे. पुलाचे पोच मार्ग बुडीत प्रकाराचे असल्यामूळे आवश्यकता पडताळून की वॉल (Key wall) किशोरीच्या विरुध्द बाजूने बांधण्यात यावी. ज्यामूळे बुडीत पोहच मार्गावर जोड रस्ते बुडीत स्थितीत असतांना Hydraulic Jump form होणार नाही याची काळजी घ्यावी. तथापि जोड मार्गाच्या भरावाची पुलाजवळ उंची जास्त असल्यामुळे वरील प्रमाणे अंदाजित किंमतीच्या मर्यादेत आर्थिक विश्लेशन सादर करुन पुढील कार्यवाही त्वरेने करावी.

पुलावरुन ओलांडून गेलेल्या विद्युत वाहिनीच्या तारा इतरत्र स्थानांतर करण्यासाठीची कार्यवाही सा.बां. विद्युत विभाग व महाराष्ट्र राज्य वि.पा.कं. मर्यादित हयांचे मार्फत करण्यात यावी व पुल वाहतुकीसाठी निर्धोक करावा. आवश्यक तेथे सुरक्षेसंबंधी सुचना फलक लावण्यात यावेत.

(२) अर्जुनी/मोरगांव तालुक्यातील सुरबन (बोंडगांव) गांधारी (ग्रा.मा.८३) रस्त्यावर एकपदरी मोठया बुडीत पुलाचे बांधकाम करणे.

सदर पुलाच्या पाहणीअंती पुलाचे ६ मीटरचे २५ गाळयांचे बांधकाम तसेच बॉक्स रीटर्नसचे बांधकाम सोबतच पुलाच्या रेलींगचेही काम पुर्ण झाले असून काम समाधानकारक आढळले. बोंडगांव बाजुकडील पोच मार्गाचे बांधकाम हे मंजुर बाबीनुसार कटींग सेक्शन मध्ये २५० मीटर लांबीत आहे. सद्यःस्थितीत गावांकडून पुलाकडे जाण्यास अस्तित्वातील खडीकरणाचा रस्ता उपलब्ध आहे. बोडगांव बाजूने पुलाचे पोहच मार्ग कटींग मधून जात असल्यामुळे भराव टुंचू शकतो. त्यामुळे जोडरस्त्याच्या बाजूने पक्की गटारी बांधून भरावाला आवश्यक स्लोप देऊन पीचींग करण्यात यावे. तथापि अंदाजपत्रक किंमतीच्या मर्यादेत राहुन आर्थिक विश्लेशन या कार्यालयाला मंजूरीस्तव सादर करावे.

(३) अर्जुनी/ मोरगांव तालुक्यातील सिरोंचा- आष्टी-गडचिरोली-कोहमारा- गोदिया बालाघाट रस्ता (रा.मा. २७५) ची कि.मी. २७०/०० ते २८२/०० मध्ये सुधारणा करणे.

सदर काम केंद्रिय मार्गनिधी अंतर्गत रु. ४२५.०० लक्ष मंजूर असून किमी २७०/०० ते २८२/०० एकूण १२.०० किमी लांबीत रुंदीकरण, (३.७० ते ५.५०) मो-यांचे बांधकाम व रुंदीकरणाचे डांबरीकरण असा वाव आहे.

निरिक्षणाचे वेळी कि.मी. २७०/०० ते २७२/०० व किमी २८०/०० ते २८२/०० मध्ये उजविकडे बाजुचे रुंदीकरणाचे काम पुर्ण झालेले आढळले व डाव्या बाजुचे रुंदीकरणाचे व मो-यांचे काम प्रगतीत आहेत. तसेच किमी २७६/३०० ते २८०/०० मध्ये बी.एम व एस.डी.बी.सी.चे काम पुर्ण झाल्याचे आढळले. वाहतुकीसाठी अडथळा होवू नये यासाठी रुंदीकरणासाठी खोदलेल्या बाजुने सुचना फलक लावावेत. कामाचे योग्य नियोजन करुन काम विहीत मुदतीत पुर्ण करावे.

(४) अर्जुनी/ मोरगांव तालुक्यातील सिरोंचा- आष्टी- गडचिरोली- कोहमारा- गोंदिया बालाघाट रस्ता (रा.मा. २७५) ची किमी २८२/०० ते २९१/०० मध्ये सुधारणा करणे.

सदर काम केंद्रिय मार्ग निधी अंतर्गत रु. ४७५.०० लक्ष अंदाजीत रक्कमे करीता मंजूर आहे. सदर कामाचा करारनामा मे. एस.के. मेहता कंपनी नागपूर यांचे सोबत झाला असून १६.९५ टक्के कमी दराची निविदा स्विकारण्यात आलेली आहे. करारनाम्याची रक्कम रु. ३५३.०० लक्ष इतकी आहे. किमी २८२/०० ते २९१/०० एकूण ९.०० किमी लांबीत अस्तित्वातील ३.७० मिटर रुंद धावपट्टीचे ५.५० मिटर धावपट्टीत रुंदीकरण व डांबरीकरण करणे, रुंदीकरणामध्ये मुरुम व रेती मिश्रणाचे अस्तरीकरण, ८० मी.मी. आकाराच्या खडीचा १५० मीमी जाडीचा एक थर, ४० मीमी आकाराच्या खडीचा ७५ मीमी जाडीचा एक थर, ७५ मीमी जाडीचा बी.बी.एम चा एक थर व ५० मीमी जाडीचा बी.एम.चा एक थर व त्यानंतर ५.५० मिटर रुंदीत २५ मीमी जाडीचा एस डी.बी.सी. चा थर असा कामाचा वाव असल्याचे कार्यकारी अभियंता यांनी सांगीतले. निरिक्षणाच्या वेळी किमी २८२/५७२ ते २८९/०० (उजवी बाजुचे) खडीने रुंदीकरणाचे काम झाले असल्याचे आढळले. तसेच डावी बाजुकडील रुंदीकरणाचे काम प्रगतीत असल्याचे दिसते. रा.मा. २७२ (वडसा- लाखांदूर-साकोली) ची वाहतुक सदर रस्त्यावर वळविण्यात आल्यामुळे अस्तित्वातील डांबरी पृष्ठ भागाचे कॅबर व प्रोफाईल क्षतिग्रस्त झालेले असून रस्त्यांचा पृष्ठ भाग ठिक- ठिकाणी दबलेला आहे.

करिता अस्तित्वातील ३.७० मिटर रुंदीचे धावपट्टीत सुध्दा ५० मी.मी. जाडीचा बी.एम.चा एक थर देवून प्रोफाईल दुरुस्त करण्यात येवून मजबूतीकरण करावे. अतिरिक्त कामाचा प्रस्ताव व कामाचे आर्थिक विश्लेशन मंजुरीस्तव या कार्यालयात त्वरीत सादर करण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत अंदाजपत्रकीय किमंतीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

कामाचे योग्य प्रकारे नियोजन करुन काम विहीत मुदतीत पुर्ण करावे.

अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
नागपूर

जा.क्र. तावि/का.२(आरे)/अअ निटी/२००९-१०/ 2323 /२००९ दिनांक :- १९/ ९ /२००९

प्रतिलीपी :-

१. कार्यकारी अभियंता, रो.ह.यो. (सा.बां) विभाग, गोंदिया यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

२. सहा.अभियंता श्रेणी-१, सा.बां. उप विभाग अर्जुनी/ मोरगांव जि. गोंदिया यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित.

३. मंडळ कार्यालयातील तावि प्र.अ.६ (गोंदिया) यांना माहितीसाठी .

विवरणपत्र क्र. ७

Annexure-A7
CRF. District Centric Audit, Gondia

Rs. In Lakhs

Sr. No.	Name of work	Amount of A.A. (Rs. in Lakhs)	Estimated amount	Tender Amount	Exependiture reported in MPR of March-2011	Actual expenditure as per last RA bill paid (AS	Upto date Expen. (March-2015)	less/More reported
1	2	3	4	5	6	7	8	9
1	Improvement toSironcha Ashti Gadchiroli Kohamara Gondia Balaghar road SH-275 km 270 to 282	425.00	394.77	327.86	423.08	345.40		77.68
2	Improvement to Bharregaon Nakti Futana Parsodi road km 8/00 to 16/00 MDR-52	288.00	245.17	201.6	307.71	212.56		95.15
3	Improvement to Sironcha Ashti Gadchiroli Kohamara Gondia Balaghar road SH-275 km 350 to 800	697.00	682.54	525.48	591.15	423.15		168.00
4	Consturciton of Major bridge across river Gadhavi in km 14/00 on Itkheda Siroli Butai Keshori road in Taluka Arjuni Mor	378.00	339.67	318.06	405.06	329.80		75.26
5	Construction of Major Single lane submersible bridge across river Gadhavi in km 28/930 on Keshori Umarpayali Ghogra Palandur Sinandoh road MDR-40 in Gondia district	191.00	138.76	126.68	190.89	97.61		93.28
6	Improvement to Sironcha Ashti Gadchiroli Kohamara Gondia Balaghar road SH-275 km 282 to 291	475.00	424.9	348.29	469.07	408.81		60.26
	Sub Total	2454.00	2225.81	1847.97	2386.96	1817.33		569.63
7	(a) Const of Railway over bridge at Gondia No.1008/C.R.(1934)/Planning-3 Dt.14/2/2008	3462.77	3462.77	3462.77	2239.34	2669.34		-430.00
	(b) Expenditure incured contingent to CRF works (Costing Rs. 98.31 Crore)				0.00	139.63		-139.63
	Sub Total	3462.77	3462.77	3462.77	2239.34	2808.97	0.00	-569.63
	Grand Total	**5916.77**	**5688.58**	**5310.74**	**4626.30**	**4626.30**	**0.00**	**0.00**

Executive Engineer
EGS(PW)Dn.Gondia

Annexure-A8				
CRF. District Centric Audit of Gondia				
Expenditure on R.O.B. Gondia				
Sr.No.	Vr No.	Date	Amount	Agency
1	260	03/31/2009	35225840.00	M/s Super Const Co Nagpur
2	153	10/23/2009	20067441.00	M/s Super Const Co Nagpur
3	149	11/29/2009	27000000.00	M/s Super Const Co Nagpur
4	94	03/24/2010	21000000.00	M/s Super Const Co Nagpur
5	196	03/31/2010	30000000.00	M/s Super Const Co Nagpur
6	73	05/19/2010	10000000.00	M/s Super Const Co Nagpur
7	132	07/26/2010	5326476.00	M/s Super Const Co Nagpur
8	50	12/30/2010	31230468.00	M/s Super Const Co Nagpur
9	46	03/31/2011	9022035.00	M/s Super Const Co Nagpur
	Sub-Total Rs.		188872260.00	
10	31	20.7.09	3372925.00	FA&CAO SECR Nagpur
11	67	12/31/2010	8500000.00	FA&CAO SECR Nagpur
12	51	12/31/2010	20000000.00	FA&CAO SECR Nagpur
13	511	03/31/2011	34700000.00	FA&CAO SECR Nagpur
	Sub-Total Rs.		66572925.00	
14	24	11/29/2008	19500.00	Taluka inspecter,land record, Gondia
15	74	03/12/2009	24000.00	Taluka inspecter,land record, Gondia
16	24	11/29/2008	19500.00	Taluka inspecter,land record, Gondia
17	74	03/12/2009	24000.00	Taluka inspecter,land record, Gondia
	Sub-Total Rs.		87000.00	
18	346	03/31/2009	6500000.00	Ex Eng Elect.P.W.D.Nagpur
19	167	10/27/2009	117520.00	Ex Eng Elect.P.W.D.Nagpur
	Sub-Total Rs.		6617520.00	
20	27	11/29/2008	290000.00	Muncipal Concil Gondia
21	41	01/26/2009	236425.00	Muncipal Concil Gondia
22	41	01/29/2009	236425.00	Muncipal Concil Gondia
	Sub-Total Rs.		762850.00	
23	7	07/09/2009	146699.00	Geotech
24	60	07/24/2010	385720.00	Geotech
	Sub-Total Rs.		532419.00	
25	232	03/30/2009	49174.00	Shri S.M. Bhoyar Contractor
26	233	03/30/2009	49698.00	Shri S.M. Bhoyar Contractor
27	234	.30/3/2009	49470.00	Shri S.M. Bhoyar Contractor
	Sub-Total Rs.		148342.00	
28	59	01/30/2009	49650.00	S.M. Samarth
29	60	01/30/2009	49742.00	S.M. Samarth
30	61	01/31/2009	49317.00	S.M. Samarth
31	62	01/30/2009	49829.00	S.M. Samarth
	Sub-Total Rs.		198538.00	
32	55	01/31/2009	49824.00	M/s Saraswati civil warks
33	56	01/30/2009	49650.00	M/s Saraswati civil warks
34	57	01/30/2009	49666.00	M/s Saraswati civil warks
	Sub-Total Rs.		149140.00	
35	19	01/25/2008	300000.00	Ex Eng PWD Pune
36	26	11/29/2008	65060.00	Gurukrupa Cons Nagpur
37	28	11/29/2008	2865000.00	BSNL Bhandara
38	25	11/29/2008	4045000.00	MJP Gondia
39	48	02/13/2009	56486.00	Ex Eng MSEB ltd Gondia
40		05/27/2009	1020275.00	I.I.T Mumbai (for proof Checking)
41	9	12/03/2009	2683593.00	M.S.E D.C.Ltd Nagpur
42		07/07/2009	247789.00	Y.R. Shukla Gondia
43	58	01/30/2009	49322.00	S.S.Construction
44	105	03/28/2010	105888.00	Wisheshta Concept Nagpur
45			993924.00	Pr.Sarodoya MSS Tirora
	Sub-Total Rs.		12432337.00	
	Grand Total Rs.		276373331.00	(Upto March 2011)

Executive Engineer
EGS(PW)Dn.Gondia

विवरणपत्र क्र. ८

A-6

अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर.

e-mail senag@mahapwd.com.	दुरध्वनी क्रमांक २५६०४०९
जावक क्रमांक :- का.३(११)/निविदा/ १६२३	दिनांक :- १३/२०१०

प्रति,

कार्यकारी अभियंता
रो.ह.यो. (सा.बां.) विभाग,
गोंदिया.

विषय:- अतिरिक्त बाबीचे दरसुचीस मंजुरी मिळण्याबाबत..
मरामजोब मासुलकसा घोनाडी रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.
प्रजिमा ५१ किमी ७/०० ते २१/०० ता. देवरी जि. गोंदिया.
करारनामा क्रमांक ब-१/७५२/विभा २००८-०९.
कंत्राटदार- मे. सेठ कन्स्ट्रक्शन कं., नागपूर.

संदर्भ :- आपले कार्यालयीन पत्र क्रमांक ११६६/तां. ३/२०१०, दिनांक ०५.०३.२०१०.

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे मरामजोब मासुलकसा घोनाडी रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे प्रजिमा ५१ किमी ७/०० ते २१/०० ता. देवरी जि. गोंदिया करारनामा क्रमांक ब-१/७५२/विभा/२००८-०९ या कामावर उद्भवलेल्या रू २,६६,९७,१११ (रू दोन कोटी सहासष्ट लक्ष सत्यान्नव हजार एकशे अकरा फक्त) रकमेच्या अतिरिक्त बाबीचे दरसुचीस (दरसुची क्र. ३/२००९-२०१०) सहपत्रात दर्शविल्याप्रमाणे खालील अटींचे अधीन राहुन मंजुरी देण्यात येत आहे.

१) या कामावरील एकुण खर्चासह रक्कम प्र.मा. रकमेच्या मर्यादीत राहील.
२) सदर अतिरिक्त बाबींकरीता भाववाढ (Price Escallation) देय होणार नाही.

उपरोक्त मंजुरीप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

- मंजुर अतिरिक्त बाब विवरण.

अधीक्षक अभियंता
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
नागपूर.

(3)

अतिरिक्त बाबीची यादी व मंजुरीसाठी प्रस्तावित केलेले दर

मंडळ :- सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपुर

विभाग :- रो.ह.यो.(सा.बां.) विभाग गोंदिया

उपविभाग :- सा.बां. उपविभाग देवरी

कामाचे नांव :- Improvement to Mariamjob Masulkasa Ghoradi road km 7/00 to 21/00 in Gondia DBH.

कंत्राटदाराचे नांव मे. राठ कंन्स्ट्रक्शन कंपनी नागपुर

.....यांनी .....दिनांक .....अन्वये मंजूर केले

अ.क्रं.	बाबीचे वर्णन	परिमाण	(ह्या बाबींशी तुलनिय अशा) बाबींचा क्रमांक		दर	प्रत्येकी	रक्कम	शेरा
			स्वीकृत निविदा असल्यास	दराची अनुसुची असल्यास				
1	2	3	4	5	6	7	8	9
1	Providing and applying primer coat with Bitumen Emulsion (Medium Seting) complying with I.S. 8887, on prepared surface of granular Base, spraying primer at the rate of 0.6 kg / sqm using mechanical means. (including cleaning of road surface) etc complete.							
	Km. 2 to 5	7150.00		MORTH CSR 5.1/10	30.60 ~~32.60~~	Sqm	218790=00 ~~233090.00~~	
	Km. 6 to 8	7575.00		MORTH CSR 5.1/10	30.60 ~~32.60~~	Sqm	231795=00 ~~246945.00~~	
	Km. 9 to 11	12195.00		MORTH CSR 5.1/10	30.60 ~~32.60~~	Sqm	373167=00 ~~397557.00~~	
	Km. 12 to 14	13470.00		MORTH CSR 5.1/10	30.60 ~~32.65~~	Sqm	412182=00 ~~439796.00~~	
	Km. 15 to 17	13327.50		MORTH CSR 5.1/10	30.60 ~~32.65~~	Sqm	407822=00 ~~435143.00~~	
	Km. 18 to 20	12312.50		MORTH CSR 5.1/10	30.60 ~~32.65~~	Sqm	376747=00 ~~402003.00~~	

Item of Work	As per T.S. Estimate				Extra Item	Aa pwe update Cost				Excess	Saving
	Quantity	Rate	Unit	Amount (Rs.)		Quantity	Rate	Unit	Amount		
Km. 12 to 14	12603.75	230.00	Sqm	2898863.00	(D) Km. 12 to 14	630.19	~~7806.45~~ 7763.85	Cum	~~4919547.00~~ 4892701	~~2020684.00~~ 1993838=00	0.00
Km. 15 to 17	12776.25	232.00	Sqm	2964090.00	(E) Km. 15 to 17	638.81	~~7850.70~~ 7809.75	Cum	5015106.00 4988246	2051016.00 2024858=00	0.00
Km. 18 to 20	11839.50	233.70	Sqm	2766891.00	(F) Km. 18 to 20	592.00	~~7894.95~~ 7855.95	Cum	~~4673810.00~~ 4650190=00	~~1906919.00~~ 1883299=00	0.00
		Total Rs.		14607576.00			Total Rs.		~~25969056.00~~ 2669711=00	~~12361480.00~~ 12089535=00	0.00
Below 18.28%				2670265.00							
Agreement Amount				11937311.00							

Assistant Engineer Gr.I
P.W. Sub Division
Deori

Executive Engineer
E.G.S. (P.W.) Division
GONDIA

परिशिष्ट - ब

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक १ ऑक्टोबर २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी १२-०० वाजता सुरू होऊन दुपारी २-२० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(६) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(७) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स

(८) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. उत्तमसिंह चव्हाण, सचिव

(२) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार

(३) श्रीमती मेघना तळेकर-इटकेलवार, उप सचिव

(४) श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय, मुंबई

श्रीमती शिला जोग, प्रधान महालेखाकार,नागपूर

वित्त विभाग, मंत्रालय

श्री. बिजयकुमार, प्रधान सचिव, वित्तीय सुधारणा

साक्षीदार :

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय

(२) श्री. उज्वल उके, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय

(३) श्री. राजेशकुमार, प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग, मंत्रालय

(४) श्री. व्ही. के. गौतम, प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान) सामान्य प्रशासन विभाग

(५) श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय

(६) डॉ. विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी, गोंदिया

(७) श्री. दिलीप गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, गोंदिया

(८) श्री. रणजितसिंह देओल, आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे

(९) डॉ. हेमत वसेकर, संचालक, यशदा

(१०) श्री. विजय रोंढे, प्रभारी प्रकल्प संचालक, गोंदिया

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.४.१ संदर्भात प्रधान सचिव, नियोजन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, पाणीपुरवठा, माहिती व तंत्रज्ञान, शालेय शिक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ४ नोव्हेंबर २०१५

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ४ नोव्हेंबर २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११-३० वाजता सुरू होऊन दुपारी २-३५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(८) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

(९) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१०) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(११) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(१२) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(१३) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(१४) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(१५) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.

(१६) श्री. संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,

(२) श्री. सो.न. सानप, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय, नागपूर

श्रीमती शिला जोग, महालेखाकार

वित्त विभाग, मंत्रालय

श्री. सिताराम कुंटे, सचिव

साक्षीदार :

१. श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. श्री. दिपक कपूर, सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई.

३. श्री. एस. बी. तामसेकर, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.

४. श्री. राजगोपाल देवरा, सचिव, रोजगार हमी योजना विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. श्री. प्रभाकर देशमुख, सचिव, जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

६. श्री. मंगेष मोहिते, अपर जिल्हाधिकारी, गोंदिया.

७. श्री. दिलीप गावडे, मु.का.अ., गोंदिया

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.१ संदर्भात प्रधान सचिव, नियोजन, शालेय शिक्षण, अन्न व नागरी पुरवठा, सार्वजनिक बांधकाम, रोजगार हमी योजना, जलसंधारण विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०१५

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११-३० वाजता सुरू होऊन दुपारी २-२५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

(८) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(९) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१०) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(११) श्री. संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव

(३) श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय, नागपूर

श्रीमती शिला जोग, महालेखाकार

वित्त विभाग, मंत्रालय

श्रीमती मनिषा वर्मा, सचिव

साक्षीदार :

विभागीय अधिकारी

श्रीमती सुजाता सौनिक, प्रधान सचिव, सा.आ.वि.

श्रीमती कुंदन, मिशन डायरेक्टर, एनएचएम

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.१ संदर्भात प्रधान सचिव, नियोजन व सार्वजनिक आरोग्य विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक १३ जानेवारी २०१६

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १३ जानेवारी २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी १२-०० वाजता सुरू होऊन दुपारी २-२० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(६) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(७) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(८) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(९) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(१०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(११) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(१२) श्री. संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

विभागीय प्रतिनिधी, आरोग्य विभाग :

(१) श्रीमती सुजाता सौनिक, प्रधान सचिव,

(२) श्रीमती आय. ए. कुंदन, अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान व आयुक्त (कुटुंब कल्याण),

(३) श्री. दिलीप गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ४.१ संदर्भात प्रधान सचिव, नियोजन व सार्वजनिक आरोग्य विभाग यांची साक्ष घेतली.